गुरुलिंगजंगम स्वामिकृपेची छाया
सर्वां परोपरीची

# चिमड संप्रदाय

प्रा. डॉ. के. वा. आपटे

# प्रकाशकाचे शब्द

श्रीक्षेत्र देवर निंबरगी येथील भगवान श्रीसद्गुरू श्रीनारायणराव ऊर्फ श्रीगुरुलिंगजंगम महाराज हे आमच्या चिमड संप्रदायाचे मूळ संस्थापक आहेत. श्रीनिंबरगीकरमहाराजांचे श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज हे पट्टशिष्य झाले. श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांची समाधी श्रीक्षेत्र चिमड येथे आहे. या श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांचे दोन पट्टशिष्य झाले. श्रीरामचंद्रावजीमहाराज यरगट्टीकर ऊर्फ चिमडमहाराज व श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर. यांपैकी श्रीचिमडमहाराजांचेपासून आमचा चिमड संप्रदाय सुरू झाला.

श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराजांनी देह ठेवल्यावर श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे आज्ञेने श्रीचिमडमहाराजांनी श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांची समाधी बांधली व दरवर्षी रथोत्सव सुरू केला व तो रथोत्सव आजतागायत चिमड येथे उत्साहात सुरू आहे. या उत्सवाला श्रीनिंबरगीकरमहाराज स्वत: येत असत. त्यानंतर त्यांचे अधिकारी नातू श्रीनागाप्पाण्णामहाराज व पणतू श्रीगुरुलिंगप्पामहाराज हे येत असत. इंचगिरी संप्रदायाचे संस्थापक श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर यांना श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराजांचा अनुग्रह असल्याने श्रीनिंबरगीकरमहाराजांनी श्रीभाऊसाहेबमहाराज यांना सांगितले होते की, ''भाऊराया, तुझ्या गुरूची समाधी चिमडला आहे तेथे तू जात जा.'' त्याप्रमाणे श्रीभाऊसाहेबमहाराज चिमडास येत असत. अशा या श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराजांना श्रीनिंबरगीकरमहाराजांनी देव करून बसविले.

श्रीचिमडमहाराजांनी देह ठेवल्यावर त्यांचे अधिकारी शिष्य भगवान श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस व चिमडच्या महाराजांचे अधिकारसंपन्न चिरंजीव श्रीसद्गुरू श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांनी चिमड संप्रदाय व चिमडचे महत्त्व वाढविले. माझे पणजोबा ती. प. पू. श्रीमामामहाराज केळकर, श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे अधिकारी चिरंजीव प. पू. श्रीदादामहाराज कोटणीस व माझे आजोबा ती. प. पू. श्रीदासराममहाराज केळकर यांनी चिमड संप्रदायाची कीर्ती वाढविली असे या चिमड संप्रदायाचे अलौकिक महत्त्व आहे.

चिमड संप्रदाय हा स्वरूप संप्रदाय आहे. खऱ्या स्वरूपाचा साक्षात्कार घडवून देणारा संप्रदाय आहे. अशा या संप्रदायातील सिद्ध-सत्पुरुषांची चरित्रे एकत्रितरीत्या प्रकाशित झाल्यास त्यांच्या त्यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी त्यांच्या चरित्राचे वाचन झाल्यास त्यांचे पुण्यस्मरण होईल यादृष्टीने हा ग्रंथ प्रकाशित करावा असे मला वाटते. अशा या चिमड संप्रदायाचा सारा इतिहास माझे आजोबा ती. प. पू. श्रीदासराममहाराज केळकर यांचे अंतरंगातील निष्ठावंत शिष्य प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी याआधीच लिहून ठेवलेला आहे असे कळल्यावर मी प्रा. डॉ. के. वा. आपटे यांना भेटलो व त्यांचेशी याबाबत बोलणे केले. त्यांनी याबाबत होकार दिल्याबरोबर हा ग्रंथ प्रकाशित करावयाचा असा निर्णय माझे तीर्थरूप प. पू. अण्णा यांच्या संमतीने घेतला.

या प्रकाशनामध्ये माझ्या मातोश्री ती. प. पू. रोहिणी केळकर, माझे तीर्थरूप अप्पाकाका व सौ. सुनीताकाकू, तीर्थरूप तात्याकाका व सौ. अर्चनाकाकू, तीर्थरूप नानाकाका व सौ. अपर्णाकाकू या सर्वांचे आशीर्वाद आहेत आणि त्याचे दृश्यफल म्हणजे प्रस्तुतचा ग्रंथ होय.

"चिमड संप्रदाय" हा ग्रंथ साकार होण्यामागे अनेकांचे सहकार्य लाभले आहे. प्रथमत: ज्या प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी हा ग्रंथ लिहून दिला त्यांचे ऋण आमचेवर सर्वात जास्त आहे. या ग्रंथाची मुद्रिते तपासण्याचे अत्यंत किचकट काम आमच्या प्रा. डॉ. के. वा. आपटे यांचे चिरंजीव श्री. नारायण आपटे व आमचे श्री. बाळासाहेब गोखले यांनी केले आहे. याकरिता त्यांनी खूप वेळ दिला आहे. आमचे श्री. मधुसूदन काटकर यांचेही या कामी सहकार्य झाले आहे. गजेंद्र प्रिंटिंग प्रेस, सांगली या प्रेसचे मालक श्री. सतीश लोखंडे, त्यांचे चिरंजीव अमृत व प्रेसमधील कर्मचारी यांनी काळवेळेकडे न पहाता त्यातही अनेक अडचणी निर्माण झाल्या असतानाही हा ग्रंथ साकार करण्याचे काम अत्यंत चांगल्या प्रकारे केले आहे. या सर्वांचाच मी ऋणी आहे.

या प्रसंगी माझे आजोबा ती. प. पू. श्रीसद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर व माझी आजी ती. प. पू. सौ. सीतावहिनी केळकर यांनी माझेवर अपरंपार प्रेम केले याची आठवण होते. आजोबा-आजींनी भगवान श्रीसद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज यांच्या या संप्रदायासाठी फार मोठी सेवा केली. अपरंपार कष्ट सोसले. त्यातील काही सेवा तरी आमचे हातून घडावी अशी श्रीमहाराजांचे चरणी शतश: प्रार्थना करतो.

या जगात आपले काही नाही. जे काही आहे ते सर्व श्रीमहाराजांचे आहे. श्रीचिमडमहाराजांचे उक्तीनुसार

*"येथे माझे काहीच नाही। निश्चय मम अंतरी। आलो तुमचे द्वारी ॥"*

हेच शेवटी खरे आहे.

अशा या प्रस्तुत ग्रंथातील सिद्ध-सत्पुरुषांनी सांगितलेल्या आचारांचा, विचारांचा, वचनांचा काही भाग आमच्यात मुरावा अशी प्रार्थना भगवान श्रीसद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज, श्रीचिमडमहाराज, श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर, श्रीमामामहाराज केळकर व श्रीदासराममहाराज केळकर यांचे चरणी करून येथेच थांबतो.

*॥ राजाधिराज श्रीसद्गुरुनाथ महाराज की जय ॥*

सांगली
अनंत चतुर्दशी
१७/९/२००५

दीपक चंद्रशेखर केळकर

# लेखकाचे मनोगत

प्राचीन काळापासून भारतामध्ये परमार्थाचे विविध संप्रदाय प्रचलित होते. अशा संप्रदायांत मोडणारा अलीकडचा संप्रदाय म्हणजे चिमड संप्रदाय. कर्नाटकातील चिमड नावाचे गावावरून या संप्रदायाला चिमड संप्रदाय असे नाव पडले. याचा प्रचार कर्नाटक व महाराष्ट्रामध्ये आहे. या संप्रदायात फार मोठे संत-सज्जन होऊन गेले. त्यांमध्ये श्रीरामराय गोविंद केळकर ऊर्फ श्रीदासराममहाराज हे एक होते. ते आयुष्यभर सांगलीत राहिले आणि मुमक्षु-जनांना सिद्ध संप्रदायाचे साधन समजावून सांगून, त्यांनी त्यांच्या उद्धाराचा मार्ग मोकळा करून दिला. तात्यासाहेब कोटणीसमहाराजांनी त्यांना कीर्तनाचा आशीर्वाद दिला होता. मामामहाराज केळकर या आपल्या पित्याच्या आज्ञेप्रमाणे त्यांनी आपल्या घरी एकोणचाळीस वर्षे दररोज संध्याकाळी नित्य हरिकीर्तन केले. त्या निमित्ताने अनेक लोक त्यांच्याकडे येत असत.

इ. स. १९८३ चे मध्यास, कोल्हापूरच्या 'ज्ञानप्रसाद' या मासिकाचे संपादक मा. श्री. संकनवाडे हे श्रीदासराममहाराजांच्या दर्शनास आले होते. त्यांनी त्यावेळी श्रीदासराममहाराजांचेकडून उपदेशानुग्रह घेतला, असे कळले. बोलता बोलता त्यांनी श्रीदासराममहाराजांना विनंती केली, "महाराज, आपण चिमड सांप्रदायिक आहात. त्या चिमड संप्रदायातील साधुसंत व या संप्रदायाचे तत्त्वज्ञान, इत्यादीवरील काही लेख आपण मला लिहून द्यावेत. ते मी माझ्या 'ज्ञानप्रसाद' मासिकात प्रकाशित करीन." ही विनंती दासराममहाराजांनी मान्य केली. परंतु त्यांनी लेखनाचे काम मजकडे सोपविले. श्रीदासरामहाराजांच्या आज्ञेनुसार हे काम मी सुरू केले. आणि पंधरा प्रकरणे असणारा प्रस्तुतचा ग्रंथ सिद्ध झाला. याला "चिमड संप्रदाय"(इतिहास, साहित्य, तत्त्वज्ञान, साधन व साक्षात्कार) असे नाव देण्यात आले. हा ग्रंथ इ. स. १९८३ मध्ये लिहिला गेला होता. साहजिकच इ. स. १९८३ च्या दीपावलीअखेर जी माहिती मला उपलब्ध झाली तिला अनुसरून हा ग्रंथ सिद्ध झाला आहे, हे लक्षात असावे.

पुढे श्रीदासरामहाराजांच्या सूचनेनुसार हा संपूर्ण ग्रंथ 'ज्ञानप्रसाद' मासिकाच्या संपादकाकडे पाठविण्यात आला. त्यानंतर ज्ञानप्रसाद डिसेंबर, १९८३ ते जुलै, १९९० या प्रदीर्घ काळात तो थोडा थोडा प्रकाशित होत गेला. तथापि या मासिकातील प्रकाशनाचे हे काम अत्यंत असमाधानकारक झाले होते. कारण अनेक प्रकरणांची चुकीची शीर्षके, असंख्य मुद्रणदोष व क्वचित् संपादकाची मल्लिनाथी, इत्यादी दोषांनी हे प्रकाशन भरले होते. आणि त्या बाबतीत श्रीदासराममहाराज व मी काहीच करू शकलो नाही.

अशा स्थितीत काही वर्षे निघून गेली. एकदा अचानक कोल्हापूरचे प्रा. मा. कृष्णा गुरव सर हे मला भेटावयास आले. ते 'कैवल्य' नावाचे वार्षिक काढणार होते आणि त्यासाठी त्यांना माझ्याकडून काही लेखन हवे होते. ते मी त्यांना यथाशक्ति दिले. बोलता बोलता

चिमड संप्रदायावरील माझ्या लेखांची वरील कहाणी मी प्रा. कृष्णा गुरव सरांना सांगितली. तेव्हा ते म्हणाले, ''सर, तुम्ही काळजी करू नका. मूळ ग्रंथाची स्थळप्रत तुमच्याकडे असल्यास ती मला द्या. त्यावरून मी हा संपूर्ण ग्रंथ मी माझ्या 'कैवल्य' च्या वार्षिक अंकात प्रसिद्ध करीन.'' त्यांच्या या आश्वासनाने मला बरे वाटले. मी त्यांना म्हटले, ''हा ग्रंथ इ. स. १९८३ च्या दिवाळीपर्यंतची माहिती देणारा आहे. चालेल ना?'' गुरव सर म्हणाले, ''चालेल. हा ग्रंथ आहे त्या स्वरूपात आपण लोकांपुढे मांडू.''

त्यानंतर मूळ ग्रंथाची स्थळप्रत मी शोधून काढली. ही प्रत माझे चिरंजीव यशवंत यांनी तयार करून ठेवली होती. पण ती मुद्रणप्रत या दृष्टीने लिहिलेली नव्हती. तेव्हा त्या स्थळप्रतीवरून मुद्रणप्रत तयार करण्याचे काम माझे दुसरे पुत्र श्री. नारायण यांनी केले. मग ही मुद्रणप्रत प्रा. गुरव सर यांच्याकडे पाठविण्यात आली. आणि मग प्रा. कृष्णा गुरव सर यांनी हा संपूर्ण ग्रंथ फार सुबक रीतीने इ. स. २००२ ते २००४ च्या ''कैवल्य'' दीपावली वार्षिकांकांत प्रसिद्ध केला.

इकडे श्रीदासराममहाराजांचे नातू श्री. दीपक यांना काही कारणांनी अशी प्रेरणा झाली की आपले पणजोबा, आजोबा, वडील व आपण हे ज्या चिमड संप्रदायाचे अनुयायी आहोत त्याची माहिती संकलित स्वरूपात उपलब्ध व्हावी. त्यांनी मला विचारले. मी त्यांना वरील सर्व हकीकत सांगितली. तेव्हा दीपक म्हणाले, ''काका, हा ग्रंथच मी आहे त्या स्वरूपात पुस्तकरूपाने प्रकाशित करतो.'' मला त्यांची कल्पना आवडली.त्याप्रमाणे श्री. दीपक हे चिमड संप्रदायावरचा प्रस्तुतचा ग्रंथ आज पुस्तकरूपाने जनतेपुढे ठेवीत आहेत. त्यांचे कौतुक करावयास हवे. या त्यांच्या कार्यास त्यांचे पिताजी चंद्रशेखर यांचे संपूर्ण सहकार्य आहे हे सांगावयास नकोच.

या ग्रंथाचे लेखन करताना ज्या पूर्वसूरींच्या ग्रंथांचा मला उपयोग झाला त्या सर्वांचा मी आभारी आहे. ग्रंथाच्या प्रती करण्याचे काम माझे चिरंजीव श्री. यशवंत व श्री. नारायण यांनी केले. त्यांचाही मी आभारी आहे. लेखन करतेसमयी माझी पत्नी सौ. माया हिने मला सवड काढून दिली, याबद्दल तिचेही आभार मानावयास हवेत. हा ग्रंथ ज्यावेळी लिहिला गेला, त्यावेळी श्रीदासराममहाराज विद्यमान होते. आता मात्र ते 'सिद्धसाधनाने स्वये ब्रह्मचि' होऊन गेले आहेत. माझ्या लेखनाच्या मागे त्यांचे आशीर्वाद असत, ते आताही आहेतच. त्यांची मला यावेळी प्रकर्षाने आठवण येत आहे. श्रीदासराममहाराजांचे नातू श्री. दीपक यांनी प्रस्तुतचा ग्रंथ फार सुबक स्वरूपात प्रस्तुत केला आहे. त्यांचाही मी आभारी आहे. प्रस्तुत ग्रंथ हा पुस्तकरूपाने छापण्यास 'कैवल्य' वार्षिकांकाचे संपादक प्रा. कृष्णा गुरव सर यांनी परवानगी दिली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

मानव हा प्रमादशील प्राणी आहे. तेव्हा शक्यता अशी आहे की या ग्रंथात काही त्रुटी राहून गेल्या असतील. तरी, ''न्यून ते पुरते। अधिक ते सरते॥'' करून घ्यावे, अशी माझी तज्ज्ञ वाचकांना विनंती आहे.

◆◆◆

प्रकरण १

# चिमड संप्रदायाची पूर्वपीठिका

अतिप्राचीन काळापासून ऋषि-मुनी आणि सिद्ध-साधू यांचे आध्यात्मिक कार्य भारतात अव्याहतपणे चालू आहे. काही सत्पुरुष हे आत्मसाक्षात्कार झाल्यावर बाह्य जगाकडे लक्ष न देता स्वतःच्याच साक्षात्काराच्या आनंदात रंगून जातात. काही संत मात्र आपल्याला आत्मसाक्षात्कार झाल्यानंतर आपणांस प्राप्त झालेल्या परमानंदाचा मार्ग जिज्ञासू मुमुक्षु-साधकांना सांगतात. त्यांतील काहींना आपल्याच तोलामोलाचे शिष्य अथवा पुत्र लाभतात आणि नंतर तेही आपल्या गुरूंच्या आज्ञेने इतरांना मार्गदर्शन करतात. अशा प्रकारे ही परमार्थाची परंपरा प्रचलित होते. या परंपरेला 'संप्रदाय' म्हणतात. भारतात प्रचलित असणाऱ्या अनेक संप्रदायांपैकी **'चिमड संप्रदाय'** हा एक महत्त्वाचा संप्रदाय आहे. त्याचा विस्तार प्रामुख्याने दक्षिण भारतातील महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यांत झालेला आहे.

## ✦ चिमड संप्रदाय

चिमड संप्रदायाचे संस्थापक श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर हे होत. ते चिमडमहाराज या नावानेही ओळखले जात. ते एक श्रेष्ठ सत्पुरुष होते. त्यांचा मठ कर्नाटकातील चिमड नावाच्या गावाजवळ होता व आहेही. या ग्राम-नावावरून या संप्रदायाला 'चिमड संप्रदाय' असे नाव पडले. हा संप्रदाय अनेक साधकांना आत्मसाक्षात्कार करवून देऊन, त्यांच्या जीवनांत शांती व समाधान निर्माण करीत आहे. साहजिकच या संप्रदायाचा परिचय करून घेणे मुमुक्षूंना उपयुक्त ठरणार आहे.

## ✦ चिमड संप्रदायाचे सिद्धसाधन

'चिमड संप्रदाय' हा स्वरूप संप्रदाय आहे. स्वरूपाचा म्हणजे आत्म्याच्या स्वरूपाचा साक्षात्कार करून घेऊन साधकाने सुख-रूप होऊन जावे हे या संप्रदायाचे उद्दिष्ट आहे. या आत्मस्वरूपाच्या साक्षात्कारासाठी आवश्यक असणारे सिद्धसाधन या संप्रदायात सांगितले जाते.

सिद्धसाधन म्हणजे सिद्ध अशा पुरुषांपासून प्राप्त झालेले जे साधन, सिद्ध अशा स्वरूपाचे म्हणजे आत्मस्वरूपाचा साक्षात्कार करून देणारे साधन आहे, ते होय. हे सिद्धसाधन चिमडमहाराजांना रघुनाथप्रिय साधुमहाराज या सत्पुरुषाकडून मिळाले. रघुनाथप्रिय साधुमहाराजांना ते साधन नारायणराव निंबरगीकरमहाराजांनी सांगितले. निंबरगीकरमहाराजांना हे साधन काडसिद्ध-मरुळसिद्ध-रेवणसिद्ध या सिद्धांच्या परंपरेतून प्राप्त झाले.

### ✦ सिद्धपरंपरा

सर्व सिद्धांचा मूळ उगम भगवान श्रीशंकरापासून आहे. साहजिकच वर उल्लेखिलेल्या सिद्धपरंपरेचे मूळ शिवशंकर आहे. भगवान सोमेश्वरापासून रेवणसिद्ध प्रगट झाले. रेवणसिद्धांचे शिष्य मरुळसिद्ध आणि रेवणसिद्धांचा अवतार काडसिद्ध किंवा रेवणसिद्धांनाच काही कारणास्तव काडसिद्ध हे नाव प्राप्त झाले. या तीन सिद्धांना येथे 'सिद्धत्रयी' असे म्हटले आहे. हे तीनही सिद्ध वीरशैव पंथाशी संबंधित आहेत.

### ✦ सिद्धत्रयी नाथपंथी होती काय ?

वर निर्दिष्ट केलेले तीनही सिद्ध हे नाथपंथातले होते, असे म्हटले जाते. उदा. - रेवणसिद्ध व मरुळसिद्ध हेही प्रथमतः नाथपंथी होते (ढेरे, गुरु गोरक्षनाथ, पृ. २००). रेवणसिद्ध, मरुळसिद्ध ही वीरशैव मंडळी नाथपंथीय मानली गेली आहेत. काडसिद्धांचाही संबंध नाथपंथाशी आहे (प्र. न. जोशी, नाथसंप्रदाय, पृ. ५७५).

या मताला पोषक म्हणून पुढील गोष्टींचा उल्लेख केला जातो. 'योगिसंप्रदायाविष्कृति' आणि 'नवनाथभक्तिसार' या ग्रंथांत रेवणनाथ हा चमसनारायणाचा अवतार मानला आहे; त्यालाच रेवणसिद्ध हे नाव दिले जाते. तसेच नाथपंथातील नवनाथांची गणना एका मोडक्यातोडक्या संस्कृतात लिहिलेल्या श्लोकात आहे, तो श्लोक असा : गोरक्ष-जालंदर चर्पटाश्च अड्बंग-कानिफ-मच्छिंदराद्याः । चौरंगि-रेवाणक-भर्त्रि-संज्ञा भूम्यां बुभूवुर्नवनाथसिद्धाः ।। या दोन गोष्टींच्या आधारे रेवणसिद्ध हे नाथपंथाचे होते आणि त्यांच्या अनुषंगाने मरुळसिद्ध आणि काडसिद्ध हेही नाथपंथी होते, अशी एक समजूत झाली आहे.

### ✦ सिद्धत्रयी नाथपंथी नव्हती

रेवणसिद्धादी सिद्धत्रयी नाथपंथी होती, ही समजूत बरोबर नाही. असे म्हणण्यास पुढील कारणे आहेत.

१. 'नवनाथभक्तिसार' या ग्रंथाची ऐतिहासिकदृष्ट्या किंमत शून्य आहे, असे वि. ल. भावे (महाराष्ट्र सारस्वत, पृ. ९२९) सांगतात, ते लक्षात घ्यावे. तसेच 'नवनाथभक्तिसार' हा ग्रंथ कोणत्याही दृष्टीने प्रमाणभूत मानणे धोक्याचे आहे, हे ढेरे (गुरु गोरक्षनाथ, पृ. २४) यांचे म्हणणेही ध्यानात घ्यावयास हवे. खेरीज आणखी असे- नवनाथभक्तिसार सांगते की, रेवणनाथ हे रेवा नदीच्या तीरी जन्मले; पुढे त्यांची दत्तात्रेय व मत्स्येंद्रनाथ यांच्याशी गाठ पडली. याउलट वीरशैव पंथाचे ग्रंथ सांगतात की, रेवणसिद्ध हे भगवान शंकराच्या एका मुखातून किंवा सोमेश्वराच्या पिंडीतून प्रगट झाले. तसेच

त्या दोघांची पुढील हकीकतही खूपच वेगळी आहे. तेव्हा नवनाथभक्तिसारातले रेवणनाथ म्हणजे वीरशैव पंथातले रेवणसिद्ध, असे म्हणता येणार नाही.

२. नवनाथांमध्ये रेवणनाथांची गणना करणाऱ्या श्लोकाचे बाबतीत शक्यता अशी दिसते की, नवनाथभक्तिसाराला अनुसरून कुणीतरी तो श्लोक तयार केला. खेरीज या श्लोकात रेवाणक म्हणजे रेवण असे मानावे लागते, ते वेगळेच. तेव्हा हा श्लोकही रेवणसिद्धांचे नाथपंथीयत्व सिद्ध करण्यास प्रमाणभूत मानता येणार नाही, हे स्पष्ट होते.

३. नाथ संप्रदायात नवनाथांच्या अनेक याद्या उपलब्ध आहेत. त्यांत पुष्कळ फरक आहेत आणि बहुतेक याद्यांमध्ये रेवणनाथाचे नाव नवनाथांच्या गणनेत येतच नाही. उदा :- 'गोरक्षसिद्धांतसंग्रह' या ग्रंथातील नवनाथांच्या गणनेत रेवणनाथ नाही. खेरीज नाथपंथात दिल्या जाणाऱ्या ८४ सिद्धांच्या गणनेतही रेवणनाथ हे नाव येत नाही (पाहा : गुरु गोरक्षनाथ, पृ. ११९-१२४).

४. वर उद्धृत केलेल्या संस्कृत श्लोकात सांगितलेले नवनाथ हे नाथपंथातले 'जबर पुढारी' समजले जातात, असे 'नाथपंथपरिचय' (पृ. १८) हा ग्रंथ सांगतो. पण गंमत अशी, नाथपंथाच्या ज्या बारा शाखा झाल्या (गुरु गोरक्षनाथ, पृ. ६०-६५), त्यांमध्ये कुठेही रेवणनाथाची शाखा नाही. तसेच नाथपंथपरिचय हा ग्रंथ सांगतो की, नाथ संप्रदायात १८ आखाडे झाले आणि नाथ संप्रदायी लोकांनी १८ पंथ काढले (पृ.१४). पण मौज अशी की, नाथपंथाचा 'जबर पुढारी' मानल्या गेलेल्या रेवणनाथाच्या नावाचा एकही 'आखाडा' व 'पंथ' दिसत नाही.

५. सिद्ध या पदवीवरूनही रेवणसिद्ध, इत्यादी सिद्धत्रयीचा नाथपंथ सिद्ध करता येत नाही. कारण सिद्ध ही पदवी नाथपंथाचे वैशिष्ट्य नाही. उलट नाथपंथाच्या उदयापूर्वीपासून सिद्ध पदवी वापरात होती, हे दिसून येते.

६. नाथपंथीयांच्या भिन्न भिन्न याद्यांमध्ये मरुळसिद्ध व काडसिद्ध ही नावेही कुठे आढळत नाहीत.

७. या संदर्भात ढेरे म्हणतात, "रेवण, मरुळ व् काडसिद्ध यांचा संबंध नाथपरंपरा व लिंगायतपरंपरा या दोहोंकडे लावला जातो. याविषयी अधिक संशोधनाची आवश्यकता आहे "(गुरु गोरक्षनाथ, पृ. २००). म्हणजे रेवणसिद्धादी सिद्धत्रयीचा नाथपंथाशी जोडला जाणारा संबंध निश्चित नसून डळमळीत आहे, हे स्पष्ट होते. तेव्हा वर दिलेल्या कारणांवरून या सिद्धत्रयीचा संबंध नाथपंथाशी मानण्याचे कारणच उरत नाही.

### ✦ काय झाले असावे ?

या संदर्भात वस्तुस्थिती अशी दिसते : नाथपंथामध्ये अन्य संप्रदायांतील महनीय व्यक्तींचा समावेश करण्याचे प्रयत्न झाले, ही गोष्ट ढेरे पुढील शब्दांत मांडतात, ''निरनिराळ्या परंपरांत स्थानिक महत्त्वानुसार व कमी जास्त आदरभावनेनुसार (नाथपंथातील) या गणना झाल्या असाव्यात हे उघड आहे'' (गुरु गोरक्षनाथ, पृ. ११७). असा प्रकार रेवणसिद्धादी तीन सिद्धांच्या बाबतीत झाला. म्हणजे असे : लिंगायतांच्या धर्मग्रंथानुसार रेवणसिद्ध आणि मरुळसिद्ध हे वीरशैव संप्रदायाचे प्रमुख आचार्य होते. त्यांत रेवणसिद्ध हे प्रमुख होते. त्यामुळे त्यांना नाथपंथी बनविण्याचा प्रयत्न झाला. अशा स्थितीत, ''नाथपंथी रेवणनाथ इकडल्या देशी आल्यावर रेवणसिद्ध म्हणून प्रसिद्ध झाले'' हे डॉ. रा. द. रानडे (पाथवे टू गॉड इन कन्नड लिटरेचर, पृ. १५) यांचे म्हणणे मान्य करता येण्यासारखे नाही.

आता, रेवणसिद्ध नाथपंथी नव्हते, तर त्यांच्याशी संबंधित असणारे मरुळसिद्ध हे नाथपंथी नव्हते, हे उघड आहे आणि रेवणसिद्ध व मरुळसिद्ध हे दोघेही नाथ संप्रदायी नव्हते, तर त्यांच्याशी संबंधित असणारे काडसिद्ध हेही नाथपंथातील नव्हते, हे स्पष्ट होते.

### ✦ सिद्धत्रयी कोण होती ?

मग ही सिद्धत्रयी कोणत्या परंपरेतील होती, अशा प्रश्न उपस्थित होईल. त्याचे उत्तर असे : फार प्राचीन काळापासून भारतात भगवान शिवाची उपासना चालू आहे. शिवाच्या उपासकांमध्ये कालांतराने अनेक पंथ आणि उपपंथ प्रचारात आले. त्यांमध्ये वीरशैव हा एक पंथ होता. वीरशैवांच्या परंपरेनुसार वीरशैव धर्म हा मूळ पाच आचार्यांनी स्थापन केला. त्यांना पंचमहाआचार्य म्हणतात (लिंगधारणचंद्रिका, पृ. ३६१). त्यांनाच अनेकदा पंचमहासिद्ध म्हणतात (रेवणसिद्धमहिमा, पृ. ६-७). हे पाच महासिद्ध असे : रेवण, मरुळ, एकोराम, पंडित आणि विश्व. कधी कधी आचार्य व आराध्य हे शब्द समानार्थी म्हणून वापरले जातात (श्रीकरभाष्य, पृ. १०). त्याला धरून या पाच आचार्यांची वा सिद्धांची नावे रेवणाराध्य, मरुळाराध्य, एकोरामाराध्य, पंडिताराध्य आणि विश्वाराध्य अशीही दिली जातात (लिंगधारणचंद्रिका, पृ. ३६). आणि वीरशैवपंथाचे हे पाचही आचार्य-संस्थापक हे आराध्य ब्राह्मण होते, असेही सांगितले जाते (कल्चरल हिस्टरी ऑफ कर्नाटक, पृ. १६७).

पंचआराध्यांनी वीरशैवमताला एक विशिष्ट रूप दिले. नंतर बसव, इत्यादींनी त्याला थोडे वेगळे रूप दिले (क. हि. ऑफ कर्नाटक, पृ. १६७). रेवण, मरुळ, एकोराम, विश्व आणि

पंडित यांनी ब्राह्मणी परंपरेचा समन्वय वीरशैवमताशी केला, असे नीळकंठशास्त्रींचे मत आहे (सोर्सेस ऑफ कर्नाटक हिस्टरी, पृ. २४, खंड १); तर करमरकरांच्या मते, पाच आचार्यांनी वीरशैव संप्रदायाचा साक्षात्कारवाद प्रचारात आणला. तर बसवेश्वरांनी त्याला तत्त्वज्ञानात्मक आधार दिला (क. हि. ऑफ कर्नाटक, पृ. १६७). ते कसेही असो. शं. बा. जोशी म्हणतात त्याप्रमाणे, ''आजच्या वीरशैवांत ऊर्फ लिंगायतांत दोन पक्ष आहेत. एक पक्ष आपणास पंचाचार्यांचा म्हणवतो; दुसरा श्रीबसवअळुमाच्या शून्य सिंहासनाच्या पंथात मोडतो'' (मऱ्हाटी संस्कृति, पृ. ११६).

वीरशैव संप्रदायाचे जे रेवण, मरुळ इत्यादी पाच आचार्य आहेत, ते सर्व वीरशैवांतील गोत्रप्रवर्तक आहेत (हँडबुक ऑफ वीरशैवीझम, पृ. १७). आणि वीरशैव घराणी जशी कर्नाटकात आहेत, तशीच ती महाराष्ट्रातील सांगली, कोल्हापूर, सातारा या जिल्ह्यांतही आहेत.

आता, रेवणसिद्ध, मरुळसिद्ध व काडसिद्ध हे नाव असणाऱ्या अनेक व्यक्ती जरी चरित्रकोशांत व वाङ्‌मयकोशांत आढळतात, तरी चिमड संप्रदायाच्या पूर्वपीठिकेत असणारे रेवणसिद्ध व मरुळसिद्ध हे वीरशैवपंथाच्या पंचमहासिद्धांपैकी दोघे असून, त्या दोघांशी संबंधित असे काडसिद्ध आहेत.

## ✦ सिद्धत्रयीविषयी सामान्य माहिती

वर पाहिल्याप्रमाणे, रेवणसिद्ध व मरुळसिद्ध हे वीरशैव संप्रदायाच्या पंचमहासिद्धांपैकी होते. त्यांच्याबद्दल वीरशैवपंथी ग्रंथ सांगतात : शिवाच्या पाच मुखांतून रेवणसिद्ध, मरुळसिद्ध इत्यादी पाच आचार्य प्रगट झाले (सुप्रबोधागम) किंवा हे पाच आचार्य शंकराच्या पाच स्थावर लिंगांतून आविर्भूत झाले (स्वायंभुवागम) अथवा कोल्लिपाकी येथील सोमेशलिंगातून रेवणसिद्ध प्रगट झाले, तर वटक्षेत्रीच्या सिद्धेशलिंगातून मरुळसिद्ध उद्‌भवले (पाहा : लिंगधारणचंद्रिका, पृ. ३६२-३६३).

'सन्मार्गदीप' नावाचा ग्रंथ स्कंदपुराणाचा हवाला देऊन सांगतो :- रेवणसिद्ध सोमेश्वराच्या पिंडीतून उद्‌भवले. त्यांचे करस्थळी मरुळसिद्ध व त्यांचे करस्थळी काडसिद्ध अवतरले (पृ. ५). 'कैवल्यपुरुष, खंड १' यामध्येही अशीच माहिती आहे. तर 'सिद्धांतसार' नावाच्या ग्रंथानुसार, सोमेश्वरलिंगातून रेवणसिद्ध आविर्भूत झाले आणि रेवणसिद्धांपासून मरुळसिद्ध उद्भवले. पुढे रेवणसिद्ध हे करवीरक्षेत्रात गेले असता तेथे त्यांनी केलेल्या एका विशिष्ट कृत्यामुळे त्यांनाच काडसिद्ध हे नाव पडले (पाहा : सन्मार्गदीप, पृ. ५).

या सिद्धत्रयीच्या नावाचे मठ आजही दाखवले जातात. कोल्लिपाकी (= हल्लीचे

बाळेहळ्ळी, बाळेहोन्नूर) गावी रेवणसिद्धांच्या नावाचा मठ आहे. उज्जनी (बेळ्ळारी जिल्हा) गावात मरुळसिद्धांच्या नावाचा मठ आहे. तर करवीर (= कोल्हापूर) जवळील सिद्धगिरी या स्थानी काडसिद्धांच्या नावाचा मठ आहे.

●●●

## प्रकरण १ : संदर्भसूची


१. **कल्चरल हिस्टरी ऑफ कर्नाटक**, करमरकर, धारवाड, १९४७
२. **कैवल्यपुरुष, खंड १**, ह. पां. कोटणीस, सांगली, १९३३
३. **गुरु गोरक्षनाथ**, रा. चिं. ढेरे, मुंबई, १९५९
४. **नाथपंथपरिचय**, योगप्रचारिणी महासभा, वाराणसी
५. **नाथसंप्रदाय**, प्र. न. जोशी, ठाणे, १९७७
६. **पाथवे टू गॉड इन कन्नड लिटरेचर**, रा. द. रानडे, मुंबई, १९६०
७. **मऱ्हाटी संस्कृति**, शं. बा. जोशी, द्वितीय आवृत्ती, मुंबई, १९८०
८. **महाराष्ट्र सारस्वत**, वि. ल. भावे, पाचवी आवृत्ती, मुंबई, १९६३
९. **रेवणसिद्ध–महिमाग्रंथ**, नारायणराव पवार, विटा, १९७७
१०. **लिंगधारणचंद्रिका**, साखरे, ठळकवाडी, १९४२
११. **श्रीकरभाष्य, खंड १**, हयवदनराव, बंगळूर, १९३६
१२. **सन्मार्गदीप**, समर्थभक्त, चिमड, १९३३
१३. **सोर्सेस ऑफ कर्नाटक हिस्टरी, खंड १**, नीळकंठशास्त्री, मैसूर, १९४०
१४. **हँडबुक ऑफ वीरशैवीझम**, नंदीमठ, धारवाड १९४२


▲▲▲

प्रकरण २

# सिद्धत्रयीची माहिती

रेवणसिद्ध, मरुळसिद्ध आणि काडसिद्ध या सिद्धत्रयीची माहिती भिन्न भिन्न ग्रंथांतून आलेली आहे. ती संक्षिप्तपणे पुढीलप्रमाणे देता येईल.

**१. रेवणसिद्ध :**

तीनही सिद्धांत रेवणसिद्ध हे श्रेष्ठ आहेत. रेवणसिद्ध-महिमाग्रंथ यावरून त्यांच्याविषयी कळते, ते असे :- एकदा अनेक सिद्धांसह रेवणसिद्ध आणि मरुळसिद्ध हे तीर्थयात्रा करीत करवीर क्षेत्री आले. मरुळसिद्ध सोडून बाकीचे सर्व बाहेर थांबले. मरुळसिद्ध मात्र पंचगंगा नदीत स्नान करण्यास गेले. ते स्नान करून येतात, तोच त्यांना काही रक्षकांनी अंबाबाईकडे नेले. करवीरात असणाऱ्या अंबाबाईचा असा एक पण होता - ''जो कोणी सिद्धसाधू विष पचवून दाखवील, त्यालाच करवीरात भिक्षा मागता येईल.'' ही गोष्ट ज्यांना जमली नव्हती, अशा अनेक सिद्धसंतांना तिने बंदिवासात टाकले होते आणि साधूंना भिक्षेत वाढण्यासाठी म्हणून तिने सात रांजण विषाने भरून ठेवले होते. सेवकांनी मरुळसिद्धांना तिच्याजवळ आणताच तिने नेहमीच्या प्रथेप्रमाणे त्यांच्या भिक्षापात्रात विष वाढले. ते विष भिक्षापात्रात पडताच त्याचे तीर्थ झाले. ते पाहून अंबाबाईला आश्चर्य वाटले. तेवढ्यात, ''गुरूंच्या आज्ञेविना मी भिक्षा कशी सेवन करू ?'' असा प्रश्न करून मरुळसिद्ध तेथून निघाले. ते थेट रेवणसिद्धांकडे आले. करवीरात घडलेला सर्व वृत्तांत त्यांनी रेवणसिद्धांना सांगितला (पृ. १२-१३).

अनेक सिद्ध बंदिवासात पडले आहेत, हे समजताच त्यांची सुटका करण्याच्या उद्देशाने रेवणसिद्ध स्वत:च अंबाबाईकडे गेले. आल्या आल्या त्यांनी अंगणात दाण्‌दिशी त्रिशूळ आदळला व ''माई, भिक्षा '' असा पुकारा गेला. त्यांनाही अंबाबाईने विष वाढले. रेवणसिद्धांनी ते प्राशन करून टाकले. अंबाबाईने पुन्हा विष वाढले. तेही रेवणसिद्धांनी पचवून टाकले. असे होता होता विषाचे सातही रांजण संपून गेले, तरी रेवणसिद्ध जसेच्या तसे होते. तेव्हा अंबाबाई त्यांना शरण आली व क्षमा मागू लागली. ''बंदिवासातील सर्व सिद्धांना तात्काळ सोडून दे,'' रेवणसिद्धांनी तिला आज्ञापिले. तिने लगेच तसे केले. मग ती रेवणसिद्धांना विचारू लागली, ''महाराज, आपण कोठून आलात ?'' ''काशीहून,'' रेवणसिद्ध उत्तरले. ''अगस्ती मुनीही तेथूनच इकडे आले होते,'' ती बोलली. ''अगस्ती सध्या कोठे आहेत ?'' या रेवणसिद्धांच्या प्रश्नावर तिने सांगितले, ''ते सध्या कृष्णाकोयनेच्या प्रीतिसंगमाच्या पूर्वेला वीस कोसांवर कर्दलीवनात आहेत'' (पृ. १३).

रेवणसिद्ध अगस्ती ऋषींस भेटण्यास निघाले. प्रवासात ते साळशिंगे गावी पोचले. त्यावेळी रात्र झाल्याने गावच्या पाटलाच्या परवानगीने ते चावडीत उतरले. योगायोगाने त्याच रात्री गावात चोरी झाली. सकाळी चावडीत येऊन पाटील रेवणसिद्धांवर चोरीचा आरोप करू लागला. रेवणसिद्ध म्हणाले, "मी चोर नाही. मी तुला चोराचा पत्ता लावून देतो." त्याप्रमाणे रेवणसिद्धांनी केले. पाटलाला चोर व चोरलेले द्रव्य दोन्ही सापडले (पृ. १४).

पुढे रेवणसिद्ध व अगस्ती मुनी यांची गाठ पडली. रेवणसिद्धांनी अगस्ती ऋषीला शिवाद्वैताचा बोध केला (पृ.२२). रेवणसिद्ध मग तसेच पुढे गेले आणि विटे गावाजवळील रेणावी ग्रामानजीकच्या रेणागिरी पर्वतावर ते राहू लागले.

विज्जल, विक्रमादित्य आणि राजेंद्रचौल या तीन राजांना रेवणसिद्धांनी दर्शन दिले, असे 'रेवणसिद्धरगळे' हा कानडी ग्रंथ सांगतो. तर पूर्वीच्या निजामाच्या हद्दीतील शिरियाल येथील सिद्धलिंगेश्वराच्या मंदिरातील शके ११०९ च्या एका कानडी भाषेतील शिलालेखावरून कळते : विज्जलाच्या यज्ञातून सुळे मयिदेवीच्या मुलीची सुटका करताना, रेवणसिद्धांनी नावेच्या मदतीविनाच भरलेली नदी पार केली. तसेच त्यांनी कळ्ळिशेट्टी व त्याची पत्नी यांना द्रव्यनिधी दाखवून त्यांचे दारिद्र्य दूर केले (पाहा : लिंगधारणचंद्रिका, पृ. ३९०, ३९५).

## ✦ हरिहर व बुक्क यांना दृष्टांत

हरिहर व बुक्क या दोघा बंधूंनी विजयनगरचे साम्राज्य स्थापिले, तत्पूर्वीची गोष्ट. एकदा हरिहर व बुक्क हे दोघे एका झाडाखाली विश्रांती घेत होते. त्यावेळी रेवणसिद्ध हरिहराच्या स्वप्नात आले. त्याला चंद्रमौलीश्वराचे लिंग देऊन त्यांनी सांगितले, "विद्यारण्य नावाच्या योगी पुरुषाशी तुझी गाठ पडेल व त्याच्या कृपेने तुला राजपद मिळेल" (फर्दर सोर्सेस ऑफ विजयनगर हिस्टरी, पृ. ११, १४). पुढे तसेच घडून आले.

## ✦ महाराष्ट्रातील रेवणसिद्धांचे स्थान

सांगली जिल्ह्यातील विटे ग्रामाजवळील रेवगी किंवा रेणावी या गावाजवळ असणाऱ्या रेणागिरी डोंगरावर रेवणसिद्धांचे स्थान आहे. असे म्हणतात की, इथली रेवणसिद्धांची मूर्ती प्रथम उभी होती. तिची पूजा करण्यास भक्तांना कष्ट पडू लागले. तेव्हा ही मूर्ती आडवी झाली. मूर्तीच्या नाभिस्थानी थंडगार शुभ्र गंगाजल आहे (रेवणसिद्ध - महिमा, पृ. ८). या स्थानी भक्तजन दर अमावास्येला रेवणसिद्धांच्या दर्शनास येतात. महाशिवरात्रीला तर मोठी यात्राच भरते. महाराष्ट्र सरकारने प्रकाशित

केलेल्या 'सांगली जिल्हा' या पुस्तिकेत या स्थानाविषयी पुढील माहिती नोंदलेली आहे : ''सांगली जिल्ह्यातील विटे गावापासून जवळच श्रीरेवणसिद्धांचे स्वयंभू स्थान आहे. देवापुढील मोठ्या नंदीमागे पंचकलशाप्रमाणे पंचआचार्य आहेत. हा रेवणी डोंगर पंचधातूंचा होता, अशी आख्यायिका आहे. डोंगरातील पांढऱ्या खड्यांचा उपयोग भस्माप्रमाणे करतात. या डोंगरात ८४ तीर्थे होती असा उल्लेख आहे. सदर स्थानाचे भक्त कर्नाटकात व महाराष्ट्रात फार आहेत ''(पृ. ९५).

रेणावी या स्थानी रेवणसिद्ध भगवान शंकररूप आहेत. काही जण त्यांना आपले कुलदैवत मानतात. या संदर्भात डॉ. रा. द. रानडे सांगतात, ''मला श्री. एम. व्ही. जोशी यांजकडून आलेल्या लग्नपत्रिकेवर 'रेवणसिद्ध प्रसन्न' असे शब्द होते. चौकशीअंती कळले की, रेणावीचे रेवणसिद्ध ही त्यांची कुलदेवता आहे'' (पाथवे टू गॉड इन कन्नड लिटरेचर, पृ. २२५).

### ✦ रेणागिरीवरील रेवणसिद्ध-स्थानाविषयी कथा

रेणागिरी येथील रेवणसिद्धांचे स्थान जागृत आहे. या स्थानाविषयी पुढील कथा सांगितल्या जातात.

शिवाजी महाराजांवर स्वारी करण्यास अफझलखान निघाला. त्याची छावणी पंढरपुरात असताना त्याने सैनिकांची एक तुकडी रेणावीकडे पाठविली. सैनिकांनी देवापुढील नंदी फोडण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्यातून चवताळलेले भुंगे बाहेर पडले. घाबरलेले सैनिक पळत सुटले (रेवणसिद्ध-महिमा, पृ. २५).

रेणावी येथील रेवणसिद्धांच्या दर्शनास श्रीसमर्थ रामदासस्वामी आले होते. तेथे त्यांनी 'सुखसहिता दु:खरहिता' ही सुप्रसिद्ध आरती रचून म्हटली.

इ. स. १९४२ सालची गोष्ट. रेवणसिद्धांच्या मंदिरासमोर इंग्रजी सैन्याची छावणी पडली होती. छावणीत मांसाहार चाले. रेवणसिद्धांना ते आवडले नाही. तेव्हा रात्रीच्या वेळी एका योग्याचे रूप घेऊन रेवणसिद्धांनी तंबूंच्या खुंट्या उपटून टाकल्या. त्यांच्यावर सैनिकांनी गोळ्या झाडल्या. पण त्या निरुपयोगी ठरल्या. दुसरे दिवशी असाच प्रकार झाला. तेव्हा सैनिकांनी आपली छावणी तेथून हलविली (रेवणसिद्ध-महिमा, पृ. २६).

### ✦ भक्तकाम-कल्पद्रुम रेवणसिद्ध

उपनिषदांतील तत्त्वज्ञान सुसूत्रपणे सांगणाऱ्या ब्रह्मसूत्रांवर श्रीकरभाष्य नावाचे एक भाष्य आहे. त्याचा कर्ता श्रीपती हा वीरशैव होता. त्याने आपल्या भाष्यारंभीच्या एका श्लोकात रेवणसिद्धांना वंदन केलेले आहे. तो म्हणतो, ''श्रीरेवणसिद्धगुरुं प्रपद्ये। भजाम्यहं रेवण-कल्पवृक्षम् ॥'' श्रीपतीने रेवणसिद्धांना कल्पवृक्ष म्हटले आहे,

ते अतिशय महत्त्वाचे आहे. त्याचा भावार्थ आहे - भक्तांच्या इच्छा पुरविणारा कल्पवृक्ष म्हणजे रेवणसिद्ध.

रेवणसिद्ध आपल्या भक्तांना दर्शन देतात, इत्यादीविषयी काही कथाही उपलब्ध आहेत.

### ✦ जयरामस्वामींना दर्शन

आपल्याला परमार्थाची प्राप्ती व्हावी, या इच्छेने जयरामपंत नावाच्या एका गृहस्थाने पंढरपुरात अनुष्ठान केले. त्यांना दृष्टांत देऊन पांडुरंगाने सांगितले, "तुम्ही रेणागिरीवर प्रभू रेवणसिद्धांकडे जा." त्याप्रमाणे ते रेणागिरीवर आले आणि त्यांनी अनुष्ठान सुरू केले. काही काळाने साक्षात रेवणसिद्ध त्यांच्यापुढे प्रगट झाले. "पंत, काय इच्छा आहे ?" रेवणसिद्धांनी प्रश्न केला. "परमार्थ मिळावा ही इच्छा आहे," जयरामपंत उत्तरले. "ठीक आहे. तुम्ही असे करा, वडगाव या गावी कृष्णाप्पा म्हणून शांतलिंगांचे एक शिष्य आहेत. त्यांच्याकडून तुमचे काम होणार आहे," रेवणसिद्धांनी सांगितले. त्याप्रमाणे जयरामपंत वडगावला कृष्णाप्पांच्याकडे गेले. गेल्या गेल्या कृष्णाप्पांनी जयरामपंतांना विचारले, "तुम्हाला रेवणसिद्धांनी इकडे पाठवले काय ?" "होय," जयरामपंत म्हणाले. तेव्हा कृष्णाप्पा म्हणाले, "रेवणसिद्धांजवळ काय कमी आहे म्हणून त्यांनी तुम्हाला मजकडे पाठविले ? असो. मला त्यांची आज्ञा प्रमाण आहे." रेवणसिद्धांच्या इच्छेप्रमाणे कृष्णाप्पांनी जयरामपंतांवर अनुग्रह केला. यथावकाश जयरामपंतांनी परमार्थाची सिद्धी प्राप्त करून घेतली. मग ते जयरामस्वामी वडगावकर या नावाने समर्थ रामदासस्वामींच्या पंचायतनात प्रसिद्ध झाले. याच जयरामस्वामींनी आपल्या शांतिपचीकरण ग्रंथात रेवणसिद्ध, मराळ -( = मरूळ-) सिद्ध, येकोराम ( = एकोराम) व पंडिताराध्य यांचा उल्लेख केला आहे (विवेकचिंतामणी, पृ. १७).

### ✦ सिद्धरामेश्वराचा जन्म

सिद्धरामेश्वर नावाचे उमदीकरमहाराजांचे एक शिष्य होते. त्यांच्या जन्मापूर्वी त्यांच्या मातेच्या स्वप्नात रेवणसिद्ध गेले. तिला त्यांनी हरभऱ्याची डाळ व गूळ प्रसाद म्हणून देऊन, "तुला पुत्र होईल,"असा आशीर्वाद दिला. त्यानंतर सिद्धरामेश्वरांचा जन्म झाला. सिद्धरामेश्वर पुढे एक महान सत्पुरुष झाले.

### ✦ माणिकप्रभू

मोगलाईत होऊन गेलेल्या माणिकप्रभू नावाच्या सत्पुरुषावर रेवणसिद्धांनी अनुग्रह केला होता, अशी माहिती 'श्रीसद्गुरु माणिकप्रभु यांची पद्यमाला' यात आहे,

अशी नोंद अ. ना. देशपांडे यांनी आपल्या 'प्राचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास,' भाग ३, पृ. १७६ वर केलेली आहे. माणिकप्रभूंच्या पद्यमालेत माणिकप्रभूंनी रेवणसिद्धांवरून केलेली पाच पदे, पाच भजने व एक आरती इतके लेखन सापडते.

### ✦ तात्यासाहेब कोटणीसमहाराजांना दर्शन

सांगलीत तात्यासाहेब कोटणीसमहाराज हे सुप्रसिद्ध संत होऊन गेले. चिमड हे त्यांचे गुरुस्थान. इ. स. १९२३ च्या चैत्र महिन्यात ते चिमडला गेले होते. संध्याकाळी ते पालखीपुढे 'देव बंदा' हे पद म्हणीत होते. त्यावेळी त्यांना समोरच्या धर्मशाळेतील सज्जावर उभे असणाऱ्या रेवणसिद्धांचे दर्शन झाले. याच कोटणीसमहाराजांचे चुलते वामनराव कोटणीस हेही अधिकारी पुरुष होते. त्यांनाही रेवणसिद्धांनी दर्शन दिले होते.

### ✦ मामामहाराज केळकरांना दर्शन

तात्यासाहेब कोटणीसमहाराजांच्या आज्ञेने मामामहाराज केळकर हे सांगलीत नित्यकीर्तन करीत. त्यांना 'रामपाठ' नावाचे अभंग स्फुरले. अन्त्य अभंगरचनेच्यावेळी त्यांना रेवणसिद्धांचे दर्शन झाले व त्यांच्या कृपेने रामपाठ पूर्ण झाला.

### ✦ नारायणमहाराज यरगट्टीकरांना दर्शन

चिमडमहाराजांचे चिरंजीव नारायणमहाराज यरगट्टीकर यांनी विटे येथे रेवणसिद्धांच्या स्थानी जाऊन साधनाचे अनुष्ठान केले. तेव्हा त्यांना रेवणसिद्धांचे दर्शन होऊन एक पदही स्फुरले.

### ✦ रेवणसिद्धांचा अवतार हालसिद्ध

भक्तासाठी रेवणसिद्धांनी हालसिद्ध या नावाने अवतार घेतला. त्याविषयीची कथा पुढीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्रातील शिरोळ तालुक्यात दूधगंगा नदीच्या काठी घोसरवाड नावाच्या गावी शिंदे देसाई इनामदार यांचे घराणे होते. या घराण्यातील भिकाजीराव देसाई यांची पत्नी सावित्री ही पतिव्रता होती. तिच्या भक्तीसाठी रेवणसिद्ध हालसिद्धरूपाने घोसरवाड येथे प्रगट झाले. कानडी भाषेत हाल म्हणजे दूध. दुधाची आवड असणारे ते हालसिद्ध. हालसिद्धांची स्थाने घोसरवाड, कारिकोळ, अप्पाची वाडी इत्यादी ठिकाणी आहेत (नाथलीलामृत, पृ. ४-५).

## २. मरुळसिद्ध :

मरुळसिद्ध हे मरळसिद्ध या नावानेही ज्ञात आहेत. 'सिद्धांतसार' या ग्रंथानुसार, मरुळसिद्ध हे मंत्रमूर्ती असून ते रेवणसिद्धांपासून प्रगट झाले. 'मरुळसिद्धसांगत्य' या कानडी

भाषेतील ग्रंथानुसार, मरुळसिद्ध हे रेवणसिद्धांचे शिष्य होते (लिंगधारणचंद्रिका, पृ. ४७०). मरुळसिद्धांना मरुळसिद्ध हे नाव कसे पडले, याविषयी पुढील कथा उपलब्ध आहेत.

१. एकदा रेवणसिद्धांनी एका मातीच्या कुंभात आपली दृष्टी केंद्रित केली. मग त्या कुंभातून एक बालक प्रगट झाले. ते बालक फार सुंदर व मोहक होते. म्हणून ते मरुळ या नावाने ओळखले जाऊ लागले. मरुळ या कानडी शब्दाचा अर्थ मोहित असा आहे.

२. रेवणसिद्धांच्यापासून एक मंत्राकृती निर्माण झाली, ती पाहून हरी, हर, ब्रह्मदेव, ऋषि-मुनी, इत्यादी सर्वच वेडावून गेले. त्या मंत्रमूर्तीला पाहताच, 'मरळ झाले सकळ सुरवर' आणि 'म्हणोनि मरुळसिद्ध नाम साचार' (सिद्धांतसार). मरुळ अथवा मरळ या कानडी शब्दाचा अर्थ मोहित असा आहे. रेवणसिद्धांपासून झालेल्या मंत्रमूर्तीला पाहून देवादी मोहित झाले. म्हणून त्यांना मरळ वा मरुळ हे नाव पडले (सिद्धांतसार).

३. दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या करवीर क्षेत्रात एकदा मरुळसिद्ध गेले. तेथे मर्दू/रमक/माया/माई हे नाव असणारी व सिद्धसाधूंची कठोर परीक्षा घेणारी देवी होती. तिचा पण असा होता - "करवीर क्षेत्रात स्नान करून भिक्षा मागणाऱ्या सिद्धसंताने मी देईन ते विष प्राशन करून ते पचवून दाखविले पाहिजे. तसे न करणाऱ्याला बंदिवासात पडावे लागेल." करवीरात मरुळसिद्ध स्नानास आल्याची वार्ता तिला कळली. तिने मरुळसिद्धांना बोलावून घेतले आणि त्यांच्या भिक्षापात्रात भिक्षा म्हणून जहाल विष घातले. आपल्या गुरूंचा जयजयकार करून मरुळसिद्धांनी ते विष पिऊन टाकले. ते सर्व शिवलिंगार्पण झाले. यावेळी मरुळसिद्धांना पाहून माई मरुळ (= मोहित) झाली. म्हणून त्यांना मरुळसिद्ध हे नाव पडले (सन्मार्गदीप, कैवल्यप्रसाद, पृ. १५).

आपले अवतारकार्य पुरे झाल्यावर मरुळसिद्धांनी आपल्या गुरूंच्या स्थानी म्हणजे रेणागिरीवर समाधी घेतली (सिद्धकथामृतसार).

### ✦ मरुळसिद्धांची मठपरंपरा

मरुळसिद्धांच्या मठपरंपरेत शांतलिंग हे साधू होऊन गेले. शांतलिंग हे शांतलिंग, शिवयोगी, शांतेश्वर, शांतलिंगस्वामी, शांतलिंगाप्पा, शांत, इत्यादी अनेक नावांनी ओळखले जातात. तथापि त्यांचे शांतलिंग हेच नाव अधिक प्रचारात आहे. शांतलिंग हे अयोनिसंभव होते, अशी आख्यायिका आहे. हे मूल लहानपणी अत्यंत शांत होते म्हणून त्याला शांत हे नाव पडले. हे शांतलिंग आजन्म ब्रह्मचारी लिंगायत जंगम होते व ते सातारा जिल्ह्यातील शिखर शिंगणापूर क्षेत्रातील जंगममठात 'पट्ट देवरु' (= पट्टाधिकारी) होते. शांतलिंगांचे शिष्य कृष्णाप्पा किंवा कृष्णदास. गुरूंच्या आज्ञेने कृष्णदासांनी सातारा जिल्ह्यातील वडगाव येते मठस्थापना करून परमार्थाचा प्रसार

केला. कृष्णदास हा कृष्णभक्त असून ब्राह्मण होता. शांतलिंग व कृष्णाप्पा या गुरुशिष्यांनी मिळून तीर्थयात्रा केली. ते दोघे मथुरेत असताना, वृंदावनात चाललेली गुप्त रासक्रीडा शांतलिंगांनी कृष्णदासाला दाखविली, असे म्हणतात (विवेकचिंतामणी). रेवणसिद्धांच्या सूचनेनुसार याच कृष्णदासांनी जयरामस्वामी वडगावकरांना उपदेश केला.

मरुळसिद्धांच्या मठपरंपरेत आणखी एक नाव घेण्याजोगे अर्वाचीन साधू म्हणजे कलमेश्वर. कलमेश्वर यांची सर्कस होती. एकदा ते सर्कशीसह उज्जनीमध्ये होते. तेथे मरुळसिद्धांच्या मठातील सिद्धेश्वरमहाराजांना त्यांनी सर्कस पाहण्याचे आमंत्रण दिले. प्रथम सिद्धेश्वरांनी नकार दिला. पुढे कलमेश्वरांच्या आग्रहाने ते सर्कस पाहण्यास गेले. त्यांच्याकडे कलमेश्वरांनी आशीर्वाद मागितला. दुसरे दिवशी कलमेश्वर मठात येताच सिद्धेश्वरांनी त्यांना अनुग्रह दिला व सर्कस बंद करण्यास सांगितले. लगेच कलमेश्वरांनी सर्कस विकून टाकली व निष्ठेने साधन केले. त्यांना प्राप्त झालेला अधिकार पाहून कलमेश्वरांना अनुग्रह देत जाण्याची आज्ञा सिद्धेश्वरांनी केली. कलमेश्वरांनी कलगुड येथे आपला मठ स्थापन केला. ते एकतारी भजन करीत व त्यात देहभान विसरून जात. दि. ११-६-६८ रोजी कलमेश्वरांनी शिरगुड येथे भजन करीत देह ठेवला.

### ३. काडसिद्ध :

सिद्ध-साधूंना त्रास देणारी करवीरची माई रेवणसिद्धांना शरण आली. पुढे त्यांनी तिचे बलिदान घेऊन तिची एक किनरी केली आणि शिवनामाचे गायन करताना ते ती वाजवू लागले. याप्रमाणे रेवणसिद्धांनी माईचे मर्दन केले म्हणून रेवणसिद्धांनाच काडसिद्ध असे नाव पडले असावे, असे 'सन्मार्गदीप' कार सुचवितात. कारण कानडी भाषेत 'काड' धातूचा अर्थ छळणे/त्रास देणे असा आहे. रेवणसिद्धांनी माईला छळले 'माई गे काडिदा' - म्हणून त्यांना काडसिद्ध नाव पडले. किनरीत रूपांतरित केलेल्या माईला एकदा काडसिद्धांनी विचारले, "आता कसे काय आहे ?" "आता फारच छान आहे. पूर्वी मी तुमच्यापासून दूर होते. आता मात्र मी तुमच्याजवळ राहून तुमच्या छाताडावर नाचत आहे," माई बोलली. ते ऐकताच काडसिद्धांनी किनरी फेकून दिली आणि तिला जीवदान दिले (सिद्धकथामृतसार).

रेवणसिद्धांनाच काडसिद्ध हे नाव कसे पडले, याविषयी आणखी एक स्पष्टीकरण असे दिले जाते. माईला जिंकल्यावर रेवणसिद्ध करवीरच्या भागातच राहिले. तेथे घोर अरण्यात त्यांनी तपश्चर्या केली. म्हणून त्यांना काडसिद्ध नाव पडले. कारण कानडी भाषेत 'काडु' म्हणजे अरण्य असा अर्थ आहे.

### ✦ ऐतिहासिकदृष्ट्या

काडसिद्धांविषयी काहीजण ऐतिहासिकदृष्ट्या पुढील माहिती आहे, असे सांगतात. शेगुणसी (तालुका अथणी) येथे काडसिद्धांचा जन्म झाला. गुंडेवाडी, येडूर, इत्यादी ठिकाणी त्यांनी तपश्चर्या केली. पुढे ते करवीरजवळ सिद्धगिरी येथे वास्तव्य करून राहिले. ते इ. स. १२ व्या शतकात होते, असे चंद्रशेखरशास्त्री सांगतात (जीवनगंगा, पृ. ८).

शके १६६३ मध्ये लिहिल्या गेलेल्या 'वीरभद्रचरित' या हस्तलिखित ग्रंथात म्हटले आहे की, शके १०४२ (= इ. स. ११२०) मध्ये काडसिद्ध गुंडीवाडी येथे जन्मले. तेथून पुढे ते सिद्धगिरीस येऊन राहिले (जीवनगंगा, पृ. ९).

ते कसेही असो. काडसिद्ध हे सिद्धगिरी येथे वास्तव्यास आले, याबद्दल सर्वांचे एकमत आहे.

इ. स. १३ व्या शतकाच्या सुमारास आद्य काडसिद्धांनी सिद्धगिरी येथे मठ स्थापन केला (सिद्धगिरिसंदेश, एप्रिल, १९७५, पृ. २). करवीरजवळच्या रानावनांत काडसिद्ध साधनास बसत. त्यांच्याजवळ वाघ व गायी एकत्र येत. साप सन्निध येऊन डोलू लागत आणि सर्वत्र सुवास दरवळत असे.

### ✦ सिद्धगिरीवर वास

पुढे काडसिद्धांनी करवीरजवळील सिद्धगिरीवर एका गुहेत वास केला. तेथे राहून ते परमार्थाचा उपदेश करीत. एकदा एका नास्तिकाने त्यांना प्रश्न केला, "सर्वत्र शिव आहे, असे तुम्ही सांगता, तर दगडात देव आहे काय ?" "होय," म्हणून काडसिद्धांनी सांगितले. त्याची खात्री पटविण्यास त्यांनी एका दगडाकडे आपली दृष्टी टाकली, तोच तो दगड चालू लागला (सिद्धकथामृतसार).

### ✦ मीरासाहेब आले

वाघावर बसून आणि सापाचा चाबूक करून मीरासाहेब सिद्धगिरीवर काडसिद्धांच्या दर्शनास गेले. त्यावेळी काडसिद्ध एका दगडावर बसले होते. मीरासाहेबांना पाहताच काडसिद्धांसह तो दगड पुढे सरकू लागला. ते पाहताच मीरासाहेबांचा गर्व गळून गेला. ते काडसिद्धांना शरण गेले. त्यांनी काडसिद्धांजवळ राहण्याचे ठरविले. तेव्हा काडसिद्ध म्हणाले, "तुम्ही मांसाहार करता. ते खाद्य तुम्हाला येथे मिळणार नाही." तत्काळ मीरासाहेब बोलले, "मी आता अभक्ष्य भक्षण सोडून देतो." तेव्हा काडसिद्धांनी अनुमती दिली, असा बखरीत उल्लेख आहे (सिद्धगिरिसंदेश, एप्रिल, १९७५).

### ✦ जागृत स्थान

सिद्धगिरी येथेच काडसिद्ध शिवस्वरूप झाले. तेथले काडसिद्धांचे स्थान जागृत आहे. गाभाऱ्यात ओवळ्याने जाऊ देत नाहीत. एकदा कोणी ओवळा मनुष्य गाभाऱ्यात गेला. त्याला वेड लागले.

सिद्धगिरीवर काडसिद्धांची म्हणून दाखविली जाणारी एक गुहा आहे. तिच्या तोंडावर शिळा आहे. ती शिळा बाजूला करून आत जाण्याचा प्रयत्न काही मंडळींनी सुरू केला. तेव्हा, "आत येऊन मला त्रास देऊ नका," असे शब्द गुहेतून बाहेरच्या लोकांना ऐकू आले. तेव्हा त्यांनी तो प्रयत्न थांबविला.

### ✦ भक्तांना दर्शन

कारणपरत्वे काडसिद्धांनी आपल्या भक्तांना दर्शन दिले, अशा कथा आहेत. एकदा काही मुले संध्याकाळचे समयी काडसिद्धांच्या दर्शनास निघाली. वाटेतच अंधार पडला. तेव्हा मुलांनी काडसिद्धांची प्रार्थना केली. काडसिद्ध तेथे प्रगट झाले आणि एका क्षणात त्या मुलांना देवालयाजवळ सोडून काडसिद्ध अदृश्य झाले.

### ✦ अनुष्ठानानंतर दर्शन

चिमडमहाराजांचे जामात गोपाळकाका कोटणीस हे होते. एकदा ते सिद्धगिरीवर जाऊन अनुष्ठानास बसले. अनुष्ठानाअंती त्यांना काडसिद्धांचे साक्षात दर्शन झाले.

### ✦ कोटणीस महाराजांना दर्शन

चिमड संप्रदायप्रर्वतक चिमडमहाराजांचे पट्टशिष्य तात्यासाहेब कोटणीसमहाराज होते. ते एकदा सिद्धगिरीस गेले. त्यावेळी त्यांना काडसिद्धांचे साक्षात दर्शन झाले. ही घटना नोंदणारा तात्यासाहेबांचा एक अभंग उपलब्ध आहे.

### ✦ शिष्याच्या शोधात काडसिद्ध

आपल्या सिद्ध संप्रदायाची परंपरा चालविणारा अधिकारी शिष्य काडसिद्धांना हवा होता. तो त्यांना नारायणराव निंबरगीकरमहाराज यांच्या रूपात दिसून आला. सोलापूरला मातुलगृही जेव्हा निंबरगीकरमहाराजांचे जनन झाले, तेव्हा त्यांचा शोध घेत काडसिद्ध एका जंगमाच्या रूपाने तेथे गेले व मुलाच्या पाचव्या दिवशी त्यांनी मंत्र सांगून मुलाची लिंगधारणा केली. पण लहानपणचा हा उपदेश निंबरगीकरमहाराज विसरून गेले. तेव्हा काडसिद्धांनी जंगमाच्या रूपात दोनतीनदा निंबरगीस जाऊन महाराजांना साधनाची आठवण करून दिली. निंबरगीकरमहाराज एकदा सिद्धगिरीस

जाऊन पुन्हा काडसिद्धांचा अनुग्रह घेऊन आले. त्यानंतर त्यांनी नेटाने साधन करून पूर्ण परमार्थ साधला. ते काडसिद्धांच्या दर्शनास गेले. शरणागतांना सिद्धसाधन सांगण्याची आज्ञा काडसिद्धांनी निंबरगीकरमहाराजांना केली.

### ✦ काडसिद्धांची मठपरंपरा

आद्य काडसिद्धांनंतर इ. स. १९२२ पर्यंत त्यांच्या पीठावर पंचवीस मठाधीश झाले. सध्या सव्वीसावे काडसिद्ध मठपती आहेत. त्यांची संक्षिप्त माहिती अशी.

कोल्हापूर जिल्ह्यातील लिंगनूर या गावी पहिगौडा पाटील होते. त्यांची पत्नी काशव्वबाई. एका संन्याश्याने तिला प्रसाद म्हणून दोन फळे दिली व दोन पुत्र होतील, असा आशीर्वाद दिला. काशव्वबाईचा एक पुत्र जयगौडा. जयगौडाचे प्राथमिक व थोडेसे माध्यमिक शिक्षण कोल्हापुरात झाले. वयाच्या आठव्या वर्षापासून त्याला परमार्थाची ओढ लागली. वयाच्या अठराव्या वर्षी सिद्धगिरी मठाचे सव्वीसावे मठपती म्हणून त्यांची निवड होऊन त्यांचे शिष्यविधान झाले. यथावकाश ते मठाचे स्वामी झाले. पण त्यांना आत्मज्ञान व समाधान नव्हते. तेव्हा त्यांनी इंचगिरीच्या सिद्धरामेश्वरमहाराजांचा उपदेश घेतला. तेव्हा सिद्धरामेश्वर म्हणाले, ''ज्या मूळ काडसिद्धांपासून गुरुपरंपरेने मला ज्ञान प्राप्त झाले, ते ज्ञान परत त्या ठिकाणी पोचविण्याचे भाग्य मला लाभले.'' सिद्धरामेश्वरांनी या नूतन काडसिद्धांना आत्मप्रचीती प्राप्त करून दिली. या काडसिद्धांनी कर्नाटक, महाराष्ट्रात ज्ञानप्रसार केला. मुंबईत त्यांचे अनेक शिष्य आहेत. ते 'सिद्धगिरिसंदेश' नावाचे त्रैमासिक प्रसिद्ध करीत असतात.

●●●

### प्रकरण २ : संदर्भसूची


१. **कर्नाटक महाराष्ट्रातील समर्थ संप्रदाय**, पां. वि. कुलकर्णी, सांगली, १९७८

२. **कैवल्यपुरुष, खंड १**, ह. पां. कोटणीस, सांगली, १९३३

३. **कैवल्यप्रसाद**, पां. र. कोटणीस, सांगली, १९५९

४. **गोविंदपंत घोसरवाडकर यांचे चरित्र ऊर्फ नाथलीलामृत**,
म. अ. कुलकर्णी, चिकोडी

५. **जीवनगंगा, म. श्री. देशपांडे**, पहिली आवृत्ती, नागपूर, १९६६

६. **तात्यासाहेबमहाराज कोटणीस**, दासराम, पुणे, १९८३

७. **दादामहाराज केळकरांची हस्तलिखित वही**

८. **पाथवे टू गॉड इन कन्नड लिटरेचर**, रा. द. रानडे, मुंबई, १९६०
९. **प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास**, भाग ३,
अ. ना. देशपांडे, पुणे, १९७३
१०. **फर्दर सोर्सेस ऑफ विजयनगर हिस्टरी**,
नीळकंठशास्त्री आणि वेंकटरमणय्या, मद्रास, १९४६
११. **महाराष्ट्राचे जिल्हे, सांगली, महाराष्ट्र सरकार प्रकाशन**
१२. **रेवणसिद्ध–महिमाग्रंथ**, नारायणराव पवार, विटा, १९७७
१३. **लिंगधारणचंद्रिका**, साखरे, ठळकवाडी, १९४२
१४. **वायुलहरी**, दासराम, सांगली, १९६९
१५. **विवेकचिंतामणी**, पंडित आवळीकर, धारवाड, १९६३
१६. **श्रीकरभाष्य**, भाग १, हयवदनराव, बंगळूर, १९३६
१७. **सन्मार्गदीप**, समर्थभक्त, चिमड, १९३३
१८. **सिद्धकथामृतसार**, दासराम, सिद्धगिरिसंदेश त्रैमासिक, मुंबई
१९. **सिद्धगिरिसंदेश त्रैमासिक**, एप्रिल, १९७५, मुंबई
२०. **हणमंतरावजी कोटणीस यांचे चरित्र**, साधुदास, सांगली, १९३७

▲▲▲

प्रकरण ३

# श्रीनिंबरगीकरमहाराज

आपल्या सिद्ध संप्रदायाची परंपरा पुढे चालू ठेवण्यासाठी काडसिद्धांनी ज्यांची निवड केली, ते निंबरगीकरमहाराज होत. त्यांचे सर्व आयुष्य निंबरगीत गेले म्हणून निंबरगी गावाबद्दल बोलताना, 'धन्य ते स्थळ महासिद्धाचे,' असे चिमडचे रामभाऊमहाराज यरगट्टीकर म्हणतात. निंबरगीकरमहाराजांच्या वास्तव्याने निंबरगी हे खेडेगाव एक पुण्यक्षेत्र आणि तीर्थक्षेत्र झाले. म्हणूनच, 'धन्य निंबरगी क्षेत्र भूतळी' असे तात्यासाहेब कोटणीस यांनी गौरवोद्गार काढले आहेत.

## ✦ निंबरगी व मारुतिमंदिर

कर्नाटक राज्यात विजापूर जिल्ह्यातील इंडी नावाच्या तालुक्यात निंबरगी अथवा लिंबरगी हे एक खेडेगाव आहे. त्यालाच देव-निंबरगी असेही नाव आहे. निंबरगीजवळ एक ओढा आहे. ओढ्यापलीकडे मारुतीच्या चतुर्भुज मूर्तीचे स्वयंभू देवस्थान आहे. देवळाच्या दर्शनी भागी नगारखाना असून, भोवती असणाऱ्या तटाच्या आतील बाजूस सेवेकऱ्यांसाठी ओवऱ्या आहेत. याच मंदिरात प्रवचने करून निंबरगीकरमहाराजांनी काडसिद्धांकडून प्राप्त झालेल्या सिद्धसाधनाचा आविष्कार केला.

## ✦ महाराजांचे जनन व काडसिद्धांचा अनुग्रह

लिंगायत धर्मातील नीलवाणी हा जातिभेद असणारे मिसलकर उपनामाचे घराणे निंबरगीत वास्तव्य करून होते. या कुळात कोष्टीपण, निळारीपण आणि शेती हे व्यवसाय होते. या कुळात महाराजांनी अवतार घेतला. महाराजांच्या पित्याचे नाव भीमण्णा आणि मातेचे नाव सौ. अंबाबाई. सोलापूरला मातुलगृही शके १७१२ (= इ. स. १७९०) मध्ये चैत्र शुद्ध पौर्णिमेला म्हणजे हनुमान जयंतीला महाराजांचे जनन झाले, तोच सूतिकागृहात बराच वेळ प्रकाश भरून राहिला.

महाराजांचे जन्मटिपणावरून झालेले नारायण हेच नाव प्रचारात आले. नंतर त्यांना भाऊ म्हटले जाऊ लागले. त्यामुळे नारायणराव भाऊसाहेब नीलवाणी किंवा नीलगार अथवा निंबरगीकर असे त्यांचे नाव व्यवहारात आले. नीलवाणी हे जातीवरून आलेले नाव. नीलगार हे व्यवसायावरून पडलेले नाव. तर निंबरगीकर हे ग्रामनावावरून पडलेले उपनाम. पुढे महाराज सिद्धपदवीला पोचल्यावर ते गुरुलिंगजंगमस्वामी या नावाने विख्यात झाले. महाराजांनी आपल्या काव्यरचनेत 'गुरुलिंगजंगम' अशी मुद्रिका वापरली आहे.

शिष्याच्या शोधात असणारे काडसिद्ध हे एका जंगमाच्या रूपात महाराजांचा शोध घेत सोलापूरला महाराजांच्या मातुलगृही आले व वयाच्या पाचव्या दिवशी मुलाच्या कानात मंत्र सांगून त्यांनी मुलाची लिंगधारणा केली.

## ✦ बालपण, शिक्षण व विवाह

योग्य वेळी शाळेत जाऊन महाराज लिहिण्यावाचण्यास शिकले. त्यांचे शालेय शिक्षण फारसे झाले नाहीच. पण लहानपणापासून ते सत्य, हित व प्रिय बोलणारे असून परोपकारी आणि निरहंकारी होते.

वयाच्या चौदाव्या-पंधराव्या वर्षी त्यांनी शेतीकामाची ओळख करून घेतली. तसेच उत्तम नीळ तयार करून सूत रंगविण्यात ते तरबेज झाले.

योग्य वेळी भीमण्णांनी महाराजांचा विवाह करून दिला. त्यानंतर काही कारणाने त्यांचा दुसरा विवाह झाला. त्यांची दुसरी पत्नी कल्याण कलबुरगेकडील होती; तिचे नाव लक्ष्मी. तिचेपासून महाराजांना भीमाण्णा हा पुत्र झाला. अशा प्रकारे व्यावहारिक जीवन जगण्यात महाराजांचा काळ जात होता. कालांतराने महाराजांचे वडील कालवश झाले. तेव्हा भावाभावांच्या वाटण्या झाल्या. होती ती शिल्लक व वडिलांचे अर्धे कर्ज महाराजांच्या थोरल्या भावाने घेतले पण महाराजांच्याकडे फक्त वडिलांचे निम्मे कर्ज आले. त्यानंतर महाराजांनी स्वत: कर्ज काढून आपला धंदा वाढविला आणि लवकरच आपले व पित्याचे कर्ज फेडून टाकले. मग जगरहाटीप्रमाणे महाराजांचे सांसारिक जीवन चालू राहिले.

## ✦ नाठवी तो स्वये द्यावी आठवण

हा वेळपावेतो महाराजांना अगदी बालपणी झालेल्या काडसिद्धांच्या अनुग्रहाची विस्मृती पडली होती. परंतु ते काडसिद्धांना चालणारे नव्हते. म्हणून निंबरगीकरमहाराजांना आठवण करून देण्याचे काडसिद्धांनी ठरविले.

एका वयातीत पुरुषाच्या रूपात, घोड्यावर स्वार होऊन काडसिद्ध महाराजांच्या घरी आले. घोड्याला पाणी पाजण्यास त्यांनी घंगाळ व घागर मागितली. त्या वस्तू मिळताच, एका हातात घंगाळ अधांतरी धरून त्या वयस्क पुरुषाने दुसऱ्या हाताने पाण्याने भरलेली घागर घंगाळ्यात रिकामी केली. ते अचाट कृत्य पाहून महाराजांच्या मनावर परिणाम झाला. तितक्यात त्या पुरुषाने प्रश्न केला, "आम्ही सांगितलेल्या गोष्टीचा तुम्हाला विसर पडला काय ?" प्रश्न ऐकताच महाराजांची खात्री झाली की, हे वयस्कर गृहस्थ म्हणजे काडसिद्ध आहेत. काडसिद्धांच्या पाया पडून महाराज

म्हणाले, "माझी साधनसिद्धता करून देण्याचे आश्वासन आपण द्यावे. मग मी साधनाभ्यासाला लागतो." "तथास्तु," म्हणून काडसिद्ध तेथल्या तेथे घोड्यासह अदृश्य झाले.

### ✦ पुनरपि अनुग्रह

पहिल्या अनुग्रहाची विस्मृती पडली असल्याने महाराज सिद्धगिरीस केले व पुन्हा काडसिद्धांकडून सिद्धसाधन समजावून घेऊन परत आले. परंतु नंतरही त्यांचे हातून साधन घडले नाही. अशीच पाचसहा वर्षे गेली. पुन्हा सिद्धगिरीहून काडसिद्ध एका जंगमाच्या रूपात घोड्यावर बसून महाराजांकडे आले. त्यांना भोजन घालून महाराजांनी दक्षिणा दिली. जाताना जंगम बोलला, "तुम्ही पुन्हा विसरलेले दिसता. असे करू नका. आता साधन करू लागा." तेव्हा महाराजांनी विचारले, " परमार्थ केल्याने प्रपंचही सुखाचा होतो काय ?" "देवाच्या कृपेला काय अशक्य आहे ?" काडसिद्ध उत्तरले. ते निघून गेले. यावेळी महाराजांना एकविसावे वर्ष होते. यापुढे मात्र त्यांनी दृढ निश्चयाने साधन सुरू केले.

### ✦ निंबरगीकरमहाराजांचे गुरू काडसिद्ध

सिद्ध संप्रदायातील काडसिद्ध हे निंबरगीकरमहाराजांचे सद्‌गुरू होते. त्यामुळे, "महाराजांना उपदेश करणारे मुप्पीनमुनी असावेत असे दिसते; तसेच महाराजांच्या एका पदातील मुप्पीनमुनींचा उल्लेख त्यांच्या गुरूच्या नावाचा असण्याचा संभव आहे" (बोधसुधा, पृ.८-९), असे जे म्हटले जाते, ते बरोबर नाही. कारण महाराजांचे गुरू मुप्पीनमुनी, असे म्हणण्यास केवळ अंदाजापलीकडे दुसरा कोणताच भक्कम आधार नाही. वरील 'संभव आहे' या शब्दांवरून अनिश्चितता सूचित होते. तसेच महाराजांच्या ज्या पदात मुप्पीनमुनी हा शब्द येतो, तेथे तो शब्द महाराजांच्या गुरूचा उल्लेख करणारा नाही, असे र. ह. कोटणीस यांनी 'कैवल्यप्रसाद' ग्रंथात (पृ. १७) दाखवून दिले आहे.

काडसिद्ध हेच निंबरगीकरमहाराजांचे गुरू, अशी या संप्रदायातील परंपरा आहे आणि चिमड व इंचगिरी या शाखांतील लेखनांत काडसिद्ध हेच महाराजांचे गुरू, असा उल्लेख येतो. इंचगिरी संप्रदायातील 'पंचसमासी' हा लघुग्रंथ उमदीकरांच्या नजरेखालून गेला असल्याने, त्यातील वचनांची सत्यता निःसंदेह मानली पाहिजे, असे वि. चिं. केळकर सांगतात (पाहा : निंबरगी संप्रदाय आणि समर्थ संप्रदाय, सज्जनगड मासिक, श्रीसमर्थ रामदासस्वामी विशेषांक, फेब्रुवारी, १९८२). पंचसमासीत पहिल्या समासात निंबरगीकरमहाराजांचे चरित्र सांगताना, 'जंगमरूपे काडसिद्धे उपदेशिले,' असे स्पष्ट वचन आहे. तसेच इंचगिरी संप्रदायाच्या 'नित्यनेमावलि' च्या पहिल्या

आवृत्तीच्या प्रस्तावनेतही 'काडसिद्धांचे शिष्य निंबरगीकरमहाराज' असा उल्लेख आहे. चिमड संप्रदायाच्या सर्व ग्रंथांत काडसिद्ध हे निंबरगीकरमहाराजांचे गुरू, असे म्हटलेले आहे. तसेच निंबरगीकरमहाराजांच्या सान्निध्यात प्रदीर्घ काळात राहिलेल्या अशा महायोगिनी लक्ष्मीबाई अक्कांनीही 'काडसिद्ध हेच निंबरगीकरमहाराजांचे गुरू,' असे सांगून ठेवले आहे. खेरीज निंबरगीकरमहाराजांनी कृपावंत होऊन, आपल्या निर्याणानंतर ज्यांना 'गुरुलिंगगीता' हा प्रासादिक ग्रंथ दिला, ते दादामहाराज केळकरही आपल्या 'सिद्धकथामृतसार' या ग्रंथात लिहितात : ''काडसिद्धे सत्-शिष्यावरी। कलियुगामाझारी। अनुग्रह केला निर्धारी। श्रीगुरुलिंगजंगमा॥'' हे सर्व लक्षात घेतले की काडसिद्ध हेच निंबरगीकरमहाराजांचे सद्‌गुरू, यात संदेह राहात नाही.

## ✦ महाराजांचे सामर्थ्य

महाराज अवतारी पुरुष असल्याने, त्यांचे सामर्थ्य त्यांच्या लहानपणापासून प्रगट झालेले त्यांच्या जीवनातील घटनांवरून दिसून येते. ते लहान असताना, त्यांच्या देवकाबाई नावाच्या आत्याला विषूचिका (कॉलरा -) चा उपद्रव होऊ लागला. तत्काळ महाराज मरीआईच्या देवळात गेले. ''माझ्या आत्याला का त्रास देतेस ?'' असा प्रश्न करून त्यांनी मूर्तीला चोप दिला. इकडे आत्याला उतार पडला.

## ✦ महाराजांना आलेले प्रत्यवाय

महाराजांचा साधनाभ्यास चालू असताना त्यांना दोन प्रकारचे प्रत्यवाय आले. एक मानसिक अथवा आंतरिक आणि दुसरा बाह्य. त्यांतून सोडविण्यास महाराजांनी ईश्वराची प्रार्थना केली, ''देवा, सत्वर मजवर दया कर. या त्रासांतून मला पार कर.'' देवाच्या कृपेने महाराज दोन्ही प्रकारच्या अंतरायांतून निभावून गेले. काही त्रासदायक अशा बाह्य प्रसंगांतून महाराज असे बाहेर पडले :-

एकदा महाराज चुन्याच्या कळ्या धोतरात बांधून निंबरगीस परतत होते. वाटेत मुसळधार पाऊस कोसळला. पण महाराजांच्या अंगावर किंवा धोतरातील चुन्यावर पावसाचा एक थेंबही पडला नाही.

## ✦ योगक्षेमं वहाम्यहम्

एकदा महाराज विजापूरला गेले होते. तेथे एका माणसाने विचारले, ''भगवद्‌गीतेत 'मी भक्तांचा योगक्षेम वाहतो' असे कृष्णाने म्हटले आहे, ते खरे आहे काय ?'' महाराज म्हणाले, ''होय.'' काही दिवसांनी त्या माणसाने त्यांना उपल्या बुरूज या ठिकाणी नेऊन दुपारी १२-१ पर्यंत बोलत ठेवले. मग तो म्हणाला, ''आता भोजनाची काय सोय ?'' महाराज बोलले, ''परमेश्वराच्या घरी काय कमी आहे ?

काळजी करु नकोस.'' तितक्यात महाराजांचा शोध करीत एक पुरुष फळफळावळ व फराळाचे सामान घेऊन तेथे आला. ते पाहून त्या माणसाने महाराजांच्या चरणी लोटांगण घातले.

### ✦ व्यापारीच देणे लागत होता

काही दिवस महाराज व्यापारात पडले होते. चडचाण गावातील एका व्यापाऱ्याशी महाराजांचा व्यवहार चालू होता. एकदा त्या व्यापाऱ्याने महाराजांच्याकडे सातशे रुपये बाकी येणे काढून ती चुकती करण्याचा तगादा लावला. ''मी तुझे काही देणे लागत नसून, तूच माझे पाच रुपये देणे आहेस,'' महाराज बोलले. ते त्याला न पटून तो भांडून निघून गेला. पुढे आपले हिशोब तपासताना त्या व्यापाऱ्याला आढळून आले की, आपणच आपल्या हाताने महाराजांचे पाच रुपयांचे देणे नोंदलेले आहे. त्याने ते देणे चुकते करून टाकले.

### ✦ पेवे धान्याने भरली

बसाप्पा सारीगावी नावाच्या एका व्यापाऱ्याने महाराजांना काही धान्य विकण्याचा करार करून त्यांचेकडून विसार घेतला. पुढे महागाई झाली. महाराजांनी कराराप्रमाणे धान्य मागितले. तेव्हा तो म्हणू लागला, ''मी तुमच्याशी करार केलेला नाही व विसारही घेतला नाही.'' त्यावेळी बसाप्पाकडे काही व्यापारी आले होते. त्यांना बसाप्पा ज्या दराने धान्य देणार होता, ''त्यापेक्षा कमी दराने मी धान्य देतो,'' असे महाराजांनी त्यांना सांगितले. ते व्यापारी महाराजांचे घरी आले. महाराजांच्या घरी धान्याची पेवे होती. पण त्यांत धान्य भरलेले आहे, हे कुणालाच माहीत नव्हते. महाराजांनी पेवांतील धान्य व्यापाऱ्यांना दिले. हे कळताच बसाप्पाला पश्चाताप झाला. ''कराराप्रमाणे मी धान्य देतो,'' असे त्याने महाराजांना सांगितले. महाराजांनी ते घेऊन पेवांत भरले.

### ✦ विक्रीचे पैसे मिळाले

काही काळ महाराज बैलावर लुगडी घालून व्यापारास गावोगावी फिरत होते. एकदा ते चडचाण या गावी असताना, करवीर छत्रपतींची छावणी चडचाणच्या माळावर पडली. महाराजांजवळील विक्रीसाठी असणारी लुगडी पाहण्यासाठी म्हणून छावणीतील एकेकाने एकेक अशी नेली. पण पैसे मात्र कुणीच दिले नाहीत. महाराज स्वस्थ बसून राहिले. तेवढ्यात छावणीतील एक अधिकारी तेथे आला. त्याने महाराजांची चौकशी केली. सर्व प्रकार महाराजांनी त्याला सांगितला. ''आता एखादे लुगडे शिल्लक आहे काय ?'' असा प्रश्न त्याने केला. खाकेत ठेवलेले लुगडे महाराजांनी त्याला दाखविले.

त्याने लुगड्याची किंमत विचारल्यावर, पाच रुपये म्हणून महाराजांनी सांगितली. "सर्व लुगड्यांची किंमत सारखीच काय ?" त्याने पुन्हा पृच्छा केली. महाराजांनी होकारार्थी उत्तर दिले. त्याने पाच रुपये देऊन ते लुगडे विकत घेतले आणि छावणीत परत जाऊन, त्याने लुगडे घेतलेल्या प्रत्येकाला लुगड्याची किंमत महाराजांना पोचती करण्यास लावले.

### ✦ व्यवसाय बदलला

अशा प्रसंगांना तोंड देता देता बारा वर्षे निघून गेली. महाराजांच्या लक्षात आले की, प्रपंचातील असले व्यवसाय करताना साधन करण्यास फार वेळ मिळत नाही. म्हणून त्यांनी मेंढीपालनाचा उद्योग सुरू केला. मेंढरे चरू लागली की महाराजांना साधनाभ्यासास भरपूर वेळ मिळू लागला. अनेकदा ते गावातसुद्‌धा परत न येता रानातच मुक्काम करीत.

### ✦ महाराजांची वृत्ती

अशा प्रकारे महाराजांचा साधनाभ्यास चालू होता. अशीच चौतीस वर्षे निघून गेली. या काळात त्यांचा साधनक्रम रात्ररात्र चालत असे. ही गोष्ट अंबूरावमहाराजांनी स्वत: पाहून नोंदवून ठेवली आहे.

प्रपंचात असताना महाराजांचा परमार्थ चालू होता. ते प्रपंचात उदास असले, तरी ते विवेकाने नेटका म्हणजे नेटाने साधन करीत प्रपंच करीत होते. साधकाला आवश्यक ती बंधने पाळीत होते. परस्त्री, परधन, परवस्तू, मद्यमांस त्यांना वर्ज्य होते. कोणत्याही अवगुणाचा त्यांनी स्वत:ला स्पर्श होऊ दिला नाही. संसारात सर्व काही ईशइच्छेने घडते, ही त्यांची भूमिका होती.

महाराज परमार्थात उल्हसित होते. "रात्रंदिवस केलेल्या साधनाने त्यांचे डोळे लाल असत," असे श्रीनागाप्पाण्णामहाराजांनी श्रीदादामहाराज केळकरांना सांगितले होते.

परमार्थ प्रगटपणे केल्यास अंगी अहंकार व दंभ येतो, असे महाराजांचे मत होते. म्हणून त्यांनी आपली परमार्थ झाकून केला. किंबहुना आपला परमार्थ गुप्त ठेवण्याचाच त्यांनी प्रयत्न केला.

### ✦ महाराजांची साधनसिद्धी

साधनाची सिद्धी होत असताना, नाद-प्रकाशरूपाने परमात्म्याची प्रतीती घेत घेत साधक आत्मरूप होतो. हाच प्रकार महाराजांच्या बाबतीत घडला. त्यांना आलेले सर्व अनुभव काही त्यांना स्फुरलेल्या थोड्या पदांत व्यक्त झालेले नाहीत. पण शितावरून भाताची परीक्षा या न्यायाने, त्यांच्या पदांतील पुढील भागावरून त्यांच्या

अनुभवाची योग्य कल्पना येते. ते म्हणतात : ''माझ्या मागेपुढे, डाव्याउजव्या बाजूस, देवा, तूच असून तूच माझे रक्षण करतोस. हे प्रभो, मी तूच झालो आहे.'' दुसऱ्या एका पदात ते सांगतात : ''सद्गुरूंनी मला पारमार्थिक वस्तू दाखविली. माझ्या नेत्रांसमोर सद्गुरूंनी शिवलिंग दाखविले. माझा भवसंसार नाहीसा झाला. सर्व भुवन आनंदमय झाले. नासिकाग्री चमकणारा प्रकाश मी पाहिला; तो कोटिसूर्यांच्या प्रभेसारखा होता. हृदयातील चक्रात ज्योत नाचत आहे. सहस्रदळस्थानात चमकणारी वस्तूही मी पाहिली. मीच प्रणवस्वरूपी ब्रह्म झालो.'' याचा अर्थ असा - ईश्वरी साक्षात्काराने त्यांचा संसार संपला. ते निर्भय झाले. त्यांना सर्वत्र आनंदीआनंद झाला. अंतरात नाना प्रकारचे प्रकाश दिसले. त्यांना परमात्मा 'दिसला' आणि 'अहं ब्रह्मास्मि' अथवा 'सच्चिदानंदस्वरूपः शिवोऽहम्' ही परमार्थातील परमोच्च प्रतीती महाराजांनी संपादन केली.

### ✦ सिद्धावस्था व परमार्थाचे मार्गदर्शन

परमार्थातील पूर्ण पदवी प्राप्त झाल्यावर महाराज काडसिद्ध सद्गुरूंच्या दर्शनास सिद्धगिरीस गेले. 'आपण पेरलेल्या परमार्थ-बीजाचा शिष्यामध्ये पूर्ण वृक्ष झाला' हे पाहून काडसिद्धांना आनंद झाला आणि शरणागत मुमुक्षूंना सिद्धसाधन सांगण्याची आज्ञा काडसिद्धांनी महाराजांना दिली. मग निंबरगीत परत आल्यावर गुरूंच्या आज्ञेनुसार महाराजांनी आपल्या वयाची ६७ ते ९५ वर्षे साधकांना सिद्धसाधनाचा उपदेश करण्यात व्यतीत केली. त्यासाठी त्यांनी प्रवचनांचा क्रम सुरू केला.

संध्याकाळी ओढ्यापलीकडील मारुतिमंदिरात जाऊन तेथे असणाऱ्या सेवेकरी आणि देवदर्शनास येणारी मंडळी यांना ते पोथी सांगू लागले. त्यांच्या प्रवचनांची गोडी लोकांना हळूहळू लागली. मग समाजाच्या सर्व स्तरांतले लोक प्रवचनांस जमू लागले. अनेकांना महाराजांचे साधुत्व कळून आले. महाराजांच्या कृपेने अनेक जणांच्या अडचणी दूर झाल्या. काहींनी त्यांचा उपदेश घेतला आणि त्यांच्या काही शिष्यांनी तर परमार्थाचे अंतिम टोकसुद्धा गाठले.

महाराजांचे शालेय शिक्षण नगण्य होते. परंतु सर्वश्रेष्ठ असे आत्मज्ञान त्यांना होते. 'एक आत्मा कळला की सर्व काही कळते' या उपनिषदातील वचनाप्रमाणे महाराज सर्वज्ञ झाले होते. त्यामुळे ते कोणत्याही भाषेतील ग्रंथाचे विवरण करीत. दुर्बोध व कठीण ग्रंथांचा श्रोत्यांना पटेल असा अध्यात्मपर अर्थ ते सांगत. अद्वैत ज्ञानानेच तरणोपाय आहे, यावर त्यांचा भर असे. आपल्या निर्वाणकाळापर्यंत महाराजांनी प्रवचनाचे हे सत्र चालू ठेवले. जमलेली मंडळी जर कधी व्यावहारिक गोष्टी बोलू लागली, तर ते म्हणत, ''संतसभेत देवाच्याच गोष्टी बोलाव्यात. अन्य काही बोलू नये.''

### ✦ प्रवचनांचे सामान्य स्वरुप

महाराजांच्या प्रवचनांस जमणारी मंडळी प्रापंचिक असत. त्यांना महाराज सदाचाराचा उपदेश करीत. संसार क्षणभंगुर आहे. संसारात सुख नाही. आपल्याला दु:ख होऊ नये असे वाटत असेल, तर आपण दुसऱ्याला दु:ख देऊ नये. दुसऱ्याचे चांगले करावे. चिंतेने उदासपणा येतो. म्हणून प्रापंचिक गोष्टींची काळजी न करता परमात्म्याचे चिंतन करावे. विवेकाने संसार करत परमार्थ करावा. आत्मदर्शनासाठीच हा नरदेह आहे.

### ✦ साखरवाटप

लोकांचे मत परमार्थाकडे खेचून घेण्यास महाराज आपणाकडे येणाऱ्याला मूठ मूठ साखर देत व त्यांना नामस्मरण करण्यास सांगत. साखरेसाठी लहान मुलेही त्यांच्याकडे येत. त्यांनाही साखर देऊन राम राम म्हणण्यास महाराज सांगत. मुले त्यांना 'सक्री-मुत्त्या' (साखर देणारे आजोबा) म्हणत.

### ✦ महाराजांचा प्रभाव

लहानपणापासून प्रगट होणारे महाराजांचे दैवी सामर्थ्य आता त्यांच्या सिद्धावस्थेत प्रकर्षाने व्यक्त होऊ लागले.

एकदा महाराज पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनास गेले. त्यांनी पांडुरंगाचे पायांवर मस्तक ठेवताच साक्षात पांडुरंग प्रगटला. आपल्या गळ्यातील दिव्य माळा विठ्ठलाने महाराजांच्या गळ्यात घातली. यावेळी पडलेली परमेश्वराची दीप्ती काही भाग्यवंत माणसांना जाणवली.

काही दुष्ट लोकांनी उमदी गावच्या सिद्रामप्पा नावाच्या परटाला महाराजांना त्रास देण्यास पाठविले. तो महाराजांच्या घरी येऊन त्यांचे पाय चेपू लागला. त्याचा दुष्ट हेतू ओळखून महाराजांनी त्याला विचारले, "तुझे काय काम आहे ?" "मी आपली पादसेवा करण्यास आलो आहे," तो खोटेच म्हणाला. "तुझी सेवा पुरे. जा तू आता," महाराज म्हणाले. परीट निघून गेला. पुढे त्याची बायको व्याधिग्रस्त झाली आणि त्याला स्वत:ला वेड लागले.

शिवलिंगप्पा नावलगीकर हे महाराजांचे पुतणे. त्यांच्या मुलास काही व्यथा होऊन त्याची अत्यवस्था झाली. घरची मंडळी चिंताग्रस्त होऊन बसली. तितक्यात महाराज तेथे गेले. त्यांनी मुलाच्या अंगावरून आपला अमृतहस्त फिरविला. "काळजी करू नका. मुलगा बरा होईल," असे आश्वासन देऊन महाराज अदृश्य झाले. तो मुलगा लवकरच बरा झाला.

सातल नावाच्या गावातील एका मुलीच्या कानांत किडे पडले होते. औषधांनी गुण येईना. तेव्हा तिच्या आईबापांनी मुलीला महाराजांकडे आणले. महाराजांनी आपल्या चिलमीतील तंबाखूची राख तिच्या कानांत घातली. लगेच किडे बाहेर पडले व त्या मुलीला बरे वाटू लागले.

महाराजांचा अनुग्रह घेतल्यावर चिमडचे महाराज काही काळ विटे येथे नोकरीस होते. तेथे त्यांना एक मूल झाले. पण ते लगेच गेले. इकडे निंबरगीत महाराजांनी आपल्या जवळच्या मंडळींना सांगितले, ''रामभाऊ यरगट्टीकरांना मुलगा झाला. पण त्याचे नालच्छेदन व्यवस्थित न झाल्याने तो निवर्तला.''

रघुनाथप्रिय साधुमहाराज हे महाराजांचे एक श्रेष्ठ शिष्य. त्यांच्या निर्वाणानंतर चिमडमहाराज चिमड येथे मठात राहण्यास गेले, त्यानंतरची गोष्ट. या मठात काही काळ एक मोर पाळलेला होता. एकदा चिमडमहाराज निंबरगीस गेले असताना, इकडे कुणीतरी त्या मोराला मारून टाकले. निंबरगीत पोथी सांगत असताना अकस्मात महाराज बोलून गेले, ''चिमड मठातील मोर गेला. तो चांगल्या ठिकाणी गेला.'' महाराजांनी सांगितल्यावेळीच मठातील मोर मेला, असे नंतर चिमडहून पत्र आले.

### ✦ शिष्यांना आलेले अनुभव

महाराजांच्या शिष्यांपैकी अनेकांना त्यांच्या सामर्थ्याचे अनुभव येत. त्यांतील काही असे :-

महालिंगपूर गावचा सिदमलाप्पा अंबी हा महाराजांचा निष्ठावान शिष्य. तो एकदा व्याधीने मरणोन्मुख झाला. ही हकीकत महाराजांना कळविण्यास त्याने तुकाप्पा नावाच्या माणसाला निंबरगीस पाठविले. तुकाप्पा दिसताच महाराज उद्‌गारले, ''तू ज्यासाठी आलास, ते काम झाले. तू परत जा. तोपर्यंत सिदमलाप्पा बरा झालेला असेल.'' तुकाप्पा परत गेला. तोवर सिदमलाप्पा बरा झाला होता.

सातल नावाच्या गावी दादा नावाचा महाराजांचा शिष्य होता. दादा एकदा काही मंडळींसह आपल्या नातवाला घेऊन महाराजांकडे आला. दर्शनानंतर मंडळी परत निघाली. महाराजांनी राहा म्हटले, तरी निकडीची सबब सांगून मंडळी निघाली. महाराज म्हणाले, ''ठीक आहे. पण आज या मुलाला बाहेर पाठवू नका.'' मंडळींनी हो म्हटले. पण त्या दिवशी मोहरमचे डोले पाहण्यास एका सुदृढ माणसाबरोबर त्या मुलाला बाहेर पाठविले. पुढे तो माणूस झीट येऊन पडला. मूलही पडले. त्याच्या डोक्याला जखम झाली. ती बरी होईना. मुलाला पुन्हा महाराजांकडे आणण्यात आले. महाराजांच्या कृपेने मुलाची जखम बरी झाली.

## ✦ महाराजांच्या बोधाचे सार

काडसिद्धांच्या आज्ञेप्रमाणे महाराजांनी संसारी जनांना बोध केला. त्यांच्या बोधाचे सार असे सांगता येईल :- संसारात असताना नेम म्हणून ठराविक नामस्मरण करावे. इतर वेळीही नामानुसंधान असावे. रात्रंदिवस आत्मस्वरूप पाहात संसार केल्यास, जीवशिवांची ऐक्यता होते. सदोदित आत्म्याचे स्मरण करीत आत्मप्रकाश पाहिला म्हणजे जन्ममरण चुकते. ''नडी नुडी इदे जन्म कडी.'' नडी म्हणजे चांगले वागावे. नुडी म्हणजे सद्गुरूची आज्ञा पाळावी. म्हणजे त्यांनी सांगितलेले साधन करीत राहावे. मग ''इदे जन्म कडी'' म्हणजे हा चालू जन्म शेवटचा होतो.

## ✦ निर्वाण व निर्वाणोत्तर

आपल्या आयुष्याची अंतिम अठ्ठावीस वर्षे महाराजांनी परमार्थ सांगण्यात व्यतीत केली. ९५ वे वर्ष लागताच महाराजांनी निजधामास जाण्याचे ठरविले. योग्य ती निरवानिरव केली. चिमडच्या रामभाऊमहाराजांच्याकडे सर्व परमार्थ सोपविला आणि शके १८०७ (= इ. स. १८८५) शुक्रवार चैत्र शुद्ध द्वादशीदिवशी रात्री ११ वाजता, 'भजन पूजन साधुनि बळे' हा तुकाराममहाराजांचा अभंग म्हणून, 'शिव शिव' असे नामस्मरण करीत महाराज शिवरूप झाले.

कुलपरंपरेप्रमाणे मुखात शिवलिंग ठेवण्याचे वेळी महाराजांनी मुख उघडले व ते ठेवून होताच पुन्हा मिटून घेतले. महाराजांची समाधी प्रथम ओढ्यापलीकडे करण्यात आली होती. पुढे तेथे काही अडचण निर्माण झाल्याने ही समाधी ओढ्याच्या अलीकडे सध्याच्या जागी करण्यात आली. महाराजांच्या पुण्यतिथीला असंख्य माणसे जमतात व महाराजांचा जयजयकार करून समाधीवर फुलांचा वर्षाव करतात.

संत स्वस्वरूपी मिळाले, तरी त्यांचे सामर्थ्य अबाधित असते. ते भक्तांसाठी अवतार घेतात, त्यांना दर्शन देतात व त्यांचे कार्य करतात. महाराजही तेच करीत आहेत. निर्वाणानंतर त्यांनी चिमडमहाराज, गुरुदेव रानडे, इत्यादींना दर्शन दिले. शिवलिंगव्वा यांना देवाच्या बालरूपाचा साक्षात्कार करून दिला. भक्तांसाठी ते काय करतात, हे पुढील गोष्टींवरून कळते : गोपाळराव पुजारी एकदा चिमडला पोचले, तेव्हा अंधार पडला होता व ओढ्याला पाणी आले होते. गोपाळराव चिंतेत पडले. तेवढ्यात एका वृद्धाच्या स्वरूपात महाराज प्रगट झाले व त्यांनी गोपाळरावांना सुखरूप मठात पोचविले आणि ते अदृश्य झाले. एकदा लक्ष्मीबाई अक्कांसह कोटणीसमहाराज निंबरगीस गेले होते. पूजासाहित्यात केळी नसल्याने केळ्यांचा शोध घेण्यात आला. पण जवळ कुठेच केळी मिळाली नाहीत. अचानक केळ्यांची पाटी घेऊन एक माणूस

तेथे आला. त्याच्याकडून केळी घेण्यात आली. पैसे देण्याचे वेळी केळीवाला कुठेच दिसेना. शोध करूनही तो सापडला नाही. ही हकीकत लक्ष्मीबाई अक्कांना कळताच त्या म्हणाल्या, ''बाबांनो, तो केळीवाला म्हणजे निंबरगीकरमहाराजच होते. त्यांचा शोध तुम्हाला कसा लागणार ?'' इ. स. १९३९ साली सांगलीला श्रीदादामहाराज केळकरांच्या घरी निंबरगीकरमहाराज प्रगट झाले व श्रीदादामहाराजांना त्यांनी 'श्रीगुरुलिंगगीता' श्रुत केली. ती पुस्तकरूपाने आज उपलब्ध आहे.

अशा प्रकारे सकलसामर्थ्यसंपन्न निंबरगीकरमहाराज आजही अनुभव देत असल्याने श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज म्हणतात :

*''गुरुलिंगजंगमस्वामिकृपेची ।*
*छाया सर्वां परोपरीची ॥''*

●●●

## प्रकरण ३ : संदर्भसूची


१. **कैवल्यकुंज**, र. ह. कोटणीस, सांगली, १९६८
२. **कैवल्यपुरुष, खंड १**, ह. पां. कोटणीस, सांगली, १९३३
३. **कैवल्यपुरुष, खंड १, भाग २**, र. ह. कोटणीस, सांगली, १९५२
४. **कैवल्यप्रसाद**, पां. र. कोटणीस, सांगली, १९५९
५. **कैवल्यबोध**, र. ह. कोटणीस, सांगली, १९२५
६. **कैवल्यवैभव**, र. ह. कोटणीस, सांगली, दुसरी आवृत्ती, १९२६
७. **जीवनगंगा**, म. श्री. देशपांडे, नागपूर, पहिली आवृत्ती, १९६६
८. **दादामहाराज केळकर यांची हस्तलिखित वही**
९. **नित्यनेमावलि**, कृ. दा. संगोराम, अथणी, आवृत्ती ८ वी, १९६०
१०. **निंबरगीकरमहाराज**, डॉ. के. वा. आपटे, पुणे, १९८३
११. **बोधसुधा**, म. श्री. देशपांडे, अथणी, पहिली आवृत्ती , १९५८
१२. **सज्जनगड मासिक**, श्रीसमर्थ रामदासस्वामी विशेषांक, फेब्रुवारी, १९८२
१३. **सिद्धकथामृतसार**, दासराम, सिद्धगिरिसंदेश त्रैमासिक, मुंबई
१४. **हणमंतरावजी कोटणीस-चरित्र**, साधुदास, सांगली, १९३७


▲▲▲



श्रीशंभुस्वरूप रेवणसिद्ध



श्रीमरुळसिद्ध



श्रीकाडसिद्ध



श्रीनिंबरगीकरमहाराज



श्रीनागाप्पाण्णामहाराज



श्रीगुरुलिंगप्पामहाराज



श्रीगुरुसिद्धप्पामहाराज निंबरगीकर



श्रीकाडसिद्धमहाराज निंबरगीकर



महायोगिनी श्रीलक्ष्मीबाई अक्का



श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज



श्रीरामचंद्रमहाराज यरगट्टीकर



माईसाहेबमहाराज यरगट्टीकर

# निंबरगीकरमहाराजांचे वंशज

निंबरगीकरमहाराजांच्या निर्वाणानंतर त्यांच्या परमार्थाची परंपरा त्यांचे वंशज आणि सच्छिष्य या दोघांच्याद्वारा चालू राहिली. येथे आता प्रथम त्यांच्या वंशजांची माहिती दिली आहे. त्यानंतर पुढील प्रकरणात त्यांच्या अधिकारी शिष्यांची हकीकत दिलेली आहे.

## ✦ निंबरगीकरमहाराजांचे वंशज

### १. भीमाण्णामहाराज :

भीमाण्णा हे निंबरगीकरमहाराजांचे एकुलते एक चिरंजीव. त्यांच्या मातोश्रींचे नांव सौ. लक्ष्मी. आपल्या निर्वाणापूर्वी महाराजांनी भीमाण्णांना प्रश्न केला, "तुम्ही परमार्थाचे नेतृत्व पत्करणार काय ?" भीमाण्णा उत्तरले, "ती जबाबदारी मला पेलणार नाही. मी प्रपंचात राहूनच परमार्थ करीन." त्याप्रमाणे त्यांनी परमार्थ साधला. महाराजांच्या निर्याणसमयी श्रीलक्ष्मीबाई अक्का व भीमाण्णा त्यांच्याजवळ होते. निंबरगीकरमहाराजांच्या कृपेने तेही परमार्थात अधिकारी पुरुष झाले होते. म्हणूनच चिमडमहाराजांच्या दाजीसाहेब या ज्येष्ठ चिरंजीवांना भीमाण्णांचेकडून अनुग्रह देववावा, असे लक्ष्मीबाई अक्कांनी सांगून ठेवले होते. त्याप्रमाणे करण्यात आले.

जगाचा त्रास नको म्हणून एकदा भीमाण्णांचे चिरंजीव श्रीनागाप्पाण्णा विहिरीत जाऊन दडून बसले. हे भीमाण्णांना कळले. भीमाण्णा विहिरीजवळ जाऊन म्हणाले, "बाळा, जगाचा त्रास न मानता, जगाला वळणावर आणून साममय करावे." हे बोलणे पटून नागाप्पाण्णा विहिरीतून बाहेर आले.

### २. भाऊराव :

भीमाण्णांच्या पत्नीचे नाव सौ. सिदव्वा. या जोडप्याला सुबराव, गुरुपादप्पा, नागाप्पाण्णा व भाऊराव असे चार पुत्र होते. भाऊरावांना उमदीकरमहाराजांचा अनुग्रह होता. एकदा निंबाळला अवर्षण असताना, भाऊराव तेथे गेले होते. तेथे साधन होऊन भजन झाल्यावर पाऊस पडला. तेव्हा गुरुदेव रानडे उद्गारले, "आपले भजन इंद्राला ऐकू जाऊन त्याने पाऊस पाठला. भाऊरावांच्यामुळे हे देवाने घडविले."

### ३. गुरुलिंगाप्पा :

वरील भाऊरावांचे चिरंजीव गुरुलिंगाप्पा. हे निंबरगीत राहून गुरुसिद्दप्पांच्यासह निंबरगीकरमहाराजांच्या समाधीची व्यवस्था पाहतात व त्यांच्या पुण्यतिथीचा सोहळा साजरा करतात. ते अनुग्रहही देतात.

**४. श्रीनागाप्पाण्णामहाराज :**

हे भीमाण्णाचे चिरंजीव. त्यांचा जन्म इ. स. १८९१ मध्ये झाला. लहानपणापासून त्यांचे ध्यान देवाकडे असे. त्यांचे लौकिक शिक्षण फारसे झाले नाही. त्यांनी उमदीकरमहाराजांचा अनुग्रह घेतला. त्यानंतर ते नित्यनेमाने त्रिकाल साधन व भजन करीत असत.

नागाप्पाण्णा गायन-वादनांत निष्णात होते. ते भजन करताना पदांतील विषयांना धरून हालचाल करीत. भजनात ते देहभानही विसरून जात.

नागाप्पाण्णांना मूळव्याधीचा विकार होता. त्यावर उपाय म्हणून शीर्षासन करण्यास त्यांना प्रा. गजेंद्रगडकरांनी सांगितले. नागाप्पाण्णा शीर्षासन घालून साधन करू लागले. पुढे त्यांची मूळव्याध बरी झाली. एकदा प्रा. गजेंद्रगडकर उद्वेगाने नागाप्पाण्णांना म्हणाले, ''मला मूल नाही, काय करावे ?'' नागाप्पाण्णांनी सांगितले, ''निंबरगीकरमहाराजांच्या समाधीपुढे नंदादीप लावा. तुम्हाला मूल होईल.'' गजेंद्रगडकरांनी तसे केले आणि एक वर्षातच त्यांना मुलगा झाला.

एकदा आपल्या वेड्या मुलाला घेऊन त्याचे आईबाप नागाप्पाण्णांच्याकडे आले व म्हणाले, ''कितीही औषधे केली, तरी याचे वेड जात नाही. महाराज, आपण काहीतरी करा.'' नागाप्पाण्णांनी त्या मुलाला आपल्याजवळ ठेवून घेतले. चार दिवस त्याला साधन करण्यास बसविले. काही दिवसांत त्याचे वेड गेले.

आपण श्रेष्ठ असा अहंकार असणारा एक योगी निंबरगीत आला. 'शरीर काष्ठवत करणे म्हणजे समाधी नव्हे,' हे त्याला पटविण्यास नागाप्पाण्णांनी साधनास बसून, आपले आसन एक हातभर उंच अंधातरी करून दाखविले. एरवीसुद्धा नागाप्पाण्णामहाराज साधनास बसले की त्यांचे आसन एक वीतभर अंतराळी होई व तेथे प्रकाश पडे.

चिमडला साधुमहाराजांच्या रथोत्सवास नागाप्पाण्णामहाराज जात असत. तेथे त्यांचा फार आदरसत्कार केला जाई. इ. स. १९३९ साली नागाप्पाण्णामहाराज चिमडच्या रथोत्सवास आले असता, श्रीदादामहाराज केळकरही तेथे गेले होते. दादामहाराजांनी नागाप्पाण्णामहाराजांना पारमार्थिक गोष्टी विचारल्या, काही त्यांनी सांगितल्या. ''उरलेल्या गोष्टी निंबरगीकरमहाराज स्वतःच तुम्हाला सांगतील,'' असे ते बोलून गेले. त्यांच्या वचनाप्रमाणे निंबरगीकरमहाराजांनी श्रीदादामहाराजांना साक्षात दर्शन देऊन श्रुति-प्रकाश-रूपाने गुरुलिंगगीता दिली.

निंबरगीतच शके १८७५, श्रावण वद्य २, बुधवार रोजी भ्रूमध्यावर दृष्टी ठेवून

श्रीनागाप्पाण्णामहाराजांनी निर्याण केले. घरच्या शेतातच त्यांची समाधी त्यांचे चिरंजीव गुरुसिद्दप्पा यांनी बांधवून घेतली आहे. तेथे त्यांच्या पुण्यतिथिदिवशी फुले उधळली जातात.

**५. गुरुसिद्दप्पामहाराज :**

गुरुसिद्दप्पामहाराज हे नागाप्पाण्णामहाराजांचे श्रेष्ठ चिरंजीव. लहानपणी त्यांना उमदीकरशिष्या शिवलिंगव्वा यांनी कडेखांद्यावर खेळविले होते आणि सिद्धरामेश्वरांनी त्यांना स्वहस्ते जेवूखाऊ घातले होते.

निंबरगीकरमहाराजांची ओढ्याकाठी समाधी होईपर्यंत साधन व भजन नागाप्पाण्णामहाराजांच्या घरी होत असे. गुरुसिद्दप्पाही डोळे मिटून बसत. एकाने त्यांना प्रश्न केला, "मुला, डोळे मिटल्यावर तुला काही दिसते काय ?" "मला प्रकाश दिसतो," गुरुसिद्दप्पा उत्तरले. जमलेल्या सर्वांना आश्चर्य वाटले. तेव्हा नागाप्पाण्णामहाराज म्हणाले, "अहो, गवयाचे पोर रडले तरी ते तालासुरावर रडते. तसा हा प्रकार आहे."

पुढे शिक्षणासाठी गुरुसिद्दप्पा विजापुरास गेले. तेथे उमदीकरमहाराजांचे शिष्य दत्तोपंत कुलकर्णी, व्यंकटराव अंजुरगी व रामराव होर्ती हे ज्या खोलीत श्रावण मासाचा साधनसप्ताह करीत, तेथेच गुरुसिद्दप्पा राहात होते. एकदा त्यांनी, "तुम्ही डोळे मिटून का बसता ?" असे दत्तोपंतांना विचारले. "तुमच्या पणजोबांपासून चालत आलेले साधन आम्ही करतो. तुम्हाला जाणून घ्यायचे असेल, तर मी सांगेन," दत्तोपंत म्हणाले. "मला सांगा," असे गुरुसिद्दप्पांनी म्हटल्यावर दत्तोपंतांनी त्यांना साधनोपदेश केला. तेव्हापासून गुरुसिद्दप्पांचा साधनाभ्यास सुरू झाला. तसेच आपल्या वडिलांच्या मार्गदर्शनाखाली गोड भजन करण्यास ते शिकले.

उपजीविकेसाठी गुरुसिद्दप्पांनी शिक्षकीपेशा पत्करला होता. एकदा मुलांना घेऊन ते सहलीसाठी काकनखेड येथे गेले. तेथे महीपतरायांची समाधी आहे. रात्री तेथे कोणी झोपत नाही. म्हणून मुले बाहेर झोपली व गुरुसिद्दप्पा आतच साधन करीत राहिले. पहाटे त्यांनी काकडारती केली. त्यांना मात्र काहीच त्रास झाला नाही.

सध्या ते सेवानिवृत्त झाले असून, निंबरगात राहतात. त्यांचे सांगलीच्या दादामहाराज केळकरांवर फार प्रेम असून, ते अधूनमधून त्यांच्याकडे येत असतात. गुरुलिंगाप्पामहाराजाच्यांसह ते निंबरगीत निंबरगीकरमहाराजांच्या समाधीची व्यवस्था पाहतात व त्यांच्या पुण्यतिथीचा सोहळा साजरा करतात. ते अनुग्रहही देतात. ते

प्रसिद्धिपराङ्मुख आहेत. ते अगदी निंबरगीकरमहाराजांच्याप्रमाणे दिसतात. त्यांचा साधन वगैरेचा नित्यक्रम चालू असतो.

●●●

## पुरवणी : संदर्भसूची


१. **कैवल्यपुरुष, खंड १**, ह. पां. कोटणीस, सांगली, १९३३

२. **दादामहाराज केळकर यांची हस्तलिखित वही**

३. **दासरामगौरवग्रंथ**, धनंजय भावे, सांगली, १९८०

४. **श्रीनागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर**, रा. गो. केळकर, सांगली


▲▲▲

प्रकरण ४

# निंबरगीकरमहाराजांचे काही अधिकारी शिष्य

काडसिद्ध-सद्‌गुरूंच्या आज्ञेनुसार निंबरगीकरमहाराजांनी सिद्ध संप्रदायातले साधन आपल्या शिष्यांना सांगितले. महाराजांच्या शिष्यसमूहात सर्व जातिजमातींचे व धर्मांचे लोक होते. त्यांतील काही शिष्यांची नावे अशी :- रघुनाथप्रिय साधुमहाराज, लक्ष्मीबाई अक्का, रघुनाथाचार्य आद्य व त्यांची पत्नी, नरसाप्पा शापेटी, भाऊराव सावळसंगकर, शिवलिंगाप्पा नावलगीकर, विरक्ताप्पा उमदी, पंढरीनाथ देसाई, लायप्पा ककमरी, गुरुबसाप्पा कोष्टी, पेरू (मांग), मोद्दीनसाहेब, मलकाप्पा माशाळ, बाबाचार्य आद्य, सिदमलाप्पा अंबी, आत्माराबुवा (जैन), दाजीबा पाटील, गुरुलिंगप्पा आवटी, बापूरावदादा जिगजिवणी, कुलकर्णी व त्याची पत्नी, तुकाप्पा, दाजीबा देशपांडे, इ. इ. यांतील अनेकजण परमार्थातील अधिकारी होते. त्या सर्वांत रघुनाथप्रिय साधुमहाराज हे श्रेष्ठ होते. तसेच त्यांनी गुरुशिष्यपरंपरा पुढे जोमाने चालू राहिली.

आता या प्रकरणात महाराजांच्या काही अधिकारी शिष्यांची उपलब्ध झालेली माहिती दिली आहे आणि नंतर पुढील पाचव्या प्रकरणात रघुनाथप्रिय साधुमहाराजांचे पवित्र चरित्र स्वतंत्रपणे दिलेले आहे.

### १. भाऊरावकाका सावळसंगकर :

भाऊरावकाका हे सावळसंग गावी राहात. ते धिप्पाड असून आजानुबाहू होते. निंबरगीकरमहाराजांच्या ठिकाणी त्यांची दृढ निष्ठा होती. महाराजांच्या कृपेने त्यांना पारमार्थिक योग्यता लाभली होती. आपल्या पहाडी पण मधुर आवाजात ते संतांची पदे फार चांगल्या प्रकारे म्हणत. त्यांची समाधी तिकोटे नावाच्या गावी आहे.

### २. विरक्ताप्पा उमदी :

विरक्ताप्पा उमदी हे निंबरगीकरमहाराजांचे एक शिष्य असून ते नियमाने महाराजांच्या पुण्यतिथीच्या उत्सवास जात. इंचगिरी गावाजवळील कन्नूर नावाच्या गावी त्यांनी देह ठेवला. तेथेच त्यांची समाधी आहे.

### ३. तुकाप्पा :

निंबरगीकरमहाराजांचे तुकाप्पा नामक शिष्य जतच्या बाजूला राहात. ते सतत साधनमग्न असत. फाल्गुन वद्य द्वितीयेस, सोमवारी सकाळी ते सदेह वैकुंठास गेले, असे म्हणतात.

### ४. सिदमलाप्पा अंबी :

सिदमलाप्पा अंबी हा महालिंगपूर गावचा रहिवासी. याने एके दिवशी आपल्या घरी काही माणसांना भोजनास बोलावले. भोजनसमयी 'निंबरगीकरमहाराज आत्ता भोजनास असते, तर फार छान झाले असते,' असे त्याच्या मनात आले. त्याचे मनोगत कळल्यावर निंबरगीतून निघून महाराज तत्काळ एका जंगमाच्या रूपाने भोजनास आले. भोजनोत्तर त्यांना दक्षिणा देण्यास सिदमलाप्पा जो घरात जातो, तो महाराज अदृश्य झाले. असेच एकदा सिदमलाप्पा गावाबाहेर जात असता, त्याला दर्शन देऊन महाराज गुप्त झाले.

### ५. शिवलिंगप्पा नावलगीकर :

शिवलिंगप्पा हे निंबरगीकरमहाराजांचे पुतणे. ते जमखंडी संस्थानातील नावलगी गावी राहात. त्यांनी महाराजांचा अनुग्रह घेतला. पण झोपेमुळे ते साधनाचा आळस करीत. निंबरगीकरमहाराज अनेकदा रात्री निंबरगीत गुप्त होऊन शिवलिंगप्पांच्या घरी प्रगट होत व हाका मारून जागे करून साधनास बसवीत. कधी महाराज त्यांना हातांनी उठवून साधनास बसवीत.

शिवलिंगप्पांच्या एका आजारी मित्राने तंद्रिल अवस्थेत त्यांच्या नाकाचा चावून तुकडा तोडला. निंबरगीत महाराज आपल्या कुटुंबास म्हणाले, "शिवलिंगप्पाचे नाक तुटले आहे. पण ते लवकरच पूर्ववत होईल." त्याप्रमाणे शिवलिंगप्पांचे नाक पहिल्याप्रमाणे झाले.

### ६. नरसाप्पा शापेटी :

नरसाप्पा हे विजापूरचे राहणारे असून ते मालगार होते. त्यांना महाराजांचा अनुग्रह होता. महाराज त्यांना 'कडे हुट्ट मगा' (सर्वांत शेवटचा पुत्र, शेंडेफळ) असे प्रेमाने म्हणत. एकदा ते महाराजांचे पाय चेपीत होते. त्यावेळी त्यांना शंखनादाचा अनुभव आला. एकदा नरसाप्पांनी महाराजांना विचारले, "सोऽहं हंसः याची प्रचीती काय ?" "चूप," महाराज उद्‌गारले. तोच नरसाप्पांचे तोंड बंद झाले, डोळे मिटले गेले आणि त्यांना आतल्या आत 'सोऽहं हंसः' ची प्रचीती आली. काही काळाने महाराजांनी त्यांना देहभानावर आणले. नरसाप्पांची समाधी मसळी नावाच्या गावी आहे.

### ७. श्रीरघुनाथाचार्य आद्य :

रघुनाथाचार्य आद्य हे आगरखेड यषथील आद्य घराण्यात जन्मले. त्यांना

उमदीकर महाराजांची बहीण दिलेली होती. दोघांनीही निंबरगीकरमहाराजांचा अनुग्रह घेतला आणि दोघांचेही संसारातील लक्ष उडाले. आपली शेतजमीन ब्राह्मणांना दान देऊन दोघेही निंबरगीत भीमरावाच्या देवळाच्या ओवरीत राहण्यास आले व साधन करू लागले. या दोघांबद्दल निंबरगीकरमहाराज म्हणत, "रघुनाथ म्हणजे मानव देहातील निर्गुण परमात्मा आहे, तर त्याची पत्नी ही मूळमाया आहे."

रघुनाथाचार्यांचे वैशिष्ट्य असे की निंबरगीकरमहाराजांचा अनुग्रह होताच तत्काळ त्यांना परमात्म्याचे विराट दर्शन झाले. ते घाबरले. तेव्हा निंबरगीकरमहाराज म्हणाले, "रघुनाथा, घाबरू नकोस. तुझी योग्यता मोठी आहे. म्हणून तुला प्रथमच परमात्मदर्शन झाले."

रघुनाथाचार्य रात्री साधनास बसले की त्यांचे शरीर हलके होऊन ते वरखाली होऊ लागे. त्यांची ही अवस्था पाहण्यास सोलापूरचे प्रभाकरस्वामीमहाराज येत व रात्रभर हा चमत्कार पाहात बसत.

यथासमय आपल्या निर्याणाचा बेत रघुनाथाचार्यांनी आपले मेहुणे उमदीकरमहाराज यांना कळविला. 'श्रावण महिना संपल्यावर निर्याण करावे,' असे उमदीकरमहाराजांनी सुचविले. श्रावण मास संपताच स्वत:च स्मशानात जाऊन त्यांनी एका तरवडाच्या झुडुपाखाली ध्यानावस्थेत निर्याण केले. या सिद्धपुरुषाची प्रसिद्धीही झाली नाही व समाधीही बांधली गेली नाही.

**८. महायोगिनी लक्ष्मीबाई अक्कामहाराज :**

'धन्य आका लक्ष्मीबाई। जैशी मीरा मुक्ताबाई॥' असे लक्ष्मीबाई अक्कांविषयी धन्योद्‌गार श्रीदादामहाराज केळकरांनी काढले आहेत. काही लोक त्यांना समर्थ स्वामी रामदासांच्या वेणुअक्का म्हणत. 'कर्नाटक प्रांतात अक्कांच्या योग्यतेची तपस्विनी आणि योगिनी झालीच नाही, असे म्हणतात' (कर्नाटक-महाराष्ट्रातील समर्थ संप्रदाय, पृ. २०).

निंबरगीरकरमहाराजांची भगवंतौवा नावाची एक स्त्री अनुगृहीत होती. तिचे पती गोविंदाप्पा येळसर या दांपत्याला शके १७६९ (= इ. स. १८४७) मध्ये लक्ष्मी हे कन्यारत्न झाले. अक्का हे त्यांचे व्यवहारात पडलेले नाव. अक्कांना अगदी बाळपणापासून निंबरगीकरमहाराजांनी आपल्याजवळ ठेवून घेतले व त्यांचेकडून साधन करवून घेतले. अक्कांनी आमरण विवाह केलाच नाही. एक बोटभर चिंच व भाकरी असा आहार घेत, महाराजांची सेवा करीत त्यांनी साधनाचा अभ्यास केला आणि परमार्थातील श्रेष्ठ पद प्राप्त करून घेतले.

एकदा अक्का आजारी पडल्या. महाराजांनी त्यांना औषध देऊ केले. "महाराज, तुमची कृपा हेच माझे औषध," अक्का म्हणाल्या. "ठीक आहे," असे म्हणून औषध महाराज

स्वतःच प्याले व त्यांनी पथ्याचे जेवण केले. दुसरे दिवशी अक्का बऱ्या झाल्या. असाच एकदा अक्कांना सर्पदंश झाला. तेव्हा महाराजांनी त्यांना एक मुळी उगाळून दिली. अक्कांना काहीच अपाय झाला नाही.

### ✦ देवाचा भात

निंबरगीकरमहाराज व अक्का एकदा म्हैसवाडगी गावाजवळ कृष्णा नदीच्या तीरावर आले. जवळ तांदूळ होते. पण शिजविण्यास भांडे नव्हते. तेव्हा त्यांनी आपल्या धोतरात ते तांदूळ बांधले, ते पाण्यात बुडविले, वाळवंटात एक खड्डा करून त्यात ते पुरले व वर विस्तव पेटवून जाळ केला. काही वेळाने खड्डा उकरून महाराजांनी तांदळाचे गाठोडे बाहेर काढले. धोतरात उत्तम भात तयार झाला होता. वाळवंटातलेच तीन दगड धुऊन घेऊन त्यांवर महाराजांनी भात वाढला. ''महाराज, तिसऱ्या दगडावरील भात कुणासाठी आहे ?'' अक्कांनी विचारले. महाराज उत्तरले, ''ज्या देवाने आपणांस भात करून दिला, त्याला नैवेद्य नको का द्यायला ?'' महाराजांनी देवासाठी वाढलेला भात झरझर विरघळून गेला.

### ✦ शिवाची भाकरी

निंबरगीकरमहाराज व अक्का एकदा रानात गेल्या होत्या. तेथे त्यांना भूक लागली. पण जवळ खाण्यास तर काहीच नव्हते. तेवढ्यात तिखट व भाकरी आणि पाणी घेऊन जाणारा एक मुलगा तेथून जाताना दिसला. ''मुला, तू कोण ? तू कुठे चालला आहेस ?'' महाराजांनी त्याला प्रश्न केला. मुलगा म्हणाला, ''माझे नाव शिवा आहे. मी आईसाठी रानात न्याहारी घेऊन जात आहे.'' ''अरे, आमच्या या मुलीला फार भूक लागली आहे. देतोस तुझ्याजवळची भाकरी तिला ?'' महाराज बोलले. ''घ्या की महाराज,'' असे बोलून त्या मुलाने भाकरी दिली. तो मुलगा चार पावल पुढे गेला आणि दिसेनासा झाला.

### ✦ मी तव हमाल

आणखी एके प्रसंगी महाराज व अक्का शेतात गेले होते. घरी नेण्यासाठी म्हणून महाराजांनी वाकाचे दोन भारे तयार केले. एक आपणासाठी व दुसरा अक्कांसाठी. पण अक्कांना तो भारा काही उचलेना. ते पाहून महाराजांनी तोही भारा आपणच घेतला. तितक्यात एक काळसर रंगाचा पुरुष तेथे आला व म्हणाला, ''महाराज, तुम्ही हे ओझे घेऊ नका. मी हे भारे तुमच्या घरी पोचवितो.'' महाराज, ''बरे'' म्हणाले. त्याने ते भारे महाराजांच्या घरी पोचविले आणि थोडासा पुढे जाऊन तो अदृश्य झाला.

### ✦ चिमड मठाची पूर्वसूचना

एका वेळी निंबरगीकरमहाराज अक्कांना बरोबर घेऊन चिमड गावाजवळील पूर्वीच्या स्मशानाच्या जागेत आले होते. भविष्यदर्शी महाराजांनी तेथे कापूर प्रज्वलित केला व अक्कांनाही त्यात कापूर घालण्यास सांगितले. "महाराज, तुम्ही कापूर घातल्यावर आता मी कशाला कापूर घालू ?" अक्का म्हणाल्या. महाराजांनी सांगितले, "अग अक्का, काही काळाने या जागेत एका साधुपुरुषाची समाधी व मठ होणार आहे आणि लक्षात ठेव, तुलाही नंतर याच मठात राहावे लागणार आहे." पुढे याच स्थानी महाराजांचे शिष्य रघुनाथप्रिय साधुमहाराज यांची समाधी झाली. तसेच महाराजांच्या आज्ञेने चिमडमहाराजही येथेच मठ बांधून राहण्यास आले आणि महाराजांच्या निर्याणानंतर लक्ष्मीबाई अक्कांनाही याच मठात येऊन राहावे लागले.

### ✦ अक्कांचे रुदन

निंबरगीकरमहाराज एकदा सहज अक्कांच्या घरी आले. बसल्या बसल्याच ते स्तब्ध झाले; त्यांची काही हालचाल दिसेना. ते पाहून अक्का घाबरल्या. त्यांनी महाराजांचे शरीर हलवून पाहिले. पण त्यांच्या शरीराचे काहीच चलनवलन होईना. तेव्हा मात्र अक्कांना रडू कोसळले. "महाराज, आम्हाला सोडून कसे हो गेलात ?" असे म्हणत त्या शोक करू लागल्या. असेच दोनतीन तास गेले आणि महाराजांना दिसले की अक्का रडत आहेत. तेव्हा सर्व प्रकार त्यांच्या लक्षात आला. तेव्हा, "अगं अक्का, जरा दुसरीकडे काम निघाले म्हणून आम्ही गेलो होतो. उगीच कशाला रडत बसलीस?" असे बोलून महाराजांनी अक्कांचे सांत्वन केले.

### ✦ महाराजांच्या निर्याणापूर्वी

महाराजांनी निर्याणास जाण्याचे ठरविले. तत्पूर्वी अक्कांच्या विनंतीनुसारच निंबरगीकरमहाराजांनी आपल्या परमार्थाचे नेतृत्व रामभाऊमहाराज यरगट्टीकर ऊर्फ चिमडमहाराज यांचेकडे सोपविले आणि अक्कांच्या इच्छेप्रमाणे महाराजांनी चिमडमहाराजांच्या पुत्रपौत्रानांही परमार्थ लाभू दे, असा आशीर्वाद देऊन चिमडमहाराजांना प्रसादाचा नारळ दिला.

### ✦ महाराजांच्या निर्याणानंतर

आपल्या पश्चात चिमडमहाराजांनी अक्कांचा सांभाळ करावा, असे निंबरगीकरमहाराजांनी चिमडमहाराजांना सांगून ठेवले होते. महाराजांच्या निर्याणसमयी महाराजांचे चिरंजीव भीमाण्णा आणि लक्ष्मीबाई अक्का त्यांच्याजवळ

होत्या. महाराजांचे निर्याणाचे पत्र आल्यावर चिमडमहाराज निंबरगीस गेले. त्यांनी महाराजांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले; अक्कांच्या घरी जाऊन त्यांचे सांत्वन केले व निंबरगीकरमहाराजांच्या इच्छेप्रमाणे लक्ष्मीबाई अक्कांना घेऊन चिमडमहाराज चिमड मठात आले. त्यानंतर आपल्या निर्याणापर्यंत अक्का चिमड मठातच राहिल्या.

### ✦ चिमड मठात वास्तव्य

महाराजांच्या इच्छेला अनुसरून अक्का चिमड मठात राहण्यास आल्या. पुढे काही वर्षांनी इ. स. १८९१ मध्ये चिमडमहाराजांनी निर्याण केले. त्यावेळी चिमडमहाराजांची मुले अल्पवयीन होती. चिमडमहाराजांचे ज्येष्ठ चिरंजीव वयात येईपर्यंतच्या काळात चिमडमहाराजांचा प्रपंच व परमार्थ यांची देखभाल लक्ष्मीबाई अक्कांनी निरलसपणे केली. या काळात लक्ष्मीबाई अक्कांच्या अद्भुत सामर्थ्याचा प्रत्यय अनेक भक्तांना आला.

### ✦ आजारातून बरे केले

चिमडमहाराजांचे चिरंजीव नारायणराव तसेच शामराव शिरोळकरांची पत्नी यांना अक्कांनी त्यांच्या आजारातून बरे केले. तसेच अक्का एकदा काही मंडळींसह निंबरगीला जात असताना, वाटेत सुट्टी गावचे ओढ्याजवळ शंकरराव आपटे यांना महामारी झाली. हे अक्कांना कळले. त्यांनी ओढ्याचे पाणी वाटीतून आणवून ते शंकररावांना दिले. शंकररावांना उतार पडला.

### ✦ दरोडेखोर परत गेले

त्या काळात अधूनमधून दरोडे पडत असत. एकदा चिमड मठावर दरोडेखोर लूटमार करण्यास येऊ लागले. ही वार्ता अक्कांच्या कानी गेली. घाबरलेल्या मंडळींना अक्का म्हणाल्या, "तुम्ही काळजी करू नका. दरोडेखोर कसे मठात येतात, ते मी पाहते." असे बोलून त्या मठाच्या अंगणातील तुळशीवृंदावनापाशी येऊन बसल्या. दरोडेखोर मठाच्या प्रवेशद्वारापर्यंत आले. पण तेवढ्यात सर्वांची मती पालटली आणि ते सर्वजण आल्या पावली परत निघून गेले. मठावरचे संकट अक्कांनी दूर केले.

### ✦ अन्न कमी पडले नाही

एके वर्षी साधुमहाराजांचा पांडवपंचमीचा रथोत्सव चालू होता. त्या वर्षी अंदाजाबाहेर मंडळी उत्सवातील भोजनास जमली. मठात तयार केलेले अन्न सर्वांना पुरण्यासारखे नव्हते. ही गोष्ट अक्कांच्या कानांवर घालण्यात आली. तेव्हा अक्का स्वतः स्वयंपाकगृहात येऊन बसल्या. इकडे पंगतीत वाढप सुरू झाले. आलेल्या सर्व मंडळींची जेवणे होऊन गेली. तरीसुद्धा बरेच अन्न शिल्लक राहिले.

### ✦ नागोदरातून वाचविले

इ. स. १८९५ सालचा मार्च महिना. यावेळी चिमडमहाराजांचे पट्टशिष्य श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस हे नागोदराच्या असाध्य व्याधीने ग्रस्त झाले व गुरुस्थानी देह ठेवण्यास ते चिमडास आले. अक्कांनी त्यांना बरे करण्याची हमी घेतली. एक अट घातली, २१ दिवस काही झाले तरी कोटणीसमहाराजांनी मठाच्या विशिष्ट परिसराबाहेर जाता कामा नये. ही अट कोटणीसमहाराजांनी पाळली. एकवीस दिवसांनंतर अक्कांच्या कृपेने ते संपूर्ण रोगमुक्त झाले. या काळात अक्कांनी कोटणीसमहाराजांना संप्रदायातील सत्पुरुषांच्या अनेक गोष्टी सांगितल्या. त्या कोटणीसमहाराजांनी लिहून काढल्या. नंतर त्यांना ठाकठीक स्वरूप देऊन त्या 'कैवल्यपुरुष, खंड १' या ग्रंथाद्वारे प्रकाशित करण्यात आल्या.

### ✦ अक्कांचा प्रकाश

तात्यासाहेब कोटणीसमहाराज हे इ. स. १८९५ च्या साधुमहाराजांच्या रथोत्सवास सपत्नीक चिमडास गेले होते. एके रात्री बहिर्दिशेस जाताना अक्कांनी तात्यासाहेबांच्या पत्नीला आपल्याबरोबर चलण्यास सांगितले. अक्कांनी बरोबर कंदील वगैरे काहीच घेतले नव्हते. तेव्हा तात्यासाहेबांची पत्नी म्हणाली, "अक्का, दिव्याशिवाय अंधारातून कसे जावयाचे ?" "थांब तुला आमचा उजेड दाखविते," असे बोलून अक्कांनी त्यांच्या डोळ्यांवरून हात फिरविला. त्यांच्या दृष्टीला दिव्य चांदणे दिसले आणि बहिर्दिशेस जाऊन मठात येईपर्यंत ते चांदणे त्यांना दिसतच राहिले.

### ✦ पुत्रप्राप्तीचा आशीर्वाद

तात्यासाहेबमहाराज कोटणीसांच्या पत्नीला बरेच दिवस पुत्र झाला नव्हता. इ. स. १८९६ साली त्या चिमडास गेल्या असताना, त्यांनी अक्कांकडे पुत्रप्राप्तीची प्रार्थना केली. "साधुमहाराजांना विचारून सांगते," अक्का म्हणाल्या. नंतर तात्यासाहेबांच्या पत्नीने पुन्हा विचारल्यावर अक्कांनी सांगितले, "बाई गं, साधुमहाराज म्हणतात - 'तुला पुत्र होतील, पण तुझी प्रकृती कायमची व्याधिग्रस्त होईल आणि पुत्र नको असल्यास प्रकृती उत्तम राहील.' तुला काय हवे ?" तात्यासाहेबांच्या पत्नीने पहिला पर्याय पसंत केला. "तुझी इच्छा पूर्ण होईल," अक्का म्हणाल्या. त्याप्रमाणे तात्यासाहेबांच्या पत्नीला अनेक पुत्र झाले.

### ✦ अक्कांचे निर्याण

यथावकाश अक्कांच्या मातोश्रींचे देहावसान झाले. "मातेच्या मरणानंतर तू

दोन वर्षे इहलोकी राहशील,'' असे निंबरगीकरमहाराजांनी अक्कांना पूर्वी सांगून ठेवले होते. ती दोन वर्षे उलटली. तेव्हा अक्कांनी आपल्या निर्याणाचा बेत जवळच्या मंडळींना सांगितला. तो कळताच तात्यासाहेबमहाराज कोटणीस तातडीने चिमडला आले. त्यांनी व इतर मंडळींनी इतक्यात निजधामी न जाण्याविषयी अक्कांची मोठ्या तळमळीने व कळकळीने विनवणी केली. तेव्हा फक्त आणि दोन वर्षे भूतलावर राहण्याचे अक्कांनी मान्य केले. नंतर मात्र मी कुणाचीच भीड ऐकणार नाही, असे बजावले. आणखी दोन वर्षे निघून गेली. अक्कांनी आपल्या निर्याणाचा निश्चय पक्का करून टाकला. चिमडमहाराजांचे ज्येष्ठ चिरंजीव श्रीदाजीसाहेब यांच्याकडे त्यांनी परमार्थाचे नेतृत्व सोपविले. इ. स. १८९७ साल उजाडले. श्रावण मासापासून अक्कांची प्रकृती नादुरुस्त दिसू लागली. क्षणात ती बरी दिसे, तर दुसरे क्षणी ती अत्यंत बिघडे. त्यांच्या प्रकृतीचे मान कुणालाच लागेना. यावेळी चिमडमहाराजांचे द्वितीय चिरंजीव नारायणराव हे बेळगावास तात्यासाहेबमहाराजांच्याकडे शिक्षणास राहिले होते. त्यांना अक्कांनी चिमडास बोलावून घेतले व त्यांना म्हटले, ''नारायणा, तुला मी आता सोडून जाणार रे!'' असेच दोन महिने गेले. अक्कांनी आश्विन प्रतिपदेदिवशी आपले निर्याण योजिले होते. परंतु त्या दिवशी चिमडमहाराजांच्या पत्नी माईसाहेब अस्पर्श झाल्या. तेव्हा अक्कांनी आपल्या निर्याणाचा दिवस आणि दोन दिवस पुढे ढकलला. अखेर शके १८१९, आश्विन शुद्ध ३ या दिवशी स्वेच्छेने त्या परमात्मस्वरूपात एकरूप होऊन गेल्या.

●●●

## प्रकरण ४ : संदर्भसूची


१. **कर्नाटक-महाराष्ट्रातील समर्थ संप्रदाय**, पां. वि. कुलकर्णी, सांगली, १९७८

२. **कैवल्यपुरुष, खंड १**, ह. पां. कोटणीस, सांगली, १९३३

२. **दादामहाराज केळकरांची हस्तलिखित वही**

३. **प्रभाकरस्वामीमहाराज**, कृ. गो. देशमुख, सोलापूर, प्रथम आवृत्ती, १९७०

४. **बोधसुधा**, म. श्री. देशपांडे, अथणी, पहिली आवृत्ती, १९५८

५. **हणमंतरावजी कोटणीस यांचे चरित्र**, साधुदास, सांगली, १९३७


▲▲▲

प्रकरण ५

# श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज

## (निंबरगीकरमहाराजांचे पट्टशिष्य)

*'रामदासस्वामी तेची साधुवर्य।*
*रघुनाथप्रिय ब्रह्मचारी ॥''*

- कोटणीसमहाराज

*''असा सद्‌गुरू तो मला कोणि दावा।*
*जनी दृष्टिला दावि जो देवदेवा।*
*प्रसादेचि जो हीनदीनांसि तारी।*
*असा तो जगी दाखवा ब्रह्मचारी॥''*

- रामभाऊमहाराज यरगट्टीकर

*''गुरूंची कृपा ज्यावरी होय ऐसी।*
*खरा देवची आणिला स्थापनेसी।*
*प्रभू डोलवीला गुरूलिंगराजा।*
*नमस्कार हा साधुराजासि माझा॥''*

- श्रीदादामहाराज केळकर

वर उद्‌धृत केलेल्या काव्यांत ज्यांचा गौरव श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर, तात्यासाहेबमहाराज कोटणीस आणि श्रीदादामहाराज केळकर यांनी केला आहे, ते श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज हे निंबरगीकरमहाराजांचे पट्टशिष्य होते. ते चिमड क्षेत्राचे अधिष्ठाता देव आहेत आणि त्यांची शिष्यपरंपरा आजतागायत अखंडपणे चालू आहे. ते चिमड संप्रदायाच्या केंद्रस्थानी आहेत.

साधुमहाराजांचा जन्म द्रविड देशात शके १७५१ (= इ. स. १८२९) मध्ये झाला. त्यांचे वडील लक्षाधीश होते. वयाला चौदा वर्षे होईपर्यंत साधुमहाराज आपल्या मातापित्यांच्या छत्राखाली होते. श्रीमंतीची मस्ती त्यांच्या अंगात नव्हती. प्रथमपासूनच त्यांचा देवाधर्माकडे ओढा होता. ते स्वभावाने भोळे होते पण करारी होते. एकदा काही कारणाने घरी कुरबूर झाली व त्यांचा पित्याशी मतभेद झाला. तेव्हा घरी वरचेवर कुरबूर नको म्हणून ते घर सोडून बाहेर पडले. त्यानंतर ते पुन्हा कधीच स्वगृही गेले नाहीत.

### ✦ सोनगी गावी आगमन

साधुमहाराज अगदी बालपणापासून सत्प्रवृत्त असून सदाचरणी होते. म्हणून घराबाहेर पडल्यावर ते कुठल्याही कुमार्गाला लागले नाहीत. आपल्या सात्त्विक व धार्मिक स्वभावाला अनुसरून त्यांनी तीर्थयात्रा सुरू केल्या. जेथे मुक्काम पडे तेथे भजन होई. ईश्वरावरील दृढ निष्ठा आणि सदाचरण व सत्याचरण यांमुळे त्यांना वाचासिद्धी प्राप्त झाली होती. त्यामुळे ते बोलतील ते खरे होत असे. ते आजानबाहू, आजन्म ब्रह्मचारी व मोठे तेजःपुंज होते. त्यांच्याकडे पाहणाऱ्यावर त्यांची चटदिशी छाप पडत असे. त्यामुळे अनेकजण त्यांच्या भजनी लागत.

तीर्थयात्रा करीत असता, एकदा साधुमहाराज काशीविश्वेश्वराचे दर्शन घेऊन रामेश्वराकडे निघाले होते. मार्गावर जेथे जेथे मुक्काम पडे, तेथे तेथे ते भजन, इत्यादी कार्यक्रम चालू करीत. अनेक लोक त्यांच्या दर्शनास येत. त्यांच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाने भारले जात. या यात्रेच्या प्रसंगी साधुमहाराजांचा तळ सोनगी गावाच्या मारुतीच्या देवळात पडला. हे सोनगी गाव निंबरगीच्या पश्चिम दिशेला एका कोसावर आहे. याच निंबरगी गावात चालतेबोलते ब्रह्म असे निंबरगीकरमहाराज राहात होते. ते साधुमहाराजांना माहीत असण्याचे काहीच कारण नव्हते. पण ईश्वरी इच्छेनुसार या दोघांची गाठ पडण्याचा प्रसंग आला आणि साधुमहाराजांचे संपूर्ण जीवन बदलून गेले.

### ✦ सोनगीतील प्रसिद्धी

सोनगी गावात असताना साधुमहाराजांनी भजनाचे सप्ताह सुरू केले. गावात त्यांची प्रसिद्धी झाली. पुष्कळ लोक त्यांचे दर्शन घेऊन त्यांना फळे, धान्य, पै-पैसा अर्पण करीत. साधुमहाराज स्वतः निरिच्छ असल्याने त्यांना त्यांतील काहीच नको असे. तरी ते त्या वस्तूंचा उपयोग करवून घेत आणि मोठ्या प्रमाणात अन्नसंतर्पण करीत. सोनगीचे लोक त्यांना साधू म्हणू लागले. काही जण त्यांना नवस करू लागले आणि साधुमहाराज नवसाला पावतात, अशी त्यांची खात्री झाली. सोनगीच्या आसपासच्या गावांतही साधुमहाराजांचा महिमा पसरला.

### ✦ निंबरगीकरमहाराज सोनगीत जातात

सोनगीजवळच्या निंबरगी गावातही साधुमहाराजांचा बोलबाला होण्यास वेळ लागला नाही. हा बोलबाला निंबरगीकरमहाराजांच्या निकटवर्ती मंडळींच्याही कानी गेला. निंबरगीकरमहाराज असताना अन्य साधूचे दर्शनास जाण्याची जरुरी या मंडळीना वाटण्याचे कारण नव्हते. पण मानवी स्वभाव वेगळाच आहे. त्याला अनुसरून महाराजांच्या आत्मारामबुवा नावाच्या शिष्यांनी सोनगीला साधुमहाराजांच्या दर्शनास

जाण्याची गोष्ट निंबरगीकरमहाराजांच्याजवळ काढली. साधुमहाराजांच्या जीवनात क्रांती व्हायची होती; त्यांना परमार्थाचा प्रसाद प्राप्त व्हावयाचा होता. हे भविष्य निंबरगीकरमहाराजांना ज्ञात असल्याने, ते सोनगीस जाण्यास तयार झाले. तेव्हा आत्मारामबुवा, बापूरावदादा कुलकर्णी, महाराजांचे चिरंजीव भीमाण्णा आणि लक्ष्मीबाई अक्का या सर्वांसह महाराज सोनगीला गेले.

## ✦ साधुमहाराजांची वृत्ती पालटली

इकडे साधुमहाराजांच्या पायाला नारू झाला असल्याने, ते देवळात निजून होते. सर्वांबरोबर निंबरगीकरमहाराजांनी त्यांना नमस्कार केला. महाराजांच्या योग्यतेची काहीच कल्पना नसल्याने, त्यांना प्रतिनमस्कार न करता साधुमहाराज तसेच पडून राहिले. हळूहळू निंबरगीकरमहाराज आणि साधुमहाराज यांचे बोलणे सुरू झाले आणि निंबरगीकरमहाराजांच्या बोलण्यावरून साधुमहाराजांची खात्री पटली की, आपण सध्या जे करीत आहोत. तो पुण्यप्राप्तीचा मार्ग आहे. पण त्यायोगे आत्मप्राप्ती होणार नाही आणि आत्मप्राप्ती झाल्याविना आपले आत्यंतिक किंवा पारमार्थिक कल्याण होणार नाही. आत्मदर्शन होऊन मानवी जीवनाचे सार्थक होण्याचा उपाय वेगळाच आहे. ते कळताच साधुमहाराजांची वृत्ती पालटली. ते स्वत:चा अभिमान आणि मोठेपणा विसरले आणि तत्काळ महाराजांच्या पायी शरण गेले व म्हणू लागले, ''मी आत्तापर्यंत आपणाशी योग्य वागलो नाही. मला क्षमा करा आणि माझ्यावर कृपा करून मला ईश्वरसाक्षात्काराचा सत्य मार्ग दाखवा.'' महाराज बोलले, ''सध्या तुमचा सप्ताह चालू आहे, तो संपू दे. त्यानंतर तुम्ही मजकडे या.'' मोठ्या नाखुशीने साधुमहाराजांनी ते कबूल केले. तेव्हा निंबरगीकरमहाराज परत गेले. पण इकडे साधुमहाराजांचे चित्त निंबरगीकरमहाराजांच्याकडे लागले होते. 'केव्हा एकदा हा सप्ता संपतो व आपण पुन्हा महाराजांचे दर्शन घेतो' असे त्यांना झाले. यथावकाश सप्ता संपला. सप्ता-समाप्तीनंतर साधुमहाराज उठले, ते तडक निंबरगीत महाराजांकडे गेले. निंबरगीकरमहाराजांनी त्यांना अनुग्रह देऊन, त्यांचा खऱ्या परमार्थात प्रवेश करून दिला.

## ✦ साधुमहाराजांची साधनसिद्धता

परमार्थात अनेकदा असे होते; गुरूंचा अनुग्रह होईपर्यंत परमार्थाची आतुरता राहते. नंतर ती कमी होते किंवा शिष्याच्या मार्गात अशा काही अडचणी येतात की तो साधनाभ्यास करू शकत नाही. अथवा साधन सुरू झाल्यावर काही प्रचीती न आल्याने साधनक्रमात ढिलाई निर्माण होते. त्यामुळे एका गुरूच्या शिष्यांमध्ये फारच थोडे गुरूच्या तोडीचे होऊ शकतात.

साधुमहाराज हे सामान्य नव्हते; ते दृढनिश्चयी होते. एकदा परमार्थ करायचा ठरवल्यावर त्यांनी गुरूपदेश होताच साधनाखेरीज इतर सर्व गोष्टींना फाटा दिला. त्यांनी आपली तीर्थयात्रा बंद केली आणि निग्रहाने रात्रंदिवस साधनाचा अभ्यास सुरू केला. असे सांगतात की, बारा-बारा तास आसनमांडी न हलविता साधुमहाराज एकाच स्थानी बसून आत्मचिंतनात निमग्न होऊन राहात. कधी निंबरगीजवळील डोंगराळ घाटात तुटलेल्या कड्याजवळ दोन पुरुष खोलीच्या खड्ड्यात बसून साधन करीत, तर कधी ते टीचभर जागेत चवड्यावर बसून साधनाचा आचार करीत आणि आसपास जमणाऱ्या वन्य श्वापदांकडे लक्ष न देता ते साधन चालू ठेवीत.

खेरीज सद्गुरूंचा सहवास जास्तीत जास्त लाभावा म्हणून ते निंबरगीजवळील सोनगी, उमदी, चिमड, इ. गावी मुक्काम करीत आणि दर शनिवारी निंबरगीकरमहाराजांच्या दर्शनास येत.

अशा प्रकारे साधनाचा कठोर अभ्यास करीत साधुमहाराज निंबरगीजवळच्या भागातच काही वर्षे राहिले आणि तेवढ्या अल्प काळातच गुरुकृपेने त्यांना साधनाची सिद्धी साध्य झाली आणि त्यांनी खरीखुरी साधू ही पदवी प्राप्त करुन घेतली.

### ✦ आवड असली की जमते

उमदीला एकदा ते मारुतीच्या देवळात काही दिवस राहात होते. तेथे ते सकाळी ६ ते दुपारी १२ पर्यंत उजवा हात जमिनीला टेकून व दुपारी १२ ते संध्याकाळी ६ पर्यंत डावा हात टेकून आसनावर असत. ते पाहून एकदा उमदीकरमहाराजांनी त्यांना विचारले, ''साधुमहाराज, आपण इतका वेळ कसे बसू शकता ?'' साधुमहाराज उत्तरले, ''बाबा रे, आवडीची गोष्ट करताना माणूस कशाकडेही पाहात नाही.''

### ✦ वाघ नम्र झाला

साधुमहाराज साधनास बसले की त्यांच्याजवळ येणारे पशुपक्षी आपापले द्वैत विसरून जात. एकदा ते असेच साधनास बसले होते. तेवढ्यात भुकेने वखवखलेला एक ढाण्या वाघ त्यांच्यावर हल्ला करण्यास धावला. अचानक साधुमहाराजांनी आपले डोळे उघडले व वाघाच्या दृष्टीला दृष्टी भिडविली. वाघ एकदम तटस्थ झाला, मग नम्र झाला आणि नंतर त्याने साधुमहाराजांच्या चरणीं आपले मस्तक टेकले. मग परिणाम असा झाला : ''वाघासारख्या पशूचे। झाले सार्थक ते साचे। जाळे तुटले जन्ममृत्यूचे। एकाएकी।। वाघाचे मस्तकी ठेविता हस्त। डोलू लागला ब्रह्मानंदात। तया पावली आत्मस्थित। धन्य धन्य।।''

### ✦ धन्यता लाभली

अशा प्रकारे गुरुनिष्ठापूर्वक अविश्रांत श्रमपूर्वक झालेल्या साधनाच्या आचाराने केवळ पाचसहा वर्षांतच साधुमहाराज परमार्थाच्या शिखरास पोचले. त्यांनी आपल्या जीवनाचे सार्थक करून घेतले. निंबरगीकरमहाराजांच्या कृपेने ते धन्य धन्य झाले.

### ✦ निंबरगीकरमहाराजांचे प्रेम

त्यानंतर निंबरगीकरमहाराजांच्या आज्ञेनेच ते प्रथम काही दिवस सोनगी गावी राहिले व नंतर उमर्दीस राहिले. निंबरगीच्या आसपास मुक्काम असताना ते निंबरगीस येत. कधी कधी ते १०-१५ दिवस निंबरगीत राहात. या काळात निंबरगीकरमहाराज आपल्या लाडक्या शिष्यासाठी आपल्या घरातून शिधा पाठवून देत. पण ही गोष्ट घरच्या माणसांना फारशी रुचत नाही, हे लक्षात येताच महाराजांनी खेमचंद गुजराच्या दुकानातून साधुबुवांना परस्पर शिधा मिळेल, अशी व्यवस्था लक्ष्मीबाई अक्कांच्यामार्फत केली. गुरू आपल्या शिष्याच्या पोटापाण्याची व्यवस्था येथे स्वखर्चाने करीत आहे, हे लक्षणीय आहे.

### ✦ अनुग्रहाची आज्ञा

साधुमहाराज जर एकेच ठिकाणी कायम राहिले, तर त्यांच्या खाण्यापिण्याचा खर्च इतरांना करावा लागेल ही गोष्ट लक्षात घेऊन निंबरगीकरमहाराजांनी साधुमहाराजांना सुचविले, "तुम्ही एकाच ठिकाणी फार दिवस राहू नये." त्याप्रमाणे साधुमहाराज सोनगी, उमदी, चिमड, विटा, विजापूर, इ. ठिकाणी संचार करू लागले. महान सत्पुरुष म्हणून त्यांची प्रसिद्धी झाली. लोक त्यांच्याकडे उपदेश मागू लागले. तेव्हा साध्याभोळ्या साधुमहाराजांनी सरळ निंबरगीकरमहाराजांना विचारले, "महाराज, लोक मला साधू मानतात व मजकडे उपदेश मागतात. मी काय करू ?" स्मित करून महाराजांनी उत्तर दिले, "बुवा, तुम्ही फार भोळे आहात. या जगात सर्व प्रकारची माणसे आहेत. तेव्हा माणूस कसा आहे ते पाहून परमार्थाचा उपदेश करावा. कोणी अनन्यभावे शरण आला, तर जरूर त्याच्यावर अनुग्रह करा."

### ✦ साधुमहाराजांची सामर्थ्यप्रचीती

आपल्या संचारामध्ये साधुमहाराज विटे गावी आपले शिष्य रामभाऊमहाराज यरगट्टीकर यांच्याकडे गेले. त्याच वेळी रामभाऊमहाराजांच्या पत्नी सौ. सीताबाई एक पुत्र प्रसवल्या. पण मुलाची नाळ नीट कापली न गेल्याने बेंबीतून रक्तस्राव होऊन तो मुलगा दगावला. तेव्हा विघ्नसंतोषी लोक म्हणू लागले, "पाहा, पाहा ! साधुमहाराज घरी आले आणि मूल निवर्तले ! असले कसले हो हे साधू !"असली बोलणी कानांवर

आली, तरी साधुमहाराजांनी आपली शांती सोडली नाही. सौ. सीताबाईंचे सांत्वन करून ते त्यांना म्हणाले, "सीताबाई, तुम्ही चिंता करू नका. तुम्हाला आणखी चांगले पुत्र होणार आहेत." यावेळी साधुमहाराजांचा वास चिमड गावी होण्याची शक्यता दृष्टिपथातही नव्हती. परंतु साधुमहाराज भविष्यवाणी बोलून गेले, "पुढे मी तुमच्या सन्निध कायमच राहणार आहे." नंतरच्या काळात रामभाऊमहाराज चिमड मठात राहण्यास गेले व तेथेच साधुमहाराजांनी निरंतरचे वास्तव्य केले आहे.

### ✦ उणे पडणार नाही

साधुमहाराज एकदा विजापुरास गेले होते. तेथे त्यांचा एक रजपूत अनुगृहीत होता. तो निवर्तल्यावर त्याच्या श्रीमंत घराला अवकळा आली. पण घराण्याच्या पूर्वीच्या नावलौकिकामुळे पाहुण्यांचा राबता सतत चालूच राहिला. तेव्हा आलेल्या जनांचे आदरातिथ्य कसे करावे, ही चिंता त्या रजपुताच्या पत्नीला नेहमी लागलेली असे. साधुमहाराज आल्यावर त्यांना तिने सर्व हकीकत सांगितली. साधुमहाराज म्हणाले, "ठीक आहे. मातोश्री, आता तुमच्या घरी काय आहे ?" बाई म्हणाली, "दोन भाकरी होतील एवढा कोंडा आहे." "मग आणा भाकरी करून," साधुबुवांनी तिला सांगितले. नंतर त्या भाकरी घेऊन, एका कोपऱ्यात शिप्तराखाली ठेवून साधुमहाराज बोलले, "बाई, शिप्तर संपूर्ण न उघडता हव्या तेवढ्या भाकरी काढून घ्या. याप्रमाणे रोज जे काही घरी असेल, त्याचा स्वयंपाक करून शिप्तराखाली ठेवा व सांगितलेल्या पद्धतीने वाटेल तितके काढून घ्या. कधी काही कमी पडणार नाही. काळजी करू नका." ती बाई विद्यमान असेपर्यंत हा प्रकार रोज चालू राहिला.

### ✦ कायमचे घोडे मिळेल

फिरत फिरत साधुमहाराज एके प्रसंगी चिमडला गेले होते. त्यावेळी त्यांच्याजवळ एक घोडे होते. चिमडास तेव्हा कलहळ्ळी नावाचा एक गृहस्थ कुलकर्णीपणाचे काम करीत होता. त्याच्या मनात आले, 'या संन्याश्याला कशाला घोडे हवे ? ते मला मिळाले, तर बरे होईल.' आणि ते त्यांच्याकडून काढून घेण्यास त्याने साधुमहाराजांना अडविले. त्याच्या मनातील हेतू तत्काळ साधुमहाराजांना कळला व ते बोलून गेले, "तुला कायमचे घोडे मिळेल." पुढे या कलहळ्ळीच्या पायाला काहीतरी इजा झाली व त्याला घोड्याविना बाहेर पाऊलही टाकता येईना.

### ✦ कीर्ती होईल

साधुमहाराज एकदा आपल्या सद्‌गुरूंच्या दर्शनास निंबरगीस गेले होते. त्यांच्यावर

निंबरगीकरमहाराजांची फारच मर्जी होती. महाराजांनी त्यांना आशीर्वाद दिला, दिला, "साधुबुवा, तुमची कीर्ती सर्वत्र पसरेल." महाराजांचा आशीर्वाद पुढे खरा झाला. चिमडचे साधुमहाराजांचे देवस्थान चांगलेच प्रसिद्धीस आले.

## ✦ निर्वाण लांबविले

कालांतराने साधुमहाराजांनी देहत्याग करण्याचा विचार केला आणि तो आपल्या काही शिष्यांजवळ बोलून दाखविला. "महाराज, आमच्यासाठी आपण आणखी काही दिवस भूतलावर रहावे," शिष्यांनी नम्रपणे विनवणी केली. तिला मान देऊन साधुमहाराजांनी फक्त आणखी एकच वर्ष इहलोकी राहण्याचे मान्य केले. आणि आपल्या देहत्यागाचा बेत एक वर्षाने लांबणीवर टाकला.

## ✦ चिमडला छाया उमटली

साधुमहाराजांनी मान्य केलेले एक वर्ष उलटून गेले. आता त्यांना पन्नासावे वर्ष लागले होते. ते चिमडास आले आणि तेथे त्यांनी गुरुनाथ बाळाजी तथा गुराप्पा औरसंग या आपल्या अनुगृहीताकडे मुक्काम केला. तेथे साधुमहाराजांनी आपल्या निर्वाणाचा दिवस सांगितला. त्याच्या आदल्या दिवशी गुराप्पाच्या मातोश्री त्यांना म्हणाल्या, "महाराज, आपण तर उद्या जाणार. मग आम्हाला आपल्या सगुण मूर्तीचे दर्शन होणार नाही." "मातोश्री, एवढेच ना ! ठीक आहे. मी गेल्यावरही माझे दर्शन तुम्हाला होईल. चिंता करू नका," साधुमहाराजांनी आश्वासन दिले आणि गुराप्पाच्या घरातील एका भिंतीवर आसनस्थ साधुमहाराजांची छाया उमटली. ती आजही चिमडला दाखविली जाते. तिचे छायाचित्र कैवल्यपुरुष, खंड १ या ग्रंथात छापलेले आहे.

## ✦ निर्याण

देह ठेवण्याच्या आपल्या इराद्याप्रमाणे साधुमहाराजांनी गुराप्पा औरसंग यांच्या घरी असताना, शुक्रवार, चैत्र शुद्ध ३, शके १८०१ (= इ. स. १८७९) रोजी सायंकाळी पाचचे सुमारास ईशचिंतन करीत महानिर्वाण केले. त्यानंतर तेथे जमलेल्या अनुगृहीत मंडळींनी चिमडच्या ईशान्य दिशेला साधुमहाराजांच्या पार्थिव देहावर अग्निसंस्कार केला. तिसरे दिवशी अस्थिसंचयन करून पवित्र कृष्णा नदीत अस्थींचे विसर्जन करण्यात आले. त्यांच्या दहनस्थानी एक वटवृक्ष लावण्यात आला. आजही तो प्रचंड स्वरूपात दिसत असून अत्यंत शोभिवंत आहे.

## ✦ साधुमहाराजांच्या निर्वाणानंतर

निर्वाण करण्यापूर्वी साधुमहाराजांनी आपल्या भक्तमंडळीना सांगून ठेवले होते

की, माझ्या पश्चात रामभाऊ यरगट्टीकरांना चिमडास आणवून येथेच ठेवून घ्या. रामभाऊमहाराज यरगट्टीकर हे साधुमहाराजांचे पट्टशिष्य असून ते यावेळी विटे गावी सरकारी नोकरीत होते. साधुमहाराजांच्या आदेशाप्रमाणे महालिंगपूर आणि चिमड येथील अनुगृहीत लोक रामभाऊमहाराजांच्याकडे गेले व त्यांनी त्यांना साधुमहाराजांची इच्छा कळविली. तेव्हा निंबरगीकरमहाराजांची आज्ञा घेऊन, आपली नोकरी सोडून रामभाऊमहाराज चिमडच्या स्मशानस्थानात वास्तव्यास आले. या स्थानावरच पूर्वी निंबरगीकरमहाराजांनी लक्ष्मीबाई अक्कांसह येऊन, कापूर लावून, ''येथे एका महान साधूची समाधी होणार आहे,'' असे भविष्य वर्तविलेले होते. हे स्थान चिमड गावाच्या आग्नेय बाजूला ओढ्याच्या पलीकडे पूर्वीच्या स्मशानात होते. तेथे तात्पुरती पर्णकुटी बांधून रामभाऊमहाराज राहू लागले.

### ✦ साधुमहाराजांच्या दर्शनास गंगा आली

आपल्या मठीजवळ साधुमहाराजांचे देवस्थान उभारण्याचे रामभाऊमहाराजांनी ठरविले. त्याप्रमाणे पाया खोदण्यास प्रारंभ झाला. पाया खणत असतानाच पाच हात खोलीवर वैशाख वद्य ३०, शके १८०२ रोजी पांढऱ्या शुभ्र स्वच्छ पाण्याचा उमाळा लागला. ही गोष्ट कळताच, रामभाऊमहाराज उद्‌गारले, ''निंबरगीकरमहाराजांच्या इच्छेने साक्षात भागीरथी नदीच साधुमहाराजांच्या दर्शनास आली आहे.'' ते पुढे म्हणाले, ''या पाण्याला विटाळ न झाल्यास, या गंगोदकाने रोगराई दूर होईल.'' तसा अनुभव पुढे अनेकांना आला.

### ✦ स्मशानात देवस्थान

निंबरगीकरमहाराजांच्या आज्ञेने या गंगोदकाभोवतीच एक सुंदर विहीर बांधण्यात आली व तिला 'तापनाशी तीर्थ' असे नाव देण्यात आले. या तापनाशीच्या मध्यभागी एक चतुष्कोणाकृती मंदिर बांधण्यात आले. या मंदिरात साधुमहाराजांच्या पादुकांबरोबरच निंबरगीकरमहाराजांचे एखादे चिन्ह असावे, असे रामभाऊमहाराजांना वाटले. ते त्यांनी निंबरगीला कळविले. महाराजांनी लिहिले, ''आमच्या जिवंतपणीच तुम्ही आमची स्थापना करणार ! ठीक आहे. तुम्हाला जे करायचे, ते आमच्या काडसिद्धगुरूंना घेऊन करा.'' मग साधुमहाराजांच्या पादुका, निंबरगीकरमहाराजांच्या नावाची पिंडी आणि काडसिद्धांच्या नावाचा बाण या त्रिमूर्तीची स्थापना मार्गशीर्ष वद्य ७, शके १८०३ या शुभदिनी झाली. या कार्यक्रमास निंबरगीकरमहाराज स्वत: उपस्थित होते, त्यांनी साधुमहाराजांना देव करून बसविले.

## ✦ साधुमहाराजांची कीर्ती वाढत चालली

निंबरगीकरमहाराजांच्या आशीर्वादाप्रमाणे साधुमहाराजांची कीर्ती वाढत चालली. अनेकजण तापनाशी तीर्थस्थानास व साधुमहाराजांचे दर्शनास येऊ लागले. त्यातच 'साधुमहाराज नवसाला पावतात' ही प्रसिद्ध झाल्याने लांबलांबचे लोक नवस करण्यास व तो फेडण्यास साधुमहाराजांच्या मंदिरात येऊ लागले.

## ✦ साधुमहाराजांचा रथोत्सव

शिष्यांनी वर्षातून एकदा तरी साधुमहाराजांच्या दर्शनास यावे व काही काळ परमार्थसाधनात घालवावा, या हेतूने रामभाऊमहाराजांनी चैत्र शुद्ध प्रतिपदा ते चैत्र शुद्ध तृतीया या तीन दिवसांत साधुमहाराजांच्या आराधनेचा कार्यक्रम आयोजित केला.

नंतर निंबरगीकरमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे रामभाऊमहाराजांनी साधुमहाराजांचा रथोत्सव सुरू केला. निंबरगीकरमहाराज विद्यमान असेपर्यंत ते स्वत: या रथोत्सवात उपस्थित राहात, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. हा रथोत्सव आश्विन वद्य १२ ते कार्तिक शुद्ध ५ म्हणजे गुरुद्वादशी ते पांडवपंचमी या ऐन दिवाळीच्या काळात येतो. चिमड सांप्रदायिकांसाठी हा पारमार्थिक दिवाळसणच आहे.

पांडवपंचमी हा या उत्सवातील मुख्य दिवस. या दिवशी तर यात्राच भरते. हजारो माणसे साधुमहाराजांच्या दर्शनास येतात. दुपारी चारच्या सुमारास मठातून वाजतगाजत साधुमहाराजांचा रथ निघतो व तो त्यांच्या दहनस्थानीच्या वडापर्यंत जाऊन मठात परत येतो.

अशाप्रकारे चिमड हे तीर्थक्षेत्र आणि देवस्थान झाले असून, साधुमहाराज हे तेथील देव झालेले आहेत.

●●●

## प्रकरण ५ : संदर्भसूची


१. कैवल्यपुरुष, खंड १, ह. पां. कोटणीस, सांगली, १९३३
२. दादामहाराज केळकरांची हस्तलिखित वही
३. श्रीचिमड संप्रदाय, दासराम, 'सहजयोगदर्शन' अंक, मे, १९८३
४. श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज, डॉ. के. वा. आपटे, कोहापूर, १९७९
५. सिद्धकथामृतसार, दासराम, सिद्धगिरिसंदेश त्रैमासिक, मुंबई


▲▲▲

# श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराजांचे काही शिष्य

निंबरगीकरमहाराजांच्या आज्ञेने रघुनाथप्रिय साधुमहाराजांनी अनन्यभावाने शरण येणाऱ्या अनेक मुमुक्षूंना उपदेश देऊन कृतार्थ केले. त्यांच्या शिष्यसमूहात नाना जातिजमातींचे लोक होते. त्यांतील काहींची माहिती या प्रकरणात दिली आहे. साधुमहाराजांचे पट्टशिष्य श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर हे होत. ते चिमडमहाराज या नावाने ओळखले जातात. आपल्या निर्वाणानंतर रामभाऊमहाराज यरगट्टीकरांनाच बोलावून चिमडास राहवून घ्या, असे साधुमहाराजांनी आपल्या चिमड व महालिंगपूर येथील भक्तमंडळींस सांगितले होते. तेव्हा आपली सरकारी नोकरी सोडून रामभाऊमहाराज निंबरगीकरमहाराजांच्या आज्ञेनुसार चिमडास येऊन मठ बांधून राहू लागले. तसेच आपल्या निर्याणापूर्वी निंबरगीकरमहाराजांनी रामभाऊमहाराजांकडेच सर्व परमार्थ लक्ष्मीबाई अक्कांच्या इच्छेप्रमाणे सोपविला. रामभाऊमहाराज चिमडास येऊन राहिल्यावरच चिमड संप्रदाय हे नाव प्रचारात आले. एका दृष्टीने पाहिल्यास, रामभाऊमहाराज हेच चिमड संप्रदायाचे प्रवर्तक होते. तसेच त्यांची शिष्यपरंपरा पुढे चालू राहिली; खेरीज त्यांचे अधिकारी वंशजही चिमड मठाची परंपरा चालवीत आहेत. या सर्व कारणांस्तव परमपूज्य श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र पुढील प्रकरणात स्वतंत्रपणे दिलेले आहे.

### १. गुराप्पा औरसंग :

गुरुनाथ बाळाजी तथा गुराप्पा औरसंग हा साधुमहाराजांचा एकनिष्ठ शिष्य होता. आपल्या भटकंतीमध्ये साधुमहाराज चिमड गावी आले की ते बहुधा गुराप्पाच्या घरी मुक्काम करीत. गुराप्पाच्या मातोश्री याही साधुमहाराजांच्या भक्त होत्या. त्यांचे समाधान करण्यासाठीच गुराप्पाच्या घरातील एका भिंतीवर आसनस्थ साधुमहाराजांची छाया उमटली.

साधुमहाराजांनी ज्यावेळी निर्वाण करायचे ठरविले, त्यावेळी ते चिमडला गुराप्पा औरसंग याच्याच घरी राहण्यास आले व त्याच्याच घरी राहात असताना साधुमहाराजांनी महानिर्वाण केले.

### २. गोविंदस्वामी :

गोविंदस्वामी हे हातनूर गावचे रहिवासी होते. त्यांनी साधुमहाराजांचा अनुग्रह घेतलेला होता. त्यांचा एक मळा होता. अनुग्रहानंतर साधन करण्यास जागा हवी म्हणून

त्यांनी आपल्या मळ्यात एक खड्डा खणवून घेतला आणि त्या खड्ड्यात बसून ते आठआठ दहादहा तास साधन करीत. त्यांचे सामर्थ्य कळून आल्यावर लोक त्यांना सत्पुरुष म्हणू लागले.

पुण्याचे गुळवणीमहाराज हे बालपणी गुरूच्या शोधात हिंडत होते. त्यावेळी ते या गोविंदस्वामींकडे आले होते. टेंबेस्वामी कुठे भेटतील, हे गोविंदस्वामींनी गुळवणीमहाराजांना सांगितले. तसेच त्यांनी काही दिवस गुळवणीमहाराजांना आपणाजवळ ठेवून घेतले व जाताना त्यांना वाटखर्चास थोडे पैसेही दिले.

### ३. माईसाहेब यरगट्टीकर :

रामभाऊमहाराज यरगट्टीकरांच्या पत्नी सौ. सीताबाई. त्या माईसाहेब या नावाने ओळखल्या जात. वयाच्या आठव्या वर्षीच त्यांचा रामभाऊमहाराजांशी विवाह झाला. त्यांचा पहिला पुत्र जन्मल्यावर थोड्या काळाने गेला. पुढे त्यांना साधुमहाराजांच्या वचनाप्रमाणे देवका, दाजीसाहेब, नारायणराव, बहिणाबाई, उद्धवराव अशी अपत्ये झाली.

माईसाहेबांना रघुनाथप्रिय साधुमहाराजांचा अनुग्रह होता. त्या नित्यनेमाने साधनाचा अभ्यास करीत. तसेच साधुमहाराजांनी त्यांना ज्या चांदीच्या पादुका दिल्या होत्या, त्यांची त्या नित्यनेमाने पूजाअर्चा करीत.

गुरूच्या आज्ञेप्रमाणे रामभाऊमहाराज आपली नोकरी सोडून चिमडजवळील एका ओसाड जागेत पर्णकुटी बांधून राहण्यास गेले. याबाबतीत कसलीही कुरकुर न करता आणि नाराजी न दाखविता माईसाहेब पतीबरोबर तेथे गेल्या आणि तेथे त्यांनी आपल्या गरिबीचा संसार सुरू केला. आपल्या पर्णकुटीजवळ रामभाऊमहाराजांनी साधुमहाराजांचे मंदिर उभारल्यानंतर माईसाहेबांच्या जीवनाला एक विशिष्ट प्रकारचा क्रम लागला. त्यात त्यांना असे दिसून आले की, आपल्या हातून पुरेशी उपासना घडू शकत नाही. आपली ही खंत त्यांनी आपल्या पतीच्या कानांवर घातली. तेव्हा रामभाऊमहाराजांनी सांगितले, ''तुम्ही काही काळजी करू नका. जशी जमेल, तशी उपासना चालू ठेवा. साधन समाधानकारक होत नाही, असे जे तुम्हास वाटते, त्याबाबतीत हे लक्षात ठेवा - आपल्याकडे येणाऱ्या साधक मंडळींच्या उस्तवारीत तुमचा जो वेळ जातो, तो वाया जातो, असे मुळीच समजू नका. आपल्याकडे येणाऱ्या सर्वांना तुम्ही हसतमुखाने पोटभर जेवू खाऊ घाला. एक लक्षात घ्या - जे इतरांच्या परमार्थाला पूरक आणि सहाय्यक असतात, तेही परमार्थच करतात.'' हे ऐकताच त्यांचे समाधान झाले. पतीच्या वचनानुसार माईसाहेब कडेपर्यंत वागल्या. घरातले सर्व पाहण्यास त्यांची कंबर सदोदित कसलेली असे. येणाऱ्या सर्व लहानथोरांकडे व त्यांच्या जेवणाखाणाकडे त्या स्वत: लक्ष देत. अशा प्रकारे त्या पतीच्या परमार्थाला केवळ पूरक

झाल्या, इतकेच नव्हे तर स्वत:च्या साधनाभ्यासाने त्या साक्षात्कारीही झाल्या.

### ✦ काशीविश्वेश्वराचे दर्शन

एकदा काही स्त्रिया काशीयात्रेला निघाल्या. माईसाहेबांनी आपल्याबरोबर यावे, असे त्या बायकांचे म्हणणे होते. तेव्हा माईसाहेबांनी काशीस जाण्याबद्दल रामभाऊमहाराजांना विचारले, रामभाऊमहाराज बोलले, "अहो, तुम्ही काशीस जाऊन काय करणार ? काशीविश्वेश्वराचे दर्शन घेणार ना ? मग त्यासाठी काशीला कशाला जावयास हवे ? आम्ही तुम्हास बसल्या जागीच काशीविश्वेश्वराचे दर्शन घडवितो. मग झाले ना ?" असे बोलून चिमडमहाराजांनी माईसाहेबांच्या मस्तकावर आपला कृपाहस्त ठेवला व त्यांना साक्षात काशीविश्वेश्वर दाखविला. माईसाहेबांना परमानंद झाला.

### ✦ सहनशक्ती

रामभाऊमहाराजांनी इ. स. १८९१ मध्ये निर्वाण केले. पतिनिधन हा आर्य स्त्रीवरील मोठा आघात. तो माईसाहेबांनी अध्यात्मबळावर सहन केल्या. त्यानंतर काही वर्षांनी त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव दाजीसाहेब व कनिष्ठ चिरंजीव हेही अल्पायुष्यात निजधामी गेले. याही पुत्रशोकावर माईसाहेबांनी विजय मिळविला व आपले कर्तव्य चालू ठेवले.

### ✦ कोटणीसमहाराजांना प्रसाद दिला

तात्यासाहेब कोटणीसमहाराज हे आपल्या पतीचे लाडके अनुगृहीत आहेत, ही गोष्ट माईसाहेबांना माहीत होती. त्या एकदा सांगलीस आल्या असताना कोटणीसमहाराजांना म्हणाल्या, "मी तुम्हाला प्रसाद म्हणून चिमडमहाराजांची एखादी वस्तू देईन." तेव्हा कोटणीसमहाराज बोलले, "माईसाहेब, मला चिमडमहाराजांच्या पादुका मिळाव्यात." माईसाहेबांनी ते मान्य केले व चिमडमहाराज आपल्या पायांत वापरीत असलेल्या पादुका प्रसाद म्हणून त्यांनी कोटणीसमहाराजांना दिल्या.

### ✦ कोटणीसमहाराजांचे गंडांतर दूर केले

इ. स. १९२३ मध्ये चिमड मठात देह ठेवण्याच्या इराद्याने कोटणीसमहाराज चिमडास गेले. डिसेंबर २३ रोजी रात्री २ च्या सुमारास कोटणीसमहाराज एका शेगडीजवळ शेकत बसले होते. त्यांचेजवळ नानबा फडणीस होते. अचानक कोटणीसमहाराजांना दोन आचके आले व त्यांची शुद्ध हरपली. नानबांनी शेगडी बाजूला करून इतरांना हाका मारल्या. नारायणमहाराज यरगट्टीकर, माईसाहेब, इत्यादी मंडळी झटपट आली. आल्या आल्या माईसाहेबांनी आल्याच्या रसातून हेमगर्भाची मात्रा दिली.

पण ती परतून आली. असेच दोन तास गेले. शेवटी माईसाहेबांच्या कृपादृष्टीचा परिणाम होऊन कोटणीसमहाराज शुद्धीवर आले. दुसरे दिवशी सकाळी मठातील म्हशीचे एक रेडकू काही रोग नसताना तडकाफडकी दगावले. ते कळताच माईसाहेब उद्गारल्या, "म्हशीच्या रेडकावरच निभावले. हणमंतरावजींचे (= कोटणीसमहाराजांचे) गंडांतर आता टळले आहे. हणमंतरावजींच्या ऐवजी काळपुरुषाने रेडकाचा बळी घेतला."

### ✦ मामामहाराज केळकरांना आज्ञा

माईसाहेब इ. स. १९३८ मध्ये काही दिवस सांगलीस राहण्यास आल्या होत्या. कोटणीसमहाराजांच्यानंतर त्यांच्याच आज्ञेने मामामहाराज केळकर हे सांगलीत नित्यकीर्तनाची परंपरा चालवीत होते. या गोष्टीचे माईसाहेबांना फार कौतुक वाटे. त्या मामामहाराजांचे कीर्तन श्रवण करण्यास येत. मामामहाराजांची पारमार्थिक योग्यता जाणून, माईसाहेबांनी मामामहाराजांना उपदेशानुग्रह करण्याची आज्ञा दिली.

### ✦ नारायणमहाराजांना आज्ञा

लक्ष्मीबाई अक्कामहाराजांच्यानंतर चिमड मठात माईसाहेब अनुग्रह देत असत. या सुमारास माधवराव उकिडवे नावाचे एक गृहस्थ चिमडास गेले व "मला नारायणमहाराज यरगट्टीकर यांचाच अनुग्रह पाहिजे," असा हट्ट धरून बसले. तेव्हा माईसाहेबांनी नारायणमहाराजांना अनुग्रह देण्याची आज्ञा केली. तेव्हापासून ते अनुग्रह देऊ लागले.

### ✦ निर्वाण

इतर काही साधूंच्या पत्नींप्रमाणे केवळ रामभाऊमहाराज यांची पत्नी म्हणून माईसाहेब माननीय नव्हत्या, तर त्या स्वतःच्या पारमार्थिक अधिकारामुळेच वंदनीय झाल्या होत्या. शके १८६३, माघ वद्य ११ (= ११ फेब्रुवारी, १९४२), बुधवारी सायंकाळी पाच वाजता माईसाहेबांनी देहविसर्जन केले व त्या परब्रह्मरूपात मिळून गेल्या.

## ४. भाऊसाहेब उमदीकरमहाराज :

भाऊसाहेब हे उमदी गावी राहात असत. उमदी गाव हे पूर्वीच्या जत संस्थानात व सध्याच्या जत तालुक्यात आहे. या खेडेगावी पूर्वी देशपांडे घराणे राहात होते. त्या कुळातील खंडेराव व सौ. भागीरथी या दांपत्याचे व्यंकटेश हे तृतीय चिरंजीव. त्यांचा जन्म रामनवमीच्या दिवशी इ. स. १८४३ मध्ये झाला. त्यांना व्यवहारात लोक भाऊ अथवा भाऊराव म्हणत. तेच पुढे भाऊसाहेब म्हणून ओळखले जाऊ लागले. उमदी या ग्रामनामावरून त्यांना उमदीकर असे नाव पडले. परमार्थातला अधिकार प्राप्त झाल्यावर ते भाऊसाहेबमहाराज उमदीकर म्हणून प्रसिद्ध झाले.

### ✦ बालपण, शिक्षण, विवाह

लहानपणी भाऊसाहेबमहाराजांचे थोडे शिक्षण झाले. लहानपणीच त्यांचा विवाह झाला. त्यांच्या सौभाग्यवतीचे नाव सौ. काशीबाई. यथावकाश भाऊसाहेबमहाराजांना कृष्णराव, रामराव आणि भीमराव असे तीन पुत्र झाले. इ. स. १८८७ मध्ये भाऊसाहेबांच्या पत्नी दिवंगत झाल्या.

### ✦ मारुतीची उपासना

बालपणापासून भाऊसाहेबमहाराज बलभीम मारुतीची उपासना करीत होते. ती पाहून रघुनाथप्रिय साधुमहाराज म्हणत, ''भाऊराया, तू दररोज मारुतीची उपासना, पूजा करतोस. तू खरोखरच पुण्यवान आहेस. तू खरोखरच धन्य आहेस.'' आणि ते भाऊरावांना नमस्कारही करीत. हे रघुनाथप्रिय साधुमहाराज म्हणजे निंबरगीकरमहाराजांचे पट्टशिष्य होत. आपल्या गुरूच्या आज्ञेने साधुमहाराज गावोगावी जात. ते काही दिवस उमदीत होते, त्यावेळी वरीलप्रमाणे प्रकार घडे.

### ✦ साधुमहाराजांचा अनुग्रह

आणि पुढे असे झाले की, हळूहळू साधुमहाराजांचा प्रभाव भाऊसाहेबमहाराजांवर पडू लागला. मग त्यांनी साधुमहाराजांना परमार्थाच्या मार्गदर्शनाची विनंती केली. तेव्हा साधुमहाराजांनी त्यांना निंबरगीस आपले गुरू निंबरगीकरमहाराज यांच्याकडे नेले. निंबरगीकरमहाराजांनी साधुमहाराजांनाच भाऊसाहेबमहाराजांना अनुग्रह देण्याची आज्ञा केली. हा अनुग्रह त्यांना इ. स. १८५८ मध्ये प्राप्त झाला. तरी ते निंबरगीकरमहाराजांनाच आपले गुरू मानीत. एकदा निंबरगीकरमहाराजांनी त्यांना सांगितले, ''भाऊराव, तुझा गुरू चिमडास आहे. तेव्हा तू दरसाल त्याच्या समाधीचे दर्शन घेऊन येत जा.'' त्याप्रमाणे भाऊसाहेबमहाराज दरवर्षी चिमडास जात. साधुमहाराजांचा अनुग्रह झाल्यानंतर भाऊसाहेबमहाराज प्रपंचात राहूनच परमार्थ करू लागले.

●●●

### प्रकरण ६ : संदर्भसूची

१. **कैवल्यपुरुष, खंड १**, ह. पां. कोटणीस, सांगली, १९३३
२. **चिमड संप्रदाय**, दासराम, सहजयोगदर्शन (अंक), सांगली, मे, १९८३
३. **जीवनगंगा, श्रीभाऊसाहेबमहाराज यांची**, म.श्री.देशपांडे, पहिलीआवृत्ती, नागपूर, १९६६
४. **दादामहाराज केळकर यांची हस्तलिखित वही**
५. **सन्मार्गदीप**, समर्थभक्त, चिमड, १९३३
४. **हणमंतरावजी कोटणीस चरित्र**, साधुदास, सांगली, १९३७

▲▲▲

# श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर तथा चिमडमहाराज

चिमड संप्रदायाचे प्रवर्तक श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर तथा चिमडमहाराज हे रघुनाथप्रिय साधुमहाराजांचे पट्टशिष्य होते. त्यांचा जन्म झाला बेळगाव जिल्ह्याच्या परसगड तालुक्यापैकी मुरगोड महाळातील यरगट्टी नावाच्या गावी. दिवस होता ज्येष्ठ शुद्ध १०, शके १७५५ (= इ. स. १८३३). त्यांचे नाव रामचंद्र असे ठेवण्यात आले. मोठेपणी लोक त्यांना रामभाऊ म्हणू लागले. परमार्थातील अधिकार प्राप्त झाल्यावर ते रामभाऊमहाराज झाले. नंतर त्यांनी चिमड संप्रदायाचे प्रवर्तन केल्यामुळे ते चिमडमहाराज म्हणून ओळखले जाऊ लागले.

## ✦ बालपण, शिक्षण व विवाह

चिमडमहाराजांच्या मातोश्री कृष्णाबाई आणि पिताजी अंताजी त्रिंबक हुद्दार. हुद्दार घराणे रामदासी होते. बनशंकरी ही कुलदेवता होती. घरात दासबोध ग्रंथाचे वाचन होत असे व दरवर्षी सज्जनगडला समर्थ रामदासस्वामींच्या दर्शनास जाण्याची प्रथा होती.

चिमडमहाराजांचे बालपण यरगट्टी गावातच गेले. तेथेच त्यांचे काही शिक्षण झाले. एकदा ते सज्जनगडला गेले असताना, त्यांना रामदासस्वामींच्याकडून दासबोधाची हस्तलिखित प्रत मिळाली. त्यांनी दासबोध पारायण सुरू केले.

वयाच्या आठव्या वर्षी चिमडमहाराजांचा व्रतबंध झाला. वयाच्या अकराव्या वर्षी ते खानापूर गावी वडिलांकडे जाऊन राहिले. तिथे त्यांचे वडील वकिलीचा व्यवसाय करीत. शिक्षण चालू असतानाच वयाच्या चौदाव्या वर्षी चिमडमहाराजांचा विवाह झाला. त्यांच्या पत्नीचे नांव सौ. सीताबाई.

इ. स. १८५७ साली चिमडमहाराज मुलकी परीक्षा उत्तीर्ण झाले. लगेच त्यांना सातारा सबॉर्डिनेट जज्ज कोर्टात कारकुनाची नोकरी मिळाली. पुढे ती नोकरी सोडून त्यांनी विटे गावात दुसरी नोकरी पत्करली.

## ✦ विटे गावचा संस्मरणीय प्रसंग

विटे गावी असताना एकदा चिमडमहाराज निद्राधीन असता त्यांना दंश करण्यास एक सर्प आढ्यातून लोंबू लागला. तेथे निंबरगीकरमहाराज प्रगट झाले. चिमडमहाराजांना बाजूला घेऊन त्यांना साप दाखविला आणि ‘‘रामभाऊ, आत्ताचे तुमचे गंडांतर टळले आहे. आता परमार्थाला लागा,’’ असे बोलून निंबरगीकरमहाराज

अदृश्य झाले. चिमडमहाराजांच्या हाकांनी लोक तेथे येताच तो साप दाराबाहेर जाऊन गुप्त झाला. 'आपणास मृत्युमुखातून सोडविणारे महात्मे कोण असावेत,' हे जाणण्याची आतुरता मात्र चिमडमहाराजांना लागून राहिली.

## ✦ पारमार्थिक मार्गदर्शन

विटे येथील नोकरीत पगार कमी असल्याने ती नोकरी सोडून चिमडमहाराजांनी जत संस्थानात सेवावृत्ती पत्करली. नोकरीच्या निमित्ताने त्यांना वारंवार उमदी या गावी जावे लागे. उमदीला वरचेवर येणाऱ्या रघुनाथप्रिय साधुमहाराजांची व त्यांची गाठ पडली. साधुमहाराजांचा पारमार्थिक अधिकार कळल्यावर त्यांच्याकडे त्यांनी परमार्थाचे मार्गदर्शन मागितले. साधुमहाराजांनी त्यांना निंबरगीत निंबरगीकरमहाराजांच्याकडे नेले. निंबरगीकरमहाराजांना पाहताच 'यांनीच आपली मरणातून सुटका केली,' हे लक्षात येऊन त्यांनी महाराजांच्या पायाला मिठीच मारली. त्यांची तळमळ लक्षात घेऊन निंबरगीकरमहाराजांनी त्यांना साधुमहाराजांच्या मुखातून अनुग्रह दिला.

## ✦ साधनसिद्धता

काही कारणाने जत संस्थानातील नोकरी सोडून चिमडमहाराजांनी काही दिवस सातारा जिल्ह्यातील मायणी सब-कोर्टात नोकरी धरली आणि पुढे ते विटे येथे पुन्हा नोकरी करू लागले. दरवर्षी पौष महिन्यात निंबरगीस जाऊन निंबरगीकर महाराजांचे दर्शन घेण्याचा त्यांनी नेम धरला व महाराज विद्यमान असेपर्यंत तो दृढ निश्चयाने पाळला. निंबरगीकरमहाराजांच्या शिकवणुकीप्रमाणे ते संसारात राहून परमार्थ करू लागले. मुळात ते सात्त्विक होतेच. परस्त्री, परवस्तू व परद्रव्य यांची इच्छा त्यांनी कधी केली नाही. दुर्गुणांचा स्पर्श होऊ न देता त्यांनी सद्गुणांची वाढ केली आणि आहे त्यात समाधान मानून त्यांनी साधनाचा अभ्यास खूप वाढविला. परिणामत: आत्मसाक्षात्कार होऊन ते परमार्थातील पराकोटीला पोचले.

## ✦ चिमडमहाराजांचे अनुभव

साधनाची सिद्धता होत असताना चिमडमहाराजांना आलेले काही अनुभव त्यांच्या उत्स्फूर्त काव्यांत असे प्रगट झाले आहेत : ''गुरुकृपेचे अंजन डोळ्यांत पडताच, 'अलक्ष्य स्थानातील नवरत्नांची खाण' दिसू लागली. एका दिशेला तारा व त्यापुढे इंद्रधनुष्य दिसले. नागरूपाने ईश्वराचे दर्शन झाले. गरुडाच्या भराऱ्या दृष्टीस पडल्या. मोत्यांच्या झालरी व नवरंगांचा फेरा दिसला. भालप्रदेशी असणाऱ्या शंकराचे दर्शन

झाले. आतापर्यंत गुप्त असणारे ब्रह्म दाही दिशांना प्रगट झाले; ते दृष्टीत भरून गेले व दृष्टीपुढून हलेनासे झाले. चंद्रसूर्यात्मक डोळ्यांना चैतन्याचे विविधरंगी प्रकाश दिसले. आकाश फाडून वीज चमकली. घंटा, सिंह, इत्यादी प्रकारचे अनाहत नाद श्रवण झाले. सद्गुरुकृपेने सर्वांतर्यामी असणारा रघुवीर दिसू लागला. जिकडे पहावे तिकडे तोच दिसू लागला.'' अशा प्रकारे सर्वत्र ब्रह्मदर्शन होऊन चिमडमहाराजांना अद्वैतानुभव आला. ते ब्रह्मरूपच होऊन गेले.

### ✦ अनुग्रहाची आज्ञा

चिमडमहाराज निंबरगीकरमहाराजांशी अत्यंत आदराने वागत. महाराजांच्या पुढे ते दोनदोन तास हात जोडून उभे राहात. त्यांच्यावर महाराजांची फार मर्जी होती. ते निंबरगीत आले रे आले की महाराज घरच्या मंडळींना सांगत, ''रामभाऊ येथे असेपर्यंत मी सर्वस्वी ह्यांचा आहे. तुम्ही आम्हाला कामे सांगू नयेत.''

प्रारंभी चिमडमहाराज निंबरगीस पायी जात. याचवेळी कोणी शरण आल्यास पंचवीस माणसांपर्यंत अनुग्रह देण्याची आज्ञा त्यांना निंबरगीकरमहाराजांनी दिली. पुढील वर्षी महाराजांनी सांगितले, ''अनन्यपणे शरण येणाऱ्यांना अनुग्रह देत चला.''

### ✦ विघ्नांचा निरास

चिमडमहाराज पौष महिन्यात निंबरगीस जात. या त्यांच्या वारीत कधी विघ्ने आली. परंतु महाराजांच्या कृपेने ती दूर झाली. असे एकदोन प्रसंग स्मरणीय आहेत.

इ. स. १८७७ साली मोठा दुष्काळ पडला. रस्त्यांवर चोराचिलटांचा उपद्रव सुरू झाला. तसेच मार्गांवर पाण्याचा थेंबही मिळणे दुर्मिळ झाले. अशा स्थितीत पौष महिना उजाडला. निंबरगीस कसे जावे असा चिमडमहाराजांना प्रश्न पडला. एके रात्री त्यांना स्वप्नात उदककुंभ घेतलेली एक सुवासिनी दिसली. ती म्हणाली , ''निंबरगीत महाराज तुमची वाट पाहात आहेत.'' चिमडमहाराजांना योग्य बोध झाला. दुसरे दिवशीच काही माणसे गोळा करून ते निंबरगीस निघाले. वाटेत खानापूर गावी ते आपल्या मातोश्रींना घेण्यास गेले. त्याही निंबरगीस कसे जाता येईल, या प्रश्नाने बैचेन होत्या. त्यांनाही चिमडमहाराजांप्रमाणे दृष्टांत झाल्याने त्याही लगेच निघाल्या. प्रवासात ही मंडळी गोमेवाडी गावच्या ओढ्याजवळ आली. ओढा कोरडा ठणठणीत होता. पण एके ठिकाणी थोडी हिरवळ व पाणी दिसले. तेव्हा तेथे मुक्काम करून लोक पुढे निघाले. 'कोरड्या ओढ्यात पाणी आणि हिरवळ कशी,'' असा

विचार मनात येऊन चिमडमहाराजांनी मागे वळून पाहिले. ओढ्यात हिरवळही नव्हती आणि पाणीही नव्हते.

### ✦ गाडीत साप

एकदा वाटेत मुक्कामाच्या वेळी मंडळी गाडीतून सामान खाली काढत होती. तळातला बुरणूस काढताना एक भला मोठा साप फुसफुस करीत बाहेर आला. पण त्याने कुणाला काही केले नाही.

### ✦ गाडीचा गड्डा निखळला

एके वारीचे वेळी गाडी चालू होती. काही लोक गाडीबरोबर चालत होते. अचानक गाडीच्या चाकाचा गड्डा निघाला. ही गोष्ट रामाप्पा गुरव याने पाहिली. पण गाडीतील माणसे घाबरतील म्हणून तो गप्प बसला. गाडी तशीच पाचसहा मैल गेली व मुक्कामावर पोचली. मग रामाप्पाने गड्ड्याची हकीकत सांगितली. तेव्हा गाडी तशीच पुढे जाते का हे पाहण्याचा प्रयत्न काहींनी केला, तो चाक निखळून पडले.

### ✦ विहिरीतून घोडे वर उचलले

एकदा निंबरगीहून चिमडमहाराज आपल्या गावी परत निघाले होते. बरोबर एक जंगम होता. चिमडमहाराज घोड्यावर स्वार होते. शेडबाळ गावाजवळ त्यांनी घोडे एका पायवाटेने चालविले. पण ही वाट पुढेपुढे फार अडचणीची झाली. एका बाजूला तुटलेली दरड होती व दुसऱ्या बाजूस एक विहीर होती. जंगम पुढे चालत होता. तितक्यात घोड्याचे मागील पाय घसरून विहिरीत लोंबकळू लागले. चिमडमहाराज ओरडले. जंगम मागे धावला. त्याने घोड्याचा लगाम पकडून ठेवला. पण त्याला घोडे आवरेना. घोड्यालाही मागचे पाय वर घेता येईनात. या बिकट स्थितीत चिमडमहाराजांनी निंबरगीकरमहाराजांचे स्मरण केले. तोच घोंगडे घेतलेला एक पुरुष घोड्याचे खूर हातावर घेऊन घोड्याचे पाय विहिरीच्या काठावर बाहेर ठेवताना चिमडमहाराजांना दिसला. रात्री मुक्कामावर चिमडमहाराजांच्या स्वप्नात येऊन निंबरगीकरमहाराजांनी सूचना दिली, "रामभाऊ यापुढे मात्र सावधगिरीने जात चला."

### ✦ चिमडमहाराज म्हणजे एकनाथमहाराजांचा अवतार

चिमडमहाराजांना निंबरगीकरमहाराज एकनाथमहाराजांचा अवतार म्हणत व तसे इतर शिष्यांना सांगत. एकदा चिमडमहाराज निंबरगीस असताना महाराजांनी त्यांना दासबोधावर प्रवचन करण्यास सांगितले. इकडे चिमडमहाराजांना घाम फुटला.

अंगाला कंप सुटला व तोंडातून शब्द निघेना. ''पाहा ! हे एकनाथमहाराज आहेत म्हणून ते गुरूला इतके भीत आहेत,'' महाराज उद्गारले.

## ✦ सोन्याचा बैल

एकदा चिमडमहाराज बैलगाडीने निंबरगीस जात होते. निंबरगीच्या अलीकडील मुक्कामात गाडीचा बैल निसटून पळून गेला. तेव्हा चिमडमहाराज गाडीवानास म्हणाले, ''सकाळी तुला तुझा बैल मिळेल.'' ''पण न मिळाल्यास..'' गाडीवानाने विचारले. ''न मिळाल्यास आमचे महाराज तुला सोन्याचा बैल देतील,'' चिमडमहाराजांनी आश्वासन दिले. सकाळी बैल गाडीजवळ येऊन उभा राहिला होता. पुढे निंबरगीस गेल्यागेल्या चिमडमहाराजांना महाराज बोलले, ''रामभाऊ, माझ्या पायातला काटा काढा. आज पहाटे रानात गेलो असता घुसला आहे.'' चिमडमहाराजांनी पृच्छा केली, ''महाराज, पहाटेच कशाला गेला होता रानात ?'' महाराजांनी उत्तर केले, ''रामभाऊ, तुम्ही दिलेल्या आश्वासनाप्रमाणे सोन्याचा बैल देण्याइतके सोने माझ्याजवळ नाही. म्हणून तुमच्या गाडीचा बैल शोधण्यास रानात जावे लागले.'' चिमडमहाराजांना वाईट वाटले व त्यांनी महाराजांची क्षमा मागितली.

## ✦ विजेचा गोळा । मस्तकी आला ॥

'आजपासून सहावे दिवशी आपण मरणार,' असा चिमडमहाराजांना एकदा दृष्टांतवजा भास झाला. तेव्हा निंबरगीकरमहाराजांच्या सन्निध देह ठेवावा म्हणून ते तातडीने निंबरगीस निघाले. पण सहाव्या दिवशी नागच गावाला पोचले. तितक्यात आकाश अभ्राच्छादित झाल्याने नाइलाजाने त्यांनी तेथेच मुक्काम केला व ते बहिर्दिशेला निघाले. एकदम प्रचंड कडकडाट होऊन त्यांच्या मस्तकावर विजेचा लोळ आला. चिमडमहाराजांनी निंबरगीकरमहाराजांचे स्मरण केले. तोच महाराज हाताने विजेला बाजूला ढकलून ढकलून देत आहेत, असे त्यांना दिसले. मग, 'रामभाऊ, तुमचे गंडांतर गेले,' असे शब्द त्यांच्या कानीं आले. पुढे यथावकाश चिमडमहाराज निंबरगीला पोचले. महाराज तेथे पोथी सांगत होते. चिमडमहाराजांकडे पाहून महाराज उद्गारले, ''बहिर्दिशेस जाताना विजेपासून भक्तांचे रक्षण करणारे स्वामीच आहेत !''

## ✦ चिमडास आगमन व निवास

विटे येथे चिमडमहाराज नोकरीत असताना चिमड मुक्कामी रघुनाथप्रिय साधुमहाराजांनी इ.स. १८७९ मध्ये निर्वाण केले. तत्पूर्वी त्यांनी आपल्या अनुगृहीतांना सांगून ठेवले होते, ''मी गेल्यावर रामभाऊ यरगट्टीकरांना चिमडास राहवून घ्या. तेच

आपल्या परमार्थाचे नेतृत्व करणार आहेत.'' त्याप्रमाणे ही शिष्यमंडळी विटे येथे गेली व त्यांनी साधुमहाराजांची इच्छा चिमडमहाराजांना सांगितली. त्यानंतर ते निंबरगीस गेले असता, निंबरगीकरमहाराजांनी त्यांना चिमडास जाऊन राहण्याची आज्ञा केली. ती शिरसावंद्य मानून चिमडमहाराजांनी आपली नोकरी सोडली व इ.स. १८८० च्या सुमारास ते चिमडास आले. निंबरगीकरमहाराजांनी पूर्वी कापूर लावून सुचविलेल्या जागीच एक साधी पर्णकुटी बांधून ते राहू लागले. ही जागा म्हणजे चिमड गावच्या आग्नेय दिशेला ओढ्यापलीकडे असणारी पूर्वीच्या स्मशानाची खुली जागा होती.

### ✦ स्मशानात गंगा व मंदिर

स्मशानातील आपल्या मठीजवळ साधुमहाराजांचे मंदिर बांधवून घेण्याचे चिमडमहाराजांनी ठरविले. त्याप्रमाणे पाया खणला जात असताना, पांढऱ्या स्वच्छ पाण्याचा उमाळा उसळून आला. ते कळताच चिमडमहाराज उद्गारले, ''निंबरगीकरमहाराजांच्या ईच्छेने साक्षात गंगा नदी साधुमहाराजांच्या दर्शनास आली आहे.'' नंतर या पाण्याभोवती एक विहीर बांधण्यात आली व तिला तापनाशी तीर्थ असे नाव देण्यात आले. मग तापनाशीच्या मध्यभागी एक चतुष्कोणाकृती मंदिर बांधण्यात आले. त्यानंतर त्या मंदिरात साधुमहाराजांच्या पादुका, निंबरगीकरमहाराजांच्या नावाची एक पिंडी व काडसिद्धांच्या नावाचा बाण या त्रिमूर्तीची स्थापना इ.स. १८८१ मध्ये चिमडमहाराजांच्या हस्ते झाली.

### ✦ चिमड मठातील कार्यक्रम

सिद्धानेसुद्धा साधन सोडू नये, या रामदासस्वामींच्या वचनाप्रमाणे चिमडमहाराजांचा साधनक्रम चालूच होता. त्याला व्यावहारिक जोड म्हणून चिमडमहाराजांनी पहाटेची काकडारती, सकाळी देवपूजा, तिसरे प्रहरी पोथी किंवा पुराण, संध्याकाळी धूपारती आणि रात्री पंचपदी असा दैनिक कार्यक्रम ठरवून टाकला. पुढील नैमित्तिक कार्यक्रमही त्यांनी आखले :- प्रत्येक श्रावण सोमवारी रात्री पालखी निघे. चैत्र शुद्ध प्रतिपदा ते चैत्र शुद्ध तृतीया या तीन दिवशीं साधुमहाराजांची आराधना होई. तसेच निंबरगीकरमहाराजांच्या आज्ञेनुसार, आश्विन वद्य १२ (गुरुद्वादशी) ते कार्तिक शुद्ध ५ (पांडवपंचमी) या दिवसांत साधुमहाराजांच्या रथोत्सवाचा कार्यक्रम आयोजित केला. यावेळी शिष्यवर्ग एकत्र येऊन परमार्थसाधनात काळ घालवी.

वरील कार्यक्रम हे मुख्य साधनाला पूरक अंगे आहेत, अशी चिमडमहाराजांची भूमिका होती. निंबरगीकरमहाराजांच्या सांगण्याप्रमाणे त्यांचा मुख्य भर साधनावर असे

व ते ही झाकून करण्यावर त्यांचा कटाक्ष असे. साधन करणे ही ज्याची त्याची वैयक्तिक जबाबदारी मानली जाई.

### ✦ शिष्यांचा पसारा

निरहंकारी चिमडमहाराजांनी आपल्या परमार्थाचा गाजावाजा केला नाही. तरी त्यांच्या माहात्म्याला भुलून मुमुक्षुजन आपोआपच त्यांच्याकडे आकर्षित होत होते. त्यामुळे त्यांना परमार्थासाठी दौरे काढावे लागले नाहीत व नवसही करावे लागले नाहीत. त्यांच्या शिष्यमंडळींत ब्राह्मण, लिंगायत, मराठा, इत्यादी विविध प्रकारचे लोक होते. जमखंडी, मुधोळ, महालिंगपूर, रबकवी या चिमडजवळच्या गावांत त्यांचे अनेक शिष्य होते. विजापूर, बेळगाव, धारवाड, बंगळूर, मैसूर या कर्नाटकातील गावांपर्यंत त्यांचे शिष्य होते. तसेच सांगली, मिरज, कोल्हापूर, वसगडे, तासगाव, सातारा, पुणे, मुंबई व नाशिक या महाराष्ट्रातील गावांतूनही त्यांचे अनुगृहीत पसरले होते. खेरीज काही शिष्य काशी व तंजावर येथे राहणारेही होते.

### ✦ अनुगृहीतांच्या अडचणींचा निरास

वेळप्रसंगी चिमडमहाराज आपल्या शिष्यांच्या संसारातील अडचणींचाही निरास करीत. त्यांच्या एका अनुगृहीताच्या लहान मुलास बालग्रह झाला. त्याने हे चिमडमहाराजांच्या कानांवर घातले. महाराज म्हणाले, ''मी औषध पाठवितो. मुलगा बरा होईल.'' सारवलेल्या भिंतीचा पापुद्रा त्यांनी औषध म्हणून पाठविला. त्यानेच तो मुलगा बरा झाला.

यादवाड गावी बसपराप्पा मुत्तूर या अनुगृहीताच्या शेतात काही बाधा असल्याने तेथे पीक येत नसे. तेव्हा त्याच शेतात स्वयंपाक करवून घेऊन मुत्तूरने चिमडमहाराज व अन्य काही जण यांना भोजनास बोलावले. जेवताना त्याने शेताच्या बाधेबद्दल सांगितले. चिमडमहाराज म्हणाले, ''आत्ता येथे जेवलेल्या गोविंदा रबकवी याचे पान शेतात पुरा. म्हणजे बाधा दूर होईल.'' तसे करताच बाधा दूर होऊन शेतात उत्तम पीक येऊ लागले. याच बसपराप्पाच्या वाटणीस आलेल्या घरात पिशाचबाधा होती. त्याने त्या घरातही चिमडमहाराजांना भोजनास बोलाविले. परिणामतः घरातील बाधा संपली व बसपराप्पा सुखाने नांदू लागला.

### ✦ सावकारला वाचविले

चिमड गावातील मुरगेप्पा नावाचा सावकार चिमडमहाराजांचा भक्त होता. त्याच्या हितशत्रूंनी त्याच्या स्वयंपाक्याला वश करून घेऊन मुरगेप्पाच्या अन्नात विष

घातले. मुरगेप्पा जेवण्यापूर्वीच चिमडमहाराजांनी त्याला तातडीने बोलावून घेऊन काय सांगायचे ते सांगितले. मुरगेप्पा घरी जाऊन पाहतो, तो अन्न हिरवे पडले होते व स्वयंपाकी पळून गेला होता. मुरगेप्पाचा प्राण महाराजांनी वाचविला.

### ✦ घरातील पीडा घालविली

यादवाड गावातील रामाप्पा चिपळकट्टी या शिष्याच्या घरात पिशाचबाधा होती. त्याने चिमडमहाराजांना आपल्या घरी नेऊन सर्व सांगितले. घरच्या सर्व मंडळींना थोडा वेळ बाहेर जाण्यास महाराजांनी सांगितले व तिमाप्पा कुलकर्णी नावाच्या माणसास दाराजवळ बसवून काय होते, ते पाहण्यास सांगितले. महाराज स्वत: देवघरात बसले. काही वेळाने महाराज बाहेर आले व त्यांनी काय झाले ते तिमाप्पाला विचारले. तो म्हणाला, ''एक बाई खाकेत गाठोडे घेऊन घराबाहेर गेली.'' ''पीडा गेली,'' महाराज बोलले. त्या घरात रामाप्पाला पुन्हा कधीही भूतबाधेचा त्रास झाला नाही.

### ✦ चिमडमहाराजांना आशीर्वाद

नेहमीप्रमाणे इ.स. १८८४ साली चिमडमहाराज पौष महिन्यात निंबरगीस गेले. यावेळी निंबरगीकरमहाराज आपल्या निर्वाणापूर्वीची निरवानिरव करू लागले होते. त्यांनी लक्ष्मीबाई अक्कांच्या विद्यमाने सर्व परमार्थ चिमडमहाराजांकडे सोपविला व ''या परमार्थापासून तुमचा लखलाभ होऊ दे,'' असा आपला आशीर्वादही देण्यास लक्ष्मीबाई अक्कांना सांगितले. नंतर चिमडमहाराज महाराजांच्या दर्शनास येताच, अक्का महाराजांना म्हणाल्या, ''महाराज, रामभाऊंच्या मस्तकावरून हात फिरवून, ते, त्यांचे पुत्रपौत्र या सर्वांना परमार्थाचा लखलाभ होऊ दे, असा आशीर्वाद देऊन पदरात नारळ घाला.'' निंबरगीकरमहाराजांनी तसे केले आणि यापुढे परमार्थाबद्दल विचारायचे झाल्यास, रामभाऊंना विचारावे, असे आपल्या अनुगृहीतांना सांगून टाकले.

चिमडमहाराज परत निघाले, तेव्हा महाराजांनी त्यांना आदेश दिला, ''आमच्या पश्चात तुम्ही लक्ष्मी अक्कांचा सांभाळ करा.'' चिमडमहाराजांनी ते मान्य केल्यावर महाराज पुन्हा म्हणाले, ''रामभाऊ, आमचा जीव चिमडासच राहील.'' चिमडमहाराजांबरोबर असणाऱ्या मंडळींना महाराज बोलले, ''तुमच्या गावी चिमडला साधुबुवांना देव करून बसविले. तेथल्या तापनाशी तीर्थात भागीरथी आहे. आता चिमड हे महाक्षेत्र झाले आहे आणि तेथे परमार्थाचे मार्गदर्शन करण्यास आमचे रामभाऊ आहेतच.''

### ✦ चिमडमहाराजांचे छत्र हरपले

इ.स. १८८५ साली निंबरगीकरमहाराजांना ९५ वे वर्ष लागले. यावर्षी त्यांनी

देह ठेवण्याचे ठरविले होते. देह ठेवण्यास चिमडास जाण्याचे त्यांच्या मनात होते. पण ते जमले नाही. निर्याणापूर्वी चिमडहून तापनाशीतील तीर्थ आणण्यास त्यांनी गुरुसिद्दप्पा जाड यास पाठविले. चैत्र शुद्ध ११ ला चिमडमहाराजांची आठवण काढून ते म्हणाले, ''रामभाऊ, जगात परमार्थ सांभाळून चालवावा.'' दुसरे दिवशी चैत्र शुद्ध १२ ला त्यांनी निर्याण केले. त्याच दिवशी चिमड येथे चिमडमहाराजांना तापनाशी तीर्थामागे निंबरगीकरमहाराज दिसले. त्यांच्या पायांवर मस्तक ठेवून चिमडमहाराजांनी वर पाहिले, तो कोणीच नव्हते. त्याचवेळी साधुमहाराजांच्या मंदिराचा कळस अचानकपणे ढासळून पडला. तेव्हा निंबरगीकरमहाराज निजधामास गेले हे त्यांना कळून चुकले.

### ✦ लक्ष्मीबाई अक्कांना चिमडास आणले

लौकिक रीतीप्रमाणे महाराजांच्या निर्याणाचे निंबरगीहून पत्र आल्यावर चिमडमहाराज निंबरगीस गेले. महाराजांच्या घरच्या मंडळींचे त्यांनी सांत्वन केले. नंतर लक्ष्मीबाई अक्कांचे सांत्वन करून महाराजांच्या सूचनेप्रमाणे लक्ष्मीबाई अक्कांना बरोबर घेऊनच ते चिमडास परतले.

### ✦ चिमडमहाराजांचे सामर्थ्य

एकदा चिमडमहाराज रबकवी गावी गेले असता, पोटशूळाने त्रस्त झालेली व औषधांनी गुण न आलेली एक परटीण महाराजांना शरण आली. ती त्यांचे पाय सोडीना. महाराज म्हणाले, ''बाई, उठा. तुमचे दुखणे गेले.'' ती बाई उभी राहिली. तिचा पोटशूळ थांबला होता.

### ✦ मेणबत्ती प्रकाशतच राहिली

चिमडमहाराजांचे मुधोळचे काही शिष्य दर शनिवार-रविवारी चिमडास येत. एकदा त्यांना येण्यास बरीच रात्र झाली. एक अर्धा इंच लांबीचा मेणबत्तीचा तुकडा उजेडासाठी लावण्यात आला. पुढे या मंडळींचा फराळ झाला आणि चिमडमहाराजांचे दासबोधावर प्रवचनही झाले. हे सर्व होण्यास दोन तास लागले आणि हा सर्व वेळ मेणबत्तीचा तेवढाच तुकडा जळत होता.

### ✦ घोडा बरा झाला

चिमडमहाराजांच्या देवका या कन्येचा विवाह चिमड मठातच झाला. त्या सुमारास महाराजांच्या घोड्याला चांदणी लागून तो मरणोन्मुख झाला. ''हे घोडे इतक्यात मरेल,'' एक कुणब्याचे पोर बोलले. चिमडमहाराजांनी घोड्याच्या पाठीवरून हात फिरविला व ते बहिर्दिशेला गेले. ते परत येईपर्यंत घोडे बरे झाले होते.

### ✦ ही पोर कशी मरेल ?

देवका अक्काच्या लग्नसमयीच तात्यासाहेब कोटणीसमहाराजांची लहान कन्या कल्लव्वाक्का अत्यवस्थ झाली. हे कळताच चिमडमहाराज हसून बोलले, ''ही पोर कशी मरेल ? ही तर आमची सून होणार आहे!'' कल्लव्वाक्का या दुखण्यातून बचावली.

### ✦ शेवटी रथ निघालाच

एके वर्षी चिमड गावच्या काही मंडळींनी पांडवपंचमीला साधुमहाराजांचा रथ गावात आणू न देण्याचे ठरविले व बंदोबस्तास असलेल्या पोलीस फौजदारास फितवून चिमडमहाराजांकडे निरोप धाडला की, रथ गावात आल्यास दंगा होईल; तेव्हा रथ गावात आणू नये. हा निरोप ऐन वेळी आल्याने अन्य काही करता येणे शक्य नव्हते. ''साधुमहाराजांच्या मनात असेल, तसे होईल,'' असे बोलून चिमडमहाराज स्वस्थ राहिले. तितक्यात जमखंडीहून पोलीस इन्स्पेक्टर मठात येऊन महाराजांना विचारते झाले, ''महाराज, अजून रथ का निघाला नाही ?'' महाराजांनी त्यांना सर्व सांगितले. इन्स्पेक्टर म्हणाले, ''महाराज, मी स्वत: रथाबरोबर येतो. बघू काय होते ते !'' आणि व्यवस्थितपणे चिमड गावात मिरवून रथ मठात परतला.

### ✦ घे अनुभव

''मला काहीतरी अनुभव द्या,'' एका शिष्याने चिमडमहाराजांना विनविले. महाराज म्हणाले, ''तापनाशी तीर्थाला प्रदक्षिणा घालू लाग. तुला अनुभव येईल.'' त्याने प्रदक्षिणा सुरू केली. दुसऱ्याच प्रदक्षिणेला त्याला पेटता अग्नी दिसू लागला. ते त्याने महाराजांना सांगितल्यावर ते म्हणाले, ''अरे, तुला दिसला, तोच अग्निरूप आत्म्याचा प्रकाश होय.''

### ✦ चिमडमहाराजांची यात्रा

इ. स. १८९० साल उजाडले. लक्ष्मीबाई अक्कांच्या इच्छेवरून चिमडमहाराज सहकुटुंब व सहशिष्य परळी, आळंदी व देहू या स्थानांच्या दर्शनास निघाले. प्रथम परळीला जाऊन सर्वांनी रामदासस्वामींच्या समाधीचे दर्शन घेतले. समाधीवर पूर्वदिवशी पुजाऱ्यांनी लावलेले थोडेसे वाळलेले गंध होते. ''गंधाचा प्रसाद घेऊ,'' असे म्हणून चिमडमहाराजांनी आपला ओला हात त्या गंधावरून फिरवून एक ताम्हणभर गंध काढले व ते आपल्या मंडळींना प्रसाद म्हणून वाटून दिले.

### ✦ दर्शनास गर्दी

परळीहून चिमडमहाराज साताऱ्यास बळवंतराव या आपल्या पुतण्याकडे काही

दिवस राहिले. तेथे चिमडमहाराज तसे अपरिचित होते, तरी त्यांचा प्रभाव झाकून नसल्याने तेथे त्यांच्या दर्शनास लोकांची रीघ लागे.

### ✦ आळंदीत समाधीतून हरिपाठ

सातार्‍याहून पुणेमार्गे चिमडमहाराज आळंदीला गेले. ज्ञानेश्वरमहाराजांच्या समाधीच्या दर्शनास जेव्हा ते गेले, तेव्हा पूजा चालू होती. त्यावेळी 'देवाचिये द्वारी उभा क्षणभरी । तेणे मुक्ती चारी ओळंगल्या ।' या हरिपाठाच्या पहिल्या अभंगाचा पहिला चरण चिमडमहाराज आणि लक्ष्मीबाई अक्का या दोघांनाही ऐकू आला आणि पुष्पमंडपात पुष्पांच्या सिंहासनावर बसलेल्या व कंठात रुद्राक्षमाळा असणार्‍या ज्ञानेश्वरमहाराजांचे दर्शन चिमडमहाराजांना झाले. ज्ञानेश्वरमहाराज चिमडमहाराजांना म्हणाले, ''आता लवकर स्वस्थानी परत या.'' ज्ञानेश्वरमहाराजांचा अवतार जे एकनाथमहाराज त्यांचाच अवतार चिमडमहाराज असल्याने, अशी सूचना ज्ञानेश्वरमहाराजांनी केली. ''लवकरच येईन,'' महाराजांनी आश्वासन दिले. ही गोष्ट चिमडमहाराजांनी लक्ष्मीबाई अक्कांना सांगितली.

### ✦ भिंतीची माती घेतली

आळंदीत चांगदेवास भेटण्यास जाताना ज्ञानेश्वरमहाराजांनी जी मातीची भिंत चालविली होती, ती पाहण्यास चिमडमहाराज गेले. प्राचीन भिंतीभोवती आता चिरेबंदी केलेली होती. ''प्राचीन भिंतीची मृत्तिका प्रसाद घेऊ,'' असे म्हणून चिमडमहाराजांनी भिंतीवरून हात फिरवून मृत्तिकेचा एक मोठा ढपसा काढून घेतला.

### ✦ छायाचित्र निघाले नाही

आता लवकरच निजधामास जावयाचे असल्याने, देहूस जाण्याचा बेत रहित करून निरवानिरव करण्यास चिमडमहाराज चिमडास परत निघाले. वाटेवर त्यांचा सांगली गावात मुक्काम पडला. येथे असताना महाराजांचे एक अनुगृहीत डॉ. विष्णुपंत आपटे यांनी चिमडमहाराजांचे छायाचित्र घेण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक फोटो घेणारी काच फुटली. असे तीनचारदा झाल्यावर छायाचित्र घेण्याचा नाद सोडून देण्यात आला. नंतर महाराज चिमडला गेले.

### ✦ निर्याणसूचक घटना

चिमडमहाराजांचे निर्याण जवळ आले आहे, हे सुचविणार्‍या काही घटना घडल्या त्या अशा :- १. ''हत्तीवर कधीही बसू नका,'' असे पूर्वी निंबरगीकरमहाराजांनी चिमडमहाराजांना सांगून ठेवले होते. यावेळी योग असा आला. रबकवी गावच्या माणसांनी चिमडमहाराजांना श्रावण मासातील यात्रेसाठी आग्रहाने नेले. यात्रेत एक हत्ती आला

होता. त्यावर बसण्याचा चिमडमहाराजांना फार आग्रह झाला व ते निरुपायाने हत्तीवर बसले. २. निंबरगीकरमहाराजांनी असेही सांगून ठेवले होते की, रामभाऊंच्या दाजीसाहेब या ज्येष्ठ चिरंजीवांना दहावे वर्ष लागले की वडिलांची समाप्ती होणार. इ.स. १८९१ मध्ये दाजीसाहेबांना दहावे वर्ष लागले. अशा प्रकारे इ.स. १८९१ हे चिमडमहाराजांचे निर्याणवर्ष होते; फक्त केव्हा एवढाच प्रश्न होता.

## ✦ निरवानिरव

चिमडास यात्रेहून परतताच चिमडमहाराजांनी आपले ज्येष्ठ चिरंजीव दाजीसाहेब यांचा विवाह तात्यासाहेब कोटणीसमहाराजांच्या कल्लव्वा या कन्येशी ठरविला व तो इ. स. १८९१ च्या वैशाख महिन्यात पार पडला. तत्पूर्वी द्वितीय चिरंजीव नारायणराव यांचा व्रतबंध उरकून घेतला. आपली दुसरी कन्या बहिणाबाई हिला तात्यासाहेब वसगडेकर यांचेकडे देण्यास लक्ष्मीबाई अक्कांना सांगून ठेवले. लक्ष्मीबाई अक्कांना चिमडमहाराजांनी आणि दोन गोष्टींबद्दल सांगितले :- मुले अद्याप लहान असल्याने शिवरामबुवा ब्रह्मचारी यांना पूजाअर्चा, इत्यादींसाठी मठात ठेवून घ्यावे. आणि मुले मोठी होईपर्यंत प्रपंच आणि परमार्थ यांचा भार लक्ष्मीबाई अक्कांनी वाहावा. लक्ष्मीबाई अक्कांनी ते मान्य केले.

## ✦ निर्याणाच्या सूचना दिल्या

इ.स. १८९१ सालचा साधुमहाराजांचा रथोत्सव चिमडमहाराजांच्या उपस्थितीतील अंतिम उत्सव होता. या उत्सवात त्यांनी इतरांना आपल्या निर्वाणाच्या काही सूचना दिल्या. दरवर्षी रथोत्सवात कोठीची व्यवस्था वामनभटजी बाळेकुंद्रीकर यांचेकडे असे. यावर्षी त्यांना काही घरगुती अडचणीमुळे उशीर झाला. त्यांना चिमडमहाराज बोलले, ''भटजीबुवा, आम्ही आता वृद्ध झालो. आता दाजीबाकडे पाहून वेळेवर येत चला.''

या उत्सवात तात्यासाहेब कोटणीसांची कीर्तने चालू होती. 'डोळा भरला जाई रे । रामरूप तू पाही रे ॥' या स्वकृत पदावर कीर्तन करण्यास चिमडमहाराजांनी कोटणीसमहाराजांना सांगितले. त्यांचे कीर्तन उत्तम झाले. पण पदातील गर्भित अशी चिमडमहाराजांच्या निर्वाणाची सूचना कुणाला कळली नाही.

चालू वर्षीच्या रथोत्सवात चिमडमहाराजांनी एकदोन कीर्तने केली. एकदा ते कीर्तनात म्हणाले, ''घोडा सामान घालून तयार आहे. रिकिबीत पाय ठेवला आहे. लाभ करून घेण्याची हीच संधी आहे.'' येथेही पर्यायोक्त पद्धतीने सुचविलेले निर्याण कुणालाच उमगले नाही. दुसऱ्या कीर्तनात ते उद्गारले, ''अहो, आता अवधी फार

थोडा उरला आहे. यातच काय ते साधून घ्या.'' इथेही महाराजांना आपल्या आयुष्याचा अल्पावधी सांगावयाचा होता. पण कीर्तनात बसलेल्या ज्या एका वृद्ध श्रोत्याकडे पाहून महाराज हे वाक्य बोलले, त्याचाच मृत्युकाळ जवळ आला आहे, असे लोकांना वाटले.

पांडवपंचमीला रथोत्सव संपल्यावर चिमडमहाराज म्हणाले, ''आमच्या हातूनचा हाच शेवटचा रथोत्सव आहे. पुढील वर्षाच्या रथोत्सवाला आम्ही असणार नाही.'' पण लगेच दुसऱ्या शब्दांनी त्यांनी त्या शब्दांचे परिमार्जन केले.

रथोत्सवानंतर ललित होऊन महाप्रसाद वाटण्यात आला. मग जमलेली मंडळी महाराजांचा निरोप घेऊन परत निघाली. त्यावेळी बऱ्याच लोकांना चिमडमहाराज म्हणाले, ''आता तुमची आमची हीच शेवटची भेट.'' पण त्यांच्या या बोलण्याचा उलगडा त्या मंडळींनाही नीटसा झाला नाही.

## ✦ अंतिम आजार

चिमडमहाराजांनी आपल्या निर्याणाचा बेत केला होता. पण शारीरिक दृष्ट्या त्यांच्या प्रकृतीत कोणतीही चलबिचल नव्हती किंवा तब्येतीत कोणतातरी बिघाड झाला होता, असेही दिसत नव्हते. पण आता देह ठेवावयाचा असे त्यांनी ठरविले असल्याने त्यांनी आता दुखण्याचे मिष घेतले. मग वैद्याला बोलावणे जाई. वैद्य येऊन प्रकृती पाहात पण त्यांना काहीच विकार दिसत नसे. परंतु वैद्य परत गेले रे गेले की महाराज आजाराचे काहीतरी लक्षण दाखवीत.

असाच एक महिना गेला. मग मात्र महाराजांनी अंथरूण धरले. मार्गशीर्ष शुद्ध नवमी उजाडली. या दिवशी लक्ष्मीबाई अक्कांनी मठातील मंडळींना सांगितले की, महाराजांचा निर्याणकाळ अगदी सन्निध आला आहे; कुणाला काही विचारायचे असल्यास विचारून घ्यावे. अक्कांनी दाजीसाहेबांना महाराजांच्या पायांवर घातले. ''याचे आता सर्वच बरे होईल,'' महाराज उद्गारले व ते पुढे म्हणाले, ''शुक्रवार आम्हांसही बरे होणार आहे.'' तात्यासाहेब कोटणीसमहाराजांची आठवण चिमडमहाराजांनी काढली. पण दोघांची भेट होऊ शकली नाही.

नंतर, ''अक्का, आम्हाला औषध वगैरे काही देऊ नका,'' असे लक्ष्मीबाई अक्कांना सांगून चिमडमहाराजांनी मौन धारण केले. या काळात घरची मंडळी व वामनभटजी बाळेकुंद्रीकर यांनी महाराजांची सेवा केली.

## ✦ निर्वाण

चिमडमहाराजांनी सूचित केलेला शुक्रवार उजाडला. या दिवशी शके १८१३

(इ. स. १८९१) मार्गशीर्ष शुद्ध एकादशी होती. मौन धारण केलेले चिमडमहाराज स्वरूपानुसंधानात होते. रात्री पावणेदहाचा सुमार झाला. आपल्या भौतिक देहातून स्वेच्छेने बाहेर पडून चिमडमहाराजांचा आत्मा रामरूपात विरून गेला. एक देदीप्यमान जीवन आत्मरूपात एकरूप होऊन गेले.

### ✦ निर्वाणानंतर

त्यांच्या निर्वाणाची वार्ता कळताच शेकडो लोक त्यांच्या अंत्यदर्शनास आले. साधुमहाराजांच्या दहनस्थानावरील वृक्षाजवळच महाराजांच्या शरीराला अग्निसंस्कार देण्यात आले. नंतर त्या स्थानी एक औदुंबराचा वृक्ष लावण्यात आला.

### ✦ निर्वाणाचा दृष्टांत

ज्या रात्री चिमडमहाराजांनी निर्याण केले, त्याच रात्री त्यांनी मोरोपंत, शर्मा, इत्यादी दक्षिण देशातील काही शिष्यांना आपल्या निर्याणाचा दृष्टांत दिला.

### ✦ समाधी

मठात ज्या जागी चिमडमहाराज बसत, त्या जागी प्रथम एक सिंहासन ठेवून त्यावर त्यांच्या पादुका ठेवण्यात आल्या आणि त्यांची पूजाअर्चा सुरू झाली. यथावकाश त्यांची स्वतंत्र समाधीही बांधण्यात आली.

### ✦ वामनभटजींना दर्शन

चिमडमहाराजांच्या निर्याणानंतर वामनभटजी बाळेकुंद्रीकर प्रथेप्रमाणे साधुमहाराजांच्या रथोत्सवास कोठीची व्यवस्था पाहण्यास येत. काकडारती झाल्यावर ते साधुमहाराजांच्या मंदिराला प्रदक्षिणा घालत. त्यावेळी त्यांना अनेकदा चिमडमहाराजांचे दर्शन झाले.

### ✦ कोटणीसमहाराजांना वाचविले

चिमडमहाराजांच्या निर्याणानंतर तीस वर्षे लोटली. इ. स. १९२१ मध्ये महाराजांचे पट्टशिष्य तात्यासाहेब कोटणीसमहाराज यांना फार ताप आला. सात दिवस ते बेशुद्ध होते. आठव्या दिवशी त्यांना उतार पडला. हळूहळू त्यांची प्रकृती सुधारली. बरे झाल्यावर ते म्हणाले, ''माझ्यावर कुणीतरी विषप्रयोग केला होता. त्यामुळे मला हे तापाचे दुखणे आले. पण मला माझ्या सद्गुरूंनी मृत्युमुखातून वाचविले.''

### ✦ कोटणीसमहाराजांना दर्शन व आदेश

इ. स. १९२३ मध्ये तात्यासाहेब कोटणीसमहाराज देह ठेवण्याच्या इराद्याने चिमडास गेले. या मुक्कामात चिमडमहाराजांच्या पत्नी माईसाहेब यांच्या कृपेने त्यांचे

गंडांतर टळले. त्यानंतर काही दिवसांत त्यांना चिमडमहाराजांचे दर्शन झाले. महाराजांनी सांगितले, ''हणमंता, झाडाखाली झाड वाढत नाही. तू सांगलीस जा.'' महाराजांच्या आज्ञेप्रमाणे तात्यासाहेबमहाराज सांगलीस परतले.

अशा प्रकारे विद्यमान असताना व निर्याणानंतर आपल्या सामर्थ्याची प्रचीती आणवून देणारे चिमडमहाराज हे एक अवतारी पुरुष होते.

●●●

## प्रकरण ७ : संदर्भसूची


१. **कैवल्यपुरुष, खंड १**, ह.पां. कोटणीस, सांगली, १९३३

२. **तात्यासाहेबमहाराज कोटणीस**, दासराम, पुणे, १९८३

३. **दादामहाराज केळकरांची हस्तलिखित वही**

४. **निंबरगीकरमहाराज**, डॉ. के.वा. आपटे, पुणे, १९८३

५. **रघुनाथप्रिय साधुमहाराज**, डॉ. के.वा.आपटे, कोल्हापूर, १९७९

६. **सन्मार्गदीप**, समर्थभक्त, चिमड, १९३३

७. **सिद्धकथामृतसार**, दासराम, सिद्धगिरिसंदेश त्रैमासिक, मुंबई, १९७३

८. **हणमंतरावजी कोटणीसचरित्र**, साधुदास, सांगली, १९३७


▲▲▲

# चिमडमहाराजांचे वंशज व त्यांचे काही शिष्य

चिमडमहाराजांच्या निर्याणानंतर त्यांच्या परमार्थाची परंपरासुद्धा त्यांचे अधिकारी वंशज आणि अधिकारी शिष्य या दोहोंद्वारा चालू राहिली. या प्रकरणात आता चिमडमहाराजांच्या पुत्रपौत्रांची माहिती देऊन त्यांच्या काही शिष्यांचीही माहिती दिली आहे. त्यानंतर चिमडमहाराजांच्या परमार्थातील अधिकारसंपन्न अशा काही अनुगृहीतांची हकीकत दिलेली आहे.

**१. दाजीसाहेबमहाराज :**

दाजीसाहेब हे चिमडमहाराजांचे ज्येष्ठ चिरंजीव. चिमडच्या तापनाशी तीर्थात ज्या साली मंदिरातील त्रैमूर्ती स्थापन झाली, त्याच इ. स. १८८१ साली त्यांचा चिमडच्या पर्णकुटीत जन्म झाला.

चिमडमहाराज पूर्वी विटे येथे असताना त्यांचा एक मुलगा दगावला होता. त्यावेळी तेथे आलेल्या रघुनाथप्रिय साधुमहाराजांनी चिमडमहाराजांच्या पत्नीचे सांत्वन करून म्हटले, "सीताबाई शोक करू नका. तुम्हाला यानंतर आणखी चांगली मुले होणार आहेत." त्यांच्या वचनाप्रमाणे चिमडमहाराज चिमडला राहण्यास आल्यावर दाजीसाहेबांचा जन्म झाला.

दाजीसाहेबांच्या जन्माच्यावेळी सूतिकागारात प्रकाश पडला होता. हे मूल पूर्वजन्मीचे साधनाभ्यासी योगी असल्याने, या नवजात अर्भकाचे केस जन्मत:च एखाद्या तपस्वी माणसाप्रमाणे लांबसडक असून ते डोळ्यांवर पडले होते. तेव्हा मुलाला डोळेच नाहीत की काय अशी जवळच्या मंडळींना शंका आली. पण केस वर सारून पाहताच मुलाचे तेजस्वी डोळे सर्वांच्या दृष्टोत्पत्तीस आले आणि पहिल्या दहा दिवसांतच हे मूल बसविले, तर चांगले खुटखुटीतपणे बसत असे. बारशाच्या दिवशी मुलाला रघुनाथप्रिय साधुमहाराजांचे रघुनाथ हे नाव ठेवण्यात आले.

### ✦ मुलाला दाजीबा म्हणा

हे मूल लहानपणी फार रडवे होते. त्याला घेऊन चिमडमहाराज सहकुटुंब निंबरगीस गेले. "महाराज, मुलगा फार रडतो," असे निंबरगीकरमहाराजांना सांगण्यात आले. "अहो, मुलाचे नाव काय ठेवले आहे ?" असा प्रश्न महाराजांनी केला. "रघुनाथप्रिय साधुमहाराजांचे रघुनाथ हे नाव मुलाला ठेवले आहे," त्यांना

सांगितले गेले. तेव्हा महाराज बोलले, "आता असे करा, मुलाला रघुनाथ नावाने हाक न मारता 'दाजीबा' या नावाने हाक मारू लागा. म्हणजे त्याचे जादा रडे थांबेल." तसे करू लागताच मुलगा रडवा राहिला नाही. मुलाच्या मस्तकावरून आपला अमृतहस्त फिरवून निंबरगीकरमहाराजांनी प्रश्न केला, "काय रे, मृत्युलोकाची हवा खाण्यास पुन्हा आलास काय ?" त्यांच्या तोंडाकडे पाहात मुलगा हसू लागला.

## ✦ दाजीसाहेबांचा विवाह व शिक्षण

तात्यासाहेब कोटणीसमहाराजांची कन्या कल्लव्वा ही आपली सून होणार आहे, असे चिमडमहाराज पूर्वी म्हणाले होते. त्याला अनुसरून कोटणीसमहाराजांनी आपली कन्या कल्लव्वा हिला दाजीसाहेबांना देण्याचे ठरविले. मग इ. स. १८९१, वैशाख शुद्ध ८, शनिवार या रोजी हा विवाह उत्साहाने साजरा झाला. त्यानंतर इ. स. १८९३ च्या नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात या नूतन दांपत्याला घेऊन लक्ष्मीबाई अक्का व कोटणीसमहाराज निंबरगीला गेले. तेथे या जोडप्याने निंबरगीकरमहाराजांच्या समाधीची पूजा केली.

यावेळी कोटणीसमहाराज बेळगावात वकिली करीत होते. त्यांनी आपले जामात दाजीसाहेब यांना शिक्षणासाठी आपल्याजवळ ठेवून घेतले. तेथे त्यांचे जरुरीपुरते इंग्रजी-संस्कृतचे शिक्षण झाले.

## ✦ चिमड मठाधिपती

चिमडमहाराजांच्या निर्याणापूर्वी लक्ष्मीबाई अक्कांनी दाजीसाहेबांना त्यांच्या पायांवर घातले. त्यावेळी दाजीसाहेबांच्या मस्तकावरून हात फिरवून, "आता याचे सर्व चांगले होणार आहे," असे चिमडमहाराज म्हणाले होते. चिमडमहाराजांच्या निर्याणानंतर लक्ष्मीबाई अक्काच प्रपंच व परमार्थ पाहात होत्या. इ. स. १८९७ मध्ये लक्ष्मीबाई अक्का निजधामास गेल्या. तेव्हा दाजीसाहेब हेच चिमड मठाचे अधिपती झाले. त्यावेळी त्यांचे वय लहान असूनही त्यांनी मोठ्या भारदस्तपणे प्रपंच-परमार्थाची व्यवस्था पाहिली. दाजीसाहेब हे नेहमी अंतर्मुख व अंतरंगात रंगलेले असत.

## ✦ निर्वाण

मठाधिपती होऊन तीन वर्षे होतात, तोच दाजीसाहेबांना इ. स. १९०० च्या ऑगस्ट महिन्यापासून बारीक ताप येऊ लागला. तरी त्यांनी नित्याचे स्नान, आह्निक, पुराणवाचन, इत्यादी कार्यक्रम पूर्वीप्रमाणेच चालू ठेवले. त्यामुळे ताप हटेना. प्रारंभी घरगुती उपचार चालू होते. तरी त्यांची प्रकृती अधिकाधिक बिघडतच चालली. काही दिवसांनी त्यांच्या खाकऱ्यातून रक्त पडू लागले. ही वार्ता कोटणीसमहाराजांना कळली.

यावेळी ते सांगलीत वकिली करीत होते. त्यांनी सांगलीच्या आबासाहेब सांबारे या ख्यातनाम वैद्यांना बरोबर घेऊन तातडीने चिमडास प्रयाण केले. वैद्यांना दाजीसाहेबांच्या प्रकृतीविषयी आशा वाटली नाही. तरी प्रकृती तपासून ते म्हणाले, "औषध पाठवून देतो." दि. २७ ऑगस्टला दाजीसाहेबांची प्रकृती विकोपास गेली व २८ ऑगस्ट रोजी सकाळी त्यांनी पार्थिव देह सोडून निर्याण केले.

### ✦ योग्यता

लक्ष्मीबाई अक्कांच्या सांगण्यावरून, निंबरगीकरमहाराजांचे चिरंजीव भीमाण्णा यांनी दाजीसाहेबांना अनुग्रह दिला होता. निर्वाणसमयी दाजीसाहेबांचे वय केवळ १९ वर्षांचे होते. तथापि पूर्वजन्मीचा व चालू जन्मीचा साधनाभ्यास यामुळे परमार्थात जे साधावयाचे असते, ते त्यांनी अल्पवयातही साधलेले होते. त्यांच्या निर्याणानंतर त्यांनी समाधी चिमड मठात बांधण्यात आली.

## २. उद्धवरावजी :

उद्धवरावजी हे चिमडमहाराजांचे कनिष्ठ चिरंजीव. जन्मापासूनच उद्धवरावांच्या कानाला मोठी भोके होती. म्हणून लक्ष्मीबाई अक्का म्हणत, "हा उद्धव म्हणजे एक कानफाट्या जोगी चिमडमहाराजांचा पुत्र म्हणून जन्माला आलेला आहे." तर 'उद्धवराव म्हणजे गोरक्षनाथांचा अवतार,' असे दादामहाराज केळकर म्हणतात. उद्धवराव अजानुबाहू होते.

### ✦ उद्धव नाव ठेवा

उद्धवरावजी लहानपणी रडवे होते. तेव्हा चिमडमहाराजांनी मुलाचे नाव 'उद्धव' ठेवण्यास सांगितले व "मठाच्या शेतातील पाखरांना न हाकलता त्यांना धान्य खाऊ दे," असेही सांगितले. मग हा मुलगा रडवा राहिला नाही.

### ✦ संसार व परमार्थ

शिक्षणासाठी उद्धवराव काही दिवस सांगलीस होते. पुढे तात्यासाहेब कोटणीसमहाराजांचे मेहुणे शामराव कुलकर्णी यांच्या कन्येबरोबर त्यांचा विवाह इ. स. १९०८ मध्ये झाला. त्यांचा वेष साधा असे पण चेहरा सदोदित प्रसन्न असे. ते अगदी कमी बोलत. त्यांचा वेष साधा असे पण चेहरा सदोदित प्रसन्न असे. ते अगदी कमी बोलत. त्यांचे प्रपंचात फारसे लक्ष नव्हते. त्यांची इंद्रिये समाधानी असून, वृत्ती सदा साधनात रंगलेली असे. त्यांना अनुग्रह मिळताच त्यांची समाधीच लागली. निद्रेवर विजय मिळवून त्यांनी साधनाचा सतत अभ्यास केला. साधन

सिद्ध झाल्यावर 'सर्व काही ब्रह्म आहे' अशी भूमिका त्यांना प्राप्त झाली. काही लोक त्यांच्याकडे अनुग्रह मागत. पण ते कुणालाच अनुग्रह देत नसत. ते निगर्वी होते. ते मानापमानाकडे लक्ष देत नसत. त्यांना कीर्तीचीही चाड नव्हती. साधनाभ्यासाचा त्यांना आणि एक फायदा झाला. त्यांना ज्योतिषशास्त्राचे उत्तम ज्ञान प्राप्त झाले होते.

### ✦ लक्ष आहेच

उद्धवरावांचे थोरले बंधू नारायणराव मठाधिपती होते. एकदा नारायणराव परगावी निघाले. जाताना ते उद्धवरावांना म्हणाले, "उद्धवा, मी परगावी जात आहे. तुझे लक्ष असू दे." इकडे नेहमीप्रमाणे लोक साधुमहाराजांचे मंदिरात दर्शनास येत व नजराणा ठेवून जात. उद्धवरावांनी तो उचलून मठात नेला नाही. ही गोष्ट परत आल्यावर नारायणरावांना कळली. त्यांनी प्रश्न केला, "उद्धवा, असे का केलेस ?" "तुम्ही फक्त लक्ष ठेवण्यास सांगितले होते," उद्धवरावांनी त्यांना निष्कपट उत्तर दिले.

### ✦ निर्वाण

आपले इहलोकीचे कार्य संपले असे वाटू लागल्यावर, साधुमहाराजांची अनुज्ञा घेऊन निजधामास जाण्याचे उद्धवरावांनी ठरविले. त्या सुमारास माधवराव उकिडवे चिमडहून परत निघाले होते. त्यांना उद्धवराव म्हणाले, "तुम्ही आणि आठ दिवस राहाल, तर बरे होईल ?" पण उकिडवे यांना आणखी राहणे शक्य नव्हते. ते निघून गेले. बरोबर आठवे दिवशी इ. स. १९३२ सालच्या मार्गशीर्ष शुद्ध षष्ठीला उद्धवरावजींनी निर्याण केले. तेव्हा "चिमडचा आत्मा गेला," असे चिमडचे लोक म्हणू लागले. लोकांनीच स्वयंस्फूर्तीने व स्वखर्चाने उद्धवरावांची समाधी चिमड मठात केली आहे.

### ✦ नंतर

उद्धवरावांना पांडुरंगराव या नावाचे एक चिरंजीव आहेत. त्यांनी सांगलीत बरीच वर्षे पोस्ट ऑफिसात नोकरी केली. आता ते सेवानिवृत्त झाले असून सध्या चिमड येथे राहतात. ते सात्त्विक आणि समाधानी गृहस्थ आहेत.

## ३. नारायणमहाराज :

नारायणमहाराज हे चिमडमहाराजांचे द्वितीय चिरंजीव. त्यांचा जन्म शके १८०७ (इ.स. १८८५), चैत्र वद्य १४ रोजी झाला. ते गर्भस्थ असताना, त्यांच्या

मातोश्री सौ. माईसाहेब यांना निंबरगीकरमहाराजांचे दर्शन झाले. म्हणून निंबरगीकरमहाराजांचे नारायण हे नाव त्यांना ठेवण्यात आले.

### ✦ शिक्षण, विवाह

इ. स. १८९१ मध्ये वयाच्या सहाव्या वर्षी त्यांचा व्रतबंध झाला. काही काळ ते बेळगावला तात्यासाहेब कोटणीसमहाराजांकडे राहिले होते. पुढे देह ठेवण्यापूर्वी लक्ष्मीबाई अक्कांनी त्यांना चिमडास बोलावून घेतले. मग ते चिमडासच राहिले. त्यांची पहिली पत्नी एका मुलीला जन्म देऊन स्वर्गवासी झाली. नंतर तेरदळ येथील वकील रामाप्पा बेळगळी यांच्या गंगाबाई या कन्येशी त्यांचा द्वितीय संबंध झाला. या संबंधापासून त्यांना मुलगे व मुली झाल्या आहेत.

### ✦ अनुग्रह व साधन

चिमडमहाराजांचे पुतणे बळवंतराव यांनी नारायणमहाराजांना अनुग्रह दिला. नंतर त्यांनी व लक्ष्मीबाई अक्कांनी त्यांच्याकडून साधन करवून घेतले. ते म्हणत, ''काही साधन न करता कुणाला काही मिळत असेल, तर मिळू दे. मला मात्र साधन करून थोडी प्राप्ती झाली आहे.''

### ✦ चिमड मठाधिपती

दाजीसाहेबांच्या निर्याणानंतर, त्यांच्या मनात नसतानाही, नारायणमहाराजांना मठाधिपती व्हावे लागले. एकदा ही जबाबदारी पत्करल्यानंतर मात्र ती निष्ठेने पार पाडण्यात त्यांनी कुचराई केली नाही.

### ✦ दैनिक कार्यक्रम

नारायणमहाराज लवकर उठून स्नानसंध्या, इत्यादी आह्निक करीत. दिवसातून एकवेळ ते मळ्यात वा शेतात चक्कर टाकीत. उरलेला बहुतेक वेळ ते आपल्या खोलीत ध्यानमग्न स्थितीत राहात. सायंकाळी एक तासभर ते प्रवचन करीत. नंतर पंचपदी आणि आरती हा कार्यक्रम होई आणि तात्यासाहेब कोटणीसमहाराजांच्या निर्याणानंतर त्यांचेऐवजी ते स्वत: साधुमहाराजांच्या रथोत्सवात कीर्तन करू लागले.

### ✦ गुरुगृहाबद्दल आदर

निंबरगीकरमहाराजांचे नातू नागाप्पाण्णामहाराज हे साधुमहाराजांच्या रथोत्सवासाठी चिमडास येत. त्यांना सवाद्य मिरवत मठात नेले जाई. तेथे त्यांची आरती केली जाई आणि नागाप्पाण्णामहाराज चिमडात असेपर्यंत नारायणमहाराज कुणालाही अनुग्रह देत नसत.

### ✦ मठाचा सेवेकरी

आपण मठपती नसून साधुमहाराजांचे मठातील सेवेकरी आहोत, अशी नारायणमहाराजांची भूमिका होती. एकदा एक गृहस्थ त्यांच्याकडे आला व अनुग्रह मागू लागला. त्याला अनुग्रहापूर्वी त्यांची पाद्यपूजा करावयाची होती. नारायणमहाराजांनी पाद्यपूजा करून घेण्यास नकार दिला.

एकदा मुंबईचे एक गृहस्थ अनुग्रह घेण्यास मठात आले. ''महाराज बाहेर गेले आहेत. पण लवकर येतील,'' असे त्यांना सांगण्यात आले. तितक्यात खाकेत दोन भोपळे घेऊन शेतावरून आलेले महाराज त्यांना दिसले. या गृहस्थांनी त्यांनाच विचारले. तेव्हा नारायणमहाराज बोलले, ''महाराज तापनाशी तीर्थातील मंदिरात आहेत. मी या मठातील सेवेकरी आहे.'' नंतर कुणीतरी त्या गृहस्थांना सांगितले की स्वत:ला सेवेकरी म्हणवणारे तेच नारायणमहाराज आहेत.

### ✦ कर्ते-करविते साधुमहाराज

नारायणमहाराजांच्या काही शिष्यांना एकदा असे वाटले की, आमच्यामुळे इथला साधुमहाराजांचा रथोत्सव व्यवस्थित होतो. तेव्हा नारायणमहाराज सहज बोलून गेले की, आपल्यापैकी कुणी काही केले नाही, तरी साधुमहाराज कर्ते-करविते आहेत. एके वर्षी शिष्यांनी अंग काढून घेतले. त्यावर्षी चिमडच्या गावकऱ्यांनी पुढे होऊन रथोत्सव पार पाडला. असेच एकदा नारायणमहाराजांना कुणीतरी विचारले, ''महाराज, आपल्यानंतर मठ कसा काय चालेल ? '' ते उत्तरले, ''साधुमहाराज सर्व काही करवून घेतात. आपण कशाला काळजी करायची ?''

### ✦ सर्वांना सन्मान

साधुमहाराजांच्या रथोत्सवसमयी मठात जेवणाची पंगत बसली होती. नारायणमहाराजांना आढळले की, इतरांपेक्षा आपल्या पानातील चटणी वेगळी आहे. मग आपल्या पानातल्यासारखी चटणी सर्वांच्या पानांत वाढवून घेतल्यावर मगच ते भोजनास बसले. पण जेवणात कुणाचे पथ्यपाणी असेल, तर तिकडेही ते लक्ष देत. अनंतराव म्हैसकरांच्यासाठी बिनमिठाचे पदार्थ वाढण्यास त्यांनी घरच्या मंडळींना सांगून ठेवले होते.

### ✦ शिष्यांच्या संदर्भात

साधन हे ज्याचे त्यानेच केले पाहिजे, असे नारायणमहाराज म्हणत. म्हणूनच ते शिष्यांना मार्गदर्शन करीत, त्यांच्या शंका निवारण करीत. त्यांना अभ्यास सांगत

व तो त्यांच्याकडून करवून घेत. शिष्यांचा मठात असताना साधनाभ्यास व्यवस्थित व वेळच्यावेळी होत आहे, हे ते पाहात. एक तासानंतर थोडी विश्रांती, या पद्धतीने ते साधन करवून घेत. साधनसमयी साधक निद्राधीन होत नाही ना, याची खातरजमा ते करून घेत.

एकदा बाबा कानेटकर या शिष्याने ''मला ब्राह्मी स्थिती द्या,'' अशी नारायणमहाराजांना प्रार्थना केली. महाराज म्हणाले, ''तुम्ही या खोलीत साधनास बसा. तुमचा 'मी' गेला की बाहेर या. मी लगेच तुम्हाला ब्राह्मी स्थिती देतो.'' तसे बाबा बसले व थोड्याच वेळात माझा 'मी' गेला असे म्हणत बाहेर आले. महाराज बोलले, ''तुमचा मी गेला असता, तर तुम्ही बाहेर आलाच नसता. अहो 'मी' जाणे, हीच ब्राह्मी स्थिती आहे व ती साधनानेच प्राप्त होणारी आहे.''

### ✦ सामर्थ्याची प्रचीती

घोसरवाड गावच्या बापूसाहेब जोशी या हालसिद्धांच्या भक्तांना दृष्टांत झाला की, त्यांनी चिमडच्या नारायणमहाराजांचा अनुग्रह घ्यावा. ते सांगलीला माधवराव उकिडवे या नातेवाईकाकडे आले. माधवराव हे नारायणमहाराजांचे शिष्य होते. ते दोघे मिळून चिमडला गेले. तेव्हा नारायणमहाराज माधवरावांना म्हणाले, ''तुमच्याबरोबरचे गृहस्थ देवाच्या आज्ञेने अनुग्रहासाठी आले आहेत ना ? त्यांना पाठवा अनुग्रहासाठी.''

नारायणराव देशपांडे यांची विपन्नावस्था होती. त्यांना नारायणमहाराज म्हणाले, ''तुमची भरभराट होईल.'' हे देशपांडे पुढे लक्षाधीश झाले.

गणेशवाडीचे काणेबुवा एकदा नारायणमहाराजांना म्हणाले, ''महाराज, मला काही अनुभव दाखवा.'' ''नाकाच्या शेंड्याकडे पाहात चला,'' नारायणमहाराजांनी सांगितले. तसे करताच काणेबुवांना गुलाबांचा वास जाणवला.

कीर्तनकार काणेबुवांच्या १७ वर्षांच्या मुलाला नारायणमहाराज बोलले, ''आज तू कीर्तन कर.'' तो घाबरला. त्याने आत्तापर्यंत कधीच कीर्तन केले नव्हते. महाराज म्हणाले, ''तू उभा तरी राहा. साधुमहाराज तुला बुद्धी देतील.'' मुलगा कीर्तनास उभा राहिला आणि त्याने उत्तम कीर्तन केले.

नारायणमहाराजांचे मेहुणे बेळगळी नांद्रे स्टेशनवरून आगगाडीने कुडचीस जाणार होते. ''तू आज जाऊ नको,'' त्यांना नारायणमहाराजांनी सांगितले. त्यांनी जाणे रहित केले. बेळगळी ज्या गाडीने मिरजेहून कुडचीस जाणार होते, त्या गाडीला त्यादिवशी वड्डी येथे फार मोठा अपघात झाला.

रामप्पा या आपल्या शिष्याच्या विनंतीप्रमाणे त्याच्या नावलगी गावी रामायणाचा सप्ताह करण्याचे नारायणमहाराजांनी मान्य केले. पुढे नावलगी गावात प्लेगची साथ आली. ''सप्ताह पुढे करू या,'' रामप्पा म्हणाला. तेव्हा महाराज बोलले, ''ठरल्याप्रमाणे मी सप्ता करणार. रामप्पा, लक्षात ठेव, आत्ता जे तुझ्या गावी प्लेगने आजारी आहेत, ते बरे होतील व बाकीच्यांना प्लेग होणार नाही.'' पुढे तसेच घडले.

एकदा साधुमहाराजांच्या रथोत्सवात जेवणाचे वेळी अकल्पितपणे फार माणसे आली. तयार असणारा वांगीभात सर्वांना पुरेसा नव्हता व नवीन करण्यास वेळ नव्हता. हे नारायणमहाराजांना कळले. ते विमलाताई कोटणीसांना म्हणाले, ''तुम्ही वाढप करा.'' तसे झाल्यावर वांगीभात सर्वांना पुरून पुन्हा शिल्लक राहिला.

## ✦ निर्वाण

अशा प्रकारे परमार्थाचे नेतृत्व करीत नारायणमहाराजांचा काळ चालला होता. त्यांच्या वयाला साठ वर्षे पुरी झाल्यावर, त्यांच्या षष्ट्यब्दपूर्तीचा सोहळा त्यांच्या शिष्यांनी साजरा केला.

निर्याणापूर्वी एक वर्ष नारायणमहाराज आजारी होते. त्यांच्या समाचारास सांगलीचे दादामहाराज केळकर गेले होते. त्यांना महाराजांनी विचारले, ''रामभाऊ, कीर्तन चालू आहे ना ?'' शेजारीच बसलेले बेळगळी म्हणाले, ''रामभाऊंचे नित्यकीर्तन चालूच आहे.'' ''असेच चालू दे,'' महाराज आशीर्वादात्मक बोलले. या वर्षीच्या रथोत्सवात महाराजांनी आपले ज्येष्ठ चिरंजीव पंडितराव यांना कीर्तन करण्यास सांगितले.

शके १८८८ (इ. स. १९६६), माघ शुद्ध दशमी रोजी सायंकाळी निजल्या स्थितीत साधुमहाराजांच्या मंदिराच्या कळसाचे दर्शन घेऊन नारायणमहाराजांनी निर्याण केले. 'सद्गुरुनाथ माझे आई । मला ठाव द्यावा पायी ॥' या भजनात त्यांची अंत्ययात्रा निघाली. साधुमहाराजांच्या दहनस्थानातील वृक्षाजवळच त्यांच्या भौतिक देहाला अग्निसंस्कार करण्यात आला.

## ✦ निर्वाणानंतर

नारायणमहाराजांच्या निर्याणापूर्वी तीनच दिवस अगोदर कोल्हापूरच्या एका माणसाने त्यांचा अनुग्रह घेतला. त्याने विचारले, ''महाराज, मला काही शंका असल्यास मी कुणाला विचारू ?'' महाराज म्हणाले, ''त्याची व्यवस्था होईल. तुम्ही काळजी करू नका.'' तो माणूस कोल्हापूरला परतला. देह ठेवल्यावर नारायणमहाराज कोल्हापूर

येथील आपल्या एका चांगल्या शिष्याच्या स्वप्नात जाऊन म्हणाले, ''कोल्हापूरच्या एका माणसास मी नुकताच उपदेश दिला आहे. त्याला लागल्यास मार्गदर्शन करा.'' तसेच त्या नवीन अनगृहीताच्या स्वप्नात जाऊन त्याला त्या विशिष्ट साधकशिष्याकडे जाण्यास सांगितले.

### ✦ पंडितराव मठपती झाले

नारायणमहाराजांच्या निर्याणानंतर महाराजांची गादी रिकामी राहू नये म्हणून चिमडग्रामस्थांनी महाराजांचे ज्येष्ठ चिरंजीव पंडितराव यांना गादीवर बसविले. मठातील उपासना, आराधना, रथोत्सव, इत्यादी कार्यक्रम पंडितराव यथायोग्यपणे चालवीत आहेत. रथोत्सवाचे वेळी ते कीर्तन करतात. त्यांचे बंधू नीळकंठराव व सदाशिवराव हे रथोत्सवात मदत करतात.

एकदा पंडितराव पुण्यास आपल्या बहिणीकडे मुक्कामास होते. रात्री माडीवर ते झोपले असताना कडकड आवाज होऊन त्यांना जाग आली. 'आढ्याला धरून कोणीतरी उभे आहे' असे त्यांना दिसले. काहीतरी असेल म्हणून ते पुन्हा झोली गेले. सकाळी उठून ते खाली येतात न येतात तोच माडीचे आढे खाली कोसळले.

### ✦ नारायणमहाराजांचे काही शिष्य

नारायणमहाराजांचे अनेक शिष्य होते. डॉ. डबीवाले, मोहोळकर, आठले, बार्शीकर, बाबा कानिटकर, भाऊराव देशपांडे, देशमुख, यशवंतराव दळवी, चरणकर, कॅप्टन जोशी, र. वि. देशपांडे, इत्यादी उच्च श्रेणीची साधक मंडळी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली तयार झाली.

#### अ) पार्वतीकाकू बोडस :

पार्वतीकाकूंना नारायणमहाराजांचा अनुग्रह होता. त्यांचे शिक्षण फारसे नव्हते. पण नारायणमहाराजांच्या कीर्तनाचे श्रवणमननाने त्या स्वतः उत्तम कीर्तन करू लागल्या. त्या नेहमी दासबोध, ज्ञानेश्वरी व भागवत यांचे पठण करीत.. त्यांचा साधनाभ्यासही चांगला होता. त्यांनी अनेक प्रकारांनी चिमड मठाची सेवा केली.

#### आ) बी. ई. कुलकर्णी :

संसारातील सुखदु:खांत मनाचा समतोल व समाधान कसे सांभाळावयाचे हे नारायणमहाराजांनी बी. ई. कुलकर्णी या शिष्यास सांगितले. ते कुलकर्णी यांना साधता आले. त्यामुळे ते कोणत्याही परिस्थितीत शांतिसमाधानाने राहू लागले.

## इ) गोविंदपंत घोसरवाडकर :

हे घोसरवाड गावी राहात. रेवणसिद्धांचा अवतार असे जे हालसिद्ध त्यांचे भक्त गोविंदपंत होते. त्यांच्या अंगात हालसिद्धांचा संचार होत असे. एकदा त्यांना संचारात देवाने आज्ञा केली, ''दत्तोपंत कुलकर्णी यांना बरोबर घेऊन चिमडास जाऊन गुरूपदेश घे.'' त्याप्रमाणे ते चिमडास आले. पण त्यांनी आपणहून महाराजांना काहीच विचारले नाही. तेव्हा नारायणमहाराजच म्हणाले, ''अहो, तुम्ही आदेशाप्रमाणे उपदेश घेण्यास आला आहात का ? मग मला का विचारले नाही ?'' मग गोविंदपंतांनी विनंती केल्यावर नारायणमहाराजांनी त्यांना अनुग्रह दिला.

पुढे गोविंदपंत अधूनमधून चिमडास जात. एकदा ते चिमड मठात असताना त्यांना संचार झाला. काही लोकांनी त्यांना विचारले, '' नारायणमहाराजांना मुलगा नाही. मग ही परंपरा कोण चालवणार ?'' ''महाराजांना मुलगा होईल,'' असे सांगून त्यांनी ओट्यात नारळ घातला. पुढे वर्षभरातच नारायणमहाराजांना मुलगा झाला.

गोविंदपंत हे चिमड संप्रदायातील गुरुभजन व पंचपदी नित्य म्हणत.

### ✦ गोविंदपंतांचे वंशज

गोविंदपंत घोसरवाडकरांचे बाबूराव अण्णा व शंकरराव हे दोघे अधिकारी चिरंजीव होते. बाबूराव अण्णांच्या अंगात हालसिद्धांचा संचार होत असे. शंकरराव हे
हातात भंडारा घेऊन प्रश्नांची उत्तरे देत. शंकरराव हे शिपूरकर घराण्यात दत्तक गेले होते.

बाबूराव अण्णांचे चिरंजीव दत्तोपंत कुलकर्णी. यांच्या अंगातही हालसिद्धांचा संचार होतो. ते सध्या इचलकरंजीत नोकरी करीत आहेत. शंकररावांचे चिरंजीव मधुकरपंत हे एम. ए. असून ते एल. आय. सी. मध्ये अधिकारी आहेत. आपल्या वडिलांचे नंतर तेही हातात भंडारा घेऊन प्रश्नांची उत्तरे देतात. त्यांनी सांगलीच्या दादामहाराज केळकरांच्याकडून परमार्थाचे मार्गदर्शन घेतले आहे.

## ई) मामामहाराज केळकर :

तात्यासाहेबमहाराज कोटणीस यांच्या सूचनेप्रमाणे मामामहाराज केळकरांनी नारायणमहाराजांचा अनुग्रह घेतला. पुढे सांगलीत त्यांचा साधनाचा अभ्यास तात्यासाहेबमहाराजांच्या देखरेखीखाली झाला. तसेच

तात्यासाहेबमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे त्यांनी अखंड ३८ वर्षे नित्य हरिकीर्तन केले. या कारणांसाठी त्यांचे चरित्र पुढे एका स्वतंत्र प्रकरणात दिले आहे.

●●●

## प्रकरण ८ : संदर्भसूची


१. **उद्धवरावजी यरगट्टीकर चरित्र**, दासराम, हस्तलिखित

२. **कैवल्यपुरुष, खंड १**, ह. पां. कोटणीस, सांगली , १९३३

३. **गोविंदपंत घोसरवाडकर चरित्र (नाथलीलामृत)**, म. अ. कुलकर्णी, चिकोडी

४. **दादामहाराज केळकरांची यांची हस्तलिखित वही**

५. **नारायणमहाराज यरगट्टीकर चरितामृत**, दासराम, सांगली, १९७३

६. **हणमंतरावजी कोटणीसचरित्र**, साधुदास, सांगली, १९३७


▲▲▲



श्रीदाजीसाहेबमहाराज यरगट्टीकर



श्रीमती जानकीबाई यरगट्टीकर



श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर



सौ. वहिनीसाहेब यरगट्टीकर



श्रीउद्धवरावमहाराज यरगट्टीकर



श्रीगोपाळकाका कोटणीस



श्रीपंडितरावमहाराज यरगट्टीकर



श्रीपांडुरंगरावमहाराज यरगट्टीकर



श्रीवामनकाका कोटणीस



श्रीबाबासाहेब मुजुमदार



श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस



सौ. आईसाहेबमहाराज कोटणीस

# चिमडमहाराजांचे अधिकारी शिष्य

आत्मसाक्षात्कार हे परमार्थातील ध्येय आहे. ते साध्य होण्यास मुमुक्षू साधकाच्या प्रयत्नाला जसे महत्त्व आहे, तसेच ते सद्‌गुरुकृपेलाही दिले जाते. सद्‌गुरूंच्या कृपेमुळे काही गोष्टी साधकाला सहजपणे साधतात, असे म्हटले जाते. तसेच परमार्थात गुरू शिष्याला आपल्यासारखे करतात, असेही सांगितले जाते. या स्थितीत जितके जास्त शिष्य परमार्थातले अधिकारी झाले असतील, तितके त्यांच्या गुरूंचे महत्त्व उठून दिसणार, हे स्पष्ट आहे. या दृष्टीने पाहिल्यास चिमडमहाराजांचा गौरव दृष्टीत भरण्यासारखा आहे.

चिमडमहाराजांचे जे काही शिष्य परमार्थातील उच्च कोटीला पोचले होते, त्यांची माहिती आता दिलेली आहे.

## १. शिवरामबुवा ब्रह्मचारी :

शिवरामबुवा हे बालब्रह्मचारी असून चांगलेच उंचेपुरे व गोरेपान होते. त्यांनी चिमडमहाराजांकडून प्राप्त झालेल्या साधनाचा अतिशय अभ्यास करून परमार्थातील अत्युच्च पदवी प्राप्त करून घेतली होती. ते बुवासाहेब या नावाने परिचितांत ओळखले जात.

ब्रह्मचारी असल्याने ते भिक्षा मागून उदरनिर्वाह करीत. जे मिळेल, त्यातील पोटापुरते ठेवून उरलेले ते चिमड मठाला अर्पण करीत. चिमडमहाराजांच्या निर्याणानंतर ते चिमडमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे चिमड मठात राहून देवाची पूजाअर्चा करू लागले. प्राय: ते मौन धारण करून साधनात रमून गेलेले असत. गुर्वाज्ञेनुसार ते अनुग्रहसुद्धा देत असत. म्हैसूर संस्थानचे दिवाण सर टी. माधवराव हे त्यांचे शिष्य होते. असे सांगतात की, माधवरावांच्या घरचा पाळलेला मोर एकदा मेला; तो शिवरामबुवांनी पुन्हा जिवंत केला. तात्यासाहेबमहाराज कोटणीसांना शिवरामबुवांबद्दल फार आदर वाटत असे.

दीक्षित नावाचा शिवरामबुवांचा एक शिष्य धारवाड गावी राहात होता. एकदा शिवरामबुवा त्याला म्हणाले, "दीक्षित, मी आता देह ठेवणार आहे." तेव्हा दीक्षित व त्याची पत्नी बुवासाहेबांना बोलले, "बुवासाहेब, आपण आमच्याकडे देह ठेवण्यास यावे. आम्हाला आपली सेवा करण्यास मिळेल." ते मान्य करून शिवरामबुवा त्यांच्याकडे राहण्यास गेले. तेथे गेल्यावर त्यांनी आपले गुरुबंधू वामनभटजी बाळेकुंद्रीकर यांना बोलावून घेतले व त्यांना सांगितले, "भटजीबुवा, माझ्या मरणानंतर माझ्या

वस्तू चिमड मठात नेऊन ठेवा आणि **माझ्या अस्थी** चिमड मठाच्या आसपासच्या परिसरात फेकून द्या.'' पुढे नामानुसंधनात राहून शिवरामबुवांनी निर्याण केले. त्यांच्या इच्छेप्रमाणे वामनभटजींनी त्यांच्या वस्तू चिमड मठात आणल्या. नंतर त्यांची योग्यता लक्षात घेऊन, मठाच्या मागील बाजूस त्यांच्या अस्थींवर त्यांची समाधी बांधण्यात आली.

चिमडमहाराजांच्या आज्ञेने शिवरामबुवांनी राजाराममहाराजांना उपदेश दिला होता. या राजाराममहाराजांनीही खूप साधन करून मोठा अधिकार प्राप्त करून घेतला होता. राजाराममहाराज पुढे देवपिंपरी येथे वास्तव्य करून होते. तेथे असतानाच चैत्र वद्य ५ रोजी साधन करीत असताना राजाराममहाराजांनी देह ठेवला. तेथे राजाराममहाराजांची पुण्यतिथी मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते.

**२. वामनभटजी बाळेकुंद्रीकर :**

वामनभटजी शहापूर या गावी राहात असत. साधुमहाराजांच्या रथोत्सवाच्या वेळी ते चिमडास येत. रथोत्सवात मठातील कोठीची व्यवस्था पाहण्याचे काम त्यांच्याकडे असे. ती कामगिरी ते अगदी चोखपणे पार पाडीत असत. प्रारंभी प्रारंभी ते चिमडास पायीपायी येत असत.

एकदा चिमडमहाराज काही कामासाठी शहापुरास जाऊन वामनभटजींच्याकडे उतरणार होते, तसे त्यांनी वामनभटजींना कळविले होते. शहापुरास जाताना चिमडमहाराज वाटेत रबकवी गावात रात्री मुक्कामास राहिले. महाराजांचे आगमन ऐकून पोटशूळ असणारी एक परटीण महाराजांच्याकडे आली. कित्येक औषधोपचार होऊनही तिचा पोटशूळ बरा होत नव्हता. महाराजांचे पाय धरून ती बाई म्हणाली, ''महाराज, माझा पोटशूळ बरा झाल्याशिवाय मी आपले पाय सोडणार नाही.'' तिची कितीही समजूत घातली तरी ती पाय सोडेना. तेव्हा महाराज उद्गारले, ''बाई, उठा. तुमचे दुखणे गेले.'' आणि खरोखरच तिचा पोटशूळ नाहीसा झाला होता. नंतर काय झाले कुणास ठाऊक ! शहापुरास जाण्याचा बेत चिमडमहाराजांनी रहित केला व ते चिमडास परतले.

तिकडे शहापुरात वामनभटजी मोठ्या आतुरतेने चिमडमहाराजंची प्रतीक्षा करीत होते. त्यांच्यापुढे प्रगट होऊन, ''भटजीबुवा, आम्ही आता तुमच्याकडे येत नाही,'' असे सांगून चिमडमहाराज अदृश्य झाले.

चिमडमहाराजांच्या अंतिम आजारात वामनभटजींनी महाराजांची खूप सेवा केली. चिमडमहाराजांच्या निर्याणानंतरही ते साधुमहाराजांच्या रथोत्सवात

कोठीच काम पाहण्यास येत असत. तेथे साधुमहाराजांच्या मंदिराला प्रदक्षिणा घालताना त्यांना अनेकदा चिमडमहाराजांचे दर्शन होत असे.

### ३. गोपाळराव दीक्षित :

गोपाळराव दीक्षित हे सांगली गावचे रहिवासी. त्यांचे वडील सदाशिव रामचंद्र दीक्षित हे नोकरीच्या निमित्ताने मुधोळ गावी राहण्यास गेले; त्यांचे चिरंजीव गोपाळराव. गोपाळरावांनीही इ. स. १८७८ च्या सुमारास मुधोळ सरकारची नोकरी धरली. गोपाळरावांनी व्यायामाची आवड असून ते चांगले तालीमबाज होते. त्यांचे बोलणे, चालणे डौलदार असून, त्यांचा स्वभाव विनोदी व मनमिळावू होता. तात्यासाहेबमहाराज हेही त्यावेळी मुधोळ सरकारच्या नोकरीत होते. त्यांच्याशी गोपाळरावांची चांगलीच मैत्री जमली होती. कोटणीसमहाराज त्यावेळच्या घरच्या ओढगस्तीने खिन्न झाले असतील, तर गोपाळराव त्यांनी धीर देऊन उल्हसित करीत.

साक्षात्कारी सत्पुरुषाचा अनुग्रह आपल्याला व्हावा म्हणून गोपाळरावांनी कोटिलिंगार्चन केले होते. त्यांच्या या तप:सिद्धीला फळ येऊन, पुढे कोटणीसमहाराजांच्या निमित्ताने त्यांना चिमडमहाराजांचा अनुग्रह झाला. अनुग्रह झाल्यापासून त्यांनी जमिनीला पाठही न लावता रात्ररात्र साधनाभ्यासात घालविली.

इ. स. १८८८ च्या पूर्वार्धात त्यांची मुधोळमधील नोकरी सुटली. तेव्हा ते पाचसहा महिने चिमड मठात राहिले. नंतर चिमडमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे ते सांगलीस येऊन राहिले. सांगलीत असताना एकदा सोंगट्या खेळणाऱ्या काही मुलांनी "तुम्ही फाशाचे दान टाका," अशी त्यांना विनंती केली. मुलांच्या कमालीच्या आग्रहामुळे त्यांनी फासे हातात घेतले, तोच त्यांनी भावसमाधी लागली. चास तास ते त्याच अवस्थेत होते. एकदा गोपाळराव व त्यांचे मित्र रघुनाथराव दीक्षित रस्त्याने जात होते. तो बंडोपंत गोखले यांच्या घरासमोर २०-२५ जोंधळ्याची पोती असणाऱ्या एका बैलगाडीचे चाक गटारात गेलेले त्यांना दिसले. तेव्हा गोपाळराव व रघुनाथराव या दोघांनी मिळून गाडीचे चाक उचलून रस्त्यावर ठेवले.

चिमडमहाराज सद्‌गुरूंचे निर्याण झाल्यावर गोपाळराव वारंवार बोलून दाखवीत, "आता संसारात मजा राहिली नाही." चिमडमहाराजांच्या निर्याणानंतरचा इ. स. १८९२ च्या दिवाळीतील साधुमहाराजांचा रथोत्सव झाला. यावेळी गोपाळराव उदराच्या व्याधीने अत्यवस्थ झाले होते. रथोत्सवास जाण्यापूर्वी कोटणीसमहाराज गोपाळरावांना भेटण्यास आले. गोपाळराव त्यांना म्हणाले, "हणमंतराव, आम्ही आज रात्रीच महाप्रयाण करणार आहोत. तेव्हा आम्हास पोचवून मगच तुम्ही चिमडास

चला.'' त्याच रात्री ईश चिंतन करीत गोपाळरावांनी देह ठेवला. तो दिवस एकादशीचा होता. त्या एकादशीच्या रात्री चिमड मठात पंचपदीच्या समयी प्रज्वलित केलेला कापूर अचानक विझला. ते पाहून लक्ष्मीबाई अक्का जवळच्या लोकांना म्हणाल्या, ''गोपाळराव दीक्षित आत्ताच सांगलीत कैलासवासी झाले. चिमडमहाराजांचा कल्याण गेला.''

## ४. वामनराव कोटणीस :

वामनराव कोटणीस हे तात्यासाहेबमहाराज कोटणीसांचे चुलते. तेही प्रथम मुधोळ सरकारच्या नोकरीत होते. ते वैष्णव असल्याने, आपल्या पुतण्याने चिमडमहाराजांचा अनुग्रह घेऊन गुरू केला, हे त्यांना तितकेसे पसंत नव्हते. तरी चिमडमहाराजांना भेटण्याचे त्यांनी ठरविले. इ. स. १८८६ साली चिमडमहाराज मुधोळ गावी बाबासाहेब मुजुमदारांच्या घरी आले असता, वामनराव त्यांना भेटण्यास गेले. त्यावेळी चिमडमहाराजांविषयी वामनरावांची मनोभूमिका तितकीशी स्वच्छ नव्हती म्हणून त्यांना पाहताच, ''हे प्रकरण बिकट आहे,'' असे चिमडमहाराज विनोदाने म्हणाले. पण वामनराव रुसले. घरी परतल्यावर ते पुतण्यास म्हणाले, ''तुझ्या गुरूचा मंत्र मला नको आहे. मुंजीत मिळालेला गायत्री मंत्र मला पुरे आहे.'' पुढे त्याच वर्षी चिमडमहाराज पुन्हा मुधोळात आले असताना, त्यांनी वामनरावांना बोलावून घेतले आणि प्रश्न केला, ''वामनराव, गायत्री मंत्राच्या जपाने गायत्री तुमच्यापुढे प्रगट होते काय ?'' या खुणेचा प्रश्न ऐकताच वामनरावांची वृत्ती पालटली व ते अनन्यभावाने चिमडमहाराजांना शरण गेले. मग महाराजांनी त्यांना अनुग्रह दिला. तेव्हापासून वामनरावांनी फार साधन केले.

एकदा व्यंकटराव या मुधोळच्या संस्थानाधिपतींनी वामनरावांना सांगितले, ''आमच्या पिताजींच्या अस्थी काशीत नेऊन गंगेत विसर्जन करून या.'' वामनराव निघाले. पण जाण्यापूर्वी ते चिमडमहाराजांचे दर्शन घेण्यास विसरले. काशीत जाऊन त्यांनी अस्थींचे विसर्जन केले. ते मुक्कामाला परतले. तोच त्यांना भयंकर ज्वर भरला. चार दिवस अन्नपाणी गेले नाही. आपण आता मरणार, असे त्यांना वाटू लागले. त्यांना चिमडमहाराजांचे स्मरण होऊ लागले. एके रात्री चिमडमहाराज त्यांच्यापुढे प्रगट होऊन म्हणाले, ''तुला काय झाले आहे ?'' ''मी आता जगत नाही,'' वामनरावांनी उत्तर दिले. ''मरायला काय झाले ? ताबडतोब काशी सोडून बाहेर निघ,'' महाराजांनी आज्ञापिले. दुसरे दिवशी ताप असतानाही वामनरावांनी काशी सोडली. ते काशीबाहेर पडले आणि त्यांचा तापही गेला.

दोघातिघा ज्योतिष्यांनी एकदा वामनरावांना सांगितले, ''वामनराव, तुम्ही

वयाच्या ५३ व्या वर्षी मरणार आहात.'' या ज्योतिष्यांचे भविष्य खरे ठरते असा अनेकांचा अनुभव होता. त्यामुळे ५३ वे वर्ष लागताच वामनरावांना मरणाचे भय वाटू लागले. त्यांनी चिमडमहाराजांना सर्व सांगितले. ''वामनराव, तुम्हाला आत्ताच मरू देत नाही. काळजी करू नका,'' महाराजांनी आश्वासन दिले. काही दिवस गेले. एके दिवशी अर्धवट जागृत अर्धवट सुषुप्त अवस्थेत असताना वामनरावांना जाणवले की, काळपुरुष आपणास ओढून नेत आहे. पण चिमडमहाराजांनी येऊन आपणास मृत्युमुखातून सोडवले आहे.

वामनरावांची सद्‌गुरूवर फार निष्ठा होती. चिमड संप्रदायाचे आद्यसिद्ध रेवणसिद्ध यांचे दर्शन त्यांना झाले होते. साधनात त्यांना दशविध नाद ऐकू येत. साधनाला पूरक म्हणून ते जपही करीत. १९०६ साली त्यांचा ५२ कोटी जप पूर्ण झाल्यावर त्यांना आत्मज्योत दिसली. त्यांचे थोडेसे काव्यही उपलब्ध आहे.

## ५. गोपाळराव कोटणीस :

गोपाळराव हे वामनराव कोटणीसांचे चिरंजीव. चिमडमहाराजांनी त्यांना वामनरावांच्या मुखाने अनुग्रह दिला. ते चिमडमहाराजांचे जावई होते. त्यांची पत्नी देवका ही चिमडमहाराजांची कन्या. प्रथम काही दिवस गोपाळराव मुधोळ संस्थानात नोकरी करीत होते. पण ती नोकरी त्यांच्या निःस्पृह वृत्तीस मानवली नाही. ती त्यांनी सोडून दिली. त्यांच्या विरक्त वृत्तीवर खूष होऊन मुधोळच्या सरकारनी त्यांना महिना २० रुपयांची बैठी तैनात करून दिली.

गोपाळरावांची काव्यशक्ती फारच चांगली होती. संप्रदाय क्रमसिंधू (१० हजार ओव्या), अद्वैत भूमानंद (५ हजार ओव्या), स्फुट पदे (७००) आणि रामस्तुतिशतक, घंटाकर्णाख्यान, सिद्धदर्शनातुरता, हृदयनिवेदन, मनाचे श्लोक, मनोजय ही स्फुट प्रकरणे त्याच्या लेखणीतून उतरली आहेत. तात्यासाहेबमहाराज कोटणीस यांच्या निर्वाणानंतर त्यांना 'प्रियजनवियोग' हे काव्य स्फुरले. खेरीज त्यांचे काही स्फुट श्लोक व अभंगही आहेत.

गोपाळरावांचा साधनाभ्यास दांडगा होता. साधनाला पूरक म्हणून त्यांनी दोन अनुष्ठानेही केली. कोल्हापूरजवळील काडसिद्धांच्या सिद्धगिरिस्थानी त्यांनी २१ दिवसांचे अनुष्ठान केले. नंतर त्यांनी १९२३ मध्ये अहमदनगरजवळील भिंगार गावाजवळच्या तिसगाव येथील वृद्धेश्वराच्या मंदिरात एकवीस दिवसांचे खडतर अनुष्ठान केले. त्यांना सगुण साक्षात्कार झाला.

## ६. बाबासाहेब मुजुमदार :

बाबासाहेब ऊर्फ व्यंकटेश रामचंद्र मुजुमदार हे मूळ सांगलीचे. इ. स. १८८४ च्या

सुमारास ते मुधोळात न्यायाधीश म्हणून नोकरीस लागले. तेथे त्यांची तात्यासाहेब कोटणीसमहाराजांशी ओळख झाली. कोटणीसमहाराज त्यावेळी कायद्याचा अभ्यास करीत होते. बाबासाहेबांनी त्यांना अधूनमधून कायद्याचे शिक्षण दिले व आपल्या कायदे-ग्रंथांचा उपयोग करू दिला.

बाबासाहेब सांगलीचे असल्याने ते अधूनमधून घोड्यावर बसून सांगलीस येत. वाटेत ते विश्रांतीसाठी चिमड मठात थांबत असत. तिथल्या चिमडमहाराजांच्या अधिकाराची त्यांना प्रारंभी काहीच कल्पना नव्हती. त्यामुळे ते महाराजांना फारसा मान देत नसत. हे चिमडमहाराजांच्या शिष्यांना आवडत नसे. त्यांनी महाराजांना म्हटले, ''बाबासाहेब आपला मान ठेवतील, असे काहीतरी करा.'' तेव्हा शिष्यजनांच्या आग्रहास्तव इ. १८८६ च्या जून महिन्यात बाबासाहेब चिमड मठात आले असता, महाराजांनी त्यांना आपल्या अधिकाराची जाणीव करून दिली. त्यांची वृत्ती पालटली व ते तत्काळ महाराजांना शरण गेले व क्षमा मागू लागले आणि आपणास परमार्थाचा मार्ग दाखवा, अशी प्रार्थना करू लागले. पुढे गणेशचतुर्थीच्या दिवशी चिमडमहाराजांनी बाबासाहेबांना मंत्रोपदेश दिला. त्यानंतर इतरांना जाणवेल इतका फरक बाबासाहेबांच्या वृत्तीत पडला. ते फारच ईश्वरनिष्ठ दिसू लागले.

पुढे बाबासाहेबांची मुधोळची नोकरी सुटली. मग ते काही दिवस चिमड मठात राहिले व मग चिमडमहाराजांच्या आज्ञेनुसार सांगलीस येऊन वकिली करू लागले. पुढे कोटणीसमहाराजांनी ज्यावेळी सांगलीमध्ये वकिली सुरू केली, त्यावेळी त्यांना बाबासाहेबांनी बरेच साहाय्य केले. ''वकील या दृष्टीने बाबासाहेबांची उलटतपासणी करण्याची पद्धत वाखाणण्याजोगी होती. बाबासाहेबांप्रमाणे उलटतपासणी करणारा वकील आपणास आढळला नाही,'' असे स्वत: वकील असणारे कोटणीसमहाराज आवर्जून सांगत.

बाबासाहेबांची गुरूनिष्ठा अचाट होती. चिमडमहाराजांच्या पायांतील जोडे त्यांच्या नित्यपूजेत होते; त्यांची पूजा केल्याशिवाय ते अन्नग्रहण करीत नसत. बाबासाहेबांच्या गुरुभक्तीच्या आठवणीने कोटणीसमहाराजांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहात व ते सांगत, ''बाबासाहेबांच्यासारखी गुरुभक्ती माझ्या हातून काय होणार आहे ?''

बाबासाहेबांचा साधनाभ्यासही प्रचंड होता. एकदा ते साधनास बसले की ठरलेली वेळ होईपर्यंत काय वाटेल ते झाले, तरी ते आपली बैठक सोडत नसत. एकदा

ते साधनाला बसले असताना त्यांच्या मुलाच्या डोक्याला खोक पडली. घरात गडबड उडाली. पण बाबासाहेबांना मात्र काहीच पत्ता नव्हता.

गुरुकृपेने व साधनाभ्यासाने परमार्थाचे नेतृत्व करता येईल, इतकी योग्यता बाबासाहेबांना प्राप्त झाली होती. त्यांनी काहीजणांना अनुग्रहही दिला होता. सांगलीत त्यांच्या राहत्या घरी त्यांचे स्मृतिमंदिर आहे.

### ७. इराप्पा अंबी :

इराप्पा अंबी हा चिमडमहाराजांचा एकनिष्ठ भक्त. तो चिमडमहाराजांच्या घोड्याची देखभाल करी. तो नेहमी त्यांच्याबरोबर प्रवासातही जात असे. त्याचाही साधनाभ्यास पुष्कळ होता. एकदा सांगलीची काही मंडळी विटे गावी त्याच्याकडे गेली होती. तेव्हा सहज बोलता बोलता इराप्पा सांगून गेला, ''रंग उडत चेतनमो'' हे चिमडमहाराजांनी मला दाखवून दिले.

### ८. वेणूमावशी :

वेणूमावशी या चिमडमहाराजांच्या लांबच्या नातेवाईक होत्या. पूर्वीच्या प्रथेप्रमाणे त्यांचा लहानपणीचा विवाह झाला आणि बालपणीच त्यांच्यावर वैधव्याची कुऱ्हाड कोसळली. खेरीज घरात भाऊबंदकी सुरू झाली. चिमडमहाराजांनी त्यांना आपल्याकडे बोलावून घेतले; त्यांच्या विनंतीवरून त्यांना अनुग्रह दिला आणि त्यांच्या विनंतीनुसार त्यांना मठात ठेवून घेतले.

वेणूमावशींची बहीण कुंभोजकरांच्या घरी दिलेली होती. एकदा तात्या कुंभोजकर वेणूमावशींना आपल्याकडे नेण्यास चिमड मठात गेले. तेव्हा वेणूमावशी बोलल्या, ''मी आता मठ सोडून कुठे जाणार नाही. माझी हाडे या मठातच पडतील.''

मठात राहून वेणूमावशींनी खूप सेवा केली. मठातील पडेल ते काम त्या करीत. माईसाहेब यरगट्टीकरांच्या आज्ञेत वागत. फावल्या वेळात भरपूर साधन करीत. खेरीज तोंडाने त्यांचे नामस्मरण चालूच असे. यथाकाळी नामस्मरण करीतच त्यांनी देह ठेवला. त्यावेळी साधुमहाराजांच्या दगडी पादुका उचकटून पडल्या होत्या.

### ९. दत्तोपंत कुळकर्णी – कुंभोजकर :

दत्तोपंत कुलकर्णी हे कुंभोज गावी राहात. सकाळची पूजाअर्चा करून ते सकाळी ६ वाजता साधनास बसत, ते दुपारी १॥ - २ वाजेपर्यंत उठत नसत. नंतर सायंकाळी संध्या झाल्यावर रात्री अकरा वाजेपर्यंत त्यांचे साधन चालत असे. पुन्हा रात्रीचे साधन वेगळेच. ते रात्री भोजन घेत नसत.

दत्तोपंत व घोसरवाड गावचे गोविंदपंत यांचा फार स्नेह होता. गोविंदपंतांच्या अंगात हालसिद्धांचा संचार होत असे. संचारातील आज्ञेप्रमाणे ते दत्तोपंतांना घेऊन चिमडास गेले व त्यांनी नारायणमहाराजांचा अनुग्रह घेतला.

एकदा दुष्काळात कुंभोजला पाऊस पडला नाही, तेव्हा दत्तोपंत देवळात जाऊन विठोबाला म्हणाले, ''देवा, जर पाऊस पडला नाही, तर मी तुझ्यापुढे डोके आपटून प्राण देईन.'' तोच आकाशात पावसाचे मेघ आले व जोराचा पाऊस पडू लागला. या गोष्टीची साक्ष म्हणून गावच्या लोकांनी मेघराजाचे मंदिर उभारले.

दत्तोपंत सांगत असत, '''नीलं धवलं श्यामं' येथपर्यंतचे अनुभव चिमडमहाराजांनी मला दिले आहे.'' पुढे चिमडमहाराजांनी दृष्टांत देऊन त्यांना सांगितले, ''दत्तोपंत, आता 'श्यामं' च्या पुढे काय दिसणार ? सर्व काही श्यामच आहे.''

काही काळाने दत्तोपंत सांगलीमध्ये राहण्यास आले. तेथे असताना आश्विन वद्य एकादशीस, सकाळी साधनास बसण्यापूर्वी ते आपल्या पत्नीला म्हणाले, ''अगं, आज एकादशी आहे. मी स्नानासाठी नदीवर जाणार आहे.'' या वाक्याचा गूढार्थ तिला कळला नाही. ती म्हणाली, ''या तुम्ही जाऊन.'' ''ठीक आहे,'' असे म्हणून धोतराची खोळ पांघरून दत्तोपंत साधनास बसले. बराच वेळ गेला. त्यांची काहीच हालचाल दिसेना. धोतराची खोळ बाजूला करून पाहताच दिसले की, साधन करीत असतानाच दत्तोपंतांनी देहत्याग केला होता.

### १०. डॉ. विष्णुपंत गोपाळ आपटे :

इ. स. १८५९ मध्ये विष्णुपंतांचा जन्म झाला. शिक्षणासाठी ते कोल्हापुरास असताना, आल्फ्रेड शिष्यवृत्ती मिळवून ते एल. एम. अँड एस. या डॉक्टरीच्या परीक्षेत प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले. प्रथम धारवाड व हावेरी गावांत डॉक्टर म्हणून काम केल्यावर ते कोल्हापुरास सरकारी डॉक्टर झाले. ते रोग्यांची फार काळजी घेत. लोक त्यांना देव-डॉक्टर म्हणत. त्यांनी ग्रामवैद्य, प्रसूतिचिकित्सा, न्यायवैद्यक, इत्यादी पुस्तके लिहिली आहे.

विष्णुपंत प्रथमपासून सुस्वभावी असून परोपकारी होते. ते शिकत असताना एकदा असे झाले : त्यांच्या एका मित्राला पैशाची फार जरुरी उत्पन्न झाली. पण कुणीच त्याला पैसे देईना. त्याने आपली अडचण विष्णुपंतांना सांगितली. विष्णुपंतांनी आपली डिक्शनरी विकून टाकून मित्राची गरज भागविली. विष्णुपंत हुशार असून त्यांना इंग्रजी, मराठी, कानडी व हिंदी या भाषा अवगत होत्या.

विष्णुपंतांनी सहा विकार जिंकले होते. त्यांचा साधनाचा अभ्यासही पुष्कळच होता. त्यांना आपला मृत्यू कळला होता. आपण देह ठेवणार, ही गोष्ट त्यांनी अनेकांना सांगितली होती. त्यांच्या शेवटच्या दुखण्यात डॉ. तांबे त्यांना औषध देत होते. त्यांना विष्णुपंत म्हणत, "डॉक्टर, आता मी तुमच्या औषधांनी बरा होणार नाही." शेवटी शनिवार दि. २९ जुलै, १८९९ या दिवशी नामस्मरण करीत विष्णुपंतांनी महाप्रयाण केले. त्यांच्या अंत्ययात्रेला शेकडो लोक जमले होते. कोल्हापूरच्या प्रा. विजापूरकरांनी विष्णुपंतांचे चरित्र आपल्या ग्रंथमालेत छापले आहे.

## ११. तात्यासाहेबमहाराज कोटणीस :

तात्यासाहेबमहाराज कोटणीस हे चिमडमहाराजांचे पट्टशिष्य होते. त्यांनी चिमडमहाराजांच्या आज्ञेने नित्याचे हरिकीर्तन सुरू केले व त्याद्वारे परमार्थाची महती वाखाणत चिमड संप्रदायाचे नाव महाराष्ट्रात सर्वतोमुखी केले. तसेच त्यांची शिष्यपरंपराही आजतागायत चालू आहे. या कारणास्तव त्यांचे चरित्र स्वतंत्रपणाने पुढील प्रकरणात रेखाटले आहे.

●●●

### प्रकरण ९ : संदर्भसूची


१. **कैवल्यपुरुष, खंड १,** ह. पां. कोटणीस, सांगली, १९३३

२. **गोविंदपंत घोसरवाडकर चरित्र (नाथलीलामृत),** म. अ. कुलकर्णी, चिकोडी

३. **दादामहाराज केळकर यांची हस्तलिखित वही**

४. **विष्णू गोपाळ आपटे चरित्र,** विजापूरकर, ग्रंथमाला, वर्ष ६, अंक ५, कोल्हापूर

५. **हणमंतरावजी कोटणीसचरित्र,** साधुदास, सांगली, १९३७


▲▲▲

प्रकरण १०

# तात्यासाहेबमहाराज कोटणीस

तात्यासाहेबमहाराजांचे संपूर्ण नांव हणमंत पांडुरंग कोटणीस. या घराण्याचे मूळ नाव नाईक-वडेर होते. या कुळातील नरसो तिमाजी यांना मुधोळ संस्थानिकांकडे कोटणीशी (कोठीचे काम) मिळाली. तेव्हापासून हे घराणे कोटणीस नावाने ओळखले जाऊ लागले.

## ✦ जन्म, बालपण, शिक्षण व विवाह

पांडुरंग कोटणीस व रखमाबाई या जोडप्याला तेरदळ गावी ७/११/१८६४ रोजी झालेला मुलगा म्हणजे हणमंत. तोच पुढे तात्यासाहेब या नावाने प्रसिद्ध झाला. हणमंताचा जन्म होताच त्याच्या मातोश्रीला असणारी पिशाचबाधा गेली.

तात्यासाहेबांचे लहानपण मुधोळ गावी गेले. लहानपणापासून ते देवभक्त होते. त्यांच्याजवळ कृष्णाची एक मूर्ती होती; तिची ते पूजा करीत. देवांच्या उत्सवात ते सुंदर रांगोळी व चित्रे काढीत. मोठेपणी त्यांनी संप्रदायातील तीन सत्पुरुषांची काढलेली चित्रे उपलब्ध आहेत.

मराठी शाळेत ते असतानाच इ. स. १८७३ मध्ये त्यांचा व्रतबंध झाला. पुढे ते इंग्रजी शाळेत असताना त्यांनी मुधोळच्या एका शास्त्रीबुवाकडे संस्कृतचेही काही अध्ययन केले. इ. स. १८८२ मध्ये ते मॅट्रिक परीक्षा पास झाले.

शिकत असताना इ. स. १८८१ मध्ये त्यांचा विवाह झाला. व्यंकट लक्ष्मण गदगकर (सत्तीगिरीकर) यांची कन्या तुळसाबाई ही वधू होती. तिचे सासरी लक्ष्मी हे नाव ठेवण्यत आले.

## ✦ मुधोळमध्ये नोकरी

मॅट्रिक होईपर्यंत त्यांना मुधोळ संस्थानातून मासिक शिष्यवृत्ती मिळत होती. त्यामुळे मॅट्रिक होताच पिढीजात नोकरीवर हजर होण्याचा त्यांना मुधोळ सरकारचा हुकूम झाला. त्यामुळे त्यांना कॉलेज शिक्षण घेता आले नाही.

या नोकरीत पगार कमी व कुटुंबात माणसे फार. अन्य कुणी मिळवते नव्हते व घराण्यावर कर्जही होते. त्यामुळे तात्यासाहेबांची प्रपंचात ओढाताण होई. पण त्यांनी नोकरीतून वरकड पैसा मात्र मिळविला नाही.

## ✦ चिमडमहाराजांचा अनुग्रह

या नोकरीत असताना त्यांनी वकिलीचा अभ्यास सुरू केला. त्यासाठी त्यांना

बाबासाहेब मुजुमदार यांची मदत झाली. बाबासाहेब मुधोळात न्यायाधीश होते. बाबासाहेबांच्या सहवासात असतानाच, इ. स. १८८६ च्या उत्तरार्धात बाबासाहेबांच्या वृत्तीत पडलेला फरक तात्यासाहेबांना जाणवला. त्याचे कारण बाबासाहेबांना झालेला चिमडमहाराजांचा अनुग्रह हे होते, असे तात्यासाहेबांना कळले. तेव्हा त्यांनाही गुरूपदेश घेण्याची इच्छा झाली. पुढे एकदा चिमडमहाराज बाबासाहेबांच्या घरी आले असता, बाबासाहेबांनी तात्यासाहेबांची इच्छा महाराजांच्या कानी घातली. चिमडमहाराजांनी इ. स. १८८६, मार्गशीर्ष वद्य ५, गुरुवार रोजी तात्यासाहेबांना अनुग्रह दिला. ही गोष्ट हळूहळू तात्यासाहेबांच्या वामनराव या चुलत्यांना कळली. त्यांना ते प्रथम पसंत पडले नाही. पण पुढे चिमडमहाराजांचा अधिकार कळल्यावर वामनराव स्वत:च चिमडमहाराजांचे अनुगृहीत झाले आणि काही दिवसांत कोटणीस कुटुंबातील अन्य मंडळीही चिमडमहाराजांची अनुगृहीत झाली.

### ✦ दुपारची वाण पडणार नाही

एकदा चिमडमहाराज तात्यासाहेबांच्या घरी भोजनास आले होते. भोजनोत्तर तात्यासाहेबांनी त्या महिन्याचा सर्व पगार महाराजांना गुरुदक्षिणा म्हणून दिला. तो घेण्यास महाराज तयार नव्हते. पण तात्यासाहेबांचा आग्रह पाहून ते कसेबसे तयार झाले. तरी त्यातील दोन रुपये तात्यासाहेबांना देऊन ते म्हणाले, "साधुमहाराजांचा हा प्रसाद जतन करून ठेव. यापुढे तुला दुपारची वाण कधीही पडणार नाही." महाराजांचा आशीर्वाद खरा झाला.

### ✦ बिनपगारी रजा व वकिलीस प्रारंभ

काही विघ्नसंतोषी माणसांच्या सांगण्यावरून मुधोळ संस्थानिकांनी चिमड सांप्रदायिक नोकरांना काढून टाकले आणि तात्यासाहेबांची बदली कुमठे गावी केली. पुढे त्यांना परत बोलावून त्यांची पदावनती केली. तेव्हा १ मे, १८८९ पासून तात्यासाहेबांनी एक वर्षाची बिनपगारी रजा घेतली. त्यानंतर ते सांगलीच्या स्टेट प्लीडर परीक्षेस बसले. पास झाल्यावर सनद काढून त्यांनी सांगलीस वकिली सुरू केली. यावेळी बाबासाहेब मुजुमदारही सांगलीत येऊन वकिली करीत होते. प्रारंभी तात्यासाहेबांना त्यांचे साहाय्य झाले.

### ✦ कीर्तनाची सुरुवात

इ. स. १८९० च्या रथोत्सवास तात्यासाहेब चिमडला गेले होते. त्यावेळी चिमडमहाराजांच्या आज्ञेने त्यांनी या उत्सवात कीर्तन केले. तात्यासाहेबांना बोलताना

अडखळण्याची थोडी खोड होती. ती चिमडमहाराजांच्या कृपेने या कीर्तनापासून नाहीशी झाली. कीर्तन संपल्यावर, ''हणमंता, तुझी कीर्तने रसाळ होतील,'' असा चिमडमहाराजांनी आशीर्वाद दिला आणि तो खरा झाला.

### ✦ निंबरगीची पहिली यात्रा

इ. स. १८९२ सालीच्या चिमडातील रथोत्सवानंतर, तात्यासाहेब लक्ष्मीबाई अक्कांबरोबर निंबरगीकरमहाराजांच्या समाधीच्या दर्शनास निंबरगीला गेले. महाराजांच्या समाधीजवळ जाताच सर्वांना अपूर्व सुगंध जाणवला. ''हा सुगंध कसला ?'' तात्यासाहेबांनी अक्कांना प्रश्न केला. अक्का उत्तरल्या, ''अरे हणमंता, निंबरगीकरमहाराज तुला भेटण्यास आले आहेत. त्यांच्या आगमनाची खूण म्हणजे हा सुगंध आहे.''

### ✦ बेळगावातील वकिली

सांगलीत वकिली चालू असतानाच तात्यासाहेबांनी डिस्ट्रिक्ट प्लीडरची परीक्षा दिली. तीत उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी खालसातील वकिली करण्याचे ठरविले व ते बेळगावास गेले. चांगले वक्तृत्व, दाव्याची व्यवस्थित मांडणी, साक्षीदारांची व्यवस्थित तपासणी व कायद्याचे ज्ञान या वकिलीला आवश्यक गोष्टी त्यांच्याजवळ असल्याने ते बेळगावात एक प्रसिध्द वकील झाले.

### ✦ निंबरगीची दुसरी यात्रा

तात्यासाहेब इ. स. १८९३ मध्ये चिमडमहाराजांच्या आराधनेला चिमडला आले. त्यानंतर कन्या कल्लव्वा, जावई दाजीसाहेब व लक्ष्मीबाई अक्का यांच्यासह तात्यासाहेब निंबरगीस गेले. तेथे कल्लव्वा व दाजीसाहेब समाधीची पूजा करीत असताना समाधीवरील चांदीच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. ही गोष्ट तात्यासाहेबांनी अक्कांना सांगितली. त्या म्हणाल्या, ''हणमंता, निंबरगीकरमहाराजांचे तुझ्यावर प्रेमच तसे आहे. तू आणि थोडा वेळ पुढे उभा राहिला असतास, तर डोळ्यांतून दुधाच्या धारा वाहू लागल्या असत्या.''

### ✦ नागोदरामुळे चिमडला गमन

तात्यासाहेबांची वकिली बेळगावात चांगली चालू होती. त्यांनी चिमडमहाराजांच्या दाजीसाहेब व नारायणराव या दोन पुत्रांना आपणाजवळ शिक्षणासाठी ठेवून घेतले. काही दिवसांनी त्यांची प्रकृती बिघडली. सांगलीचे राजवैद्य आबासाहेब सांबारे यांनी उदराचे निदान केले आणि ते असाध्य आहे, असेही म्हटले. हे

कळताच, सद्गुरुसान्निध्यात चिमडास देह ठेवायचा निश्चय करून इ. स. १८९५ मध्ये तात्यासाहेब चिमडास निघाले. बैलगाडीने चिमडास जात असताना वाटेत असे घडले : गाड्या पुढे जात होत्या. वाटेत उतरून कढत पाण्याबरोबर औषध घेऊन तात्यासाहेब व त्यांचे हितचिंतक नानबा फडणीस गाड्या गाठण्यास निघाले. सहज त्यांची नजर बाजूस गेली. तो रस्त्याकडेचा झाडाचा एक सोट आपल्यामागे येत आहे, असे त्यांना दिसले. दोघेही घाबरले व झटपट गाड्यांपर्यंत गेले. मठात पोचताच अक्का म्हणाल्या, ''हणमंता, घाबरू नको. झाडाच्या रूपाने वाटेत भेटलेले गंडांतर दूर झाले. साधुमहाराज तुझे बरे करतील.''

## ✦ नागोदरातून सुटका

तात्यासाहेबांना बरे करण्याचे लक्ष्मीबाई अक्कांनी मान्य केले. तेव्हा त्यांनी तात्यासाहेबांना बजावले, ''एकवीस दिवसपर्यंत कोणत्याही कारणाने मठ सोडून कोठेही जावयाचे नाही. शौचास जाताना एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच जावयाचे. हे झाले नाही, तर माझ्याकडे काही नाही.'' तात्यासाहेबांनी तसे केले. या काळात लक्ष्मीबाई अक्का ह्या निंबरगीकरमहाराज, साधुमहाराज व चिमडमहाराज यांच्या चरित्रलीला तात्यासाहेबांना सांगत. त्यांची टिपणे तात्यासाहेबांनी काढली. ती पुढे कैवल्यपुरुष, खंड १ या ग्रंथरूपाने प्रकाशित झाली.

एकविसावा दिवस उजाडला. तात्यासाहेबांना जरा हुशारी वाटली. म्हणून ते संध्याकाळी शौचाच्या वेळी नेहमीच्या मर्यादेपलीकडे गेले. तोच त्यांना कुणीतरी मानेला धरून ढकलून दिले. ते पुढे जाऊन पडले. नानबा फडणीस धावत आले. थोड्या वेळाने दोघेही मठाकडे परतले. आल्या आल्या अक्का म्हणाल्या, ''हणमंता, इतक्या लांब कशाला गेला होतास ? देसायाच्या विहिरीजवळ तुला काळाने गाठले असते, तर कठीण झाले असते.'' दुसरे दिवशी शौचावाटे तात्यासाहेबांच्या पोटातला सर्प बाहेर पडला. तो अनेकांनी पाहिला. अक्का बोलल्या, ''हणमंता, तुझे दुखणे सरले. साधुमहाराजांनी तुझ्यावर कृपा केली.'' तात्यासाहेब मग स्वगृही गेले.

## ✦ तेरदळ गावी स्थलांतर

पूर्ववत तात्यासाहेबांची बेळगावातील वकिली सुरू झाली. इ. स. १८९७ सालात तात्यासाहेबांच्या पत्नीची प्रकृती फार बिघडली. ती बेळगावच्या हवेत सुधारण्याचे लक्षण दिसेना. तेव्हा त्यांनी तेरदळास स्थलांतर केले आणि तेथे असतानाच इ. स. १८९८ सालापासून तात्यासाहेबांनी प्रथम दर सोमवार व गुरुवार आणि एकादशी

या दिवशीं कीर्तन करण्यास प्रारंभ केला आणि मग त्यांनी हळूहळू रोजचे कीर्तन सुरू केले. त्यांची रसभरित कीर्तने तेरदळ गावात फारच लोकप्रिय झाली.

### ✦ सांगलीत स्थलांतर

तेरदळात असताना तात्यासाहेबांच्या पत्नीने रघुनाथ नावाच्या मुलाला जन्म दिला. पण त्याच्या जन्मानंतर आईची प्रकृती अत्यंत बिघडली. ती तपासून आबासाहेब सांबारे वैद्यांनी सांगलीस येऊन आपल्या देखरेखीखाली औषध घेण्याची सूचना दिली. त्याप्रमाणे इ. स. १९०० सालच्या प्रारंभी तात्यासाहेब सांगलीस राहण्यास आले आणि मग निर्याणापर्यंत ते या गावीच राहिले. त्यांच्या वास्तव्याने सांगली गाव पुण्यक्षेत्र झाले.

### ✦ जलोदरातून वाचविले

तात्यासाहेब सांगलीत आल्यानंतर काही दिवसांनी प्लेगची साथ आली. तेव्हा तात्यासाहेब जवळच्या कवलापूर गावी राहण्यास गेले. तेथे त्यांची कीर्तने अतिशय लोकप्रिय झाली. काहीजण त्यांच्याकडे अनुग्रह मागू लागले. तेव्हा चिमडहून परवानगी आणून ते अनुग्रह देऊ लागले.

तात्यासाहेब सांगलीत सहस्रबुद्धे यांच्या घरी बिऱ्हाडाने असताना असे घडले : तात्यासाहेबांच्या तेरदळच्या मामांचा मुलगा रंगाप्पा जलोदराने आजारी होऊन औषधोपचारास सांगलीस आला. त्याची व्याधी असाध्य आहे, असे आबासाहेब सांबारे यांनी सांगितले. तेव्हा तात्यासाहेबांनी त्याला रोज ५०० रामनाम लिहिण्यास सांगितले. दोनतीन महिन्यांत तो बरा होऊन गेला.

### ✦ पिशाचबाधा गेली

सांगलीत काही दिवस तात्यासाहेब, पडसलगीकर यांच्या वाड्यात रहात होते. घरमालकांना पिशाचबाधा होती. ते तात्यासाहेबमहाराजांच्या कीर्तनांत बुक्का लावण्याची सेवा करू लागले. तेव्हा त्यांची पिशाचबाधा गेली. पण ती मग त्यांच्या पत्नीला होऊ लागली. त्या तात्यासाहेबांचे कीर्तन श्रवण करू लागल्या. तेव्हा त्यांचीही पिशाचबाधा दूर झाली.

या घरात तात्यासाहेबांचे कीर्तन चालू असताना एक कुत्रा घराच्या अंगणात कीर्तन संपेपर्यंत बसून राही. मग कीर्तन संपल्यावर तो तात्यासाहेबांना एक प्रदक्षिणा घालून निघून जात असे.

### ✦ पादुकाप्राप्ती व नित्यक्रम

चिमडमहाराजांचा अनुग्रह झाल्यापासून तात्यासाहेबांचा साधनाभ्यास चालू

होता व त्यांच्या सामर्थ्याचे दाखले येत होते. अशातच इ. स. १९०६ साली चिमडमहाराजांच्या पत्नी माईसाहेब यांनी तात्यासाहेबांना प्रसाद म्हणून चिमडमहाराजांच्या चर्मी पादुका दिल्या. त्यानंतर त्यांच्या दैनिक कार्यक्रमात थोडा बदल झाला व तो अखेरपर्यंत पुढीलप्रमाणे राहिला : पहाटे ४॥ वाजता ते काकडारती करीत; पुढे स्नानसंध्येनंतर पादुकांचे पूजन करीत; नंतर दासबोध वाचीत; सकाळी ७-१० वकिलीचे काम पाहात; त्यानंतर भोजन करून सायंकाळी पाचपर्यंत कोर्टात असत; परत आल्यावर पत्रव्यवहार पाहून ५॥ च्या सुमारास तासभर पोथी सांगत; सातच्या सुमारास धूपारती करून भोजन करीत; नंतर पंचपदी व काही वाचन करीत; रात्री ९-११ कीर्तन करीत; त्यानंतर शेजारती होइतो १२ वाजत; यानंतर ते चारपर्यंत साधन करीत. अर्धा तास झोप झाली की ४॥ वाजता उठत. शनिवारी मात्र कोर्ट सकाळी असल्याने ते दुपारी दोन तास झोप घेत व ''आठवड्याची झोपेची बेगमी झाली,'' असे म्हणत.

त्यांची साधनसिद्धता केव्हाच झाली होती. म्हणून 'तात्यासाहेब जीवन्मुक्त आहेत; त्यांची कृपा मिळवा,' असा दृष्टांत अ. वि. खासनीस या जत येथील न्यायाधीशांना झाला होता. तसेच सांगलीच्या वि. गं. खाडिलकरांच्या मातोश्रींना निरंजनस्वामींचा दृष्टांत झाला, 'तुम्ही हणमंतराव कोटणीसांचा अनुग्रह घ्या. म्हणजे माझी भक्ती केल्याचे सार्थक होईल.'

### ✦ तात्यासाहेबांचे औदार्य

सांगलीतील वकिलीत त्यांना खूप प्राप्ती होई. त्यातील बहुतेक द्रव्य ते परोपकारात वेचत. त्यांच्या घरी अनेक आश्रित मंडळी, वारकरी मुले, येणारे-जाणारे पाहुणे असत. त्या सर्वांची जेवणाखाणाची सोय ते करीत. वाचकाला ते उदारहस्ते मदत करीत. आपल्या स्नेही मंडळींना आर्थिक मदत करीत. चिमडच्या गुरुस्थानात धर्मशाळेचे बांधकाम, नवीन रथ, पाण्याचा पंप, इत्यादीसाठी त्यांनी खूपच खर्च केला. ढवळीकर नावाच्या एका विद्यार्थ्यावर त्यांची कृपा झाली. तो असिस्टंट कलेक्टर होऊन निवृत्त झाला.

एकदा ह. भ. प. रा. कृ. कामत तात्यासाहेबांच्याकडे आले होते. ते म्हणतात, ''श्रीएकनाथमहाराजांचेच घरी मी आहे की काय, असे मला वाटले. श्रीएकनाथांसारखे मुक्तद्वार घर, नाथांसारखी यांची शांती व समदृष्टी आणि त्यांच्यासारखेच यांचे निर्गुण ज्ञानयुक्त सगुण प्रेम पाहून यांचे दर्शन झाल्याबद्दल मला मोठी धन्यता वाटली.''

### ✦ विहिरीला पाणी लागले

इ. स. १९०७ मध्ये तात्यासाहेब पेठ भागातील भगवानसिंग सोबनसी यांच्या प्रशस्त वाड्यात राहू लागले. ते निर्याणापर्यंत तेथेच राहिले. हा वाडा आजही कोटणीसवाडा म्हणून ओळखला जातो. या वाड्यात पिशाचबाधा होती. तात्यासाहेबांच्या आगमनाने ती दूर झाली. तसेच या वाड्यात विहिरीला पणी लागण्याची शक्यता जवळजवळ नव्हतीच. पण तात्यासाहेबांनी दाखविलेल्या जागेवर खोदकाम सुरू झाल्यावर विहिरीला मुबलक पाणी लागले.

### ✦ काडसिद्धांचे दर्शन झाले

एकदा तात्यासाहेब सन १९१० मध्ये सहकुटुंब सिद्धगिरीला काडसिद्धांच्या दर्शनास गेले. त्यावेळी त्यांना काडसिद्धांचे साक्षात दर्शन झाले. ते वर्णन करणारा त्यांचा एक अभंग उपलब्ध आहे.

### ✦ क्षय बरा झाला

उकिडवे नावाचे एक गृहस्थ तात्यासाहेबांचे परिचित होते. त्यांच्या मुलाला क्षयरोग लागला. त्यांनी तात्यासाहेबांना उपाय विचारला. "पूजेच्या वेळी हजर राहून तीर्थ घेण्यास मुलाला सांगा," तात्यासाहेब म्हणाले. तसे केल्यावर काही दिवसांनी तो मुलगा बरा झाला.

### ✦ कृष्णा नदीचा पूर ओसरला

सांगली गाव कृष्णा नदीच्या तीरावर वसलेले आहे. या नदीला इ. स. १९१४ साली महापूर आला. पाणी तात्यासाहेबांच्या वाड्यात शिरले. तेव्हा काही भक्त म्हणाले, "तात्यासाहेब, कृष्णाबाईला मागे फिरण्याची प्रार्थना करा." ते मान्य करून तात्यासाहेबांनी अंगणातील पाण्यात उभे राहून कृष्णेला हात जोडले. त्यांचा पादस्पर्श होताच पाणी ओसरू लागले.

### ✦ मुसलमानाच्या घरी कीर्तन

सांगलीजवळील डिग्रज गावात तात्यासाहेबांची कीर्तने होत. ती ऐकून तेथील हुसेन तांबोळी या मुसलमानाची वृत्ती पालटली व तो रामविजय वाचू लागला. पारायण समाप्तीच्या दिवशी तात्यासाहेबांनी आपल्या घरी कीर्तन करावे, अशी विनंती त्याने पत्राद्वारे केली. ती तात्यासाहेबांनी मान्य केली. या कीर्तनात त्यांनी मुसलमानी धर्मातील ईश्वरविषयक संकल्पना स्पष्ट करून सांगितली.

### ✦ कीर्तन हेच औषध

सांगलीत येणाऱ्या प्लेगमुळे तात्यासाहेबांना तात्पुरते स्थलांतर करावे लागे. इ. स. १९१७ मध्ये अशा एका प्रसंगी ते मिरजेत होते. रामनवमीचा उत्सव होता. पण त्यांना ताप आला होता. पण कीर्तन चुकवायचे नाही म्हणून ते तसेच कीर्तनास उभे राहिले. कीर्तन सुरू झाल्यावर थोड्याच वेळात त्यांचा ताप उतरला. ''कीर्तन हेच आमचे औषध,'' असे ते म्हणत असत. एका प्रसंगी पायाला विंचू चावला असतानाही त्यांनी कीर्तन सुरू केले. काही वेळाने विंचू उतरला.

### ✦ कीर्तनात गणेशदर्शन

एकदा कुरुंदवाडकर अण्णासाहेब पटवर्धन यांनी आपल्या गणेशोत्सवात तात्यासाहेबांना कीर्तन करण्याचे आमंत्रण दिले. कीर्तन चालू झाले आणि अण्णासाहेबांना सर्वत्र गणपतीचे दर्शन होऊ लागले. कीर्तन संपताच ते तात्यासाहेबांना शरण आले. त्यांनी तात्यासाहेबांच्याकडून अनुग्रह घेतला.

### ✦ जखम बरी झाली

हर्डीकर आडनावाच्या एक बाई तात्यासाहेबांच्या अनुगृहीत होत्या. त्यांच्या मुलाच्या पायाला बूट लागून जखम झाली. ती काही केल्या बरी होईना. तेव्हा हा मुलगा तात्यासाहेबांचा तीर्थप्रसाद घेऊ लागला आणि आठ दिवसांत त्याची जखम बरी झाली.

### ✦ विषप्रयोगातून सुटका

जुलै २१, १९२१ रोजी तात्यासाहेबांना अतोनात ताप येऊन ते बेशुद्ध झाले. सात दिवस ते तसेच गुंगीत होते. आठव्या दिवशी पहाटे दृष्टांत होऊन त्यांना बरे वाटू लागले. बरे झाल्यावर ते म्हणाले, ''कुणीतरी माझ्यावर विषप्रयोग केला होता. पण सद्गुरूंच्या कृपेने मी त्यातून बचावलो.''

### ✦ निंबरगीची तिसरी यात्रा

चिमडचे नारायणमहाराज इ. स. १९२२ मध्ये निंबरगीस जाण्यास निघाले. त्यांच्या इच्छेला मान देऊन, आपली प्रकृती बरी नसतानाही तात्यासाहेब या यात्रेला निघाले. तेथे निंबरगीकरमहाराजांच्या समाधीची महापूजा करून त्यांनी महाप्रसाद केला. निंबरगीकरमहाराजांच्या कुटुंबातील सर्व लहानथोरांना यथायोग्य आहेर दिला. या यात्रेसमयी जागोजागी त्यांची कीर्तने झाली. खूप माणसे जमत असत. या यात्रेत

त्यांची अशी सहा माणसे होती. पण बऱ्याच इतर लोकांचा खर्चही तात्यासाहेबांनी आत्मीयतेने केला. या यात्रेसाठी त्यांनी जवळजवळ ६,००० रुपये खर्च केले.

### ✦ रेवणसिद्धांचे दर्शन

तात्यासाहेबांना अधूनमधून प्रकृतीचा त्रास होतच असे. इ. स. १९२३ पासून मात्र त्यांची तब्येत हळूहळू खालावत चाललेली दिसत होती. तथापि तिकडे लक्ष न देता त्यांचे पारमार्थिक कार्यक्रम चालूच असत. त्यामुळे यावर्षीही ते साधुमहाराजांच्या आराधनेस चिमडला गेले. संध्याकाळी निघालेल्या पालखीपुढे ते 'देव बंदा' हे पद म्हणत होते. त्यावेळी त्यांना समोरच्या धर्मशाळेतील सज्जावर उभ्या असलेल्या रेवणसिद्धांचे दर्शन झाले.

### ✦ व्यासपीठावर बसू कीर्तन

तात्यासाहेबांची प्रकृती खालावली असतानाच त्यांच्या पायाला एकदा कुत्रे चावले. त्यांना बराच त्रास होऊन ही जखम एकदाची बरी झाली. पण पावसाळा लागताच पुन्हा प्रकृती बिघडली. अशक्तपणा वाढला. हातापायांस सूज आली. त्यामुळे त्यांना उभे राहून कीर्तन करणे अशक्य झाले. तेव्हापासून त्यांनी एका व्यासपीठावर बसून कीर्तन करण्यास प्रारंभ केला.

### ✦ निर्वाणाचा निश्चय

या दुखण्यात त्यांनी औषध घेतलेच नाही; जेवण सोडले व ते चहावर राहू लागले. अंगावर थंडीचा काटा येत असल्याने, ते शेकण्यास शेगडी पुढे घेऊन बसू लागले. ''आता आपण लवकरच देह ठेवणार,'' अशा आशयाचे उद्गार त्यांच्या तोंडून बाहेर येऊ लागले.

### ✦ कीर्तन प्रकृतीला तारक

तात्यासाहेबांच्या घरच्या काही मंडळींना वाटू लागले की, रोजच्या कीर्तनाच्या श्रमामुळे तात्यासाहेबांची प्रकृती सुधारत नाही. तेव्हा त्यांनी, कीर्तन बंद ठेवण्याचा फार आग्रह केला. पण तो तात्यासाहेबांनी मुळीच मानला नाही. तेव्हा कीर्तन बंद करण्यास डॉक्टरी सल्ला मिळवावा म्हणून तसे डॉ. ठकारांना अगोदर सुचवून ठेवण्यात आले. त्यांनी तात्यासाहेबांची प्रकृती तपासली व आपला अभिप्राय दिला, ''कीर्तन हे तात्यासाहेबांच्या प्रकृतीला तारक आहे.''

### ✦ चिमडास प्रयाण

आता देह ठेवण्याचे तात्यासाहेबांनी ठरविले होते. पण त्यासाठी स्थान मात्र

अद्याप ठरले नव्हते. प्रथम चिमडास गुरुस्थानी जाऊन पाहावे असे त्यांना वाटले. तेव्हा ''आपण महाप्रयाणासाठी चिमडास जात आहोत,'' असे त्यांनी सांगितले व त्याप्रमाणे ते निघाले. सांगली स्टेशनवर त्यांना निरोप देण्यास अनेक लोक गोळा झाले होते. मिरजेहून निघून ते शेडबाळ स्टेशनवर उतरले व तेथून भाड्याच्या मोटारीने चिमडास पोचले.

### ✦ गंडांतर टळले

तात्यासाहेब चिमड मठात असताना इ. स. १९२३ चा डिसेंबर २३ हा दिवस आला. रात्री दोनची वेळ झाली. तात्यासाहेब शेगडीजवळ शेकत बसले होते. अचानक त्यांना झीट आली व ते कलंडून पडले. त्यांना दोन आचके आले व शरीर स्तब्ध झाले. जवळच नानबा फडणीस होते. त्यांनी शेगडी बाजूला केली व इतर मंडळींना हाका मारल्या. नारायणमहाराज व माईसाहेब दोघेही आले. माईसाहेबांनी हेमगर्भाची मात्रा दिली. असेच दोन तास गेले. शेवटी माईसाहेबांच्या कृपादृष्टीचा प्रभाव पडून तात्यासाहेब शुद्धीवर आले.

### ✦ सद्गुरूंचा दृष्टांत

अशा स्थितीत आणि काही दिवस गेले. १९२४ साल उजाडले. एके दिवशी तात्यासाहेबांना चिमडमहाराजांचा दृष्टांत झाला, ''हणमंता, झाडाखाली झाड वाढत नाही. तू सांगलीस जाऊन निर्याण कर.'' लगेच त्यांनी सांगलीस जाण्याचे ठरविले व ते १५ जानेवारी, १९२४ रोजी चिमडहून निघाले.

### ✦ निर्याण

तात्यासाहेब सांगलीत पोचले. चिमडात असताना थोडीफार सुधारलेली त्यांची प्रकृती आता झपाट्याने ढासळत चालली. त्यांची उदराची व्याधी आता विकोपास गेली होती. पण शरीराकडे त्यांचे लक्षच नसे; ते नेहमी आत्मानुसंधानात मग्न असत. २७ जानेवारी ही तात्यासाहेबांच्या वडिलांची श्राद्धतिथी होती. याच दिवशी तात्यासाहेबांनी निर्याण करण्याचे ठरविले होते. या दिवशी त्यांनी आपल्या वडिलांचे श्राद्ध केले व थोडासा श्राद्धप्रसाद सेवन करून ते बिछान्यावर पडले. पण त्यांची प्रकृती बिघडतच चालली. वैद्य आबासाहेब सांबारे येऊन औषध देऊन गेले. तात्यासाहेबांनी ते औषध घेतले. संध्याकाळचे पाच वाजले. ''महाराज आले आहेत, आरती करा,'' असे बोलून तात्यासाहेबांनी निर्याण केले.

### ✦ अंत्यसंस्कार

तात्यासाहेबांच्या दर्शनास शेकडो माणसे आली. 'राजाधिराज सद्गुरुनाथ महाराज की जय' या गजरात अंत्ययात्रा निघाली. पुढे भजनी मंडळी भजन करीत होती. वाटेत तात्यासाहेबांच्या पार्थिव शरीरावर गुलाल व फुले यांचा वर्षाव होत होता. दीक्षितांच्या

नदीवरील मळीत तात्यासाहेबांचा अंत्यसंस्कार झाला. यावेळी रावसाहेब सदाशिव धोंडो ऊर्फ बाबूराव गोखले यांनी श्रद्धांजली वाहिली.

## ✦ निर्याणोत्तर

तात्यासाहेबांचे ज्येष्ठ चिरंजीव रघुनाथराव ऊर्फ बाबूरावजी यांनी तात्पुरती चल स्वरूपाची समाधी करून, तिची स्थापना आपल्या राहत्या घरी केली. पुढे काही वर्षांनी त्यांनी कैवल्यधाम बांधून तेथे स्थिर स्वरूपाची समाधी केली. इकडे गंगाधरराव दीक्षित या तात्यासाहेबांच्या भक्तांनी तात्यासाहेबांच्या दहनस्थानावर एक मंदिर बांधून व त्यात तात्यासाहेबांच्या पादुका ठेवून त्यांची समाधी केली. हे स्थान 'हनुमान समाधिमंदिर' म्हणून ओळखले जाते. नंतर या दोन्ही ठिकाणी संप्रदायाच्या परंपरेप्रमाणे आराधना, इत्यादी कार्यक्रम होऊ लागले व तात्यासाहेबांची कीर्ती सर्वत्र दुमदुमू लागली.

## ✦ केळकरमहाराजांना दर्शन

निर्वाणानंतर तात्यासाहेबांनी नानबा फडणीस, इत्यादी भक्तांना दर्शन दिले. तात्यासाहेबांच्या निर्वाणानंतरच्या माघ महिन्यात मामामहाराज केळकर हे तात्यासाहेबांचे भक्त रात्री आपल्या घरी समर्थांचा दासबोध वाचीत होते. बाराच्या सुमारास तेथे तात्यासाहेब प्रगटले. मामामहाराजांनी त्यांना बसण्यास शाल दिली. दासबोधाचे पठण ऐकत तात्यासाहेब बसले. वाचन झाल्यावर मामामहाराजांनी तात्यासाहेबमहाराजांना म्हटले, ''माझे नित्यकीर्तन व्हावे, अशी इच्छा आहे.'' तात्यासाहेबांनी त्यांच्या मस्तकावर हात ठेवले व नेत्रसंकेताने कीर्तन करण्याची आज्ञा दिली. आज्ञेप्रमाणे पुढे मामामहाराज केळकरांनी ३८ वर्षे अखंड हरिकीर्तन केले.

●●●

प्रकरण १० : संदर्भसूची

१. **कैवल्यपुरुष, खंड १**, ह. पां. कोटणीस, सांगली, १९३३

२. **तात्यासाहेबमहाराज कोटणीस**, दासराम, पुणे, १९८३

३. **दादामहाराज केळकर यांची हस्तलिखित वही.**

४. **हणमंतरावजी कोटणीसचरित्र**, साधुदास, सांगली, १९३७.

५. **हनुमद्गुरुचरित्रबोधसार**, गो. अ. केळकर, सांगली, १९३७.

▲▲▲

प्रकरण ११

# तात्यासाहेबमहाराज कोटणीसांचे वंशज आणि काही शिष्य/भक्त

चिमड येथील मठात वास करणाऱ्या महायोगिनी लक्ष्मीबाई अक्का यांच्या कृपाप्रसादाने तात्यासाहेब कोटणीसमहाराजांच्या सौ. लक्ष्मी या पत्नीला पुत्रसंतती होऊ लागली. त्यांना आठ पुत्र झाले. पण त्यांतील चारच जगले. ते म्हणजे रघुनाथ, गोविंद, लक्ष्मण आणि रंगनाथ. तथापि या मुलांमधून रघुनाथ ऊर्फ बाबूरावजी हेच फक्त आपल्या पश्चात आपली परंपरा चालवतील, असे तात्यासाहेबमहाराज म्हणत असत. पुढे तसेच झाले. गोविंदराव हे एम. बी. बी. एस. होऊन सांगलीतच वैद्यक करू लागले. लक्ष्मणराव हे बी. ए. झाल्यावर परगावी गेले. मॅट्रिक झाल्यावर रंगरावांनी रंगकामाचे शिक्षण घेतले व ते बंगळूर येथे एका रंगाच्या कारखान्यात नोकरीवर गेले. इकडे वडिलांच्या इच्छेप्रमाणे रघुनाथराव मात्र सांगलीतच राहिले व त्यांनी तात्यासाहेबमहाराजांची उपासना-परंपरा पुढे चालू ठेवली.

## १. बाबूरावजीमहाराज कोटणीस

रघुनाथराव हे तात्यासाहेबमहाराजांचे ज्येष्ठ चिरंजीव. ३१ डिसेंबर, १८९९ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे नाव रघुनाथ असे ठेवण्यात आले. पण घरी त्यांना बाबू म्हणू लागल्याने, पुढे ते बाबूरावजी या नावाने ओळखले जाऊ लागले. नंतर मुले त्यांना दादा म्हणू लागली. तेव्हा ते दादासाहेब या नावानेही ओळखले जाऊ लागले. प्राय: बाबूराव/बाबूरावजी या नावानेच त्यांचा उल्लेख केला गेलेला आढळतो.

### ✦ बालपण, शिक्षण, विवाह

चिमड मठातील मातोश्री माईसाहेब यरगट्टीकर यांच्या सूचनेप्रमाणे बाबूरावजींचा व्रतबंध इ. स. १९०८ मध्ये चिमड मठात करण्यात आला. त्यांचे जरुरीपुरते शिक्षण सांगली आणि पुणे या दोन ठिकाणी झाले. गुरुवार दि. २० जुलै, १९१६ रोजी त्यांना तात्यासाहेबमहाराजांच्या अनुग्रहाचा लाभ झाला. पुढे ते आपल्या पितृदेवांच्या देखरेखीखालीच वकिलीचा अभ्यास करू लागले. त्यांचा वकिलीचा अभ्यास चालू असतानाच त्यांच्या विवाहाचा योग आला. इ. स. १९२० मध्ये त्यांचा विवाह अथणी गावातील अ. श्री. दातार यांच्या सुभद्रा नामक कन्येबरोबर झाला. तिचे सासरी जानकी असे नाव ठेवण्यात आले. त्यांना पुढे लोक जानकीवहिनी म्हणू लागले. त्या बाबूरावजींच्या परमार्थाला अनुकूल अशा होत्या.

विवाहानंतर कुरुंदवाड गावी वकिलीची सनद काढून बाबूरावजी तेथे वकिली करू लागले. त्यांची परमार्थातील आवड लक्षात घेऊन, तात्यासाहेबमहाराजांनी बाबूरावजींना चांदीच्या पादुका प्रसाद म्हणून दिल्या.

### ✦ 'कैवल्यवैभवा'चे प्रकाशन

आपल्या चिमड संप्रदायाची पंचपदी पुस्तकरूपाने छापण्याचा विचार बाबूरावजीमहाराजांच्या मनात आला. तो तात्यासाहेबमहाराजांना कळल्यावर त्यांनी सूचना केली, 'त्या पंचपदीच्या जोडीने साधुसंतांची काही वेचक पद्ये पुस्तकात असावीत.' पदांची निवड तात्यासाहेबमहाराजांनी केली. त्यानंतर इ. स. १९२१ च्या जुलै महिन्यात हे पुस्तक 'कैवल्यवैभव' नावाने प्रकाशित झाले.

### ✦ चर्मी पादुका प्राप्त झाल्या

इ. स. १९२४ च्या जानेवारी महिन्यात तात्यासाहेबमहाराजांचे निर्याण झाले. ज्या खोलीत त्यांचे निर्याण झाले, त्या खोलीतील तात्यासाहेबांच्या स्पर्शाने पुनीत झालेल्या अनेक वस्तू प्रसाद म्हणून लोकांकडून घेतल्या जाऊ लागल्या. त्यांमध्ये तात्यासाहेबांच्या पायांतील चर्मी जोडेही गेले. पण ते उपासनेसाठी बाबूरावजींना हवे होते. ते परत मिळावेत म्हणून बाबूरावजींनी अन्नपाणी सोडून प्रायोपवेशन सुरू केले. अदृश्य झालेल्या चर्मी पादुका लवकरच जागच्या जागी आलेल्या बाबूरावजींना आढळल्या. त्यांना आनंद झाला.

### ✦ परंपरा चालू ठेवली

तात्यासाहेबमहाराजांच्या निर्याणानंतर तेराव्या दिवसापासून कीर्तन सुरू करून बाबूरावजीमहाराजांनी आपल्या वडिलांच्या इच्छेप्रमाणे त्यांची उपासना-परंपरा पुढे चालू ठेवली.

### ✦ तात्यासाहेबमहाराजांची चल समाधी

तात्यासाहेबमहाराजांच्या निर्याणानंतर बाबूरावजींनी आपल्या राहत्या घरीच तात्यासाहेबांची चल स्वरूपाची समाधी केली आणि सांप्रदायिक परंपरेप्रमाणे आराधना, उत्सव सुरू केले. तसेच ज्या व्यासपीठावर बसून तात्यासाहेबमहाराज कीर्तन करीत, त्यावर तात्यासाहेबमहाराजांच्या उपास्य पादुका ठेवून त्यांच्या पूजेचे तीर्थ तात्यासाहेबांच्या पादुकांवर पडेल, अशी व्यवस्था करून तात्यासाहेबांची एक इच्छा पूर्ण केली.

### ✦ 'स्फूर्तिदशक'

बाबूरावजीमहाराजांची दैनिक उपासना चालूच होती. अशात त्यांना स्फूर्ती

झाली की, आपण रामदासस्वामींच्या दासबोधाची एक प्रत स्वहस्ते लिहून काढावी. त्याप्रमाणे त्यांनी ती लिहून काढली. यानंतर त्यांना काही पारमार्थिक अनुभव आले. हा सर्व भाग वर्णन करणारे 'स्फूर्तिदशक' त्यांना स्फुरले.

### ✦ निंबरगीकरमहाराजांची सेवा

निंबरगी गावी निंबरगीकरमहाराजांचे स्मारक म्हणून एक वृंदावन होते. त्या वृंदावनावर सांबाची पिंडी बसवून गु. रा. द. रानडे यांनी एक देऊळ बांधले होते. हे वृंदावन हलवून त्या जागी बाबूरावजींनी निंबरगीकरमहाराजांची सुंदर समाधी बांधवून घेतली.

### ✦ तुमचे बरोबर आहे

तात्यासाहेबमहाराजांचे एक भक्त श्रीमामामहाराज केळकर हे तात्यासाहेबांच्या साक्षात्कारातील आज्ञेप्रमाणे नित्य हरिकीर्तन करीत होते. त्यांचे चिरंजीव रामराय ऊर्फ दादामहाराज केळकर. त्यांना वयाच्या चौदाव्या दिवशी तात्यासाहेब महाराजांनी दृष्टिद्वारा अनुग्रह केला होता. रामानंदमहाराजांच्या सूचनेप्रमाणे दादामहाराजांनी वयाच्या नवव्या वर्षी 'रामदासबोध' नावाचा लघुग्रंथ रचला. त्यात साधनाचे वर्णन आहे. त्यावेळी श्रीदादामहाराजांनी वडिलांना विचारले, "मी जे साधनास बसतो, ते बरोबर आहे ना ?" त्यावेळी श्रीमामांनी श्रीदादांना बाबूरावजी कोटणीस यांच्याकडे पाठविले. तेव्हा श्रीदादामहाराज जे साधन करतात, ते बरोबर आहे, असा निर्वाळा श्रीबाबूरावजींनी दिला. तेव्हा श्रीबाबूरावजीमहाराजांकडे दादामहाराजांचे जाणेयेणे सुरू झाले. बाबूरावजींच्या प्रथम पत्नी सौ. जानकीवहिनी यांना दादामहाराजांबद्दल फारच आपुलकी वाटे. त्या त्यांना आपला मुलगा असेच मानीत. इतकेच नव्हे, तर दादामहाराजांच्या विवाहात आम्हीच देवक ठेवणार, असेही म्हणत.

### ✦ पुस्तक–प्रकाशने

विद्यमान असताना तात्यासाहेबमहाराजांनी काही पुस्तके प्रकाशित करण्याची योजना आखली होती. या पुस्तकांना 'कैवल्यमाला' असे नाव देण्यात आले होते. या मालेतील पहिले पुस्तक 'कैवल्यवैभव' हे तात्यासाहेब विद्यमान असतानाच प्रकाशित झाले होते. तात्यासाहेबमहाराजांच्या निर्याणानंतर या मालेतील पुढील पुस्तके प्रकाशित करण्याचे काम बाबूरावजीमहाराजांनी सुरू केले व पुढील पुस्तके प्रकाशित केली :- १) कैवल्यकुसुम (वामनकाका कोटणीस व तात्यासाहेबमहाराज यांचा पद्यात्मक पत्रव्यवहार), १९२४; २) कैवल्यबोध (निंबरगीकरमहाराजांचा उपदेश), १९२५;

३) कैवल्यमार्ग (चिमड संप्रदायाची पंचपदी व नित्योपयोगी भजने), १९२५; ४) कैवल्यवैभव, दुसरी आवृत्ती, १९२६; ५) कैवल्यपुरुष, खंड १ (चिमड संप्रदायातील सत्पुरुषांची चरित्रे), १९३३; ६) कैवल्यपुरुष, खंड २ (हणमंतरावजी कोटणीस यांचे चरित्र), १९३७.

### ✦ कैवल्यधामाची स्थापना

तात्यासाहेबमहाराजांच्या निर्याणानंतर काही वर्षांनी घरमालक सोबनसी यांनी बाबूरावांना आपले बिऱ्हाड सोडून जाण्यास सांगितले. तेव्हा बाबूरावजींनी उपासनेसाठी नवीन वास्तू उभारण्याचे ठरविले. या कामास बाबूरावजींच्या प्रथम पत्नीने आपल्या अंगावरचे १५-१६ हजार रुपयांचे दागिने पतीच्या स्वाधीन केले. पुढे इ. स. १९३९ साली सांगलीच्या राधाकृष्ण वसाहतीमध्ये 'कैवल्यधाम' ही वास्तू उभी राहिली. तेथे निंबरगीकरमहाराज, चिमडमहाराज व तात्यासाहेबमहाराज या त्रिमूर्तींची स्थापना करण्यात आली. येथेच तात्यासाहेबांच्या सर्व वस्तू आणि ग्रंथ जपून ठेवलेले आहेत. तसेच येथे बाबूरावमहाराजांनी अनेक संतांच्या चित्रांचा संग्रहही केला आहे.

### ✦ मनाच्या श्लोकाचे अभंग

रामदासस्वामींचे मनाचे श्लोक फारच चांगले आहेत. त्यांचा उपयोग कीर्तनासाठी करणे सोयीचे व्हावे म्हणून बाबूरावजींनी त्यांचे अभंगात्मक रूपांतर केले आणि ते अभंग 'कैवल्यमनोबोधिनी' या ग्रंथात इ. स. १९४१ मध्ये प्रकाशित केले.

### ✦ द्विवतीय विवाह

बाबूरावमहाराजांच्या प्रथम पत्नी सौ. जानकीवहिनी यांना इ. स. १९४२ मध्ये देवाज्ञा झाली. त्यांना काही मूलबाळ नव्हते. यानंतर इतरांच्या आग्रहास्तव काही काळाने बाबूरावजींनी मिरज गावच्या म. के. कुलकर्णी याच्या मैना नामक कन्येशी द्वितीय विवाह केला. या संबंधातून बाबूरावजीमहाराजांना मुलेबाळे झाली.

### ✦ कैवल्यधामात भर

इ. स. १९४५ मध्ये बाबूरावजींनी आपल्या कैवल्यधामात दत्तपादुका आणि औंदुबर वृक्ष यांची स्थापना केली. तसेच १९४८ मध्ये त्यांनी तात्यासाहेबमहाराजांची पंचरसी धातूंची मूर्ती व पादुका यांची स्थापना केली.

### ✦ रौप्यमहोत्सव

इ. स. १९४९ साल उजाडले. या वर्षी बाबूरावमहाराजांच्या उपासनाक्रमाला २५ वर्षे पूर्ण होत होती. म्हणून रौप्यमहोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी त्यांनी

७ दिवसांचे संतसंमेलन भरविले. पैठणचे भैय्यासाहेब, चौंडेमहाराज, धुंडामहाराज, सोनोपंत दांडेकर, गुंडामहाराज, इत्यादी अनेक संत जमले होते. यावेळी भैय्यासाहेबांच्या हस्तें तात्यासाहेबमहाराजांच्या संपूर्ण पुतळ्याचे अनावरण झाले.

रौप्यमहोत्सवानंतर तीनच वर्षांत बाबूरावजींनी कैवल्यपुरुष, खंड १, भाग २, (तात्यासाहेबमहाराजलिखित निंबरगीकरमहाराजांचे ओवीबद्ध चरित्र) हे पुस्तक प्रकाशित केले. त्यानंतर इ. स. १९५४ मध्ये कैवल्यमार्ग, दुसरी आवृत्ती आणि १९५७ मध्ये कैवल्यविधि (साधुसंतांचा पदसंग्रह) हे ग्रंथही प्रसिद्ध केले.

### ✦ षष्ट्यब्दपूर्ती

इ. स. १९५८ मध्ये बाबूरावमहाराजांना साठावे वर्ष लागत होते. त्यानिमित्ताने त्यांच्या भक्तांनी षष्ट्यब्दपूर्ती समारंभ साजरा केला. बाबूरावजींचे लेखन ग्रथित असणारा 'कैवल्यप्रसाद' नावाचा ग्रंथ त्यांच्या अल्पवयी मुलांनी प्रकाशित केला.

### ✦ आणखी कार्य

इ. स. १९६२ मध्ये बाबूरावजींनी निंबरगीमध्ये निंबरगीकरमहाराजांच्या मूळ समाधिस्थानाचे भूमिपूजन कर्नाटकचे त्यावेळचे मुख्यमंत्री मा. जत्तीसाहेब यांचे हस्तें व कोनशिला राज्यपाल मा. सुकथनकरसाहेब यांच्या हस्तें करवून घेतले. इ. स. १९६७ मध्ये त्यांनी तात्यासाहेबमहाराजांची जन्मशताब्दी साजरी केली आणि १९६८ मध्ये 'कैवल्यकुंज' (निंबरगीकरमहाराजांचा मराठी अर्थासह कानडी पदसंग्रह) हा ग्रंथ प्रकाशित केला.

### ✦ अमृतमहोत्सव

इ. स. १९७० मध्ये बाबूरावमहाराजांना ७१ वे वर्ष लागत होते. त्यानिमित्त त्यांच्या चाहत्यांनी त्यांचा अमृतमहोत्सव साजरा केला. याप्रसंगी बाबूरावजींची पाच कीर्तने झाली व दासरामलिखित तात्यासाहेबमहाराजांचे चरित्र असणारा 'कैवल्यसंकीर्तन' हा ग्रंथ त्यांच्या मुलांनी प्रकाशित केला.

### ✦ निर्वाण

अमृतमहोत्सवानंतर हळूहळू बाबूरावजींची प्रकृती खालावत चालली. वैद्यकीय उपचार चालू झाले. यासमयी त्यांना तात्यासाहेबमहाराजांच्या अभंगांचा गाथा प्रसिद्ध करावयाचा होता. पण ते काम त्यांच्या हातून होऊ शकले नाही. प्रकृती खालावतच चालली. बाबूरावजींचे बंधू डॉ. कोटणीस, पुतणे डॉ. माधवराव कोटणीस, पत्नी सौ. जानकीवहिनी, चिरंजीव गुरुनाथ व श्रीकांत, शिष्य जनार्दन आणि पुजारी गोपाळराव

कुलकर्णी हे सगळे बाबूरावजींची देखभाल व सेवा करीत होते. श्रीमंत माधवराव पटवर्धन यांचाही येथे उल्लेख करावयास हवा. अशातच इ. स. १९७३ चा भाद्रपद महिना आला. बाबूरावजींना आपल्या प्रकृतीचा भरवसा वाटेनासा झाला. भाद्रपद शुद्ध ५, शनिवारी रात्री बाबूरावमहाराजांनी आपले चिरंजीव गुरुनाथमहाराज यांच्याकडे आपली परंपरा सुपूर्त केली. नंतर माधवराव कोटणीस यांनी 'बा रे पांडुरंगा, केव्हा भेट देसी' हे पद म्हटले. बाबूरावजींनी स्वतः वै. मामासाहेब दांडेकरांना आवडणारे 'विठ्ठल रखुमाई' हे भजन हाताची टाळी वाजवून म्हटले. रात्र सरली. उजाडता षष्ठी, वार रविवार होता. या दिवशी बाबूरावमहाराजांचे निर्याण झाले.

### ✦ निर्याणानंतर

बाबूरावजी विद्यमान असताना त्यांच्या सुनेने त्यांच्याकडे अनुग्रह मागितला होता. बाबूरावजींनी अनुग्रह देईन, असे म्हटले होते. पण ते तसेच राहून गेले होते. तेव्हा सुनेला चुटपूट लागली. पुढे आठ-नऊ महिन्यांनी बाबूरावजी तिच्या स्वप्नात आले व त्यांनी तिला अनुग्रह दिला.

### ✦ बाबूरावमहाराजांचे वंशज

बाबूरावांना द्वितीय पत्नीपासून हणमंत ऊर्फ श्रीकांत, पांडुरंग ऊर्फ गुरुनाथ व लीला अशी तीन अपत्ये झाली. बाबूरावजींनी आपली परंपरा पुढे चालविण्याचे कार्य गुरुनाथमहाराजांच्याकडे सोपविले. गुरुनाथ हे डॉक्टर असून वैद्यक करतात. ते कीर्तन-प्रवचन करतात. आपल्या पूज्य पिताजींची परंपरा त्यांनी व्यवस्थितपणे चालविली आहे.

### ✦ तात्यासाहेब कोटणीसमहाराजांचे भक्त

चिमडमहाराजांच्या आज्ञेने तात्यासाहेबमहाराजांनी नित्यकीर्तन केले आणि मुमुक्षूंना मार्गदर्शन केले. त्यांना कीर्तनात साथ करणाऱ्या मंडळींत पुढील नावे दिसतात : अप्पाराव फडणीस, वामन व्यंकटेश आपटे, रंगनाथ व लक्ष्मण कोटणीस, भाऊ फाटक, श्रीमंत विनायकराव किबे, श्रीमंत श्रीपतराव गोळे, बळवंतराव दीक्षित, नानबा फडणीस, पुंडलीकराव कोटणीस, गोपाळराव मुजुमदार, बापूरावजी केळकर, अंताजीपंत केळकर, इत्यादी. त्यांच्या भक्तमंडळींत मध्यमवर्गी, सेवकवर्ग, भाविक स्त्रिया, प्रेमळ कामकरी शेतकरी व सुखवस्तू पांढरपेशे यांचा मुख्य भरणा होता. त्यांच्या चरित्रात आलेली त्यांतील काही नावे अशी : शंभूराव इनामदार, महादेवराव दाणेकरी, नारायणराव जोग, गंगाधरपंत दीक्षित, न्यायाधीश अ. वि. खासनीस, गोविंदराव पडसलगीकर, वेणुबाई सावर्डेकर, अक्कूताई देशपांडे, श्रीमंत भाऊसाहेब व्याकुडकर,

जानकीबाई खाडिलकर, चिंतामणराव अत्रे, कुरुंदवाड संस्थानाधिपती अण्णासाहेब, इत्यादी. त्यांतील काहींच्या हकीकती मनोरंजक असल्याने त्या पुढे दिल्या आहेत.

### २. गोविंदराव पडसलगीकर :

तात्यासाहेबमहाराजांचे बिऱ्हाड सांगलीत काही दिवस गोविंदराव पडसलगीकरांच्या वाड्यात होते. गोविंदरावांना पिशाचबाधा होती. तात्यासाहेबमहाराजांच्या कीर्तनात ते बुक्का लावण्याची सेवा करू लागले. तेव्हा त्यांची बाधा गेली. पुढे तात्यासाहेबमहाराजांचे बिऱ्हाड सोबनसींच्या वाड्यात गेले. तात्यासाहेब बहुतेक रोज सकाळी मंडईत जात. ते पडसलगीकरांच्या वाड्यावरून जात व गोविंदरावांना हाका मारीत. लगेच गोविंदराव तात्यासाहेबांच्या दर्शनास बाहेर येत. एकदा अशीच तात्यासाहेबांची हाक कानी येताच ते भान न राहून आंघोळ करता करता तसेच बाहेर दर्शनास आले.

### ३. पाटील, खरकटवाडी :

खरकटवाडीचे पाटील हे तात्यासाहेबमहाराजांचे अनुगृहीत होते. आपल्या वयाच्या ८५ व्या वर्षी ते सांगलीस तात्यासाहेबमहाराजांच्या पुण्यतिथीच्या उत्सवास आले होते. ते एखाद्या तरुणाप्रमाणे दिसत होते. कुणीतरी विचारले, ''तुमची प्रकृती इतकी चांगली कशी ?'' ते उत्तरले, ''तात्यासाहेबमहाराजांचा अनुग्रह घेतल्यापासून मी रोज ८ तास साधन करतो त्यामुळे आत्तापर्यंत मला कसलेच दुखणे झाले नाही.''

### ४. हणमंत व्यंकटेश मुकदवी :

हणमंतराव मुकदवी हे तात्यासाहेबमहाराजांच्या सावत्र बहिणीचे चिरंजीव. ते इ. स. १९०० पासून तात्यासाहेबांच्या निकट सान्निध्यात होते. तात्यासाहेब बेळगावी असताना ते लक्ष्मीबाई अक्कांसह निंबरगीला गेले होते. मुकदवीही गेले होते. त्यावेळी निंबरगीकरमहाराजांच्या राहत्या घरी तात्यासाहेबांचे कीर्तन झाले. निंबरगीकरमहाराजांचे चिरंजीव भीमाण्णामहाराज यांनी महाराजांचा चांदीचा मुखवटा ठेवला होता. तात्यासाहेबमहाराजांचे कीर्तन सुरू झाल्यावर महाराजांच्या चांदीच्या मुखवट्याचे दोन्ही डोळ्यांतून अत्यंत तेजस्वी प्रकाश मुकदवींना दिसू लागला. तो कीर्तन संपेपर्यंत दिसत होता. कीर्तनोत्तर तात्यासाहेबमहाराजांनी त्यांना विचारले, ''महाराजांच्या डोळ्यांतील तेज तुला दिसले ना ?'' मुकदवी, ''होय'' म्हणाले. तात्यासाहेबमहाराजांनी त्यांचे कौतुक केले.

**५. लक्ष्मीबाई चितळे :**

लक्ष्मीबाई तात्यासाहेबमहाराजांच्या अनुगृहीत होत्या. तात्यासाहेबमहाराजांनी त्यांना आपली कन्या मानले होते. त्यांचा चांगली काव्यस्फूर्ती होती. तात्यासाहेबमहाराजांच्या आज्ञेने त्यांनी ''कैवल्यगुंजारव'' नावाचा आपल्या पदांचा संग्रह प्रकाशित केला.

**६. श्रीमंत भाऊसाहेब व्याकुडकर :**

श्रीमंत भाऊसाहेब व्याकुडकर इ. स. १९२० च्या सुमारास अतिशय आजारी पडले. औषधाने गुण येईना. ''भाऊसाहेब, तुम्ही आता मरणार,'' असे त्यांना काही ज्योतिष्यांनी सांगितले. एके रात्री तात्यासाहेबमहाराज आपल्याजवळ येऊन बसले आहेत, असा त्यांना भास झाला. ''भाऊसाहेब, काळजी करू नका. तुम्ही बरे व्हाल,'' तात्यासाहेबमहाराजांनी आश्वासन दिले. त्याप्रमाणे पुढे ते चांगले बरे झाले.

**७. साळुंके, खरकटवाडी :**

खरकटवाडीचे साळुंके हे शेतकरी. शेतकाम झाल्यावर नित्यनेमाने तात्यासाहेबमहाराजांच्या कीर्तनास येत. इ. स. १९०४ ते १९२४ पर्यंत त्यांचा हा नेम चालू होता. तात्यासाहेबांच्या निर्याणानंतर ते दरवर्षी तात्यासाहेबमहाराजांच्या पुण्यतिथि-उत्सवास सांगलीस येत असत.

**८. विठ्ठलराव लोटलीकर :**

विठ्ठलराव लोटलीकर हे ऑपरेशनसाठी मिशन हॉस्पिटलात होते. ते झोपले असताना, तात्यासाहेबमहाराज खोलीचे दार उघडून आत आले, असे त्यांना दिसले. त्यांनी लोटलीकरांना जागे करून ज्ञानेश्वरी वाचून दाखविण्यास सांगितले व आपल्या खाकेतून ज्ञानेश्वरी काढून दिली. तेव्हा लोटलीकरांनी ज्ञानेश्वरी वाचण्यास सुरुवात केली. ''यापुढे तू नेहमी ज्ञानेश्वरी वाचत जा,'' असे सांगून तात्यासाहेबमहाराज अदृश्य झाले. तेव्हापासून लोटलीकर ज्ञानेश्वरी वाचू लागले.

**९. तात्या पाटील :**

तात्या पाटील हे कवलापूर गावचे राहणारे. एके वर्षी तात्यासाहेबमहाराज नेहमीप्रमाणे चिमडला साधुमहाराजांच्या रथोत्सवास निघाले. यावेळी तात्या पाटलांची पत्नी प्लेगने आजारी होती. तरीसुद्धा ते तसेच चिमडला गेले. ते परत येईपर्यंत त्यांची बायको बरी झाली होती.

### १०. जानकीबाई खाडिलकर :

जानकीबाई खाडिलकर यांनी तात्यासाहेबमहाराजांचा अनुग्रह घेतला. अनुग्रहाच्या दुसऱ्याच दिवशी त्यांना तात्यासाहेबमहाराज स्वप्नात दिसले. "तुम्ही दासबोध वाचीत जा," तात्यासाहेबमहाराजांनी त्यांना सांगितले. त्याप्रमाणे जानकीबाईंनी नियमाने दासबोध पठण सुरू केले.

### ११. श्रीगंगाधररावसिंग :

श्रीगंगाधररावसिंग दीक्षित यांची सांगलीच्या गावभागात नदीकाठी जी मळी आहे, तीमध्ये तात्यासाहेबमहाराजांच्या पार्थिव देहाला अग्निसंस्कार झाला होता. त्यांनी तात्यासाहेबमहाराजांच्या त्या दहनस्थानावर एक मंदिर उभारले व त्यात तात्यासाहेबांच्या पादुका ठेवून त्यांना समाधीचे स्वरूप दिले. हे मंदिर 'हनुमान समाधिमंदिर' म्हणून ओळखले जाते. तेथे श्रीगंगाधररावांनी संप्रदायाच्या परंपरेप्रमाणे आराधना, इत्यादी कार्यक्रम चालू केले. ते दरवर्षी पौष मासात तात्यासाहेबमहाराजांच्या पुण्यतिथीचा उत्सव साजरा करतात. उत्सवात पूर्वी रोज मामामहाराज केळकरांचे कीर्तन होत असे. आता तीच कीर्तनाची परंपरा दादामहाराज केळकरांनी चालविली आहे.

### १२. आकूताई देशपांडे :

आकूताईंना तात्यासाहेबमहाराजांचा अनुग्रह होता. १९२२ साली त्या क्षयरोगाने आजारी होत्या. एके दिवशी त्यांच्या स्वप्नात जाऊन तात्यासाहेबमहाराजांनी त्यांना सांगितले, "तुम्ही गुरुचरित्राची ५३ पारायणे केल्यास तुम्हाला बरे वाटेल." त्याप्रमाणे त्यांनी पारायणे सुरू केली व त्यांची प्रकृती सुधारत गेली. आकूताई तात्यासाहेबांच्या कीर्तनास जात असत. तात्यासाहेबांच्या निर्याणानंतर त्या मामामहाराजांच्या नित्य-कीर्तनास जाऊ लागल्या. मामामहाराजांच्या निर्याणानंतर त्या दादामहाराजांच्या कीर्तनास जात असत. त्यांचा नामाचा अभ्यास दांडगा होता. त्यांनी शके १८९८ मध्ये देह ठेवला. रक्षाविसर्जनानंतर त्या जागी 'श्रीराम' ही अक्षरे उमटली होती.

### १३. श्रीनानबा फडणीस :

तात्यासाहेबमहाराज सांगलीत राहू लागल्यावर त्यांचा भाऊसाहेब फडणीस यांच्याशी परिचय झाला. भाऊसाहेबांच्या नानबा या चिरंजीवावर तात्यासाहेबमहाराजांचा लोभ जडला व त्यांना त्यांनी आपल्या घरी कायमचे ठेवून घेतले.

नागोदराने आजारी झाल्यावर तात्यासाहेबमहाराज चिमडास गुरुस्थानी देह ठेवण्यास गेले त्यावेळी नानबा त्यांच्याबरोबर होते. त्यावेळी त्यांनी केलेली तात्यासाहेबमहाराजांची सेवा पाहून लक्ष्मीबाई अक्का नानबांबद्दल तात्यासाहेबांना म्हणाल्या, ''हणमंता, हा तुझा सात जन्मांचा भाऊ तुझ्या उपयोगी पडला.'' पुढे तात्यासाहेबांनी तेरदळात असताना कीर्तनास प्रारंभ केला. त्यावेळी नानबा त्यांचे साथीदार होते. शेवटच्या आजारात तात्यासाहेबमहाराज देह ठेवण्याच्या इराद्याने चिमडास गेले. एके रात्री २ वाजता तात्यासाहेब शेगडीपुढे शेकत असताना त्यांना झीट आली. त्यावेळी नानबांनी शेगडी बाजूला घेऊन इतरांना हाका मारल्या. आपल्या निर्याणाच्या दिवशी दुपारी २ वाजता तात्यासाहेबमहाराजांनी, ''मी आज जाणार,'' असे नानबांना सांगितले. त्या दिवशी आबासाहेब वैद्यांना बोलावण्यास नानबाच गेले होते. तात्यासाहेबांच्या निर्याणानंतर नानबांना फार वाईट वाटले. एके रात्री तात्यासाहेबमहाराज कीर्तनकाराच्या वेषात त्यांच्यापुढे उभे राहिले व त्यांनी आपल्या अंगावरचे उपरणे नानबांच्या खांद्यावर टाकले. नानबांनी तात्यासाहेबमहाराजांची बहुतेक कीर्तने ऐकली असल्याने त्यांचे पाठांतर पुष्कळ वाढले होते. त्यांना तात्यासाहेब 'जिवंत रेकॉर्ड' म्हणत. पुढे वेळप्रसंगी नानबा स्वत: कीर्तनही करीत.

### १४. कृष्णाबाई सोनार :

कृष्णाबाई सोनार नावाची एक स्त्री परगावहून मिरजेस राहण्यास आली. तेथे तिला तात्यासाहेबमहाराजांचा लौकिक कळला. तेव्हा त्यांचा अनुग्रह मिळावा म्हणून कृष्णाबाईंनी प्रायोपवेशन सुरू केले. पाच दिवसांनी स्वप्नात येऊन सांगलीत येण्यास त्यांना तात्यासाहेबांनी सांगितले. त्याप्रमाणे त्या सांगलीस आल्या व त्यांनी तात्यासाहेबांचा अनुग्रह घेतला. पुढे इ. स. १९२३ मध्ये तात्यासाहेबांनी केलेल्या निंबरगीच्या यात्रेत कृष्णाबाई होत्या. यात्रा संपल्यावर, ''मी आता कायम चिमडास राहणार आहे,'' असे बरोबरच्या मंडळींना सांगून त्या चिमडास गेल्या. तेथे गेल्यावर एक-दोन दिवसांत दुखण्याचे निमित्त होऊन त्यांनी साधुमहाराजांच्यासमोर देह ठेवला. पुढे चिमडमहाराजांच्या नावाचा जो वृक्ष आहे त्याच्यासमोर एक कट्टा बांधून कृष्णाबाईंचे स्मारक केले गेले.

### १५. अ. वि. खासनीस :

अ. वि. खासनीस हे बी. ए., एल. एल. बी. असून न्यायाधीश होते. प्रथमपासून त्यांचा देवधर्माकडे ओढा होता. काही दिवस त्यांनी दत्ताची उपासना केली. तसेच त्यांनी वे. शा. सं. दिवाकर गुरुजी यांच्याकडून गायत्रीपुरश्चरण व स्मार्ताग्निग्रहण केले होते.

''तात्यासाहेबमहाराज हे जीवन्मुक्त आहेत. त्यांची कृपा संपादन करावी,'' असा दृष्टांत खासनीसांना झाला. तेव्हा त्यांनी तात्यासाहेबमहाराजांचा अनुग्रह घेतला. कुरुंदवाड येथे न्यायाधीश असताना त्यांनी ज्ञानेश्वरी संस्कृतमध्ये श्लोकबद्ध करण्यास सुरुवात केली. त्या कामास तात्यासाहेबांनी त्यांना आशीर्वाद दिला. त्याप्रमाणे त्यांनी हे काम जत गावात न्यायाधीश असताना पूर्ण केले. तात्यासाहेबमहाराजांच्या निर्याणानंतर खासनीस त्यांच्या आराधनेस येत असत.

**१६. साधुदास :**

साधुदासांचे मूळ नाव गोपाळराव मुजुमदार. संस्कृत व मराठी भाषेवर यांचे चांगलेच प्रभुत्व होते. त्यांनी मराठीत काही कादंबऱ्या, काव्य व अन्य काही लिखाण केले आहे. ते बुद्धिबळ खेळण्यात तरबेज होते. ते शीघ्रकवी होते. काही काळ ते सांगली हायस्कूलमध्ये शिक्षक होते.

इ. स. १९१८ नंतर तात्यासाहेबमहाराज रामनवमीचे कीर्तन साधुदासांच्या राहत्या घरी करू लागले. तात्यासाहेबांच्या कृपेने साधुदासांच्या अत्यवस्थ स्थितीतील मुलाला बरे वाटले होते. देह ठेवण्याच्या इराद्याने तात्यासाहेबमहाराज चिमडास गेले. त्यांना भेटण्यास साधुदास गेले. तेव्हा, ''मी सांगलीत येऊन देह ठेवणार'' असे तात्यासाहेबमहाराजांनी साधुदासांना आश्वासन दिले. प्लेगच्या काळात तात्यासाहेबमहाराज साधुदासांच्या मळ्यात जाऊन राहिले असता, त्यांचे साधन कसे रात्रभर चाले ते साधुदासांनी पाहिले होते. तात्यासाहेबमहाराजांच्या कीर्तनांच्या साथीदार मंडळीत साधुदास होते. ते रागदारीची पदे म्हणत. साधुदासांना दोन तपे तात्यासाहेबमहाराजांचे सान्निध्य लाभले होते. त्यामुळेच तात्यासाहेबांचे चरित्र लिहिण्याचे काम बाबूरावजी कोटणीसांनी त्यांच्याकडे सोपविले व ते त्यांनी पार पाडले.

**१७. प्रा. रघुनाथ नारायण आपटे :**

प्रा. रघुनाथ नारायण आपटे हे एक एम. ए., एल. एल. बी. असून कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये प्राध्यापक होते. त्यांना तात्यासाहेबमहाराजांची कीर्तनं फार आवडत. म्हणून ते अधूनमधून सांगलीस कीर्तन ऐकण्यासाठी येत. परमार्थात कोणत्या पायऱ्या व टप्पे आहेत हे कीर्तनांत विशद करण्यास तात्यासाहेबमहाराजांनी उपनिषदांपासून ते रामदास-तुकारामापर्यंत जी वचने गोळा केली होती, ती त्यांनी प्रा. आपटे यांना दाखविली होती. देह ठेवण्यासाठी तात्यासाहेबमहाराज चिमडास गेले होते. नंतर त्यांचे गंडांतर माईसाहेब यरगट्टीकर यांच्या कृपेने टळले. त्यानंतर त्यांची प्रकृती थोडी सुधारली. त्यावेळी त्यांना भेटण्यास प्रा. आपटे चिमडला गेले होते.

तात्यासाहेबमहाराजांच्या निंबरगीच्या शेवटच्या यात्रेत प्रा. रघुनाथराव आपटे सहभागी झाले होते. निंबरगीत असताना एके दिवशी पहाटे काकडारतीसाठी तात्यासाहेबमहाराज निंबरगीकरमहाराजांच्या समाधीकडे चालले असता, घाटावर पायरी चुकून खाली पडले आणि त्यांच्या कपाळास दुखापात झाली. त्यावेळी प्रा. आपटे त्यांच्याजवळ होते. त्यांनी ताबडतोब आपले नेसते धोतर फाडून तात्यासाहेबमहाराजांची जखम बांधली.

### १८. श्रीमंत अण्णासाहेब कुरुंदवाडकर :

कुरुंदवाड संस्थानचे अधिपती अण्णासाहेब हे भाविक असून ते गजाननाचे एकनिष्ठ भक्त होते. ते दरवर्षी गणेशोत्सव साजरा करीत. इ. स. १९१९ च्या गणेशोत्सवात त्यांनी तात्यासाहेबमहाराजांना कीर्तन करण्यास आग्रहपूर्वक निमंत्रण केले. एके दिवशी रात्री तात्यासाहेबमहाराजांचे कीर्तन चालू असताना श्रीमंत अण्णासाहेबांना सर्वत्र गणपतीचे दर्शन झाले. दुसरे दिवशी ते तात्यासाहेबमहाराजांकडे येऊन अनुग्रह मागू लागले. तात्यासाहेबांनी त्यांना अनुग्रह दिला. तात्यासाहेबमहाराजांच्या कृपाप्रसादाने आपले ऐहिक व पारमार्थिक कल्याण झाले, अशी श्रीमंत अण्णासाहेबांची दृढ भावना होती.

### १९. मामामहाराज व दादामहाराज केळकर :

तात्यासाहेबमहाराजांच्या भक्तांमध्ये मामामहाराज केळकर व तात्यासाहेबमहाराजांच्या शिष्यांमध्ये दादामहाराज केळकर हे दोघे पितापुत्र आपल्या निष्ठेने, साधनाभ्यासाने व तात्यासाहेबमहाराजांच्या कृपाप्रसादाने सर्वश्रेष्ठ झाले. त्या दोघांचीही माहिती पुढे स्वतंत्रपणे दिली आहे.

●●●

## प्रकरण ११ : संदर्भसूची

१. **कैवल्यप्रसाद**, ह. र. कोटणीस व पां. र. कोटणीस, सांगली, १९५९.

२. **कैवल्यसंकीर्तन**, ह. र. कोटणीस व पां. र. कोटणीस, सांगली १९७०

३. **दादामहाराज केळकर यांची हस्तलिखित वही.**

४. **हणमंतरावजी कोटणीस यांचे चरित्र**, साधुदास, सांगली, १९३७.

▲▲▲




श्रीदादामहाराज कोटणीस



सौ. जानकीबाई कोटणीस



श्रीमामामहाराज केळकर



सौ. इंदिराबाई केळकर



श्रीदासराममहाराज केळकर



सौ. सीतावहिनी केळकर



श्रीनिंबरगीकरमहाराज - समाधी



श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज - समाधी



श्रीरामचंद्रराव यरगट्टीकरमहाराज - समाधी



श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज - समाधी



श्रीहनुमान - समाधिमंदिर



श्रीमामामहाराज केळकर - सिंहासन

प्रकरण १२

# मामामहाराज केळकर व त्यांचे काही भक्त

*''अखंड ध्यान श्रीरामाचे। अखंड पूजन श्रीरामाचे।*
*अखंड कीर्तन श्रीरामाचे। हेचि गोविंद चरित्र ॥''*

- गोविंदचरितमानस

वरील ओवीत मामामहाराजांच्या चरित्राचे सारसर्वस्व आलेले आहे. मामामहाराजांचे संपूर्ण नाव गोविंद अनंत केळकर. त्यांना घरी बापू म्हटले जाई. म्हणून त्यांचे सहाध्यायी मित्र वगैरे त्यांना बापूराव म्हणू लागले. पुढे त्यांचे भाचे त्यांना मामा म्हणू लागले; तसेच चिरंजीवही मामा म्हणू लागले. त्यामुळे मामा या घरगुती नावानेच ते ओळखले जात. त्यांची भक्तमंडळी त्यांना मामामहाराज म्हणू लागली.

## ✦ भक्तीचे मूळ कुळ

मामामहाराजांचे केळकर हे कुळ कोकणातील आचरे या गावचे. त्याच गावातील रामेश्वर-सोमेश्वर हे कुलदैवत. नवली बांदेश्वरी ही कुलदेवता. हे घराणे पुढे सांगलीत स्थायिक झाले. मामामहाराजांचे पिताजी अनंत गंगाधर ऊर्फ नाना हे शिवभक्त होते. ते रोज पार्थिव लिंगपूजा करीत आणि ॐ नमःशिवाय या मंत्राचा जप करीत. ते मृत्युशय्येवर असतानाही त्यांच्या हातात जपाची माळ फिरत होती. नानांच्या पत्नी सौ. राधाबाई याही शिवभक्त होत्या. नाना हे कोटणीसमहाराजांच्या कीर्तनांस जात व तेथे साथही करीत. अशा भक्तीने भारावलेल्या कुळामध्ये मामामहाराजांचा जन्म झाला.

## ✦ जनन आणि बालपण

मामामहाराजांच्या पिताजींनी शहापूर (बेळगाव) जवळ एक शेत घेतले होते. शेताच्या कामासाठी ते शहापूरला जात. असेच एकदा ते सपत्नीक गेले होते. तेथेच एका गोस्थानात मामामहाराजांचा जन्म झाला. शके १८१० (इ. स. १८८८), फाल्गुन शुद्ध दशमी हा मामांचा जन्मदिन. गोस्थानात जन्म झाल्याने त्यांचे 'गोविंद' असे नाव ठेवण्यात आले. घरातील भक्तीचे संस्कार लहान गोविंदावर झाले. त्यामुळे लहानपणापासूनच भजन, स्तोत्रपठण, देवपूजा, देवाची पालखी अशा गोष्टींमध्ये मामामहाराज रमून जाऊ लागले. असे दिसते की, मामामहाराजांचा पूर्वजन्मापासून ज्ञानेश्वरमहाराजांशी काहीतरी संबंध होता. त्यामुळे 'ज्ञानेश्वर माऊली' असे भजन करण्यात ते तासन्‌तास रंगून जात.

## ✦ शिक्षण

वयाच्या सातव्या वर्षी मामामहाराजांचा व्रतबंध झाला आणि त्यांचे शिक्षण सुरू झाले. चिमडमहाराजांचे चिरंजीव उद्धवराव हे काही काळ मामांचे सहाध्यायी होते. प्राथमिक शिक्षणानंतर मामामहाराजांचे शिक्षण इंग्रजी सात इयत्तांपर्यंत म्हणजे मॅट्रिकपर्यत झाले. तसेच ड्रॉईंगची तिसरी परीक्षाही ते उत्तीर्ण झाले.

शिक्षणाच्या काळात मामामहाराजांनी व्यायामाने शरीर कमावण्याकडेही लक्ष दिले. भल्या पहाटे उठून कृष्णा नदीत स्नान करून, पाण्यात उभे राहून त्यांनी गायत्रीमंत्राचा जप केला. पुढे ते जोरबैठका काढत. एका वेळी बाराशे सूर्यनमस्कार घालण्याइतकी त्यांची तयारी झाली होती. पुढे काही अनुष्ठाने करताना गोमूत्रातील भाकरी व कडुलिंबाचा रस असा रूक्ष आहारही त्यांनी घेतला.

## ✦ गोंदवलेकरमहाराजांचे दर्शन

मामामहाराजांचे वडील नाना यांची गोंदवलेकरमहाराजांच्यावर फार निष्ठा होती. एकदा गोंदवलेकरमहाराज आपल्या प्रवासात बुधगाव स्टेशनवरून जाणार होते. मामामहाराजांना घेऊन नाना त्यांच्या दर्शनास गेले. महाराजांनी मामामहाराजांना आशीर्वाद दिला. त्यावेळी मामामहाराजांच्याबद्दल बोलताना महाराज पाठक मास्तरांना म्हणाले, ''हा तरुण पुढे महासाधू होणार आहे.''

## ✦ ज्ञानेश्वरमहाराजांचा आदेश

त्या काळच्या प्रथेप्रमाणे लवकरच घरात मामामहाराजांच्या विवाहाचा विचार सुरू झाला. पण मामामहाराजांना वाटत होते की, आपण प्रपंचात न पडता परमार्थच करावा. या पेचातून मार्ग काढण्यास वडिलांची परवानगी घेऊन, ज्ञानेश्वरमहाराजांची आज्ञा घेण्यासाठी मामामहाराज आळंदीला गेले. तेथे त्यांनी ज्ञानेश्वरीचे पारायण सुरू केले. एके दिवशी साक्षात ज्ञानेश्वरमहाराज प्रगट झाले. ''गोविंदा, प्रपंच करून परमार्थ कर,'' असा आदेश ज्ञानेश्वरमहाराजांनी दिला. मामामहाराज परत निघाले.

## ✦ टांगेवाला भेटला

त्यावेळी तरणेबांड मामामहाराज लष्करभरती करणाऱ्या काही लोकांना दिसले. ते मामामहाराजांच्याजवळ आले व लष्करात चल असा आग्रह करू लागले. ही नवीनच अडचण आली. तेव्हा मामामहाराजांनी मनात ज्ञानेश्वरमहाराजांचे स्मरण केले. तोच एक टांगेवाला तेथे आला व ''तुम्हाला कुठे जायचे आहे ?'' असे मामामहाराजांना विचारू लागला. ''पुण्याला लो. टिळकांच्याकडे,'' मामामहाराज बोलून गेले. लगेच

टांगेवाल्याने मामामहाराजांना टांग्यात घेतले व पुण्यास टिळकांच्या वाड्यापुढे आणून सोडले. खाली उतरून मामामहाराज चालू लागले. सहज त्यांची दृष्टी मागे गेली, तो टांगाही नव्हता व टांगेवालाही नव्हता. यथाक्रम मामामहाराज सांगलीत आले. आल्या आल्या त्यांनी झालेल्या दर्शनाप्रमाणे ज्ञानेश्वरमहाराजांचे चित्र स्वहस्ते काढले.

### ✦ विवाह

लगेच नानांनी वधू पाहण्यास प्रारंभ केला. शेवटी कागवाड गावच्या नागेशपंत फाटक यांची रंगूबाई नामक कन्या ही वधू नेमस्त झाली. सासरी वधूचे नाव सौ. इंदिरा ठेवण्यात आले. पतीच्या परमार्थाला पूरक अशा इंदिराबाई होत्या. पुढे त्यांनी तात्यासाहेबमहाराजांचा अनुग्रह घेतला. त्या सतत तुकाराममहाराजांचे बारा अभंग म्हणत असत.

### ✦ अपत्यप्राप्ती

कालक्रमाने सौ. इंदिराबाईंना प्रथम एक कन्या झाली. पण ती अल्पायुषी ठरली. काही काळाने मामामहाराजांना एक पुत्र झाला. त्या पुत्राचे नाव 'राम' ठेवण्यास तात्यासाहेबमहाराज कोटणीसांनी सांगितले. तसेच या 'रामा'ला त्यांनी दृष्टिद्वारे अनुग्रहही दिला. मामामहाराजांच्या घरी 'राम'-राज्य आले.

### ✦ मामामहाराजांचे वैराग्य

राम या पुत्राच्या जन्मानंतर मामामहाराजांनी निष्कामता धारण केली. पत्नीला ते मातृभगिनीवत मानू लागले. गृहस्थाश्रमात असतानाच ते वानप्रस्थाश्रमाचे व्रत पाळू लागले. कोणत्याही मोहाला ते बळी पडले नाहीत. कामाने भल्याभल्यांना ठकवले. पण मामामहाराज कामाला पुरून उरले.

### ✦ एका बैठकीत गुरुचरित्रपठण

मामामहाराजांची मावशी दिगवडे नावाच्या गावी राहात होती. तिला गुरुचरित्र ऐकण्याची इच्छा झाली. एकदा मामामहाराज तिच्याकडे गेले असता, तिने ही इच्छा प्रदर्शित केली. पण गुरुचरित्राचा सप्ताह करण्याइतका वेळ मामांना नव्हता. तेव्हा त्यांनी एकाच बैठकीत संपूर्ण गुरुचरित्र मावशीला वाचून दाखविले.

### ✦ करील ते काय नोहे महाराज

दिगवडे गावच्या या मावशीबरोबरच मामामहाराज एकदा ज्ञानेश्वरमहाराजांच्या दर्शनासाठी आळंदीला गेले होते. तेथे अचानक मामामहाराजांना जुलाब सुरू झाले. मावशी घाबरून गेली. पण मामामहाराजांनी तिला धीर दिला व

ज्ञानेश्वरमाऊलीवर आपला भार घातला. मंदिरात जाऊन त्यांनी ज्ञानेश्वरमहाराजांचे तीर्थ प्राशन केले आणि त्यांचे जुलाब बंद झाले.

### ✦ प्लेग हटला

त्याकाळी वारंवार प्लेगची साथ येत असे. एकदा मामामहाराज प्लेगच्या तडाख्यात सापडले व मरणोन्मुख झाले. त्या स्थितीत त्यांना एका योगिराजाचे दर्शन झाले. ते मामामहाराजांना म्हणाले, ''तू वर का येत आहेस ? तुझे येथे काम नाही. तू परत खाली जा.'' मग मामामहाराज शुद्धीवर आले व प्लेगमधून बरे झाले.

### ✦ ज्ञानेश्वरीची १०८ पारायणे

मामामहाराज प्लेगमधून वाचले. पण प्लेगने मामामहाराजांच्या वाचेवर परिणाम केला. त्यांना नीट बोलता येईनासे झाले. तेव्हा त्यांनी पुन्हा ज्ञानेश्वरमहाराजांना साकडे घातले. त्यांनी ज्ञानेश्वरीची पारायणे सुरू केली आणि १०८ पारायणे पूर्ण होताच त्यांची वाणी पूर्वीप्रमाणे खणखणीत झाली.

### ✦ उमेदवारीतील कसोटी

शिक्षणानंतर काही काळ मामामहाराज सांगलीच्या मुन्सफ कोर्टात उमेदवारी करीत होते. एकदा मुन्सफांना एक कागद हवा होता. तो त्यांनी मामामहाराजांच्याजवळ मागितला. मामामहाराज कामात व्यवस्थित होते. पण त्या दिवशी काय झाले कुणास ठाऊक, त्यांना तो कागद सापडेना. फजितीची वेळ आली. तेव्हा त्यांनी ईश्वराचे स्मरण केले. ईश्वरी प्रेरणेने त्यांच्या मनात स्फुरले, 'निरुपयोगी म्हणून जे कागद बाजूला काढून ठेवलेले आहेत, त्यांमध्ये शोधावे.' त्यांनी तसे केले आणि मुन्सफांना हवा तो कागद तेथे सापडला.

### ✦ सद्‌गुरूंचा अनुग्रह

लहानपणापासून मामामहाराज जरी देवभक्ती करीत होते, तरी सद्‌गुरुविना परमार्थाला योग्य दिशा लागत नाही, याची जाणीव त्यांना होती. ते सद्‌गुरूंच्या शोधात होतेच. सांगलीतच एक महात्मा त्यांना आढळला. तो म्हणजे तात्यासाहेब कोटणीसमहाराज. कोटणीसमहाराज नित्यकीर्तन करीत. तसेच मुमुक्षूंना मार्गदर्शनही करीत. त्यांच्या कीर्तनांसही मामामहाराज जात. त्यांना मामामहाराजांनी अनुग्रह देण्याची प्रार्थना केली. तेव्हा कोटणीसमहाराज बोलले, ''बापूराव, तुमचे पूर्वनियोजित गुरू चिमडास आहेत. त्यांचेकडून तुम्ही अनुग्रह घ्या. पुढे काही अडचण आली, तर मला विचारा.'' तेव्हा मामामहाराज चिमडास गेले व त्यांनी चिमडमठाधिपती नारायणमहाराज यरगट्टीकर यांचा अनुग्रह घेतला.

### ✦ भक्तीचा थाट होईल

परत येताना मामामहाराज तेरदळात आले. तेथे शेडबाळकरांच्या दत्ताच्या देवळात उमदीकरमहाराजांचा सप्ता चालू होता. त्यांच्या दर्शनास मामामहाराज गेले. त्यांना प्रसाद म्हणून एक केळे देऊन उमदीकरमहाराज म्हणाले, ''भक्तीचा थाट होईल.''

### ✦ सिटी हायस्कुलात शिक्षक

या सुमारास सिटी हायस्कूल नावाची एक नवीन शिक्षणसंस्था उभी राहिली होती. त्या संस्थेत मामामहाराज आजीव सदस्य झाले व तेथे शिक्षक म्हणून काम करू लागले. ते मॉरल सायन्स व ड्रॉईंग शिकवीत. लवकरच एक विद्यार्थिप्रिय उत्तम शिक्षक म्हणून त्यांनी नाव कमावले. मुलांच्या मनावर चांगले संस्कार कसे होतील, याकडे ते लक्ष देत. त्यांच्यामुळे काही विद्यार्थ्यांनाही अध्यात्माची आवड उत्पन्न झाली.

### ✦ पारमार्थिक शाळा

मामामहाराजांच्याबरोबर शाळेत असणाऱ्या शिक्षकांमध्ये तोरो नावाचे एक शिक्षक होते. तेही पारमार्थिक प्रवृत्तीचे होते. या दोघांमुळे जाणते असे काही विद्यार्थी सिटी हायस्कूलला 'पारमार्थिक शाळा' म्हणू लागले.

### ✦ 'काही नाही' म्हणजे काय ?

शाळेत मामामहाराज विद्यार्थ्यांच्या वादविवाद स्पर्धा घेत. त्यासाठी मुलांना एक विषय ते अगोदर देत. एकदा हा वक्तृत्वाचा विषय देण्यास ते विसरले. नियोजित वेळी मुलांनी फळ्यावर लिहून ठेवले - 'आजचा विषय काही नाही.' वर्गात आल्यावर मामामहाराजांनी ते पाहिले. काय झाले, ते त्यांना उमगले. पण प्रसंगावधान राखून त्यांनी विचारले, ''आज 'काही नाही' या विषयावर कोण बोलणार आहे ?'' विद्यार्थी बुचकळ्यात पडले व गप्प बसले. तेव्हा मामामहाराज स्वत:च 'काही नाही' या विषयावर बोलू लागले. ''संत सांगतात की, ईश्वर तेवढा एक सत्य आहे. इतर सर्व 'काही नाही' असेच आहे,'' असा त्यांनी आपल्या बोलण्याचा समारोप केला.

### ✦ आध्यात्मिक ग्रंथवाचन

गुरूपदेशानंतर साधनाभ्यास मामामहाराज करीत होतेच. त्याला बाह्य पूरक अंग म्हणून तुलसी रामायण, आनंद रामायण, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, गुरुचरित्र, रामदासस्वामींचा दासबोध, इत्यादी अनेक ग्रंथ त्यांच्या पठणात होते.

### ✦ नामस्मरणाने विंचू उतरला

'नामे विषबाधा हरती' असे नामस्मरणाचे महत्त्व रामदासस्वामींनी आपल्या

दासबोधात सांगितले आहे. एकदा मामामहाराजांना त्याची प्रचीती आली. त्यांना एकदा विंचू चावला. तेव्हा त्यावर अन्य काही उपाय न करता मामामहाराजांनी रामनामस्मरण सुरू केले. त्यांच्या शरीरात विंचवाचे विष चढले नाही.

### ✦ कोटणीसमहाराजांचे दर्शन व नित्यकीर्तन

मामामहाराज रात्री साधन करीत असल्याने, ते अधूनमधून कोटणीसमहाराजांच्या कीर्तनास जात. त्यांची योग्यता कोटणीसमहाराजांना माहीत होती. आपल्यानंतर मामामहाराज नित्यकीर्तनाची परंपरा चालवितील, असे त्यांचे मत होते. अशा स्थितीत इ. स. १९२४ सालच्या पौष महिन्यात कोटणीसमहाराज निजधामास गेले. माघ महिन्यात रात्री दासबोध वाचण्याचा मामामहाराजांचा नेम असे. त्याप्रमाणे ते दासबोध वाचीत असताना, माघ वद्य तृतीयेला त्यांच्यापुढे कोटणीसमहाराज साक्षात प्रगट झाले आणि नित्यकीर्तनाचा आदेश त्यांना नेत्रसंकेताने दिला आणि तेव्हापासून मामामहाराजांचे नित्यहरिकीर्तन सुरू झाले व ते त्यांनी आपल्या निर्याणापर्यंत अखंड अडतीस वर्षे चालविले.

### ✦ गुरुपादुकांची प्राप्ती

मामामहाराजांचे नित्यकीर्तन सुरू झाले. त्यासाठी उपास्य दैवत मिळण्याचाही योग आला. शके १८६० च्या कार्तिक शुद्ध नवमीला बाबूरावजी कोटणीसांनी तात्यासाहेबांच्या चरणांतील चर्मी पादुका मामामहाराजांना प्रसाद म्हणून आपणहून आणून दिल्या. तेव्हा या पादुकाप्राप्तीची खूण म्हणून मामामहाराजांनी प्रत्येक सोमवारी मौन पाळण्याचे व्रत सुरू केले.

### ✦ गुंडूबुवा कीर्तनांत नाचत

तात्यासाहेबमहाराजांच्या पुण्यतिथीचा उत्सव दरवर्षी गंगाधरसिंगांच्या हनुमान समाधिमंदिरात होत असे. त्यात मामाहाराजांची कीर्तने होत. या कीर्तनांना गुंडूबुवा येत व ते आनंदाने नाचत. बुधगावचे हे गुंडूबुवा एक विदेही सत्पुरुष होते. एकदा गुंडूबुवा सांगलीतील पांडुरंगमहाराज ताम्हनकरांना म्हणाले, "अरे हा गोंदा (= मामामहाराज) परमार्थात पुरा आहे."

### ✦ सांगलीत वास

काशीला दुर्गाताई पंडे नावाच्या बाई होत्या. त्यांना स्वप्नात मामामहाराजांचे दर्शन झाले. 'स्वप्नातील पुरुष कोण' हे जाणण्याची त्यांना तळमळ लागली. तेव्हा त्यांच्या परिचयाच्या कावेरीबाई नावाच्या अधिकारी स्त्रीने त्यांना सांगलीत

मामामहाराजांच्याकडे आणले. मामामहाराजांना पाहताच 'हेच ते' ही ओळख दुर्गाताईंना पटली. मग मामामहाराजांचे कीर्तन ऐकण्यास त्या सांगलीतच राहिल्या.

### ✦ राम-सीता यांचे आगमन

'श्रीराम जयराम जयजय राम' या त्रयोदशाक्षरी मंत्रावर मामामहाराजांचा भर होता. त्यामुळे त्यांना राम-सीतेच्या मूर्ती मिळण्याचा योग आला. जमखंडी गावी एकाला रामसीतेच्या मूर्ती सापडल्या व त्या त्याने स्वेच्छेने मामामहाराजांना देऊ केल्या. तेव्हा खाडिलकर नावाच्या एका गृहस्थांनी जमखंडीहून सोवळ्याने चालत येऊन या मूर्ती सांगलीस आणल्या. मामामहाराजांनी देव्हाऱ्यामध्ये या मूर्तींची स्थापना केली.

### ✦ मारुतीसुद्धा आला

राम-सीतेच्या मागोमाग मारुती येण्याचाही योग आला. तो असा : सिटी हायस्कूलमध्ये शिक्षक असताना, मामामहाराजांनी स्थलांतर न करता ३॥ कोटी रामनामाचे पुरश्चरण सुरू केले. तितक्यात त्यांची बदली परगावी झाली. व्रतभंग होऊ नये म्हणून त्यांनी तत्काळ नोकरीचे त्यागपत्र दिले व आपले पुरश्चरण पूर्ण केले. अंतरात त्यांना मारुतिरायांचा साक्षात्कार झाला. त्याची बाह्य खूण म्हणून मारुतीची मूर्ती मिळाली. मिरजेत वेणाबाईंच्या मठात समर्थ रामदासस्वामींच्या हातची मारुतीची मूर्ती होती. ती मामामहाराजांना द्यावी, अशी प्रेरणा त्या मठाच्या अधिपतींना झाली. तेव्हा बाबूराव कोटणीसांच्यामार्फत त्यांनी ही मारुतीची मूर्ती मामामहाराजांकडे पाठवून दिली.

### ✦ देवाला कीर्तनाचा मोह

मामामहाराजांच्या कीर्तनाकडे केवळ माणसेच आकृष्ट होत असे नाही. त्यांच्या कीर्तनश्रवणाचा मोह देवालाही पडल्याची उदाहरणे आहेत. एकदा कुरुंदवाडच्या घाटावर मामामहाराजांचे कीर्तन झाले. तेव्हा दत्तगुरू कीर्तनाला आले. तेथील कृष्णा-पंचगंगेच्या संगमावरील पाण्यावरील उमटलेली दत्तगुरूंची पाउले काहींनी पाहिली. असेच एकदा औदुंबरला देवापुढे मामामहाराजांचे कीर्तन दुपारी झाले. दत्तगुरूंची विश्रांतीची वेळ असल्याने देवाची दारे बंद होती. पण दत्तगुरूंनी पुजाऱ्यांना दृष्टांत देऊन दारे उघडावयास लावली व कीर्तनश्रवणाचा लाभ घेतला.

### ✦ नोकरी मिळाली

श्री. पटवर्धन नावाचे एक गृहस्थ मामामहाराजांच्या कीर्तनात येत. एकदा त्यांची नोकरी गेली. ही गोष्ट त्यांनी मामामहाराजांच्या कानी घातली. मामामहाराज

म्हणाले, "काळजी करू नका. ज्याची ईश्वरावर निष्ठा आहे, त्याचे देव रक्षण करतो." लवकरच पटवर्धनांना दुसरी नोकरी मिळाली.

### ✦ निरोप घेऊन निर्याण

विठाई पवार नावाच्या भाविक स्त्रीला दृष्टांत देऊन कोटणीसमहाराजांनी सांगितले, "तुम्ही बापूराव केळकरांच्या कीर्तनाला जात चला." त्याप्रमाणे त्या मामामहाराजांच्या कीर्तनात रंगून गेल्या. पुढे त्यांचा शेवट आला. तेव्हा, "मामा, येते आता मी," असे बोलून या बाईंनी देहत्याग केला.

### ✦ आता गुरुदेव येणार

एकदा मामामहाराज दुपारी ३ ।। वाजता डोक्याला रुमाल बांधू लागले. जवळ असणाऱ्या पंडितराव परचुरे यांनी प्रश्न केला, "मामा, आत्ता का रुमाल बांधत आहात?" मामा उत्तरले, "आत्ता गुरुदेव रानडे माझ्याकडे येणार आहेत." तेवढ्यात गुरुदेव आलेच. ते येणार आहेत, असा निरोप काही अगोदर आलेला नव्हता.

### ✦ जुलाब थांबले

कोटणीसमहाराजांच्या आज्ञेने मामामहाराज नित्यकीर्तन करीत होते. देहधर्माने त्यांना एकदा जुलाब होऊ लागले. "कोटणीसमहाराजांच्या आज्ञेने आपण कीर्तन करतो, हे बापूरावांचे म्हणणे खोटे असल्याने त्यांना जुलाब लागले," असे एका निंदकाचे शब्द ऐकल्यावर मामामहाराज बोलले, "महाराज, नित्यकीर्तनाची आपली आज्ञा खरी असेल, तर जुलाब ताबडतोब बंद व्हावेत." आणि लगेच जुलाब थांबले.

### ✦ शेंदूर पोटात गेला

मामामहाराजांच्या नित्यकीर्तनांत व्यत्यय यावा, असे वाटणाऱ्या एका विघ्नसंतोषी माणसाने शेंदूर घातलेल्या करंज्या मामामहाराजांना दिल्या. न बघताच त्यांनी काही खाल्ल्या. शेंदूर पोटात जाताच त्यांचा आवाज अगदी खोल गेला. कीर्तनातील त्यांचे बोलणे एक हातावरच्या माणसाससुद्धा ऐकू जाईना. तेव्हा मामामहाराज मनोमन देवाला म्हणाले, "देवा तुला माझे कीर्तन नकोसे झाले असेल, तर तू मला मारून टाक. पण जर माझे कीर्तन तुला हवे असेल, तर माझा आवाज पूर्ववत कर." देवाने त्यांचा आवाज पूर्वीप्रमाणे केला.

### ✦ पांडुरंगाची माळ

एकदा मामामहाराज हे पांडुरंग पतंगे, महादेव दाणेकरी, गणपतराव कानिटकर, इत्यादी काही लोकांसह पंढरपूरला गेले व तेथे एका मठात उतरले.

मामामहाराजांच्या गळ्यात वारकरी माळ नसल्याने, त्यांना मठात कीर्तन करण्यास परवानगी मिळेना. तेव्हा त्यांचे प्रवचन झाले. प्रवचनात ते सहज बोलून गेले, "ज्याच्या अंतरात नाममाळ आहे, त्याला बाह्य माळेची काय जरूरी आहे ?" पुढे मामामहाराज पांडुरंगाच्या दर्शनास गेले असताना, कोणीतरी अचानक त्यांच्या गळ्यात फुलांचा एक हार घातला. त्यात एक तुळशीची माळ मिळाली. या प्रसंगाची स्मृती म्हणून मामामहाराजांनी दर द्वादशीला वारकरी पद्धतीचे निरूपण सुरू केले.

### ✦ क्षयातून सुटका

कोल्हापूरच्या महादेव कृष्णा माने यांचा क्षयाचा विकार शेवटच्या अवस्थेत गेला व त्यांना पुण्याला नेण्याचे ठरले. तत्पूर्वी ते मामामहाराजांच्या दर्शनास आले व "मला बरे वाटेल काय ?" असा प्रश्न त्यांनी मामामहाराजांना केला. "बरे वाटेल," मामामहाराज उत्तरले. त्यावेळी मामामहाराजांनी खाऊन टाकलेल्या जांभळाची एक बी त्यांनी प्रसाद म्हणून घेतली. घरी जाऊन ते ती बी पाण्यात टाकून पाणी प्याले. क्रमाक्रमाने ते क्षयातून मुक्त झाले. याच महादेव माने यांची मूळची गरिबी होती. पुढे मामामहाराजांच्या वचनाप्रमाणे त्यांना कोल्हापुरात नोकरी लागली. नंतर धाडस करून त्यांनी वखार काढली व तेथे मामामहाराजांचा फोटो लावला. त्यानंतर या व्यवसायात त्यांना हजारो रुपये नफा झाला.

### ✦ साधुमहाराज प्रगटले

इ. स. १९४६ सालच्या पांडवपंचमीला मामामहाराजांनी आपल्या कीर्तनात साधुमहाराजांचे महत्त्व सांगितले व ते म्हणाले, "आज इथे साधुमहाराज प्रगटले आहेत." यावेळी कीर्तनास बसलेल्या विनायकराव कानिटकर यांना दरवाज्यातून देव्हाऱ्यापर्यंत आलेले तेज दिसले. ही हकीकत त्यांनी नंतर मामामहाराजांना सांगितली. तेव्हा मामामहाराज बोलले, "आज खरोखरच इथे साधुमहाराज प्रगट झालेले होते."

### ✦ प्रसाद फळास आला

सौ. सोनूबाई माने या मामामहाराजांच्या नित्यकीर्तनांस येत. त्यावेळी त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती बेताचीच होती. एकदा मामामहाराजांनी माने बाईंना एक रुपया प्रसाद म्हणून दिला व म्हटले, "तुम्हाला पैसा कमी पडणार नाही." पुढे माने कुटुंबीयांनी सुरू केलेला व्यापार फारच भरभराटीस आला. आज हे माने कुटुंब खूपच श्रीमंत आहे.

### ✦ नऊ तासांचे निरूपण

एकदा मामामहाराजांच्या मनात आले की, आपण सतत नऊ तास निरूपण करावे. त्याप्रमाणे १९४२ च्या शिवरात्रीला हा कार्यक्रम आयोजित झाला. दुपारी बरोबर बारा वाजता निरूपण सुरू झाले, ते रात्री ९॥ वाजता संपले. साथीदार आणि श्रोते न कंटाळता कार्यक्रमात होते.

### ✦ समुद्र भेटीला आला

इ. स. १९४२ च्या मे महिन्यात रामेश्वर या कुलदेवतेच्या दर्शनास जाण्याचे मामामहाराजांनी ठरविले. वाटेत कणकवलीच्या पुढे घाटात बैलगाडीने प्रवास होता. अचानक बैल जुवापासून सुटले. पण रामेश्वरकृपेने सर्व सुखरूप राहिले. पुढे सर्वांनी रामेश्वराचे दर्शन घेतले व ते समुद्राकडे गेले. ओहोटीची वेळ होती. अशा स्थितीत मामामहाराज खूप दूर असतानाही समुद्राची एक लाट पुढे येऊन मामामहाराजांच्या पायाला स्पर्श करून परत गेली.

### ✦ गंडांतर गेले

रामभाऊ केळकर मास्तर हे मामामहाराजांचे कीर्तनास येत. इ. स. १९४७ साली त्यांना ताप आला व ते मरणोन्मुख झाले. त्यांच्या पत्नी मामामहाराजांच्या पत्नींना - सौ. इंदिराबाईंना भेटल्या व त्यांनी सर्व सांगितले. तेव्हा सौ. इंदिराबाई म्हणाल्या, ''हा अंगारा घेऊन जावा. हे (= मामामहाराज) उद्या सकाळी तुमच्याकडे येतील. तोवर आजाऱ्याच्या रक्षणाची हमी यांच्याकडेच आहे.'' दुसरे दिवशी सकाळी मामामहाराज रामभाऊंच्याकडे गेले. त्यांनी त्यांच्या अंगावरून हात फिरविला व ''बरे वाटेल,'' म्हणून सांगितले. हळूहळू रामभाऊ केळकरांची प्रकृती सुधारत गेली.

### ✦ मुलगी वाचली

सौ. रुक्मिणीबाई नाईक यांची कन्या सुशीला एकदा तापाने आजारी पडली. सर्वांनी तिची आशा सोडली. रुक्मिणीबाईंच्या विनंतीवरून मामामहाराज त्यांच्या घरी गेले. त्यांनी मुलीला तीर्थ दिले व आपल्या हाताने अंगाला अंगारा चोळला. थोड्याच वेळात सुशीलेचा ताप कमी होऊ लागला व ती पुढे बरी झाली.

### ✦ कीर्तनाचा रौप्यमहोत्सव

फेब्रुवारी, १९४९ मध्ये मामामहाराजांच्या नित्यकीर्तनांस पंचवीस वर्षे पूर्ण होत होती. तेव्हा मामामहाराजांचे चिरंजीव श्रीदादामहाराज व अन्य भक्तमंडळी यांनी रौप्यमहोत्सव साजरा केला. यावेळी नारायणमहाराज यरगट्टीकर आले होते. तसेच यावेळी बाबूराव कोटणीसांचा सत्कार करण्यात आला.

### ✦ हा साधू वेगळा

ह. भ. प. सोनोपंत दांडेकर अधूनमधून सांगलीस येत. मामामहाराजांना भेटल्याशिवाय ते परत जात नसत. एकदा तर भर पावसात ते मोरोपंत कुलकर्णी यांच्यासह मामामहाराजांना भेटण्यास आले. ते मोरोपंताना म्हणाले, ''मोरोपंत, बापूरावांच्यासारखा साधू वेगळा.''

### ✦ नातवाला वाचविले

अनिलप्रभू हा मामामहाराजांचा कनिष्ठ पौत्र जन्मास आला, त्यावेळी त्याच्या अंगात चेतनाच नव्हती. घरगुती व डॉक्टरी उपायांचा उपयोग झाला नाही. त्यावेळी माईसाहेब दांडेकरांनी मामामहाराजांच्याजवळ तीर्थ व अंगारा मागितला. त्यांनी दिला. मुलाच्या अंगावर तीर्थ शिंपडून अंगारा चोळताच मुलाच्या अंगात चेतना आली.

### ✦ म. अ. कुलकर्णी वाचले

म. अ. कुलकर्णी हे १९५७-५८ मध्ये टायफॉइडने आजारी होते. तीनदा त्यांचा ताप उलटला. शेवटी डॉक्टरांनी आशा सोडली. कुलकर्णींच्या वडिलांनी मामामहाराजांना घरी बोलावले. म. अ. कुलकर्णी मामामहाराजांच्याकडे नेहमी येत. त्यांच्याकडे जाऊन मामामहाराज म्हणाले, ''हे बघ, या आजारात तुला मरण नाही. तुला एक-दोन दिवसांत आराम वाटेल.'' दुसऱ्या दिवसापासून म. अ. कुलकर्णी बरे होण्याच्या मार्गाला लागले.

### ✦ षष्ट्यब्दपूर्ती

पालघर गावच्या श्रीमंत माईसाहेब दांडेकर या इ. स. १९५०-५१ च्या सुमारास सांगलीस येऊन मामामहाराजांचे कीर्तन श्रवण करू लागल्या. त्यांना कळले की, मामामहाराजांना ६० वर्षे पुरी झाली आहेत. माईसाहेबांच्या आग्रहाने व पुढाकाराने षष्ट्यब्दपूर्तीचा धार्मिक सोहळा पार पाडण्यात आला.

### ✦ कीर्तननिष्ठा

मामामहाराजांची कीर्तननिष्ठा जबरदस्त होती. एकदा ते आपल्या बहिणीच्या ऑपरेशनसाठी मिरजेच्या मिशन हॉस्पिटलात गेले होते. तेथे असताना कीर्तनाची वेळ होताच, एका बाजूला असलेल्या जिन्याखाली उभे राहून त्यांनी कीर्तनाचा नेम पार पाडला. तसेच एकदा मामामहाराज रेल्वेने पालघरला जात होते. कीर्तनाचा समय येताच, त्यांनी गाडीतच कीर्तन केले. तसेच त्यांच्या शेवटच्या दुखण्यात डॉक्टर मामामहाराजांना म्हणाले, ''ऑपरेशन केले, तर तुम्हाला पुष्कळ गुण येईल.''ऑपरेशन केले, तर कीर्तन चुकेल, या कारणाने ते ऑपरेशनला तयार झाले नाहीत. तसेच दुखणे सहन करीत राहिले.

## ✦ निंबरगीची यात्रा

निंबरगीला जाण्याची कल्पना पंडितराव परचुरे यांनी काढली. त्याचवेळी वाटेवरील ओढ्यांना पाणी आले आहे, अशी वार्ता असतानाही मंडळी निघाली. वाटेत मामामहाराज असणारी मोटार ओढ्याच्या पाण्यात बंद पडली. शेजारच्या शेतातले बैल आणून ती पाण्याबाहेर काढावी लागली. निंबरगीच्या वाटेवर चिखल असल्याने सर्वजण जवळच्या चडचाण गावी मुक्कामास गेले. सकाळपासून मोटारीत बसलेले मामामहाराज रात्री ८ वाजेपर्यंत एकदाही खाली उतरले नव्हते. चडचाणला मुक्कामाजवळ मारुतीचे देऊळ होते. तेथे जाऊन मामामहाराजांनी लगेच कीर्तन सुरू केले. या कीर्तनप्रसंगी मामामहाराजांच्या कपाळावर अनेकांना भस्माचे तेज:पुंज पट्टे दिसले. दुसरे दिवशी सर्वजण निंबरगीस गेले. तेथे निंबरगीरमहाराजांच्या समाधीपुढे मामामहाराजांचे कीर्तन झाले.

## ✦ कीर्तनाचा त्रितपमहोत्सव

मामामहाराजांच्या कीर्तनाचा त्रितपमहोत्सव इ. स. १९६० साली दादामहाराज केळकरांच्या व इतरांच्या प्रेमाने साजरा झाला. या महोत्सवाला सिद्धगिरी येथील काडसिद्ध मठातील मठपती काडसिद्ध आले होते या निमित्ताने 'गुरुतृतीयाकथा' हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले. त्यात मामामहाराजांच्या नित्यकीर्तनाची साद्यंत हकीकत देण्यात आली आहे.

## ✦ कृष्णा नदीचा पूर ओसरला

इ. स. १९६१ मध्ये कृष्णा नदीला महापूर आला. सांगलीत पाणी शिरले. त्यामुळे मामामहाराजांच्या कीर्तनाची उपस्थिती रोडावली. काही मंडळींनी मामामहाराजांना कृष्णेच्या पाण्यापर्यंत नेले. मामामहाराजांच्या पायाचा स्पर्श कृष्णेच्या पाण्याला होताच पुराचे पाणी ओसरू लागले.

## ✦ अंतिम आजार

त्रितपमहोत्सवानंतर मामामहाराजांच्या कायेवर आमयांचा अंमल होऊ लागला. रक्तदाब, मधुमेह, अस्थिक्षय व मूत्रपिंडातील कर्करोग यांचा मामामहाराजांना त्रास होता. अशातच तात्यासाहेबमहाराजांची पुण्यतिथी आली. मामामहाराजांना चालवत नव्हते. तरी त्यांना खुर्चीत बसवून हनुमान समाधिमंदिरात नेण्यात आले. या कीर्तनात त्यांनी आपल्या निर्याणाची सूचना दिली.

## ✦ निर्याणाचा सोहळा

मामामहाराज मरणाला मारून उरलेले असल्याने त्यांच्या निर्याणाचा सोहळा

### ✦ निर्याणाचा सोहळा

मामामहाराज मरणाला मारून उरलेले असल्याने त्यांच्या निर्याणाचा सोहळा झाला. शके १८८३, माघ शुद्ध सप्तमीला रात्री मामामहाराजांना बेसुमार ताप भरला. अष्टमीचे त्यांचे कीर्तन झाले. सोमवारी नवमी होती. सकाळी मामामहाराजांची प्रकृती तपासणाऱ्या डॉक्टरांना काही आशा दिसली नाही. त्यांच्या मते दुपारी दोनपर्यंत मामामहाराज असतील. दुपारचे दोन वाजले. डॉक्टरांना बोलावण्यात आले. मामामहाराज आहेत तसेच पाहून डॉ. फडणीस आश्चर्याने म्हणाले, "हे अघटितच आहे." याच सुमारास कान्हेरेबुवा व अन्य काही यांना मामामहाराजांच्या डोळ्यांत नीलप्रकाश दिसला. संध्यकाळचे पाच वाजले. मामामहाराजांनी सताड डोळे उघडले व 'श्रीराम जयराम जयजय राम' हा गजर उच्चरवाने केला. या नामोच्चाराने त्यांनी आपले अखेरचे कीर्तन साधले. पुन्हा त्यांनी डोळे मिटून घेऊन मौन धरले. जमलेली मंडळी सतत 'श्रीराम जयराम जयजय राम' हा नामघोष करीत होती. रात्री ११.५० वाजता मामामहाराजांची आत्मज्योत परमात्मज्योतीत मिळून गेली.

### ✦ निर्याणोत्तर

एक वर्षाच्या आत मामामहाराजांच्या राहत्या घरी ते ज्या ठिकाणी बसून कीर्तन करीत, त्या ठिकाणी त्यांचे सिंहासन श्रीदादामहाराज केळकरांनी स्थापन केले. त्यांच्या कीर्तनाची परंपरा श्रीदादामहाराजांनी निष्ठेने चालविली आहे.

### ✦ भिडे बरे झाले

बाळासाहेब गोखले मामामहाराजांच्या कीर्तनास येत. त्यांच्यामुळे त्यांचे मित्र किसनराव भिडे यांना निर्वाणानंतर मामामहाराजांचे महत्त्व कळले व ते मामांचे भक्त बनले. इ. स. १९६९-७० साली किसनरावांना ताप आला. डॉक्टरांनी आशा सोडली. तेव्हा किसनरावांनी मामामहाराजांचे छायाचित्र आपल्या उशाशी ठेवले व ते त्यांचे स्मरण करू लागले. लवकरच किसनराव बरे झाले. त्यांना एक-दोनदा मामामहाराजांचे दर्शनही झाले.

### ✦ तुम्ही देव झालात

मामामहाराजांच्या निर्याणानंतर इंचगिरी संप्रदायाचे बाबूराव गोखले मामामहाराजांच्या घरी आले व त्यांच्या सिंहासनाला नमस्कार करून म्हणाले, "बापूराव, तुम्ही आता देव होऊन बसलात !"

### ✦ मामामहाराजांचे काही भक्त

चिमडच्या माईसाहेब यरगट्टीकरांनी अनुग्रह देण्याची आज्ञा दिली असूनही

मामामहाराजांनी फारसा अनुग्रह दिला नाही. तथापि त्यांची कीर्तने ऐकून त्यांचे भक्त बनलेल्या काहींची चांगलीच पारमार्थिक तयारी झाली होती. अशी दोन-तीन उदाहरणे येथे दिली आहेत.

**१. न. दा. दिवेकर :**

न. दा. दिवेकर यांचे बिऱ्हाड प्रारंभी प्रारंभी मामामहाराजांच्या वाड्यात होते. लहानपणी त्यांना इतर लोक खूप उपदेश करीत. त्यांच्या काही तक्रारी त्यांच्या मातोश्रींनी मामामहाराजांच्या कानांवर घातल्या. पण मामामहाराज मात्र त्यांना काहीच बोलले नाहीत. ते त्यांच्या मातोश्रींना इतकेच म्हणाले, "राधाकाकू, तुम्ही काळजी करू नका. तो आपल्या आपण सुधारेल." त्याप्रमाणे घडले. दिवाकर पुढे बी. ए., बी. टी. होऊन सिटी हायस्कूलमध्ये शिक्षक झाले. मामामहाराजांचा परान्न न घेण्याचा नियम होता. पण त्यांनी दिवेकरांच्या घरी जाऊन भोजन केले, हे लक्षणीय आहे. मामामहाराजांच्या निर्याणानंतर दिवेकरांनी स्वयंस्फूर्तीने मामामहाराजांचे चरित्र लिहिण्यास प्रारंभ केला; गुरुसिद्दप्पामहाराजांच्या आशीर्वादाने त्यांचे हे लेखन पूर्ण झाले. हे चरित्र लिहून पूर्ण झाल्यावर मामामहाराज दादामहाराजांच्या स्वप्नात येऊन म्हणाले, "नरहरीने लिहिलेले चरित्र मी ऐकले. नरहरीचे आहेच तसे."

**२. शरयू उपळावीकर :**

शरयू उपळावीकर मामामहाराजांच्या कीर्तनांस येत. एकदा आपल्या अंगातून काढलेला शर्ट मामामहाराजांनी खुंटीवर ठेवण्यास त्यांना सांगितला. तो शर्ट घेताच त्यांना अपूर्व सगंध आला व त्यावर अपरंपार प्रकाश दिसला. एकदा तर मामामहाराजांच्या कीर्तनात त्या देहभान विसरल्या व समाधिअवस्थेत गेल्या.

**३. माई करमरकर :**

माई करमरकर या मुंबईकडल्या राहणाऱ्या. मामामहाराजांच्या कीर्तनाची त्यांना इतकी गोडी लागली की, मुले, नातवंडे यांचा मोह दूर सारून त्या मामामहाराजांची कीर्तने ऐकण्यासाठीच सांगलीस मामामहाराजांच्या वाड्यात येऊन राहिल्या. कीर्तने ऐकून त्यांनी नामस्मरणाचा अभ्यास सुरू केला. तो इतका वाढला की, त्या झोपल्या, तरी त्यांच्या श्वासातून नामोच्चार होई. ही गोष्ट त्यांच्या नातेवाईकांनी अनुभवली.

**४. अप्पाराव पोवार :**

अप्पाराव पोवार हे नित्यनेमाने मामामहाराजांच्या कीर्तनांस येत. कीर्तन-श्रवणाने त्यांनी नामस्मरणाचा अभ्यास सुरू केला. तो इतका की, ते सतत नामच घेऊ

लागले. झोपेतही त्यांचे ओठ हलत. मामामहाराजांच्या कीर्तनाचा गौरव करणारे 'गोविंद-कीर्तन-गुण-गान' हे अभंगात्मक छोटे पुस्तक त्यांनी प्रकाशित केले. त्यात ते म्हणतात, ''बापूराव धन्य मज स्मरणास लाविले। अनुभवा दिले सर्व काही ॥'' आणि शेवटी नामस्मरण करीतच त्यांनी देहत्याग केला.

●●●

## प्रकरण १२ : संदर्भसूची


१. **अमृतवाणी**, रा. गो. केळकर, सांगली, १९८१.

२. **गोविंद-कीर्तन-गुण-गान**, अप्पाराव पोवार, सांगली, शके १८६१ (= इ. स. १९३९)

३. **गोविंदचरितमानस**, न. दा. दिवेकर, सांगली, १९६३

४. **गोविंदस्मृति**, किसन भिडे, सांगली, १९७२

५. **दादामहाराज केळकर यांची हस्तलिखित वही**

६. **मामामहाराज केळकर**, डॉ. दा. वि. कुलकर्णी, पुणे १९८३

७. **मामामहाराज केळकर**, 'दीपलक्ष्मी' मासिक विशेषांक, मुंबई, फेब्रुवारी, १९७१

८. **हणमंतरावजी कोटणीस चरित्र**, साधुदास, सांगली, १९३७

९. **हनुमद्‌गुरुचरित्रबोधसार**, गो. अ. केळकर, सांगली, १९३७


▲▲▲

प्रकरण १३

# श्रीदादामहाराज केळकर

"हे पूर्वजन्मीचे योगी आहेत," असे ज्यांच्याविषयी श्रीमिरीकरमहाराज म्हणाले; "ज्यांचे 'शेषसाधन' राहिले आहे," असे निंबरगीकरमहाराज उद्‌गारले; ज्यांची बालपणाची कीर्तनें ऐकून रामानंदमहाराज खटावकर ज्यांना 'प्रल्हाद' म्हणू लागले; ज्यांचे कौतुक करून नागाप्पाण्णामहाराजांनी आशीर्वाद दिला; लहानपणीच ज्यांचा गौरव सिद्रामप्पा मैंदर्गी व शिवाप्पा रामाप्पा सोनार यांनी केला; ज्यांच्या 'रामदासबोध' ग्रंथाचे महत्त्व सांगताना ह. भ. प. विनायकराव कानिटकर यांनी महिमा गाइला; ज्यांचे पारमार्थिक भाग्य मामामहाराज केळकरांनी वर्णिले; ज्यांचे श्रेष्ठत्व मा. वि. गोसावी व ना. मो. कुलकर्णी यांनी अभंगांचेद्वारा प्रगट केले; ज्यांचे महत्त्व द. वा. बेडेकर यांनी वर्तमानपत्रातून घोषित केले, ज्यांचा गौरव बाबूराव गोखले यांनी केला; ज्यांच्यावरून पांडुरंगमहाराज ताम्हनकरांनी काव्यरचना केली; ज्यांना डॉ. ग. वा. तगारे 'संत' म्हणतात; ज्यांना श्री. भाऊसाहेब जोशी 'दत्तगुरू' म्हणतात; ज्यांचा गौरव दीपलक्ष्मी मासिकाच्या मामामहाराज केळकर विशेषांकात प्रगट झाला, असे श्रीदादामहाराज केळकर हे सध्याच्या काळातले एक सर्वश्रेष्ठ सत्पुरुष आहेत.

### ✦ संतकुळात जन्म

दादामहाराजांचा जन्म ज्या केळकर कुळात झाला, ते कोकणातून सांगलीस राहण्यास आलेले होते. हे घराणे भक्तिसंपन्न होते. दादामहाराजांचे आजोबा अनंतरावजी हे शिवभक्त असून ते रोज पार्थिव पूजा आणि ॐ नम:शिवाय या मंत्राचा जप करीत. त्यांचे चिरंजीव श्रीमामामहाराज केळकर हे नित्यहरिकीर्तन करणारे महान साक्षात्कारी संत होते. त्यांच्या पत्नी सौ. इंदिराबाई. त्या नित्यसाधन करणाऱ्या व तुकाराममहाराजांचे १२ अभंग रोज सतत म्हणणाऱ्या होत्या. या इंदिरा-गोविंद दांपत्याचे पुत्ररत्न म्हणचे दादामहाराज होत.

### ✦ वजीरबाबांचे भविष्य

सौ. इंदिराबाई या श्रीदादामहाराजांच्या वेळी गर्भवती असतानाच, त्यांना श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांच्या अनुग्रहाचा लाभ झाला. सौ. इंदिराबाईंना पुत्र होणार व तो महान विष्णुभक्त होणार, असे भविष्य औरवाड गावच्या वजीरबाबा या अवलिया सत्पुरुषांनी वर्तविले होते आणि या विष्णुभक्ताचा जन्म कुरुंदवाड नावाच्या गावी श्रावण वद्य ६, दि. ६/८/१९२० या दिवशी रात्री दोन वाजता झाला.

### ✦ नाव

या नवजात अर्भकाचे नाव काय ठेवावे, असे अनंतरावजींनी तात्यासाहेबमहाराजांना नम्रपणे विचारले होते व त्यांच्या सांगण्याप्रमाणे मुलाचे नाव 'राम' असे ठेवण्यात आले. त्यांना 'रामजी' असे आईवडील प्रेमाने म्हणत. बाहेरची माणसे 'रामभाऊ' म्हणतात. पण भक्त त्यांना नुसतेच महाराज अथवा दादा किंवा दादामहाराज म्हणतात. दादामहाराजांनी आपल्या लेखनामध्ये 'दासराम' अशी मुद्रिका वापरली आहे. रामानंदमहाराज व नागाप्पाण्णामहाराज यांनी त्यांना 'प्रल्हाद' म्हटले. हे प्रल्हाद नाव दादामहाराजांना मिळालेल्या गुरुलिंगगीतेत वारंवार येते.

### ✦ कोटणीसमहाराजांचा कृपानुग्रह

इ. स. १९२० साली तात्यासाहेब कोटणीसमहाराज कुरुंदवाडकर श्रीमंतांकडे कीर्तनासाठी आले होते. त्यांचा आशीर्वाद नूतन बालकाला मिळावा म्हणून अनंतरावजींनी महाराजांना आमंत्रण दिले. "बाळावर कृपा असावी," असे बोलून अनंतरावांनी बाळाला महाराजांच्यापुढे ठेवले. मुलाला आपल्या मांडीवर ठेवण्यास कोटणीसमहाराजांनी सांगितले व "आहेच मुळी हा राम आमचा," असे म्हणून बाळाच्या मस्तकावरून आपला वरदहस्त फिरवून, बाल-रामाला दृष्टिद्वारा कृपानुग्रह दिला. यावेळी रामाचे वय फक्त १४ दिवसांचे होते. "हा आमचा राम अगदी बालपणापासून कीर्तन करू लागेल," असा आशीर्वादही सर्वांच्यादेखत कोटणीसमहाराजांनी दिला. तो पुढे खरा ठरलाच.

### ✦ घरी भक्ती वाढली

यथावकाश सौ. इंदिराबाई बाल-रामासह सांगलीस आल्या. कालांतराने इ. स. १९२४ मध्ये तात्यासाहेब कोटणीसमहाराजांचे निर्याण झाले. त्याच वर्षीच्या माघ वद्य ३ पासून तात्यासाहेबमहाराजांच्या आज्ञेनेच श्रीमामामहाराजांनी नित्याचे हरिकीर्तन सुरू केले. श्रीदादामहाराजांच्या घरातील भक्तीच्या वातावरणात अधिकच भर पडली.

### ✦ बालपणचे खेळ

प्रथमपासून श्रीदादामहाराज इतरांप्रमाणे नव्हते. त्यांचे बालपणातील खेळही इतर मुलांप्रमाणे नव्हते. देवाची पूजा करणे, देवाची पालखी काढणे, भजन-कीर्तन करणे हे त्यांचे छंद होते. आपल्या मुलाची आवड लक्षात घेऊन मामामहाराजांनी त्यांच्यासाठी एक छोटीशी पालखी तयार करून घेतली व त्यांना कीर्तनात वापरण्यासाठी

लहान वीणाही आणला. श्रीदादामहाराजांच्या या कार्यक्रमांना अनेक समवयस्क सवंगडी उपस्थित असत.

### ✦ साधन–कीर्तन यांचा प्रारंभ

आपल्या वयाच्या पाचव्या वर्षापासूनच श्रीदादामहाराज साधनास बसू लागले आणि कीर्तनही करू लागले. त्यांची वेदान्तप्रचुर कीर्तने ऐकून श्रीरामानंदमहाराज खटावकर अतिशय खूष झाले व ते त्यांना 'प्रल्हाद' म्हणू लागले. सातव्या वर्षी श्रीदादामहाराजांची काव्यस्फूर्ती प्रगटली व ती पारमार्थिक काव्यरूपात व्यक्त होऊ लागली. नवव्या वर्षीपासून त्यांनी दैनिक १३,००० जप सुरू केला.

### ✦ उपनयन व शिक्षण

वयाच्या सातव्या वर्षी श्रीदादामहाराजांचे उपनयन झाले. आठव्या वर्षापासून ते जवळच्या मराठी शाळा नं. २ मध्ये जाऊ लागले. मराठी चौथी उत्तीर्ण झाल्यावर ते जवळील सिटी हायस्कूलमध्ये इंग्रजी शिक्षणास गेले. पण शिक्षणात त्यांचे फारसे लक्ष नसे. त्यांच्या त्यावेळच्या उपलब्ध वह्यांमध्ये अभंग-पदे लिहिलेली आढळतात.

### ✦ सिद्धानंद प्रगटले

रामानंदमहाराज खटावकर दादामहाराजांची कीर्तने अत्यंत आस्थेने ऐकत. असेच एकदा दादामहाराजांचे कीर्तन चालू असता एक अपूर्व सुवास सुटला. तेव्हा रामानंदमहाराजांनी खुलासा केला, "प्रल्हादाच्या चिमड संप्रदायाचे आद्य सत्पुरुष श्रीनिंबरगीकरमहाराज हे सिद्धानंदरूप धारण करून प्रगट झाले आहेत. त्यांच्या आगमनाची खूण म्हणून हा सुगंध सुटला आहे."

### ✦ रामदासबोध लिहिला

एकदा श्रीरामानंदमहाराज श्रीदादामहाराजांना म्हणाले, "प्रल्हादा, तू संतवचनांचे हृद्गत सांगशील काय ?" "तात्यासाहेबमहाराजांच्या कृपेने व आपल्या आशीर्वादाने हे काम मजकडून होईल," असे बोलून श्रीदादामहाराज घरी आले. त्यांनी १६९ ओव्यांचे 'रामदासबोध' नावाचे प्रकरण लिहिले. या छोट्या ग्रंथात साधनाची प्रक्रिया वर्णिलेली आहे. यावेळी दादामहाराजांनी वडिलांना विचारले, "मी जे साधनास बसतो, ते बरोबर आहे ना ?" त्याला उत्तर न देता मामामहाराजांनी मुलाला बाबूराव कोटणीसमहाराजांच्याकडे पाठविले. दादामहाराज करतात ते साधन बरोबर आहे, असा त्यांनी निर्वाळा दिला.

### ✦ भगवान रामाचे दर्शन

"मला रामाचे दर्शन घडवा," असा हट्ट एकदा श्रीदादामहाराजांनी वडिलांच्याजवळ धरला. मामामहाराज बोलले, "रामजी, येत्या शनिवारी तुला रामाचे दर्शन होईल." शनिवार उजाडला. श्रीदादामहाराज व त्यांचे मित्र यांनी रामाच्या स्वागताची तयारी केली व अंगणात बसून भजन सुरू केले. थोड्याच वेळात पश्चिम दिशेला हातात धनुष्यबाण घेतलेले व नौकेत बसलेले राम-लक्ष्मण दिसू लागले.

### ✦ पोवाडा गायन

सद्‌गुरू तात्यासाहेबमहाराजांचे गुणगान करणारा एक पोवाडा एकदा दादामहाराजांनी रचला. त्यांच्या पोवाडा गायनाचा कार्यक्रम बाबूराव कोटणीसांनी आपल्या मंदिरात केला. या पोवाडा गायनाबद्दल श्रीदादामहाराजांना पारितोषिकेही मिळाली.

### ✦ तुकाराममहाराजांचे दर्शन व बोध

श्रीदादामहाराजांच्या आत्याबाई गंगूताई पटवर्धन या सांगलीतच राहात होत्या. त्यांचे एक नातेवाईक सातारा गावी होते. नारायण व हरी या आपल्या आतेभावांसह दादामहाराज एकदा सातारला गेले असता, दि. २१।५।१९३७ रोजी त्यांना स्वप्नात तुकाराममहाराजांचे दर्शन झाले. त्यांनी श्रीदादामहाराजांना एका अभंगाद्वारे बोध केला तो अभंग श्रीदादामहाराजांनी जागे झाल्यावर लिहून ठेवला.

### ✦ सद्‌बोधदशक

त्यानंतर श्रीदादामहाराजांनी आपल्या संप्रदायातील साधुमहाराज, इत्यादी सत्पुरुषांनी आपणास बोध करावा, अशी प्रार्थना केली. त्यांनी केलेला बोध श्रीदादामहाराजांच्या मनात प्रगट झाला. तो त्यांनी दहा अभंगांत काव्यबद्ध केला व त्याला 'सद्‌बोधदशक' असे नाव दिले. नंतर दि. ११।६।१९३७ रोजी त्यांना स्वप्नात तात्यासाहेबमहाराज व निंबरगीकरमहाराज यांचे दर्शन झाले. निंबरगीकरमहाराज म्हणाले, "रामा, तुझे सद्‌बोधदशक जो नित्यनेमाने वाचील, तो भगवद्भक्त होईल."

### ✦ गुरुतृतीया उत्सवाचा प्रारंभ

इ. स. १९३७ साली साधुदासांनी लिहिलेले हणमंतरावजी कोटणीसांचे चरित्र प्रसिद्ध झाले. त्यात, तात्यासाहेबमहाराजांनी निर्वाणानंतर प्रगट होऊन मामामहाराजांना नित्यकीर्तनाची आज्ञा दिली, हा प्रसंग वर्णिलेला होता. ही घटना कळताच या प्रसंगाची स्मृती म्हणून तात्यासाहेबमहाराज प्रगट झालेल्या माघ वद्य तृतीयेदिवशी - गुरुतृतीयेला

महाराजांच्या प्रगटकालाचे कीर्तन दादामहाराज करू लागले.

### ✦ गुंडूबुवांची घोषणा

तात्यासाहेबमहाराजांच्या निर्याणानंतर हनुमान समाधिमंदिरात मामामहाराजांची कीर्तने पुण्यतिथि-उत्सवात होऊ लागली. या कीर्तनांस कधी कधी बुधगावचे गुंडूबुवा हे विदेही साधू येत. १९३७ साली एके दिवशी मामामहाराजांचे कीर्तन संपल्यावर श्रीमामामहाराज व दादामहाराज घरी परत येत असताना, मागच्या बाजूने गुंडूबुवा आले आणि श्रीदादामहाराजांच्या अंगावर आपली कफनी झटकून बोलले, ''हे प्वार लई ग्वाड आहे.''

### ✦ गोविंदपंत घोसरवाडकरांचे वचन

या सुमारास गोविंदपंत घोसरवाडकर हे एकदा मामामहाराजांच्याकडे आले होते. प्रवेशद्वारातच त्यांच्या अंगात हालसिद्धमहाराजांचा संचार झाला. त्यांना नमस्कार करण्यास श्रीदादामहाराज पुढे गेले. गोविंदपंतांनी हात धरून त्यांना थांबविले व म्हटले, ''रामभाऊ, तुमच्या डोळ्यांत मला आत्मतेज दिसते आहे. तुम्ही मला नमस्कार करू नका.''

### ✦ श्रीनागाप्पाण्णामहाराजांचा आशीर्वाद

श्रीदादामहाराज १९३९ साली साधुमहाराजांच्या रथोत्सवासाठी चिमडास गेले. त्यावेळी माईसाहेब यरगट्टीकरांच्या सूचनेवरून चिमडपीठस्थ नारायणमहाराज यरगट्टीकर यांनी कार्तिक प्रतिपदेला सकाळी श्रीदादामहाराजांचे कीर्तन आयोजित केले. या कीर्तनात निंबरगीकरमहाराजांचे अधिकारसंपन्न नातू श्रीनागाप्पाण्णामहाराज उपस्थित होते. श्रीदादामहाराजांचे कीर्तन ऐकल्यावर संतुष्ट झालेल्या श्रीनागाप्पाण्णामहाराजांनी, ''हा खरोखरच प्रल्हाद आहे,'' अशी दादामहाराजांची प्रशंसा केली. पुढे श्रीनागाप्पाण्णामहाराजांना दादामहाराजांनी काही पारमार्थिक प्रश्न विचारले. त्यांनी काही प्रश्नांची उत्तरे दिली व बाकीचा खुद्द भाग निंबरगीकरमहाराजच तुम्हाला सांगतील, असे ते बोलून गेले. याच चिमडच्या मुक्कामात नागाप्पाण्णामहाराजांनी निंबरगीकरमहाराज वापरत असलेली चिलीम श्रीदादामहाराजांना प्रसाद म्हणून दिली.

### ✦ गुरुलिंगगीता-श्रुती

श्रीदादामहाराज चिमडहून परतल्यावर १-२ महिने गेले आणि एक चमत्कार घडला. इ. स. १९३९ च्या पौष शुद्ध नवमीला निंबरगीकरमहाराज दादामहाराजांच्या

पुढे साक्षात प्रगट झाले आणि ''येनू इल्लदानू '' हे कानडी पद उच्चारून त्यांनी श्रीदादामहाराजांना बोध केला. श्रीदादामहाराजांनी महाराजांच्या पायांवर मस्तक ठेवले. महाराज अंतर्धान पावले. महाराजांनी ऐकवलेला अभंग दादामहाराजांना लगेच पाठ झाला व तो त्यांनी लिहून ठेवला व तो अभंग ते रोज म्हणू लागले. पुढेही असेच अनेक कानडी अभंग श्रीदादामहाराजांना ध्वनिरूपाने ऐकू आले व प्रकाशरूपाने दिसले. 'येनू इल्लदानू' या अभंगाचे मराठीत रूपांतर असे आहे :-

*अरे काही नाही हे तू-तुझे कशाला।*
*सत्य एकलाला चिदानंद आत्मा ॥१॥*
*जीवात्मयालागी जन्ममरण नाही।*
*अंतर्मुख बाळा पाही नादबिंदुरूपी ॥२॥*
*ऐक ऐक रामा गुरुनाम घेई।*
*गुरुपदकमलठायी भृंगरूपे राही ॥३॥*

### ✦ रेवणसिद्धांचे दर्शन

एकदा श्रीदादामहाराज आपले मामा पंडितराव यांच्याबरोबर १९४० साली विटे येथील रेवणसिद्धांच्या दर्शनास गेले. दर्शनाचे वेळी सुगंध सुटला. सांगलीला परतल्यावर श्रीदादामहाराजांना स्वप्नात रेवणसिद्धांचे दर्शन झाले. रेवणसिद्धांनी त्यांच्या मस्तकाला विभूती लावली. सकाळी श्रीदादामहाराजांना रेवणसिद्धांच्या स्तुतिपर अभंग स्फुरले. या अभंगांना त्यांनी 'रेवणसिद्धपाठ' असे नाव दिले.

### ✦ साधनाची बैठक

दादामहाराजांची प्रकृती प्रथमपासून अशक्त आहे. एकदा त्यांच्या मातोश्री त्यांना सहज म्हणाल्या, ''रामजी, तू कीर्तनात साधनाबद्दल पुष्कळ सांगतोस. पण तुला स्वत:ला जमेल काय नऊ नऊ तास साधन करायला ?'' यावर ते काहीच बोलले नाहीत. दुसरे दिवशी सकाळचे कार्यक्रम आटोपून ते माडीवरच्या खोलीत साधनाला बसले आणि संध्याकाळी मातोश्रींनी जेव्हा फारच आग्रह केला, तेव्हाच साधनाची बैठक सोडून ते खाली आले.

### ✦ पूर्वजन्मीचे योगी

इ. स. १९४०-४१ च्या सुमारास दादामहाराजांच्या वाड्यात गोसावी आडनावाचे एक कुटुंब भाड्याने राहण्यास गेले. त्यात माणिक या नावाचा एक तरुण मुलगा होता. त्याची दादामहाराजांच्यावर फार श्रद्धा बसली. तो सारखा त्यांच्याजवळ

जाऊन बसत असे. ते त्याच्या घरच्या मंडळींना रुचेनासे झाले. या गोसावी कुटुंबात शंकरमहाराज मिरीकर येत असत. त्यांना माणिकने दादामहाराजांच्याविषयी पृच्छा केली. तेव्हा ते म्हणाले, ''रामभाऊ केळकर हे पूर्वजन्मीचे योगी आहेत.'' हे ऐकताच घरच्या मंडळींची समजूत पटली व त्यांचा विरोध मावळला.

### ✦ कर्नाळला गमन

काही काळाने हे गोसावी कुटुंब आपल्या कर्नाळ या गावी राहाण्यास गेले. माणिकला फार वाईट वाटले. जाताने तो दादामहाराजांना म्हणाला, ''दादा, तुम्ही एकदा कर्नाळला आमच्याकडे या.'' दादामहाराजांनी ते मान्य केले. पुढे एकदा माणिक सांगलीस आला असताना दादामहाराज त्याला म्हणाले, ''माणिक, काल मी तुझ्याकडे कर्नाळला आलो होतो. काल संध्याकाळी तू आपल्या घराच्या परसात जाऊन मला साष्टांग नमस्कार घातलास. तेव्हा मी तेथे होतो.'' ही खूण माणिकला पटली व श्रीदादामहाराज कर्नाळला येऊन गेल्याचे त्याला उमगले.

### ✦ कूट अभंगपदांवर टीपा

बाबूरावमहाराज कोटणीसांनी प्रकाशित केलेल्या 'कैवल्यवैभव' या ग्रंथात संतांचे काही कूट अभंग आहेत. दादामहाराज अधूनमधून त्यांच्याकडे जात असत. एकदा बाबूरावजी त्यांना म्हणाले, ''रामभाऊ, तुम्ही आम्ही या कूट पदांवर टीपा लिहू.'' दादामहाराज, ''हो'' म्हणाले. ते घरी आले आणि त्या कूट पदांवरील टीपा त्यांनी लगेच लिहून टाकल्या. त्यांतील काही 'दासरामगौरवग्रंथ' यामध्ये प्रकाशित झालेल्या आहेत.

### ✦ विवाह

दादामहाराज मॅट्रिकच्या वर्गात शिकत असतानाच त्यांच्या विवाहाचा योग जुळून आला. इचलकरंजीच्या मराठे मिल्सचे संस्थापक श्री. बळवंतराव मराठे यांच्या मधयस्थीने इचलकरंजी गावातील दत्तोपंत गोवंडे व सौ. गिरिजाबाई गोवंडे यांची कनिष्ठ कन्या मालती ही वधू नेमस्त झाली. हा विवाह नृसिंहवाडीस माघ वद्य ११, शके १८६४ (इ. स. १९४२) या शुभदिनी संपन्न झाला. सासरी सौ. सीता असे नाव ठेवण्यात आले. सौ. सीतावहिनी पारमार्थिक वातावरणात चटदिशी रुळल्या आणि त्या आपल्या पतीच्या परमार्थाला पूरक झाल्या.

### ✦ तुंग गावातील निरूपण

सांगलीजवळ तुंग नावाचे गाव आहे. तेथील मारुतीच्या मंदिरात एकदा

दादामहाराजांचे निरूपण ठरले. दादामहाराज व साथीची अन्य मंडळी बैलगाडीने तुंगला निघाली. वाटेत अचानकपणे बैल बाजूच्या शेतात घुसले आणि बैलगाडी कलंडली. मंडळी पडली. बहुतेक सर्वांना मुका मार लागला. थोड्या वेळाने गाडी सरळ करून लोक तुंगाला गेले. लगेच दादामहाराजांनी निरूपण सुरू केले व ते तीन तास चालले.

### ✦ खटाव गावातील निरूपण

असेच एकदा खटाव गावी दादामहाराजांचे निरूपण होते. श्रीदादामहाराज आणि साथीची मंडळी खटाव गावाजवळ पोचली. दिवस पावसाळ्याचे असल्याने सगळीकडे चिखल होता. तेवढ्यात अंधार पडला. प्रकाशाची सोय कुणाजवळच नव्हती. कसेतरी चिखलातून जात, येरळा नदी पार करून सर्वजण पलीकडे पोचले. सगळेजण अगदी शिणून गेले होते. पण इच्छित स्थळी पोचताच दादामहाराजांनी निरूपण सुरू केले व ते पहाटे ३ पर्यंत चालले.

### ✦ योगी पुरुषाला आश्वासन

श्री. फडके नावाचे एक योगाभ्यासी या सुमारास दादामहाराजांच्याकडे आले. त्यांच्याकडून काही प्रमाद घडला असल्याने त्यांच्या गुरूंच्या गैरमर्जीमुळे त्यांच्या डोळ्यांपुढे सतत चक्र फिरत असे. दादामहाराजांनी त्यांना काही दिवस सांगलीत ठेवून घेतले व एक दिवस ते फडके यांना म्हणाले, "आता तुम्ही गुरूकडे जाऊन त्यांना माझा निरोप सांगा की, मी तुम्हास हे चक्र काढून घेण्यास सांगितले आहे." तसे त्यांनी केले. त्यांच्या डोळ्यांपुढील चक्र अदृश्य झाले.

### ✦ हंस साप्ताहिकात गुरुलिंगगीता

निंबरगीकरमहाराज दादामहाराजांना देत असलेली कानडी पदे, ज्यांना गुरुलिंगगीता म्हटले जाते, प्रसिद्ध होण्याचा योग याच काळात आला. श्री. द. वा. बेडेकर नावाच्या गृहस्थांना, गुरुलिंगगीता कशी मिळाली, हे कळले. त्यातील पदांचा अर्थ वाचून त्यांना विलक्षण वेगळे वाटले. ही कानडी पदे लोकांपर्यंत पोचलीच पाहिजेत, असे त्यांना प्रकर्षाने वाटले. बेडेकर हे सातारा येथून निघणाऱ्या 'हंस' या सनातनधर्माच्या साप्ताहिकाचे वार्ताहर होते. त्यांनी दादामहाराजांच्या संक्षिप्त परिचयासह गुरुलिंगगीतेची त्यावेळची २४ पदे मराठी अर्थासह 'हंस' कडे प्रसिद्धीस पाठविली. 'हंस' च्या तीन क्रमिक अंकांत ती प्रसिद्ध झाली.

### ✦ पत्रिकेतील राजयोग

दादामहाराजांचे मुख्य लक्ष परमार्थात असल्याने, ते मॅट्रिकची परीक्षा काही

उत्तीर्ण होऊ शकले नाहीत. तेव्हा एकदा त्यांच्या मातोश्रींनी त्यांची जन्मपत्रिका श्री. छत्रे गुरुजींना दाखविली. पत्रिका पाहून गुरुजी म्हणाले, "या पत्रिकेत शिक्षण, व्यापार, नोकरी, इत्यादी कसलाच योग नाही. पण पत्रिकेत राजयोग आहे. ज्याची ही पत्रिका आहे, त्याला जीवनात कडेपर्यंत कसलीच कमतरता पडणार नाही." लौकिक दृष्टीने पाहिल्यास, दादामहाराज सुदैवी आहेत. प्रसंगानुरूप ते स्वतःच सांगतात, "लहानपणी आईवडिलांनी माझे सगळे केले. आता मुले करत आहेत. मी मात्र मधल्यामधे निवांत आहे. आत्तापर्यंत माझे आयुष्य राजासारखे गेले आहे. फक्त राज्य नाही इतकेच."

## ✦ तात्पुरती नोकरी

मॅट्रिकची परीक्षा अनुत्तीर्ण झाल्यावर दादामहाराजांनी शिक्षणास रामराम ठोकला आणि व्यवहारात आवश्यक म्हणून कुठेतरी नोकरी करण्याची तयारी दर्शविली. पुढे काहींच्या खटपटीमुळे त्यांना सांगली संस्थानातील दिवाणी ऑफिसात आणि नंतर ट्रेझरी ऑफिसात नोकरी लागली. नोकरीच्या काळात ते सहकारी सेवक आणि अधिकारी वर्ग या दोहोंतही लोकप्रिय झाले. दादामहाराज उत्तम कीर्तन-निरूपण करतात, हे कळल्यावर त्यांचे अनेक सहकारी त्यांना 'महाराज' म्हणू लागले.

## ✦ दंड माफ

एकदा असे झाले : ट्रेझरी ऑफिसातील नोकर उशिरा येतात असे कळल्यावर एकदा कलेक्टरसाहेब अचानक तपासणीस आले. उशिरा येणाऱ्या सर्वांना त्यांनी दंड केला. नेहमी वेळेवर जाणारे दादामहाराज त्यादिवशी प्रकृती ठीक नसल्याने ऑफिसात उशिरा पोचले. त्यांना दंड करण्याची कल्पना कलेक्टरसाहेबांना न रुचून त्यांनी सर्वांनाच दंड माफ केला.

## ✦ संतमंडळी निरूपणास आली

मामामहाराजांनी सुरू केलेल्या नित्यकीर्तनाला फेब्रुवारी, १९४९ मध्ये २५ वर्षे पूर्ण होत होती. दादामहाराजांनी पुढाकार घेऊन आपल्या वडिलांच्या कीर्तनाचा रौप्यमहोत्सव साजरा केला. याच वर्षी नोव्हेंबर महिन्यात तात्यासाहेबमहाराजांच्या पुतळ्याचा अनावरण समारंभ कैवल्यधामात भैय्यासाहेब पैठणकरमहाराज यांच्या हस्ते संपन्न झाला. त्यावेळी ह. भ. प. लमक्ष्मणबुवा निजामपूरकर यांच्या शिफारशीवरून भैय्यासाहेब व त्यावेळी जमलेली अन्य संतमंडळी दादामहाराजांच्या घरी त्यांचे निरूपण ऐकण्यास आली. सर्व संतसज्जनांना दादामहाराजांचे निरूपण फारच आवडले.

## ✦ श्रीमंत देहूकरांचे वचन

इ. स. १९५२ च्या सुमारास श्रीदादामहाराज तुकाराममहाराजांच्या देहू गावी गेले होते. तेथे तुकाराममहाराजांचे वंशज श्रीबाबासाहेब देहूकर यांनी दादामहाराजांचा सत्कार केला. तेथे दादामहाराजांचे निरूपण झाले. ते ऐकल्यावर भारावून गेलेले देहूकर म्हणाले, "रामभाऊ, तुम्हीच तुकाराममहाराजांचे खरे वंशज आहात. कारण तुम्ही उत्कृष्ट कीर्तन-निरूपण करता."

## ✦ गुरुलिंगगीता ग्रंथप्रकाशन

इ. स. १९३९ साली दादामहाराजांना पहिले कानडी पद मिळाले. त्यानंतर ही पदे दादामहाराजांना अधूनमधून मिळतच होती. इ. स. १९५३ पर्यंत ही पदे ६६ झाली. तेव्हा पठणाच्या सोयीसाठी माधवनगरच्या ह. भ. प. वासुदेवराव जोशी यांनी ही पदे पुस्तकरूपाने प्रकाशित केली.

## ✦ तुम्हाला देवदर्शन झाले आहेच !

एकदा वासुदेवराव जोशी यांच्याबरोबर श्रीदादामहाराज हे कुरुंदवाडला श्रीमंत शि. वि. पटवर्धन यांच्याकडे गेले होते. श्रीदादामहाराजांचे कीर्तन ऐकल्यावर श्रीमंत म्हणाले, "महाराज, आपला अधिकार मोठा आहे. आपण मला देव दाखवा." तेव्हा दादामहाराज त्यांना म्हणाले, "श्रीमंत, आपण रोज गजाननाची पूजा करता. मागे एकदा तुम्ही अशीच पूजा करीत असताना देवापुढचा विजेचा दिवा गेला. देवापुढे अन्य कुठलाच दिवा नव्हता. त्यावेळी तुम्हाला प्रकाश दिसला. हे सर्व तुम्हाला आठवते काय ?" श्रीमंतांना तो प्रसंग आठवला व त्यांनी होकार दिला. "तो प्रकाश म्हणजेच देव. तो तुम्हाला दिसला आहे," दादामहाराजांनी सांगितले. मग श्रीमंतांनी प्रश्न केला, "आता पुन्हा मला का देव दिसत नाही ?" "ती पूर्वीची अवस्था तुम्हाला पुन्हा जेव्हा प्राप्त होईल, तेव्हा पुन्हा देव दिसेल," दादामहाराजांनी उत्तर दिले.

## ✦ नोकरीचा त्याग

इ. स. १९४८ नंतर सांगली संस्थान विलीन झाले. नोकरांच्या आता बदल्या होऊ लागल्या. दादामहाराजांना तर बदली नको होती. तेव्हा 'बदली होईल तिकडे जावे. अन्यथा ग्रॅच्युईटी घेऊन सेवामुक्त व्हावे,' असा पर्याय दादामहाराजांना दिला गेला. बदली पत्करली, तर मामा महाराजांचे कीर्तन श्रवण अंतरेल, असा विचार करून दादामहाराजांनी ग्रॅच्युईटी घेऊन नोकरी सोडण्याचा मार्ग धरला. "माझा जन्म नोकरी करण्यासाठी नाहीच," असे दादामहाराज नेहमीच म्हणत.

## ✦ पालघरात निंबरगीकरमहाराजांचे दर्शन

पालघरच्या श्रीमंत माईसाहेब दांडेकर अलीकडे मामामहाराजांच्या कीर्तनांस येऊ लागल्या होत्या. त्यांच्या आग्रहाने दादामहाराज, मे, १९५६ मध्ये पालघरला कीर्तने करण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांना २६।५।५६ रोजी स्वप्नात, "तू इथे गुरुलिंगगीता वाचत आहेस पण तिकडे सांगलीत रथाचे चाक अडले आहे," असे शब्द ऐकू आले. त्याच रात्री पहाटे ५॥ च्या सुमारास निंबरगीकरमहाराज प्रगट झाले व त्यांनी एक कानडी पद उच्चारले. त्यावरून दादामहाराजांच्या लक्षात आले की, गुरुलिंगगीताजयंतीच्या दिवशी आपण सांगलीत आपल्याच घरी असावयास हवे. लगेच ते सांगलीला परत निघाले. त्या वर्षी गुरुलिंगगीताजयंतीच्या दिवशी सकाळी सांगलीत रथ निघू शकला नव्हता. दादामहाराज तेथे पोचल्यावर संध्याकाळी रथोत्सव करण्यात आला.

## ✦ पितृ-मातृछत्र हरपले

मामामहाराजांच्या नित्याच्या हरिकीर्तनाला १९६० साली छत्तीस वर्षे पुरी होत होती. पुढाकार घेऊन दादामहाराजांनी मामामहाराजांच्या कीर्तनाचा त्रितपमहोत्सव साजरा केला. या उत्सवानंतर मामामहाराजांची प्रकृती हळूहळू खालावत चालली आणि शके १८८३, माघ शुद्ध नवमी या दिवशी मामामहाराजांचे निर्याण झाले. दादामहाराजांचे पितृछत्र हरपले. तो पोरके झाले. पण झालेले दुःख बाजूला सारून वडिलांच्या आज्ञेप्रमाणे दादामहाराजांनी माघ शुद्ध दशमीपासून पित्याची नित्यहरिकीर्तनाची परंपरा पुढे चालू ठेवली. मामामहाराजांच्या निर्याणाला एक वर्ष पूर्ण होण्याच्या आतच दादामहाराजांच्या मातोश्रींचाही कैलासवास झाला. मातृवियोगाचा शोकही आवरून दादामहाराज दैनिक पारमार्थिक कार्यक्रमांत गुंग राहिले.

## ✦ दैनिक कार्यक्रम

मामामहाराजांच्या निर्याणानंतर त्यांचे सर्वच दैनिक कार्यक्रम दादामहाराजांनी जसेच्या तसे चालू ठेवले. इतकेच नव्हे, तर मामामहाराजांच्या रामपाठाचे दैनिक पठण आणि निंबरगीकरमहाराजांच्या वचनाप्रमाणे रोजचे त्रिकाल साधन हे दोन अधिक कार्यक्रम दादामहाराजांनी नवीनच सुरू केले. खेरीज मामामहाराजांच्या पुण्यतिथीच्या दिवशी - गोविंदनवमीला मामामहाराजांच्या आराधनेचे कीर्तनही सुरू केले. तसेच मामामहाराज ज्या ठिकाणी बसून कीर्तन करीत, त्या ठिकाणी दादामहाराजांनी एक पाषाणाचे सिंहासन स्थापन केले व त्याची पूजाअर्चा सुरू केली.

## ✦ कीर्तननिष्ठा

पितृदेवांना आश्वासन दिल्याप्रमाणे दादामहाराज रोजचे कीर्तन करू लागले. त्यांची कीर्तननिष्ठाही जाज्वल्य आहे. तिची परीक्षा होण्याचा समयही लवकरच आला. या संदर्भात दोन प्रसंग सांगण्यासारखे आहेत. मार्च १९६७ मध्ये दादामहाराजांना दोन-तीन डिग्री ताप आला. एके दिवशी तर संध्याकाळच्या सुमारास दीड डिग्री ताप होता. अशा तापातच त्यांनी कीर्तन सुरू केले आणि ते नेहमीप्रमाणे उत्कृष्ट झाले. इ. स. १९७९ च्या उत्तरार्धात दादामहाराजांना मूळव्याधीने हैराण केले. चालणे आणि विशेषतः बसणे या क्रिया अतिशय त्रासदायक झाल्या. पण त्याही परिस्थितीत दादामहाराजांचे नित्यकीर्तन चालूच राहिले.

## ✦ इथे का आलात ?

कोल्हापूर येथे भागवतवार म्हणून एक मोठे ऑफिसर आहेत. त्यांच्याकडे नानामहाराज तराणेकर आले होते. अनेक लोक दर्शनास येत होते. त्यांमध्ये सांगलीचे एक गृहस्थ होते. त्यांना नानामहाराजांनी विचारले, ''अहो, तुम्ही सांगलीचे ना ?'' ''होय,'' ते गृहस्थ म्हणाले. ''मग सांगलीला रामभाऊ केळकरमहाराजांच्याकडे न जाता तुम्ही इथे कशाला आलात ? तुमचे काम तेथेच झाले असते,'' नानामहाराज उद्गारले.

## ✦ हालसिद्धांचा प्रसाद

इ. स. १९७२ सालातील गोष्ट. 'नमनस्तोत्र' हे पुस्तमक शंकरमहाराज शिपूरकरांना भेट देण्यास दादामहाराजांनी दिले. ते घेऊन नारायणराव कुंभोजकर अप्पाच्या वाडीला गेले. पुस्तक स्वीकारल्यावर शंकरमहाराजांनी दादामहाराजांना देण्यास भंडारा दिला. त्यात नारायणरावांना १ रुपयाची एक नोट व चार आण्याचे एक नाणे सापडले. ते शंकरमहाराजांच्याकडे जाऊन म्हणाले, ''तुम्ही दिलेल्या भंडाऱ्यातून सव्वा रुपया आला आहे. तो परत घ्या.'' शंकरमहाराज बोलले, ''सव्वा रुपया भंडाऱ्यात घालून मी दिलेला नाही. तो हालसिद्धांनीच दिला आहे. तो तुम्ही भंडाऱ्यासह प्रसाद म्हणून रामभाऊ केळकरमहाराजांना नेऊन द्या.''

## ✦ महाराजांचेच देतो

नारायणराव हे गुरुसिद्दप्पामहाराजांचे सुनेस घेऊन दादामहाराजांकडे आले व म्हणाले, ''यांना नाम द्यावे.'' दादामहाराजांनी विचारले, ''गुरुसिद्दप्पामहाराजांनीच तुम्हाला माझ्याकडे पाठविले काय ?'' ते, ''होय'' म्हणाले. तेव्हा दादामहाराज म्हणाले, ''आहे हे सर्व निंबरगीकरमहाराजांचे आहे. तुमचे तुम्हालाच द्यावयाचे आहे.

गुरुसिद्दप्पामहाराजांचीच आज्ञा म्हणजे निंबरगीकरमहाराजांची आज्ञा. म्हणून महाराजांचे स्मरण करून ते जे सांगतील, तेच मी तुम्हाला सांगेन.''

### ✦ केळकरमहाराजांकडे जा

अप्पाची वाडी या गावी १९७३ साली घडलेला प्रसंग. भाद्रपद अमावास्येला शंकरमहाराज शिपूरकरांनी दादामहाराजांना आग्रहपूर्वक अप्पाचे वाडीला नेले होते. तेथे शिरगुप्पीकर नावाचे गृहस्थ शंकरमहाराजांना म्हणत होते, ''माझ्या मनाला शांतिसमाधान नाही.'' हातात भंडारा घेऊन शंकरमहाराज बोलले, ''डॉक्टरांनी आशा सोडली असता देवाने तुला कॅन्सरच्या दुखण्यातून वाचविले आहे. देवानेच तुला व केळकरमहाराजांना आज येथे एकत्र आणले आहे. त्यांना लगेच नमस्कार कर आणि नंतर सांगलीस जाऊन त्यांच्याकडून उपदेश घे. आता चिमड संप्रदायात रामभाऊ केळकरमहाराजांच्याशिवाय अन्य कोणी श्रेष्ठ अधिकारी सत्पुरुष नाही.''

### ✦ सततचा ईश्वरसंचार

गोविंदपंत घोसरवाडकरांचे अधिकारी चिरंजीव बाबूराव अण्णा यांना भेटण्यास दादामहाराज त्यांच्याकडे गेले होते. त्यावेळी ते दादामहाराजांना म्हणाले, ''महाराज, आमच्या अंगात देवाचा संचार कधीतरी होतो. पण तुमच्या अंगात देव कायमचाच संचारलेला आहे, हे मला तुमच्या दृष्टीवरून दिसते आहे.''

### ✦ संजीवन समाधीत सुगंध

दादामहाराजांच्या अनल या तृतीय पुत्राचा विवाह १९७६ सालच्या डिसेंबर महिन्यात झाला. मग घरच्या सर्व मंडळींसह दादामहाराज हे अप्पाच्या वाडीला हालसिद्धांच्या दर्शनास गेले. तो दिवस कौल लावण्याचा नसूनही शंकरमहाराजांनी देवाला कौल लावला व तो दादामहाराजांना अनुकूल असाच होता. त्यानंतर हालसिद्धांच्या संजीवन समाधीच्या घुमटीत सर्वजण गेले, तोच एक दिव्य, अद्भुत, अपूर्व आणि अवर्णनीय असा सुवास सर्वांना जाणवला. दादामहाराज घुमटीत असेपर्यंत सुमारे अर्धा तास हा सुगंध दरवळत होता. श्रीदादामहाराज घुमटीबाहेर आले आणि सुवास संपला.

### ✦ सोहं स्वरूप आज कळले

कोल्हापूर शहरात विश्वनाथमहाराज रुकडीकरांच्या १९७८ सालातील पुण्यतिथीच्या उत्सवात दादामहाराजांचे कीर्तन झाले. कीर्तनाला पावसच्या स्वामी स्वरूपानंदांचे शिष्य अमलानंद हे उपस्थित होते. 'सोहं स्वरूप ते जाण। न कळे सद्गुरूवाचून।।' या अभंगावर दादामहाराजांचे अभूतपूर्व कीर्तन झाले. कीर्तन संपताच

दादामहाराजांना आलिंगन देऊन अमलानंद उद्गारले, ''आजच्या तुमच्या कीर्तनात 'सोहं' चे खरेखुरे स्वरूप सर्वांना समजले.''

### ✦ त्यांना अनुग्रह आहेच

मुंबईत वास्तव्य करून असणारे पंडित आडनावाचे एक दांपत्य इ. स. १९७८ मध्ये दादामहाराजांच्याकडून मार्गदर्शन मिळवण्यास आले. दादामहाराज श्रीयुत पंडितांना म्हणाले, ''मी तुम्हाला सांगेन. पण तुमच्या सौभाग्यवतींना नाही. कारण त्यांनी कलावतीबाईंचा अनुग्रह घेतलेलाच आहे.'' आपल्या पत्नीच्या पूर्वानुग्रहाची माहिती पतीलाही नव्हती.

### ✦ षष्ट्यब्दपूर्ती

इ. स. १९८० साली श्रीदादामहाराजांच्या षष्ट्यब्दपूर्तीचा सोहळा त्यांच्या भक्तांनी मोठ्या थाटामाटाने पार पाडला. या प्रसंगी 'श्रीदासराम-गौरवग्रंथ' प्रकाशित करण्यात आला. त्यात श्रीदादामहाराजांचे विहंगम जीवनदर्शन, त्यांचा गौरव करणारे काही लेख व त्यांचे काही पारमार्थिक वाङ्मय प्रकाशित झाले आहे.

### ✦ निंबरगीची यात्रा

षष्ट्यब्दी सोहळ्यानंतर दादामहाराजांनी निंबरगीची यात्रा केली. बरोबर लहानथोर सुमारे १२५ माणसे होती. महाराजांच्या समाधिमंदिरात सर्वजण सकाळी ११.३० वाजता पोचले. दर्शनानंतर लगेच गुरुलिंगगीता पठण व दादामहाराजांचे कीर्तन झाले. एव्हाना दुपारचे २.३० झाले होते. लहान मुले असूनही कुठे गडबड झाली नाही व २.३० पर्यंत कुणालाच जेवणाखाणाची आठवण झाली नाही.

### ✦ ज्ञानबांना दर्शन

सांगलीस ज्ञानबा पाटील नावाचे दादामहाराजांचे एक भक्त आहेत. ते १९८१ साली निंबरगीकरमहाराजांच्या पुण्यतिथीला निंबरगीस गेले होते. तेथे महाराजांच्या समाधीजवळ त्यांना दादामहाराजांचे दर्शन झाले.

### ✦ दादा म्हणजे देव

गोविंदपंत घोसरवाडकरांचे अधिकारी नातू श्री. दत्तोपंत हे इ. स. १९८१ च्या एप्रिल महिन्यात डॉ. आपटे यांच्याकडे गेले होते. ते बोलता बोलता म्हणाले, ''श्रीदादा म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वर आहेत. त्यांना पाहिले की, मला देव पाहिल्याचे समाधान लाभते.''

### ✦ अंगाऱ्याचा गुण

बापूराव मायदेव हे दादामहाराजांचे भक्त आजरे गावी राहातात. जानेवारी,

१९८२ मध्ये त्यांच्या पत्नी अचानक अत्यवस्थ झाल्या. दादामहाराजांनी दिलेला अंगारा बापूरावांनी लगेच पत्नीला लावला आणि तिला बरे वाटू लागले. याच बापूरावांनी एकदा दादामहाराजांना विचारले, ''मला शेतात विहीर खणावयाची आहे. कुठे खणू?'' दादामहाराज बोलले, ''कुठेही खणा, पाणी लागेलच.'' त्याप्रमाणे घडून आले.

### ✦ कीर्तनाला जा

शंकरमहाराज शिपूरकरांचे डॉक्टर चिरंजीव मार्च, १९८२ मध्ये सांगलीहून कोल्हापूरला जात होते. वाटेत गाडी बंदपडली. काही केल्या त्यांची मोटार चालू होईना. तितक्यात 'सांगलीच्या केळकरमहाराजांचे कीर्तन ऐकल्याशिवाय पुढे जाऊ नका' असे शब्द त्यांच्या कानी आले. तसे करण्याचे ठरवून त्यांनी मोटार सुरू करण्याचा प्रयत्न केला, तो ती लगेच सुरू झाली. मग ते सांगलीस आले व दादामहाराजांचे कीर्तन ऐकून कोल्हापुरास गेले.

### ✦ शस्त्रक्रिया नको

दादामहाराजांना प्रोस्टेटचे दुखणे घेऊन १९८३ साल उजाडले. या दुखण्यातही त्यांचे दैनिक कार्यक्रम व नित्यकीर्तन चालूच आहेत. नित्याचे कीर्तनात खंड पडू नये म्हणून ते शस्त्रक्रिया करून घेण्यास तयार होत नाहीत.

### ✦ सौ. सीतावहिनींचे महाप्रयाण

गेली अनेक वर्षे सौ. सीतावहिनी दादामहाराजांच्या घरचा कारभार कार्यक्षमतेने करीत होत्या. त्यामुळे दादामहाराजांना तिकडे पाहावे लागत नसे. त्या नेमाने साधनही करीत असत. मार्च, १९८३ मध्ये त्यांनी महाप्रयाण केले. निर्वाणाच्या वेळेपासून अंत्ययात्रा स्मशानात जाईपर्यंत 'श्रीराम जयराम जयजय राम' या मंत्राचा घोष जमलेली मंडळी करीत होती. स्मशानात त्यांच्या गौरवपर भाषणेही झाली. दादामहाराजांचे नित्याचे कीर्तन मात्र चुकले नाही.

### ✦ पुत्र व स्नुषा

सौ. वहिनींच्यानंतर घरचा कारभार दादामहाराजांचे ज्येष्ठ चिरंजीव चंद्रशेखर अण्णा व त्यांच्या पत्नी सौ. रोहिणीताई पाहात आहेत. श्री. सूर्यकांत व श्री. अनल हे दादामहाराजांचे दोन चिरंजीव नोकरीनिमित्त परगावी असतात. तेही अधूनमधून आपल्या पत्नीमुलांसह येऊन पिताजींचे होय-नको पाहतात. दादामहाराजांचे दोन कनिष्ठ चिरंजीव अनिलप्रभू सांगलीतच नोकरीस असून तेही वडिलांची काळजी वाहतात. चंद्रशेखर व अनिलप्रभू हे दोघेही दादामहाराजांच्या नित्यकीर्तनांत पेटी व झांज वाजवून साथ करीत असतात.

शंकरमहाराज शिपूरकरांनी भंडारा हातात घेऊन सांगितल्याप्रमाणे, वर्तमानकाळात चिमड संप्रदायामध्ये श्रीदादामहाराज हेच अधिकारी सत्पुरुष आहेत व नित्य हरिकीर्तन करून ते भक्तीचा मार्ग दाखवीत आहेत. त्यांच्याबद्दल कितीतरी सांगता येईल. त्यांचे संपूर्ण जीवन साक्षात्कारी आहे. त्यांचे सर्व आयुष्यच परमार्थमय आहे. 'चैतन्याशी सतत समरसता' हे सिद्धांचे लक्षण दादामहाराजांमध्ये पूर्णपणे प्रत्ययाला येते.

*जयाची मती कीर्तनी गुंग झाली ।*
*जयाची कृती साधनी दंग झाली ।*
*जयाची रती देवकाची सदा या ।*
*नमस्कार माझा तया रामराया ॥*

●●●

## प्रकरण १३ : संदर्भसूची


१. **के. वा. आपटे यांची नोंदवही**
२. **चंद्रशेखर केळकर यांची नोंदवही**
३. **गुरुलिंगगीता**, प्र.- वासुदेवराव जोशी, माधवनगर, १९५३
४. **गोविंदचरितमानस**, न. दा. दिवेकर, सांगली, १९६३
५. **दासराम-गौरवग्रंथ**, धनंजय भावे, सांगली, १९८०
६. **मामामहाराज केळकर**, डॉ. दा. वि. कुलकर्णी, पुणे, १९८३
७. **मामामहाराज केळकर**, 'दीपलक्ष्मी' मासिक विशेषांक, मुंबई, फेब्रुवारी, १९७१


▲▲▲

# चिमड संप्रदायातील सत्पुरुषांची साहित्यसंपत्ती

चिमड संप्रदायात जे सत्पुरुष होऊन गेले आणि जे सध्या विद्यमान आहेत, त्यांतील बऱ्याच जणांचे पारमार्थिक लेखन उपलब्ध आहे. त्यांच्या प्रकाशित वाङ्मयाचा संक्षिप्त परिचय आता करून दिलेला आहे.

## ✦ रेवणसिद्ध व काडसिद्ध यांची पदे

रेवणसिद्धांची दोन कानडी भाषेतील पदे व काडसिद्धांचे एक कानडी भाषेतील पद 'कैवल्यकुंज' या ग्रंथात मराठी अर्थासह प्रसिद्ध झालेली आहेत.

रेवणसिद्धांच्या पदांत पुढील विषयांवरचे विचार आहेत : शंकराचे भजन करण्यात गेलेला जन्म भाग्याचा ठरतो. सच्चिदानंद परमात्म्याच्या ध्यानात मग्न होऊन जावे. चंचल मनाला एकाग्र करून अनाहत नादात विरून जावे. सद्गुरूंची कृपा झाल्याखेरीज ब्रह्माचे खरे स्वरूप कळत नाही. मोत्याचे रूपक करून ब्रह्माचे वर्णन असे आहे :- या मोत्याला उदयास्त नाही. तो कोटिसूर्याप्रमाणे तळपतो. तो मस्तकात वास करतो. परमार्थातील साक्षात्कार असे होतात :- पूर्व दिशेला उगवलेला तारा पुढे भ्रूमध्यात शोभायमान होतो. पश्चिम दिशेस वीज चमकते. ऊर्ध्वगिरीवरून हिरवा, पिवळा, तांबडा या रंगांचा वर्षाव होतो. अवकाश नाहीसे होऊन दिसणारे निरवकाश म्हणजेच मूलब्रह्म होय.

काडसिद्धांचे पद हे एक कूटपद आहे. त्यात म्हटले आहे, 'मोड नसलेले बी पेरा व अमाप रास करा. तिने आपले घर भरून टाका. उरलेले धान्य मोजक्या प्रमाणात इतरांना विका. दांडा नसलेली कुऱ्हाड घेऊन पूर्व दिशेस असणारी मुळी तोडून टाका, एका घावात तीन तुकडे करा. तीन अंगुळे असलेल्या स्थळावर सहा पर्वत दडलेले आहेत. उन्मनीचे दार उघडून त्यांना पाहा. जीभ नसलेली घंटा वाजवून तिच्यातून निघणारे नाद व शब्द स्थिर करा.'

## ✦ काडसिद्धमहाराजांची प्रवचने

काडसिद्धांच्या सिद्धगिरी पीठावरील विद्यमान मठपती काडसिद्धेश्वरमहाराज यांची प्रवचने मुंबईहून निघणाऱ्या सिद्धगिरिसंदेश या त्रैमासिकातून प्रसिद्ध होत असतात. त्यांतील काही भाग पाहा : सुखप्राप्तीसाठी आपला प्रयत्न चालू आहे. देहाचे सुखदुःख ते आपले, असे मानल्याने, आपली दुःखपरंपरा चालू राहते. शास्त्र व संत सांगतात की, परमार्थ केल्यानेच मानव सुखी होतो. संतांकडून सुखप्राप्तीचा मार्ग कळतो. योग्य

मार्गदर्शन नसल्यास परमार्थ साधत नाही. परमार्थ होण्यास जिज्ञासा, अधिकार, गुरू, उमेद, जिद्द, इत्यादी गोष्टी आवश्यक असतात. वासनावृद्धी हा परमार्थाला फार मोठा धोका आहे. मन परब्रह्मी रंगले की, ते ब्रह्मरूप होते. सर्वतृप्ती म्हणजे ब्रह्म. त्यासच परमार्थ हे नाव आहे.

### ✦ निंबरगीकरमहाराजांचा बोध व पदे

निंबरगीकरमहाराज प्रवचने करीत, ती रघुनाथाचार्य आद्य यांनी लिहून घेतली. त्यांतील वचनांचा मराठी अनुवाद 'बोधसुधा' या पुस्तकात प्रसिद्ध झाला आहे. निंबरगीकरमहाराजांचा सविस्तर उपदेश 'कैवल्यबोध' या मराठी ग्रंथामध्ये उपलब्ध आहे. तो संक्षेपाने असा : संसारात सुख शोधणे म्हणजे मृगजळाने साळीकेळी पिकविण्याची इच्छा करणे आहे. संसारात दुःख होऊ नये असे वाटत असेल, तर आपण दुसऱ्याला दुःख देऊ नये. दुसऱ्याला सुख दिले, तर आपल्यासही सुख होते.

संसारात नाना चिंता असतात. चिंता केल्याने उदासपणा येतो. म्हणून व्यावहारिक गोष्टींची चिंता सोडून आत्म्याचे चिंतन करावे. म्हणजे आत्मा आपली चिंता करू लागतो.

संसारात चांगल्या माणसांची संगत धरावी. संसारात राहून परमार्थ करावा. आत्मदर्शनासाठी शरीराचा उपयोग करावा. संसारात नाम घेत परमार्थ करावा. शरीर कामधामाकडे असावे पण मन आत्म्याकडे असावे. आत्म्याचे ध्यान करीत संसार करावा. काम करतानाही आत्मानुसंधान सोडू नये.

येथे जगात जे दिसेल, त्याची वासना धरू नये. देवाने आपणास जे दिले आहे, त्यात समाधान मानून राहावे.

अहंकार चांगला नाही. ज्या गोष्टीसाठी अहंकार येतो, तिचा विनाशकाळ जवळ आला आहे, असे खुशाल समजावे.

दुर्गुण वाढू देऊ नयेत. दुर्गुणांचा नाश करीत जावा. आपली वागणूक चांगली असेल, तर ब्रह्मादिक देवही आपले वाईट करू शकत नाहीत. म्हणून वागणूक सुधारत जावी. आळस सोडून आत्म्याचे साधन करावे.

षड्विकारांनी सुख न होता दुःखच होते. म्हणून षड्विकारांचे शमन करावे. सहा रिपूंना जिंकून आत्म्याला प्रसन्न करून घ्यावे.

निंबरगीकरमहाराजांची २१ पदे 'कैवल्यवैभव' ग्रंथात प्रसिद्ध झाली. त्यांची काही पदे प्रक्षिप्त आहेत, असे कुणी म्हणतात. पण ती कोणती व का हे मात्र सकारण

सांगितले जात नाही. तेव्हा कोणतेही कारण न देता काही पदे प्रक्षिप्त आहेत, हे म्हणणे तर्कदुष्ट आहे. तेव्हा ही २१ पदे महाराजांचीच मानावयास हवीत. काही काळाने अथणी गावच्या संगोराम वकिलांना संशोधनाअंती महाराजांची आणखी चार पदे मिळाली. तेव्हा पहिली २१ पदे व नवीन ४ पदे अशी २५ पदे 'कैवल्यकुंज' ग्रंथात मराठी अर्थासह प्रसिद्ध झाली आहेत. त्यांतील २४ पदे कानडी भाषेत असून एक पद हिंदी भाषेत आहे. या पदांतील विषय संक्षिप्तपणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### अ) प्रासंगिक :

१. एकदा निंबरगीकरमहाराज स्नानासाठी विहिरीत उतरले होते. परत येताना वाटेवर एक साप त्यांच्याकडे येऊ लागला. त्याला चुकविता येत नव्हते. तेव्हा महाराजांनी नेत्र मिटून नामस्मरण केले. साप नाहीसा झाला होता. त्यावेळी नामाचे सामर्थ्य सांगणारे 'ॐ नाम कायवु वदू' हे पद त्यांना स्फुरले. २. एका शाहिराने एकदा महाराजांना एक कूट सवाल टाकला. त्याचे उत्तर त्यांनी 'केळो चातुरा' या पदात मदनावर पक्ष्याचे रूपक करून दिले. मग त्यांनी 'केळु शाहिरा' या पदात विश्वावर पशूचे रूपक करून एक प्रतिसवाल केला. त्याचे उत्तर शाहीर देऊ शकला नाही. ३. 'ब्यासरादितो जन्म' या पदात आपणास जीवनाचा कंटाळा आला आहे असे सुचवून, ईश्वराने आपला देहसंग नाहीसा करावा, अशी प्रार्थना आहे.

### आ) उपदेश :

साधकावस्थेत मन भलते चाळे करते. तसेच चिंता, आशा, निद्रा, काम व वासना त्रास देतात. तेव्हा विकारांना दूर करून मनावर नियंत्रण साधकाने ठेवावे, असे 'कंडकंडने मन' आणि 'मनसिन मुरिगेय' या पदांत सुचविले आहे. साधूंचा सहवास करून आत्मसाक्षात्कार साधावा, प्राण्यांनी चिंता सोडावी, या जन्मात गुरुभजन आवश्यक आहे आणि अंत:करण मऊ करून परमार्थाचा अनुभव घ्यायचा आहे, असा भावार्थ 'गुरुचरणकमल', 'चिंत्याक माडती', 'ध्यान करो गुरुसाहेबजीका' आणि 'कळ्ळु मेत्तगे' या पदांमध्ये आहे.

### इ) प्रार्थना :

देवाने दया करावी, भवसागरातून पार करून रक्षण करावे व ईश्वराने आपल्या घरी यावे, अशा ईश्वराच्या प्रार्थना 'मुनिवरेनु रमणा', 'तारिसो एन्न' आणि 'बारो रंगा' या पदांत आढळतात.

**ई) साक्षात्कारानुभव :**

आपल्या अवतीभोवती ईश्वर असून आपल्याला इच्छित वस्तू मिळते, आपण व देव एकच झालो आणि सहस्रदळस्थानात प्रकाशणारी वस्तू पाहून आपण ब्रह्म झालो, हे महाराजांचे स्वत:चे अनुभव 'ना ह्यांग बडव', 'आंदिळ्ळा स्वामि' आणि 'गुरुता तोरिद' या पदांतून व्यक्त झाले आहेत.

## ✦ गुरुलिंगप्रसादगीता

निंबरगीकरमहाराजांनी आपल्या निर्याणानंतर अनेक वर्षांनी आपले अधिकारी नातू श्रीनागाप्पाण्णामहाराज यांच्या वचनानुसार, सांगलीच्या दादामहाराज केळकरांना पुष्कळ कानडी पदे, काही संस्कृत पदे व एक इंग्रजी काव्य दिले. कानडी पदांपैकी २४ 'हंस' साप्ताहिकात व ६६ पदे 'गुरुलिंगप्रसादगीता' या ग्रंथात प्रकाशित झालेली आहेत. उरलेल्या अप्रसिद्ध भागात स्वरगीता, अक्षरगीता, नामगीता, स्मरणगीता, मंत्रगीता, सूर्यनारायणगीता, अमृतध्वनिगीता, शतनामगीता, सहस्रनामगीता, त्रयोदशसहस्रनामगीता अशी नावे असणाऱ्या लहानमोठ्या गीता, नमस्काराष्टक, आरत्या, श्लोक, भजने आणि पदे आहेत. त्यांतील 'सिद्धस्तुति' ही प्रकाशित झाली आहे. या 'सिद्धस्तुति' मध्ये गुरुलिंगसिद्धनामस्तोत्र, रेवणसिद्धांचे ध्यान व रेवणसिद्धांची मानसपूजा आहे.

गुरुलिंगप्रसादगीता या ग्रंथातील ६६ पदांमध्ये आलेले काही विषय असे आहेत :

**(क) तत्वज्ञान :-** अरे, हे काही नाही आहे. विश्वाच्या उत्पत्तीला कर्ता असा कोणी नाही; ती हरीचे ठिकाणी कल्पनेने निर्माण झालेली आहे. सत्य एक चिदानंद आत्माराम तेवढा आहे. चिदाकाशात नि:शब्द असे परिपूर्ण ब्रह्म आहे. ब्रह्म हे स्वयंसिद्ध आहे.

**(ख) उपदेश :-** द्वैत हे आपल्या नाशाला कारणीभूत होते. सर्व संगातून अलिप्त होऊन नामामृताचे सेवन करावे. कुसंगापासून अलिप्त राहावे. जीवात्म्याचे ठिकाणी जो नाश पावण्याचा धर्म आहे, तेथेच तू जागा हो आणि या देहात असलेल्या गुरुभक्तीत तल्लीन हो. ज्या गतीवर तू स्वार झाला आहेस, ती गती एकाग्रतेने संथ अशी वाहती ठेव. वायुगतीचा पूर्ण निरोध करून, चार देहांचे पलीकडे असलेली चिद्प्रभा पाहा. ब्रह्मरंध्रचक्राचे ठिकाणी वृत्तिश्रवण होणे हाच निंबरगीश्रीहरीचा परमार्थ आहे.

**(ग) साक्षात्कार :-** सूर्यचंद्र जेथे एक होतात, त्या बिंदुमात्र विवरात जो प्रकाश आहे, त्याचे आत अग्निस्वरूप आत्म्याचा लोटच लोट आहे; तेच प्रीतप्रभायुक्त आत्मतेज आहे. दोन भुवयांच्यामध्ये साक्षिरूप आत्मा आहे. आकाशाचे आत असणाऱ्या वायूचे ठिकाणी

आत्मा हा अग्निरूपात दैदीप्यमान असतो. रविशशीलाही दिपवून टाकणारे तेज अंधारात चमकते.

### ✦ रघुनाथप्रिय साधुमहाराजांचे शिष्य

निंबरगीकरमहाराजांचे वंशज व त्यांचे शिष्य यांचे काही पारमार्थिक लेखन उपलब्ध झाले नाही. रघुनाथप्रिय साधुमहाराजांचे शिष्य चिमडमहाराज यांचे काही वाङ्मय उपलब्ध आहे.

### ✦ चिमडमहाराजांचे काव्य

चिमडमहाराजांचे काव्य सन्मार्गदीप, कैवल्यवैभव आणि कैवल्यकुंज या ग्रंथांतून प्रसिद्ध झालेले आहे. त्यात श्लोक, कटाव, आरती, अभंग व पदे असे अनेक प्रकार आहेत.

१) **श्लोक** : दोन श्लोक हिंदी भाषेत असून उरलेले मराठीत आहेत. श्लोकरचनेत आर्या, मालिनी, कामदा, भुजंगप्रयात, पृथ्वी व पंचचामर ही वृत्ते वापरलेली आहेत.

मोरोपंतांच्या केकावलीच्या धर्तीवर करुणा भाकणारी पृथ्वी वृत्तातील केकावली आहे. आर्यांमध्ये तापनाशी तीर्थातील गंगेचा गौरव, सद्‌गुरूंची प्रार्थना आणि स्वत:ची स्थिती सांगून केलेली देवाची प्रार्थना हे विषय आहेत. हिंदी श्लोकांमध्ये गुरुकृपेने आलेल्या अनुभवांचे वर्णन आहे. इतर मराठी श्लोकांत तापनाशी तीर्थाचे वर्णन, रघुनाथप्रिय साधुमहाराजांचा गौरव, सदगुरुमहिमा, ईश्वराची प्रार्थना, उपदेश आणि स्वत:ची स्थिती सांगून केलेली रक्षणाची प्रार्थना हे विषय आहेत.

'हे दयानिधे श्रीजनार्दना' हा ध्रुवपदवजा चरण असणाऱ्या सहा श्लोकांत, दुर्गणांचा नाश करून, सद्‌बुद्धी देऊन उद्धार करावा अशी प्रार्थना केली आहे. यांतील एक श्लोक असा -

*माउलीपरी चित्त मजवरी। ठेवि आपुले सदय मन करी।*
*भवभयांतका विघ्ननाशना। हे दयानिधे श्रीजनार्दना॥*

तसेच 'नमो नमो दिगंबरा प्रकाशरूपसुंदरा' असा ध्रुवपदवजा चरण असणाऱ्या आठ श्लोकांत सद्‌गुरूंची प्रार्थना आहे. उदा.

*विनवितो तुलाच मी मला नको तू विसरू।*
*कल्पवृक्ष कामधेनू माय तू मी लेकरू।*
*धरा मला की पोटसी जशी ती माय लेकरा।*
*नमो नमो दिगंबरा प्रकाशरूपसुंदरा॥*

**२) कटाव :** पूर्वी मायेने देवादिकांना फसविले. तेव्हा स्वतःचे कल्याण इच्छिणाऱ्याने सद्‌गुरूला शरण जावे, असा कटावाचा भावार्थ आहे.

**३) भूपाळी, काकडारती, शेजारती,** इत्यादी प्रकारच्या काव्यांत सद्‌गुरूंच्या आरतीतील पुढील कडवे लक्षणीय आहे -

*कर्तुं आणि अकर्तुं तिसरी अन्यथा ।*
*तिन्ही शक्ती तुमच्या दासी सर्वथा ।*
*वेदांसी अंत न लागे प्रार्थिता ।*
*तू आम्हा सुलभ तू जय कृपावंता ।*
*जय देव जय देव जय सद्‌गुरूराया ।*
*आरती ओवाळू महाराजया ॥*

**४) अभंग :** चिमडमहाराजांचे अभंग तसे थोडे आहेत. नऊ अभंगांमध्ये गुरूंचा गौरव, देवाची करुणा, गुरूंची प्रार्थना, इत्यादी विषय आहेत.

**५) पदे :** दोन पदे कानडी भाषेत, पाच पदे हिंदी भाषेत आणि उरलेली पदे मराठी भाषेत आहेत. हिंदीमधील पदांत गुरूंची प्रार्थना, स्वतःचा अनुभव, नरदेहातील साक्षात्कार वगैरे विषय आहेत. अन्य पदांतील विषय असे आहेत : **देव :-** ईश्वराच्या इच्छेने सर्व काही चालते. ईश्वरच सर्वकर्ता आहे. तो सर्वत्र आहे. तो भक्तांचे रक्षण करतो. **देवाची प्रार्थना :-** देवा, मी तुझा दास आहे. तू भक्तवत्सल आहेस. धावत येऊन मजवर छाया कर आणि माया दूर कर. मला तुझ्याशिवाय कोणी नाही. तू धाव आणि मला पाव. देवा, तुझ्याजवळ काय उणे आहे ? तू मला विन्मुख का होतोस ? माझा कंटाळा न करता देवा, तू माझ्या मस्तकी हात ठेवून माझा उद्धार कर. **सद्‌गुरू व त्यांची प्रार्थना :-** सद्‌गुरू अनंत, नित्य प्रकाशरूप आहे. सद्‌गुरू म्हणजेच ब्रह्म. हे सद्‌गुरो, मला गांजणाऱ्या सहा रिपूंची तुम्ही रक्षा करा. इंद्रिये मला त्रास देतात, त्यांना शांत करा. तुम्हीच मला तुमच्या कृपेची भीक घाला. मला तुमचा थारा देऊन मला भवसागरातून तारा. **उपदेश :-** संसारातील आसक्ती सोडून सद्‌गुरूला शरण जावे. विषयांचा नाद सोडून ईश्वराचे नामस्मरण करावे. गुरूला शरण जाऊन आपणच शिव व्हावयाचे आहे. 'माडो परमेश्वर गुरुध्याना' या कानडी पदात दुर्मिळ नरदेहाचा उपयोग करून चिन्मय परमात्म्याशी एकरूप होण्यास सांगितले आहे. **साक्षात्कारानुभव :-** 'कंडेनी कण्णिले' या कानडी पदामध्ये सद्‌गुरूंनी सांगितलेल्या मार्गाने गेल्यावर आपणास कृष्णांचे दर्शन झाले, असे म्हटले आहे. तर 'माडो परमेश्वर गुरुध्याना' या कानडी पदात अग्निचक्राच्या शेजारी दोन कमलांमध्ये झगझगीत प्रकाश आहे व मस्तकातील

सहस्रदलकमलस्थानी गुरुतत्त्व असून तेथे अवर्णनीय सुख आहे, असे सांगितले आहे. एका हिंदी श्लोकात अनाहत नाद श्रवण होऊन आकाशात गूढ ज्योतीचे दर्शन होऊन निराकार वस्तूत मिळून गेलो, असे वर्णन आहे. अन्य पदात चिमडमहाराज म्हणतात, या नरदेहात चंद्रसूर्यात्मक दोन डोळ्यांना साक्षात्कार होतात. हिरा-तारा दिसतात. हिरवा, पिवळा असे चैतन्याचे विविधरंगी प्रकाश दिसतात. घंटा, सिंह यांसारखा नाद असणारे अनाहत नाद ऐकू येतात. प्रथम तारकाकृती ब्रह्म, मग दंडाकृती, नंतर कुंडलिनी नाम, त्यानंतर निढळावर सूर्याचे दर्शन, मग दर्पणाकृती, नंतर ॐकाररूप मूळ ब्रह्म दिसून शेवटी सगळीकडे पसरलेले आत्मतेज दिसते.

६) पंचपदी : दैनिक भजनास उपयोगी पडावी म्हणून चिमडमहाराजांनी पंचपदी रचली. ती सन्मार्गदीप, कैवल्यवैभव, नित्यनियम-भजनविधी, चिन्मय नित्यपाठ या ग्रंथांत प्रकाशित झाली आहे. या पंचपदीत मुख्यतः सद्गुरुमहिमा वर्णन केलेला आहे. 'धन्य हा सद्गुरुमहिमा' या पदात रघुनाथप्रिय साधुमहाराज व निंबरगीकरमहाराज यांचे महत्त्व सांगितलेले आहे. 'भज सद्गुरुराजं 'या संस्कृतमधील पदात, सद्गुरू हे सच्चिदानंद असून त्यांच्या कृपेने परमार्थात नाद व प्रकाशरूपाने येणाऱ्या साक्षात्कारांचा उल्लेख आहे. 'सद्गुरु चिद्घन' या पदात, गुरू हीच श्रेष्ठ देवता आहे, असे सांगून पुढे म्हटले आहे :- श्रुती, स्मृती, शेष आणि वागीश्वरी हे आजअखेर सद्गुरूचे वर्णन पुरे करू शकले नाहीत. सद्गुरू सचराचर विश्व निर्माण करतात व त्यावर सत्ता गाजवतात. सद्गुरू साधकाला निष्काम करतात. 'प्रार्थना ऐका माझी' या पदात, दुर्बुद्धी, वासना, षड्रिपू, इत्यादींना दूर करून, सद्गुरूंनी सद्बुद्धी द्यावी, दुर्गुणांतून सोडवावे व सायुज्यमुक्ती द्यावी, अशी प्रार्थना आहे. अंतिम पदातील गुरूजवळ केलेले मागणे असे आहे :-

*हेचि दान देई स्वामी। सहो नित्य मन नामी ॥१॥*

*तुझी सेवा अखंडित। घडो रूप जडो चित्त ॥२॥*

*अहर्निशी संतसंग। घडो मज हा प्रसंग ॥३॥*

*दुरितकानन दहन करा। पुण्यरूप वैश्वानरा ॥४॥*

*शिरी ठेवोनिया हाता। दासा करिशी जीवन्मुक्त ॥५॥*

### ✦ नारायणमहाराज यरगट्टीकर

चिमडमहाराजांच्या वंशजांपैकी कुणाचेच स्वतंत्र असे लेखन नाही. तथापि नारायणमहाराज यरगट्टीकर हे साधुमहाराजांच्या रथोत्सवसमयी जी कीर्तने करीत, त्यांची टिपणे घेऊन व त्यांतील विषयांचे वर्गीकरण करून त्याला श्री. मोहोळकर यांनी

व्यवस्थित रूप दिले. तो भाग, 'नारायणीय शिष्यप्रबोध अथवा भारतीय आत्मविद्या' या ग्रंथात श्री. आठले यांनी प्रकाशित केला आहे. त्यामध्ये काही विषयांवर नारायणमहाराजांची वचने अशी आहेत : **चिमडचा रथोत्सव** :- बाह्य स्थितीशी निरपेक्षपणे हा रथोत्सव चालूच राहणार. **सद्गुरु** :- सद्गुरू म्हणजे कोणी व्यक्ती नसून सर्वसमर्थ अशी एक शक्ती आहे. उन्मनी अवस्था हे सद्गुरूंचे खरे स्वरूप आहे व ते शब्दातीत आणि स्वसंवेद्य आहे. या सद्गुरुरूप शक्तीची कृपा संपादन करण्यातच जीवनाचे साफल्य आहे. सद्गुरुकृपा ही सद्गुरूंच्या इच्छेवर अवलंबून आहे. **साधन** :- ईश्वराने दिलेल्या सामग्रीवरच साधन आधारलेले आहे. म्हणून ते सर्वांना लभ्य आहे. **मन** :- चांचल्य हा मनाचा अंगभूत गुण नसून मनाच्या शुद्ध स्वरूपावरील आभास आहे. मन हे श्वासाशी संबंधित आहे. श्वास हळुवार झाला की मन हळुवार होते. पवनविजय झाला की मन स्थिर होते. मनाच्या एकाग्र अवस्थेत आपले भाग्य साठलेले आहे. **शरीर** :- शरीरात आत्मा आहे, तोपर्यंत त्या शरीराला शोभा असते. तो अंतर्धान पावला की सर्व मातीमोलाचे होते. **साधन** :- जीवन आत्मसंतुष्ट व आत्मतृप्त करण्यास सत्पुरुषांनी साधनाची व्यवस्था केली आहे. साधनाचा अवलंब केल्याविना कोणीच सत्पुरुष झालेला नाही व होऊ शकणारही नाही. ईश्वराला पाहण्यास जीवाला अंतर्मुख करण्याची योजना म्हणजे साधन होय. **नाम** :- नाम म्हणजे नामीची जाणीव करून देणारा व त्याचे आवाहन करण्यास उपयोगी पडणारा शब्द होय. नामी जेव्हा प्रकट होण्याच्या संभवात असतो, अशा पर्वकाळात नाम घ्यावयाचे आहे.

### ✦ मामामहाराज केळकरांचे साहित्य

एक ओवीबद्ध चरित्र आणि भजन, पदे व अभंग या स्वरूपाचे पद्यात्मक लेखन श्रीमामामहाराजांनी केलेले आहे व ते हनुमद्गुरुचरित्रबोधसार, श्रीरामपाठ व अमृतवाणी या तीन ग्रंथांत प्रकाशित झालेले आहे.

### १. हनुमद्गुरुचरित्रबोधसार :

यात तेरा अध्यायांत ७०० ओव्या आहेत. येथे तात्यासाहेबमहाराज कोटणीसांचे चरित्र साधनमार्गाला धरून लिहिलेले आहे. त्यामुळे यातून साधकाला बोध होतो तो असा :- नित्यानित्यविवेक, वैराग्य, शमदमादी साधनसंपत् हे परमार्थाला आवश्यक आहेत. परमार्थात सद्गुरूंचे मार्गदर्शन लागते. गुरुकृपेने, अरूप असणाऱ्या परमात्म्याचे दर्शन होते. सद्गुरूंनी सांगितलेले साधन साधू लागले की परमार्थातील साक्षात्कार होऊ लागतात. ते असे - त्रिकूटस्थानी सद्गुरूंचे सत्यस्वरूप कळते. श्रीहाटस्थानी

लखलखीत प्रभा दिसते. गोल्हाटमंडळात श्याम तेज आहे. औटपीठस्थानी नीलवर्णप्रभा आहे. भ्रमरगुंफेत उन्मनी अवस्था प्राप्त होते. ब्रह्मरंध्रस्थानात *'कोटी सूर्य तळपती शीतलपणे.'* त्यानंतर पुढील निरामय निर्गुण स्थानामध्ये साधक स्वरूपाकार होऊन सिद्ध होतो. नमुना म्हणून गणेश-सरस्वती वंदनातील दोन ओव्या अशा :-

***ॐ नमो जी श्रीगुरुगणेशा। आधारचक्री स्थित सर्वेशा।***
***जगदाधारा जगदीशा। जगत्पाला विघ्नहरा॥***
***जय जयाजी देवी शारदे। चिच्छक्ति परमानंदे।***
***भक्तजना अभय वर दे। आदिमाया तू स्वामिणी॥***

## २. श्रीरामपाठ :

मामामहाराजांच्या शिकवणुकीचे सोलीव सार ३२ अभंगांच्या रामपाठात आहे. यात ते सांगतात :- नरदेहातच नराचा नारायण व्हावयाचे आहे. संसार असार आहे व निर्गुण ब्रह्म सार आहे. निर्गुण ब्रह्मप्राप्तीसाठी रामनाम हे साधन आहे. रामनामाने देहभाव लयाला जाऊन, ईश्वरदर्शन होऊन अखंड सुख मिळते. रामनामाने अंतरातील ज्योती प्रगट होते. नामाचा मार्ग प्रत्येकाच्या शरीरात आहे. चार वाचांच्या पलीकडे रामनाम आहे. रामनाम मतिरूप आहे व ही मती प्रत्येकाच्या शरीरात आहे ( *रामनामगती देहात प्रचीती*). नामाच्या समगतीत हरीचा आठव झाला की उन्मनी अवस्था प्राप्त होते, तेथेच आत्मसाक्षात्कार आहे. इडा, पिंगला या सुषुम्नेत शिरल्या की अखंड रामनाम हातात येते. नामाच्या गतीवर लक्ष ठेवणे हाच अजपा जप. 'राम-नाम-पवन' साधू लागला की समाधान, देहबुद्धीचा लय, मनाची एकाग्रता, उन्मनी, दशनाद, तारकस्वरूपदर्शन, इत्यादी अनुभव येतात. या रामपाठातील पुढील चरण संस्मरणीय आहे - *'तरो अथवा बुडो नाम न सोडीन । प्रतिज्ञा ही जाण जीवी धरी ॥१॥'*

## ३. अमृतवाणी :

रामपाठासकट मामामहाराजांची अभंग-पदरचना 'अमृतवाणी' या ग्रंथात प्रकाशित झाली आहे. त्यात एक दोन भजनेही आहेत. ज्ञानेश्वरमहाराज व प्रभू राम यांवरील एकेक भजन आहे. अभंग-पदांमध्ये आत्मचरित्रपर माहिती, कीर्तनाचे नमन-पद, 'उन्मन', 'भजन' सारख्या शब्दांची स्पष्टीकरणे, सण व पर्वकाळ यांचे आध्यात्मिक स्वरूप, कार्य आणि प्रयोजन, पौराणिक कथांचे तात्पर्य, कोणती गोष्ट अधिक अथवा सर्वाधिक, मातृप्रेम, गुरू, नाम, इत्यादी विषय येतात. उदा.- भजन म्हणजे 'मनोवृत्ति समाधान। हेचि देवाचे भजन॥'; 'गोकुळ अष्टमी' म्हणजे 'अष्ट विसरावे नामी। हेचि गोकुळ अष्टमी॥'; गजेंद्रमोक्ष कथेचे तात्पर्य असे :-

*देवा पुष्प समर्पिता। देव भेटे अवचिता ॥१॥*
*थोरी पुण्याची ते खूण। मनी धावी ओळखण ॥२॥*
*गजेंद्राचे पुण्याकारणे। देवे केलेसे धावणे ॥३॥*
*चित्तपुष्प समर्पण। दास म्हणे हे साधन ॥४॥*

**अमृतवाणीत आलेले पारमार्थिक विषय संक्षेपाने असे :-** नरदेहातच ईश्वरी साक्षात्काराची मौज अनुभवून मुक्त व्हावयाचे आहे. नामस्मरणाने देहात देवाची प्रचीती येते. संसाराच्या कटकटीतच नाम जपावयाचे आहे. वासनेला आवरून अहंकार टाकून देवाचे नाव घ्यावे. नामात राहून प्रपंच करावा. नामाने संसार सुटून मोक्षसुख मिळते. परमार्थासाठी विवेक, वैराग्य व भक्ती हवी. परमार्थात नाम हे एकच साधन आहे. नामाने चंचल मन एकाग्र होते. नामाने मन शुद्ध होते. मन शुद्ध होणे म्हणजे उन्मन होणे. शुद्ध मनात म्हणजे उन्मन अवस्थेत परमात्म्याचा साक्षात्कार होतो. देव सर्वांना आधार आहे. चराचरांत देव भरला आहे. पण त्याचा शोध आपल्या देहात करावयाचा आहे. देव एक आहे पण मायाजन्य भ्रमामुळे द्वैत दिसते. माया जीवाला भुलविते व देवाला विसरवून टाकते. नामाच्या योगे माया दूर होऊन देव भेटतो.

**नामाच्या साधनाने पुढीलप्रमाणे साक्षात्कार होतात :-** उन्मनीच्या ओवरीत तेज दिसते. हंसावरील राम दिसतो. चित्ताचे चांदणे प्रकाशते. 'तेज लखलखीत भोवती मध्ये बिंदु सुनील सरे। त्यामध्ये श्रीराम विराजित निरखुनि पाही बरे ॥' हे घडले की जगदाभास संपून जीव शिवरूप होऊन जातो.

## ✦ चिमडमहाराजांचे शिष्य

चिमडमहाराजांच्या शिष्यांपैकी दोघातिघांचे काही पारमार्थिक काव्य उपलब्ध आहे. त्याविषयी पुढीलप्रमाणे माहिती सांगता येईल.

### १. वामनराव कोटणीसांचे काव्य :

वामनराव कोटणीसांचे बरेच काव्य आहे, असा उल्लेख येतो. पण त्यातील बहुतेक सर्व आजतागायत अप्रसिद्ध आहे. वामनरावांचा तात्यासाहेबमहाराज कोटणीसांशी जो अभंगरूप पत्रव्यवहार झाला, तो मात्र 'कैवल्यकुसुम' आणि साधुदासकृत 'हणमंतरावजी कोटणीस यांचे चरित्र' या ग्रंथांत प्रकाशित झाला आहे. त्यावरून कळते, ते असे :- वामनरावांची ५२ कोटी जपसंख्या पूर्ण झाल्यावर त्यांनी 'अनंत देखिली आत्मरूपे' आणि त्यांना 'ॐकार संयुक्त रामनामध्वनि। वेदघोष श्रवणी नाना वाद्ये।' ऐकू आली. वामनरावांनी काही अभंगांत तात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे भाग्य वर्णिले आहे. तसेच उपर्युक्त कोटणीसचरित्रात उद्‌धृत असणाऱ्या काही

ओव्यांत तात्यासाहेबांची धन्यता ते अशी सांगतात -

*धन्य धन्य [illegible] निश्चिती ॥ निरलस नित्य कीर्तन करीत रात्री ।*
*[illegible] नाम [illegible] चित्ती ॥ अखंड [illegible] कार [illegible] वानू ॥*

श्री. ए. एन. कोटणीसांनी इंग्रजीत लिहिले ल्या तात्यासाहेबमहाराज कोटणीसांच्या चरित्रात बाबासाहेबांचा अनुभव वर्णन करण [illegible] द्वारा एक अभंग आला आहे, तो असा :-

*आकाश [illegible] ॥ [illegible] ी एकवार ॥१॥*
*बिंदूंनी वेष्टित [illegible] ॥ [illegible] ती तयांची ती ॥२॥*
*अमित त्या [illegible] ॥ काय त्याची [illegible] सरी वर्णु आता ॥३॥*
*सद्गुरुंची [illegible] ॥ [illegible] आणि प्रगटताहे ॥४॥*

**२. गोपाळराव कोटणीस :**

गोपाळराव कोटणीसांचे पारमार्थिक लेखन पुष्कळ आहे. संप्रदायक्रमसिंधु (१० हजार ओव्या), अद्वैत भूमानंद (५ हजार ओव्या), सातशे पदे, मनाचे श्लोक, रामस्तुतिशतक, अभंग, श्लोक, इत्यादींची नोंद सा[illegible]दासकृत कोटणीसचरित्रात आहे. पण हे काव्य जवळजवळ सर्वच अप्रकाशित आहे.

तात्यासाहेबमहाराज कोटणीसांच्या निर्याणानंतर, 'प्रियजनवियोग' या शीर्षकाखाली मालिनी, मंदाक्रांता, इंद्रवंशा, इत्यादी वृत्तांत असणारे त्यांचे एक शोककाव्य व आरती उपर्युक्त कोटणीसचरित्रात प्रसिद्ध झालेली आहेत.

'कैवल्यवैभव' ग्रंथात प्रकाशित झालेले गोपाळराव कोटणीसांचे पुढील पद लक्षणीय आहे -

*मंगलधामी या झालो जंगम आम्ही ॥ध्रु.॥*
*घेऊनी गुरुमुद्राची दीक्षा । मागतो कोराभाची भिक्षा ।*
*अलक्ष्य लेवुनि त्या रुद्राक्षा । ना स्तू कामी ॥१॥*
*षड्रिपु जाळुनी केली राख । विभूति तेची अंग देख ।*
*घेऊनी ज्ञान शुभ्र शंख । फुंकू नामी ॥२॥*
*येता जाता शिवस्मरणासी । करुनि मारिले त्या मरणासी ।*
*पर्वतशिखरी प्रभुलिंगासी । पहातो नेमी ॥३॥*
*साठावरची कळ लागली । शिवशिव चिंतने शिवची झालो ।*
*गोपालनाथ पायी वितरलो । अवघे तू मी ॥४॥*

### ३. तात्यासाहेबमहाराज कोटणीस :

तात्यासाहेबमहाराज हे नागोदराने आजारी असताना चिमड मठात राहात होते. तेथे त्यांनी लक्ष्मीबाई अक्कांच्या मुखातून निंबरगीकरमहाराज, साधुमहाराज आणि चिमडमहाराज यांच्या चरित्रात्मक गोष्टी ऐकल्या. त्या एकत्र करून व त्यांत लक्ष्मीबाई अक्कांचे चरित्र जोडून व त्यात अन्य काही पारमार्थिक भाग घालून त्यांनी जो ग्रंथ तयार केला, तो 'कैवल्यपुरुष : खंड १' या नावाने प्रसिद्ध झाला. त्यानंतर असे दिसते की, तात्यासाहेबमहाराजांनी निंबरगीकरमहाराजांचे एक स्वतंत्र ओवीबद्ध चरित्र लिहिण्याचे काम सुरू केले, पण ते अपूर्ण राहिले. या चरित्राचे फक्त सात अध्याय उपलब्ध झाले. ते 'कैवल्यपुरुष : खंड १, भाग २' या ग्रंथात छापले गेले. या चरित्रात निंबरगीकरमहाराजांविषयी थोडी अधिक माहिती मिळते. या ग्रंथातील एक ओवी अशी आहे -

*अहंपणाचे ओझे भारी। कदापि न घ्यावे शिरावरी।*
*स्वामीसी सोपवूनि संसारी। सुखरूप रहाणे सत्यत्वे ॥*

तात्यासाहेबमहाराजांचे अन्य प्रकाशित काव्य आहे. त्यात श्लोक, अभंग व पदे हे प्रकार असून ते सर्व कैवल्यकुसुम व साधुदासकृत हणमंतरावजी कोटणीस यांचे चरित्र या ग्रंथांत प्रकाशित झाले आहेत.

**अ) श्लोक :**

श्लोक हे इंद्रवज्रा, भुजंगप्रयात, वसंततिलका, मालिनी, पृथ्वी, अमृतध्वनी, पंचचामर आणि मंदाक्रांता या वृत्तांत आहेत. चिमडमहाराजांच्या निर्याणानंतर तात्यासाहेबमहाराजांना झालेला शोक 'श्रीसद्गुरु-राम-निर्याण' हे शीर्षक असणाऱ्या २९ श्लोकांमध्ये आहे. 'मनास बोध' या २१ श्लोकांच्या प्रकरणातील पहिल्या २० श्लोकांत 'मना राम तो अंतरी साठवावा' हा ध्रुपदवजा चरण आहे. त्यात निर्गुण आत्माराम व त्याचा साक्षात्कार यांचे वर्णन आहे. साक्षात्कार सांगणारा एक श्लोक असा -

*दिसे तारकू तो चतुर्वक्त्र जाणा। महाविष्णु हा दंडरूपे सुजाणा।*
*सदाशिव तो बिंदुरूपे पहावा। मना राम तो अंतरी साठवावा ॥*

**आ) अभंग :**

दोन अभंग स्वतंत्र असून, उरलेले आठ अभंग हे वामनराव कोटणीसांना दिलेले पत्रोत्तर आहे. तात्यासाहेबमहाराजांचे अन्य काही अभंग अप्रकाशित राहिले आहेत असे म्हणतात.

सद्गुरुकृपेने विषप्रयोगातून वाचल्यावर स्फुरलेल्या 'सद्गुरूंनी दया बहुतचि केली' या अभंगात ते म्हणतात, 'जेथे राम माझा उभा वाचवाया। कोण गणी वाया संकटांसी॥' दुसऱ्या अभंगात चिमड संप्रदायातील कोणते सत्पुरुष कुणाचे अवतार आहेत, ते सांगितले आहे. पत्रात्मक अभंगात वामनराव कोटणीसांचा गौरव केला असून, स्वतःची ५२ कोटी जपसंख्या पूर्ण झाली, असे सांगितले आहे. आणखी एका अभंगात '*अखंडित वाचे श्रीरामस्मरण। हेचि पै कीर्तन दासालागी॥*' असे कीर्तनाचे सत्यस्वरूप सांगितले आहे.

**इ) पदे :** एक पद कानडी भाषेत असून उरलेली पदे मराठीत आहेत. 'नानु धन्य' या कानडी पदात, सद्गुरुकृपेने आपण शिवरूप झालो असे म्हटले आहे. मराठीतील पदांमध्ये चिमड संप्रदायाची परंपरा व त्यातील संतांचा गौरव, तापनाशी तीर्थाचे महत्त्व, कीर्तनाचे नमन, आत्मा-कुडी-संवाद, रामायण-महाभारतातील एक-दोन प्रसंग, इत्यादी विषय आहेत. संसारवृक्षाचे रूपक एका अभंगात आहे. तेथे या वृक्षाचे मूळ कर्म, कामक्रोधादी शाखा, भ्रम-मद-सुख-शोक ही पाने, जन्ममरण ही फळे व बायका-पोरे हे वृक्षावरील पक्षी असा तपशील आहे. दुसऱ्या एका पदात, सुखसमाधान देणारे आणि अद्वैताचा बोध करणारे असे कीर्तन हवे, असे सांगितले आहे.

अन्य पदांत पुढील विषय आलेले आहेत : **आत्मस्वरूप :-** पंचमहाभूते, इंद्रिये म्हणजे आत्मा नव्हे. आत्म्याला रूप, रंग, आकार नाही. तो निष्कळ , सूक्ष्म, निर्गुण व सर्वव्यापक आहे. **साक्षात्कार :-** आत्मारामाचा साक्षात्कार कुठे व कसा होतो, हे सांगून 'हंसावर राम आहे ' असे म्हटले आहे. **उपदेश :-** साधकाने सद्गुरूचा शोध घेऊन साधन समजून घ्यावे. सद्गुरूवर विश्वास ठेवून नामस्मरण, साधन केले, तर स्वरूपसाक्षात्कार होतो. श्वासोच्छ्‌वासात नाम आहे. हरिनाम गाइल्याने हरिरूप दिसते. जीवनात देव कळणे महत्त्वाचे आहे. साधकांना उपदेश असणारे व स्वतःच्या निर्याणाची सूचना देणारे तात्यासाहेबमहाराजांचे पद असे -

*ब्रह्मपुरी आम्ही जातो रे। कोणी येतो का रे।*
*संगे येईल त्यासी नेतो रे। लाभ होतो रे॥ध्रु.॥*
*गुरुपदि शरण आधी व्हावे रे। नाम घ्यावे रे।*
*गुरुनाम निशिदिनी गावे रे। रूप पहावे रे॥१॥*
*नामात राम प्रगट होतो रे। भेट देतो रे।*
*नेसील तिकडे हा येतो रे। मुक्ती देतो रे॥२॥*
*दासाचा निश्चय पाही रे। शंका नाही रे।*
*सद्गुरुपद धरूनि राही रे। मुक्ती लाही रे॥३॥*

**३. बाबूरावजी कोटणीसमहाराजांचे वाङ्‌मय :**

तात्यासाहेबमहाराजांच्या वंशजांपैकी बाबूरावजीमहाराज कोटणीसांचे वाङ्‌मय उपलब्ध आहे व ते कैवल्यप्रसाद, कैवल्यसंकीर्तन आणि कैवल्यमनोबोधिनी या ग्रंथांत प्रसिद्ध झाले आहे. त्यांचे काही लेखन गद्यात तर काही पद्यात आहे. पद्यामध्ये श्लोक, भूपाळी, लोणीसाखर, आरती, ओवी, पदे व अभंग हे प्रकार आढळतात.

**(क) श्लोक :–** हनुमंताची भेट, सिद्धमालिका, चिमड संप्रदायातील पूर्वसूरी, माता-पिता, इत्यादी विषयांवरील श्लोक आहेत.

**(ख) ओवी :–** परमार्थात स्त्री आडवी येते, असे ९ ओव्यांमध्ये सांगितलेले आहे.

**(ग) पदे :–** सद्‌गुरू, प्रासंगिक, बोध या विषयांवरील पदे आहेत. सद्‌गुरुविषयीचे एक पद असे आहे -

*आनंद केला आनंद केला सद्‌गुरूरायांनी ।*
*दाऊनिया मन अक्षय असले रामस्वरूप या नयनी ॥ध्रु.॥*
*गुरूकरणीचा प्रताप पाहुनि विस्मय मनी वाटे ।*
*अनंतरूपी पाहता रामचि हृदयी प्रेम दाटे ।*
*गुरूचे नामि रंगुनि जाता स्वसुखा अंत-पार नाही ॥२ ॥*
*म्हणे रघुनाथ समर्थ सद्‌गुरु माऊलिचे पायी ।*
*रात्रंदिन रत होऊ सखया दुजा ध्यास नाही ॥३ ॥*

**(घ) अभंग :–** सद्‌गुरू, करुणा, उपदेश, चिमड संप्रदायातील सत्पुरुषांचे निर्याण, इत्यादी विषयांवरील अभंग आहेत. सद्‌गुरूचे वर्णन करणारा एक अभंग असा -

*आनंदाचा कंद माझा गुरूराय । प्रकाशाचा सूर्य नांदतसे ॥१ ॥*
*सकळांचा धनी कैवल्याचा दानी । ब्रह्मांड व्यापुनि राहिलासे ॥२ ॥*
*अखंड अक्षर आकाररहित । नांदतो सतत निरंजन ॥३ ॥*
*निरंजनी राहो अखंडित मन । प्रार्थी रघुनाथ प्रेमभावे ॥४ ॥*

'कैवल्यमनोबोधिनी' या ग्रंथात बाबूरावजींनी केलेले रामदासस्वामींच्या मनाच्या श्लोकांचे अभंगात्मक रूपांतर आहे.

बाबूरावजीमहाराजांनी दासबोधाची स्वहस्ते लिखित प्रत सिद्ध केल्यावर त्यांना 'स्फूर्तिदशक' (१० समास, ५२५ ओव्या) स्फुरले. त्यातील काही ओव्यांमध्ये त्यांनी आपल्या पारमार्थिक अनुभवाचे वर्णन केले आहे. ते असे -

*प्रथम दिसला तेजोगोल । चार मोती बहू अमोल ।*
*तारा चमके लाल लाल । मध्यवर्ती समोर ॥*
*पुढे पाहता रत्नखाणी । अमोल एक हिरकणी ।*
*तो इकडे शुभ्र पाणी । लाटाच उठती ॥*
*वरखाली चोहीकडे । नाना रंगी रंग चढे ।*
*रत्नगोल चेंडू उडे । काय सांगू प्रकार ॥*
*तेज फाकले आकाशात । मन रमले त्या प्रकाशात ।*
*अवचित आला निशाकांत । पूर्ण इंदुप्रकाश ॥*

'कैवल्यप्रसाद' ग्रंथात बाबूरावजींची काही प्रवचने छापलेली आहेत. त्यांतील काही विषय संक्षेपाने असे :- आत्मवस्तूच्या अधिष्ठानावर विश्व उभे आहे. किंबहुना आत्मवस्तूच नानात्वाने विलसत आहे. नाममंत्राने आत्मवस्तू हस्तगत होते. नाम म्हणजे स्फोट, नाद. नादाची मूळ तत्त्वे ज्यात आहेत, तेच सबीज नाम. अशा नामामध्ये व नामीमध्ये भेद नाही.

'कैवल्यसंकीर्तन' या ग्रंथात बाबूरावमहाराजांची पाच कीर्तने प्रकाशित झाली आहेत. त्यातील काही भाग असा :- प्रपंचाकडे धावणारे मन काही केल्या परमार्थाकडे वळत नाही. परद्रव्यव परस्त्री यांकडे मनाची ओढ असते. पण या दोन्ही गोष्टी परमार्थात वर्ज्य आहेत. आशा सोडल्यावाचून परमार्थ नाही. वैराग्याशिवाय भक्ती नाही व भक्तीशिवाय भगवंताची प्राप्ती नाही. भगवत्प्राप्तीच्या सर्व साधनांमध्ये कीर्तन हे श्रेष्ठ आहे.

## ✦ गुरुनाथ कोटणीसमहाराजांचे लेखन

बाबूराव कोटणीसमहाराजांच्या वंशजांपैकी पांडुरंग रघुनाथ ऊर्फ गुरुनाथ कोटणीसमहाराज यांचे काही प्रकाशित लेखन उपलब्ध आहे. त्यांचे काही लेख स्वस्तिश्री व सज्जनगड या मासिकांत प्रसिद्ध झाले आहेत.

'श्रीसमर्थ रामदासांची आधुनिकता' (स्वस्तिश्री, फेब्रुवारी, १९८२) मध्ये रामदासस्वामींच्या दासबोधाकडे विविध दृष्टिकोनांतून कसे पाहता येते, हे त्यांनी संक्षेपाने दाखविलेले आहे. त्यांच्या मते, दासबोधात विनोद, काव्यालंकार, इत्यादी असून 'वायो कठिणास आडतो। आत्मा कठिण भेदून जातो।' यात फोर्थ डायमेन्शनची कल्पना आहे. 'श्रीसद्गुरु सोपानदेवचरित्र' (स्वस्तिश्री, नोव्हेंबर, १९८२) मध्ये त्यांनी ज्ञानदेवबंधू सोपानदेव यांच्या चरित्राचा संक्षिप्त आढावा घेतला आहे.

## ✦ दादामहाराज केळकरांचे साहित्य

वयाच्या सातव्या वर्षी दादामहाराजांना पहिला अभंग स्फुरला, तो असा -

*गुरूचा पंखा असावा वरती । डंका गाजे त्रिजगती ॥१॥*

*गुरूकृपेचे असावे छत्र । श्रीराम हालवितो सूत्र ॥२॥*

*रामनामी रंगलिये वाणी । तेचि लावण्याची खाणी ॥३॥*

*राम म्हणे नका धरू शंका । एक हलवा गुरुपंखा ॥४॥*

तेव्हापासून आजतागायत त्यांचे पारमार्थिक लेखन चालू आहे. त्यातील काही गद्यात आहे, तर काही पद्यात आहे. गद्यामध्ये चरित्र, इतिहास, स्वभावचित्र, ग्रंथपरिचय, टीपा, भाष्य, भावार्थ व तात्पर्यार्थ, अर्थ, वर्णन, स्वतंत्र, लेख असे प्रकार आहेत. पद्यामध्ये पोवाडा, आख्यान, श्लोक, भजन, आरती, ओवी, सवाया, पदे आणि अभंग अशी विविधता आहे. खेरीज त्यांना निंबरगीकरमहाराजांच्याकडून श्रुत झालेले काही साहित्य आहे. दादामहाराजांचे बरेचसे साहित्य अप्रसिद्ध आहे. त्यात रामदासबोध (ओवीबद्ध), आत्मलहरी (१,५०० गद्य वाक्ये), रामानंदमहाराजांचे चरित्र, उद्धवरावजींचे चरित्र, हरिपाठावरची कीर्तने, भजने, आरत्या, अभंग व पदे आहेत.

दादामहाराजांचे जे लेखन प्रकाशित झाले आहे, त्यात पुढील प्रकार आढळतात.

### अ) इतरांच्या ग्रंथांत प्रकाशित झालेले :

हे लेखन पद, अभंग, आरती, श्लोक, गद्य, लघुलेख, सवाया, श्लोकाष्टक, काव्यपुष्पावली, काव्यआहेर, पंचारती, अभिप्राय, पुरस्कार, आठवणी, इत्यादी स्वरूपाचे असून, ते पुढील ग्रंथांतून आले आहे - हणमंतरावजी कोटणीस यांचे चरित्र, हनुमद्गुरुचरित्रबोधसार, गोविंदकीर्तनगुणगान, कैवल्यप्रसाद, अपरोक्षज्ञान व साक्षात्कार, तुकारामहाराजांचे सदेह वैकुंठगमन, सार्थक, कैवल्यपुरुष : खंड १, भाग २, गुरुलिंगप्रसादगीता, नित्यनियमभजनविधी, पहिला दीप, गुरुतृतीया-कथा, राजेसाहेब सांगली गौरवग्रंथ, गोविंदचरितमानस, समर्थ पांडुरंगविजय, तुकारामहाराजचरित्र, कैवल्यसंकीर्तन, नाथलीलामृत, गोविंदस्मृती, शुद्ध व सुलभ परमार्थविचार, बालमुकुंद बालावधूतलीलाचरित्र, कर्नाटक-महाराष्ट्रातील समर्थ संप्रदाय, रघुनाथप्रिय साधुमहाराज, निंबरगीकरमहाराज, तात्यासाहेबमहाराज कोटणीसचरित्र, रामराव तिकोटेकर चरित्र (तपशीलासाठी 'दासराम-गौरवग्रंथ' पाहा).

आ) नियतकालिकांतून प्रकाशित झालेले :

सिद्ध संप्रदाय व त्याची परंपरा, ज्ञानेश्वरमहाराजांची सनद (अर्थ), ज्ञानदेवकृत चांगदेवपासष्टी टीका, ज्ञानेश्वरांचा प्रणव (अर्थ), सिद्धकथामृतसार (ओवी), एकनाथकृत प्रकाशदीपिका (अर्थ), अमृतानुभव ज्ञानेशविलास टीका, भावपुष्पांजली, अमृतदर्शन, बारा अभंगांचे स्पष्टीकरण, श्रीसद्‌गुरुदर्शन, श्रीसमर्थांचा गणाधीश, समर्थकृत आत्माराम, सोलीव सुख, आत्मबोधप्रत्ययामृत, परमार्थसार, अर्थमंजरी, आदरांजली व चिमड संप्रदाय हे लेखन मामामहाराज केळकर, 'दीपलक्ष्मी' मासिक विशेषांक, सिद्धगिरिसंदेश त्रैमासिक, शांतिकुटीरसंदेश षण्मासिक, आनंदभुवन विशेषांक, समर्थत्रिशताब्दीमहोत्सव स्मरणिका, सज्जनगड मासिक, पुरुषार्थ मासिक, समर्थ सेवा मंडळ किल्ले सज्जनगड स्मरणिका, शक्तिपातयोगदर्शन अंक व सहजयोगदर्शन या नियतकालिकांतून आले आहे.

इ) तात्यासाहेबमहाराजांचा पोवाडा पत्ररूपाने प्रसिद्ध झाला होता.

ई) स्वतंत्रपणे प्रकाशित लेखन असे :

मंगळवेढेकर यांचे चरित्र (ओवीबद्ध), ज्ञानदेवतेहतिशी (ओवीबद्ध सानंद टीकेसह) व ज्ञानेश्वरमहाराजांचा हरिपाठ (मथ तात्पर्यार्थ), ज्ञानदेवमुद्राप्रकाश (ओवीबद्ध साधनमुद्रा टीका) व ज्ञानेश्वरीसार, वायुलहरी व ज्ञानदेव आज्ञापत्र, ज्ञानेश्वरकृत दत्तस्तुती, ज्ञानदेवकृत नमनस्तोत्र, नारायणरावजीमहाराज यरमट्टीकर चरितामृत, नागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर चरित्र, ज्ञानेश्वरी-चिंतनस्तोत्र व ज्ञानेश्वरी-संकीर्तनस्तोत्र, ज्ञानेश्वरस्तोत्र व अमृतानुभव मंगलाचरण.

उ) श्रुत वाङ्मयातील गुरुलिंगप्रसादगीता (६६ पदे) व सिद्धस्तुती हे प्रकाशित आहेत.

ऊ) दादामहाराजांच्या षष्ट्यब्दिनिमित्त निघालेल्या 'दासरामगौरवग्रंथ' मध्ये आत्मविज्ञान (गद्य लेख), काही कूटपदांवरील टीपा, आत्मलहरीतील काही वाक्ये, दासरामविंशिका (ओवी), परमार्थसार (श्लोक), काही भजने, आरत्या, पदे व अभंग आणि कीर्तन-निरूपणांतील सारभूत वचने इतका भाग प्रकाशित झाला आहे.

दादामहाराजांच्या सर्वच प्रकाशित लेखनाचा परामर्श प्रस्तुत स्थळी घेता येणे शक्य नसल्याने काही महत्त्वाच्या लेखनाचाच परामर्श येथे घेतलेला आहे.

(१) ज्ञानदेवतेहतिशी : या ग्रंथावर दादामहाराजांची ओवीबद्ध टीका आहे. त्यातील काही भाग असा - *'नादरहित जे स्फुरण । तेचि शब्दस्वरूप गगन ।। अर्धमात्रा शक्तिरूपिणी । जेथे उदेली प्रणववाणी ।। चारी शून्यांचा विस्तार । तेचि अखिल चराचर ।। अखंड जप चाले देही । म्हणोनि ते अजपा होई ।।'*

**(२) ज्ञानदेवमुद्राप्रकाश :** या ग्रंथावरील ओवीबद्ध टीकेतील एक ओवी अशी - *'नासिकेचा प्राण। जो नादरूप गहन। त्याचे लागता अनुसंधान। होय ज्ञाने आत्मयाचे॥'*

**(३) वायुलहरी :** हे स्वतंत्र पदात्मक प्रकरण आहे. चिद्वायुस्वरूपी सद्गुरुंनी सांगितलेल्या वायुअधिष्ठित साधनाने चिद्वायुरूप देवात आपले वारे मिसळून टाकणे म्हणजे परमार्थ, हे वायुलहरीचे सार आहे. यातील एक चरण असा आहे - *'प्राणापानामाजी मनाचे मीलन। परमार्थ पूर्ण तया ठाया॥'*

**(४) आत्मबोधप्रत्ययामृत :** देहापेक्षा आत्मा भिन्न आहे. देहातील आत्म्याचा नाद गुरुकृपेने कळतो. त्या आत्म्याच्या नादाचा नाद लागला की उन्मनी स्थिती प्राप्त होऊन, आपण आत्मानंदस्वरूप होतो, हा या लघुग्रंथाचा भावार्थ आहे.

**(५) आत्मलहरी :** दादामहाराजांना वेळोवेळी स्फुरलेले विचार म्हणजे आत्मलहरी. यातील काही विचार असे - स्वार्थाची पराकाष्ठा हाच परमार्थ व प्रेमाची पराकाष्ठा हीच भक्ती. साधनात सर्व सुख आहे. साधनात दिसणारा प्रकाश हाच आत्मा. आनंद सतत टिकणे म्हणजेच परमेश्वरदर्शन.

**(६) आत्मविज्ञान :** हा दीर्घ लेख आहे. आत्मा नि:शब्द आहे, शब्दाचा ग्रास होऊन नि:शब्दाशी अभेद स्थिती प्राप्त झाली की आत्म्याचा शाश्वत आनंद मिळतो, हे या लेखाचे तात्पर्य आहे.

**(७) परमार्थसार :** या श्लोकबद्ध प्रकरणात, देवाच्या सत्तेने विश्व चालते व अहंकार गेला, तरच देवाचे रूप कळते,असे सांगितले आहे.

**(८) कीर्तन-निरूपणांतील विषय :** दादामहाराजांच्या कीर्तन-प्रवचन-निरूपणांत असंख्य पारमार्थिक विषय येतात. त्यांतील काही असे - **संत :-** ज्यांच्या अंत:करणांत भगवंताशिवाय काही नसते, ते संत. संतांनासुद्धा प्रारब्ध चुकविता येत नाही. **सद्गुरु :-** सद्गुरू ब्रह्मरूप असतात. त्यांच्या कृपेशिवाय साधन जमत नाही. गुरुकृपा होण्यास त्यांनी सांगितलेल्या गतींवर लक्ष ठेवावे लागते. **परमार्थ :-** चैतन्याच्या स्मृतीत जीव आला की परमार्थ. परमार्थांत चैतन्याचा अनुभव घ्यावयाचा आहे. परमार्थांत प्रथम सुख नाही; पण परमार्थांतील सुख एकदा मिळाले की ते नाहीसे होत नाही.

**(९) अभंग-पदे :** यांमध्येही अनेक पारमार्थिक विषय व साधकास उपदेश येऊन जातो. नमुन्यादाखल काही विषय असे - **ब्रह्म-माया :-** ब्रह्म हे निश्चळ, घन व नि:शब्द आहे. नि:शब्द हे सद्रूप आहे. सद्रूप हे पूर्ण आनंदस्वरूप आहे. मूळ ब्रह्मरूपात निघालेल्या हुंकारातून चंचल माया निघाली. माया विश्वाचा खेळ करते. तसे पाहिल्यास, 'ब्रह्म पहाता माया, माया पहाता ब्रह्म' आहे. **अनुभव :-** साधनात १२ अंगुळे नि:श्वास वाहू

लागला की चित्ताला समता येते; ११ अंगुळे नि:श्वास वाहू लागला की आत्म्याची काव्यस्फूर्ती होते; ९ ते २ अंगुळे नि:श्वास वाहू लागला की अष्टसिद्धी मिळतात; एक अंगुळ नि:श्वास वाहू लागला की नादघोष ऐकू येतात. नि:श्वास बंद झाला की सर्वत्र सुवास सुटतो. ऊर्ध्वमुख झाले की आत्मसाक्षात्कार होतो. अभंग - पदातील काही चरण असे -

*सद्गुरुदेव सद्गुरुदेव।*
*देवांचाही थोर देव॥*
*ब्रह्मकपाटीचा मार्ग।*
*त्यासी बोलती सहजयोग॥*
*नामघोष जेथे।*
*देही लक्ष ठेवी तेथे॥*

दादामहाराजांचे एक कूट पद पुढीलप्रमाणे आहे -

*पोहत्यावरी पोहे पाणी। मासा वाचवी त्यालागोनी॥१॥*
*उलटा मासा बेडका ग्रासी। राहाता न ये भुजंगासी॥२॥*
*भुजंगापोटी ते मांजर। कुत्री खाय ते साचार॥३॥*
*संताघरी ऐसी खूण। दासरामा हे प्रमाण॥४॥*

### ✦ चंद्रशेखरअण्णा केळकर

दादामहाराजांचे ज्येष्ठ चिरंजीव चंद्रशेखरअण्णा केळकर यांना निंबरगीकरमहाराजांचे दर्शन झाल्यावर स्फुरलेले पद असे आहे -

*सद्गुरु सावळा धरोनिया सोवळा।*
*बाप रखुमादेवीवरु सद्गुरु सावळा॥१॥*
*पाहिला म्यां डोळा पाहिला म्यां डोळा।*
*घननीळ सावळा पाहिला म्यां डोळा॥२॥*
*चंद्रशेखराला आनंद मनाला॥*
*नये सांगायला ज्याचा त्यासी॥३॥*

●●●

## प्रकरण १४ : संदर्भसूची


१. **अमृतवाणी**, प्र. - रा. गो. केळकर, सांगली, १९८१

२. **अमृतानुभव मंगलाचरण**, दासराम, सांगली, १९७९

३. **कैवल्यकुंज**, र. ह. कोटणीस, सांगली, १९३८

४. **कैवल्यकुसुम**, र. ह. कोटणीस, सांगली, १९२४

५. **कैवल्यपुरुष : खंड १**, ह. पां. कोटणीस, सांगली, १९३३

६. **कैवल्यपुरुष : खंड १, भाग २**, र. ह. कोटणीस, सांगली, १९५२

७. **कैवल्यप्रसाद**, प्र. - ह. र. आणि पां. र. कोटणीस, सांगली, १९५९

८. **कैवल्यबोध**, र. ह. कोटणीस, सांगली, १९२५

९. **कैवल्यमनोबोधिनी** (कैवल्यप्रसाद या ग्रंथात अंतर्भूत)

१०. **कैवल्यवैभव**, र. ह. कोटणीस, दुसरी आवृत्ती, सांगली, १९२६

११. **कैवल्यसंकीर्तन**, प्र. - ह. र. आणि पां. र. कोटणीस, सांगली, १९७०

१२. **गुरुलिंगप्रसादगीता**, प्र. - वासुदेवराव जोशी, माधवनगर, १९५३

१३. **चिन्मय नित्यपाठ**, प्र. - र. रा. जाधव, सांगली, १९८१

१४. **जीवनगंगा**, म. श्री. देशपांडे, पहिली आवृत्ती, नागपूर, १९६६

१५. **दासरामगौरवग्रंथ**, प्र. - धनंजय भावे, सांगली, १९८०

१६. **नागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर चरित्र**, रा. गो. केळकर, सांगली

१७. **नारायणरावजीमहाराज यरगट्टीकर चरितामृत**, दासराम, सांगली, १९७३

१८. **नारायणीय शिष्यप्रबोध अथवा भारतीय आत्मविद्या**, सं. - व्यं. रा. मोहोळकर, बार्शी

१९. **नित्यनियमभजनविधी**, र. ह. कोटणीस, सांगली, आवृत्ती २ री, १९५४

२०. **बोधसुधा**, म. श्री. देशपांडे, अथणी, पहिली आवृत्ती, १९५८

२१. **भाऊसाहेबमहाराज उमदीकर यांची जावक पत्रे व टिपणे**, निंबाळ आश्रम, निंबाळ, १९५९

२२. **मंगळवेढेकर अल्पपरिचय**, रा. गो. केळकर, सांगली, शके १८६२

२३. **रामपाठ**, गो. अ. केळकर, सांगली, आवृत्ती २ री, १९६३

२४. **लाईफस्केच ऑफ संत तात्यासाहेब कोटणीस**, ए. एन. कोटणीस, सांगली, १९६३

२५. **वायुलहरी**, दासराम, सांगली, १९६९

२६. **सन्मार्गदीप**, समर्थभक्त, चिमड, १९३३

२७. **सिद्धगिरिसंदेश त्रैमासिक**, मुंबई

२८. सिद्धस्तुती, (दासराम), सांगली, १९७७
२९. स्वतिश्री मासिक, फेब्रुवारी व नोव्हेंबर, १९८२
३०. हंस साप्ताहिक, सातारा, १८-११-१९४३, ०२-१२-१९४३, १६-१२-१९४३
३१. हणमंतरावजी कोटणीस यांचे चरित्र, साधुदास, सांगली, १९३७
३२. हनुमद्गुरुचरित्रबोधसार, गो. म. केळकर, सांगली, १९३७
३३. ज्ञानदेवतेहत्तिशी, दासराम, सांगली, १९५२
३४. ज्ञानदेवमुद्राप्रकाश, दासराम, मुंबई, १९६८
३५. ज्ञानेश्वरकृत दत्तस्तुती, दासराम, सांगली, १९७१
३६. ज्ञानेश्वरकृत नमनस्तोत्र, दासराम, सांगली, आवृत्ती पहिली, १९७२
३७. ज्ञानेश्वरस्तोत्र, दासराम, सांगली, १९७५
३८. ज्ञानेश्वरी-चिंतनस्तोत्र व ज्ञानेश्वरी - संकीर्तनस्तोत्र, दासराम, सांगली, १९७४

▲▲▲

प्रकरण १५

# चिमड संप्रदायातील तत्त्वज्ञान, साधन व साक्षात्कारानुभव

चिमड संप्रदायाची मूळपीठिका ही रेवणसिद्ध, मरुळसिद्ध व काडसिद्ध या सिद्धांच्या सिद्ध संप्रदायामध्ये आहे. या संप्रदायाची थोर परंपरा लाभलेले एक श्रेष्ठ संत श्रीदादामहाराज केळकर सध्या सांगलीत आहेत. त्यांनी मामामहाराज केळकर 'दीपलक्ष्मी' मासिक विशेषांक यामध्ये 'सिद्ध संप्रदाय व त्यांची परंपरा' आणि 'सहजयोगदर्शन' या प्रासंगिक अंकात 'चिमड संप्रदाय' असे दोन लेख लिहून या संप्रदायातील तत्त्वज्ञान व साधनप्रणाली यांचा संक्षिप्त आढावा घेतलेला आहे. त्या दोन लेखांच्या आधाराने व या संप्रदायातील सत्पुरुषांच्या प्रकाशित साहित्याच्या आधारे, आता या प्रकरणात चिमड संप्रदायात अभिप्रेत असणारे तत्त्वज्ञान, आचार, साधन, साध्य व साक्षात्कारानुभव यांची नोंद केलेली आहे. तसे करताना ज्या सत्पुरुषांची वचने अभिप्रेत आहेत, त्यांची नावे कंसात केवळ आद्याक्षराने दिली आहेत. उदा. - रे = रेवणसिद्ध, निं = निंबरगीकरमहाराज, निंगु = निंबरगीकरमहाराजांनी दिलेली गुरुलिंगप्रसादगीता, चि = चिमडमहाराज, ना = नारायणरावमहाराज यरगट्टीकर, दा = दादामहाराज केळकर, बा = बाबूरावमहाराज कोटणीस, मा = मामामहाराज केळकर, ता = तात्यासाहेबमहाराज कोटणीस.

### ✦ अद्वैतसिद्धी हे साध्य

रेवणसिद्धादी सिद्धत्रयीचा सिद्ध संप्रदाय भगवान शंकरापासून सुरू झाला. शंकर हे अद्वैत तत्त्वज्ञानाचे उद्गाते व पुरस्कर्ते आहेत. साहजिकच चिमड संप्रदायाला अद्वैताचे तत्त्वज्ञान मान्य आहे. त्यातील मुख्य कल्पना अशी :- विश्वाच्या बुडाशी एकच एक असे चेतन तत्त्व आहे. त्यातूनच विश्वाचा पसारा दृश्यमान झाला आहे. या विश्वात वावरणारा जीव मुळात मूळतत्त्वरूप आहे. पण याचा त्याला विसर पडला आहे. पण ती गोष्ट सद्गुरूंचेकडून जाणून घेऊन, त्यांनी सांगितलेली साधना जीवाने केली, तर त्याला त्याचे मूळ रूप प्राप्त होते; तेच जीवनाचे साध्य आहे. साधन साधू लागले की चैतन्याचे नाना प्रकारचे अनुभव त्याला येतात व शेवटी त्याला अद्वैतसिद्धी मिळते. ही अद्वैतसिद्धी साधणे हे जीवाचे ध्येय आहे, अशी चिमड संप्रदायाला मान्य असणारी भूमिका आहे.

### ✦ स्वरूप संप्रदाय

चिमड संप्रदाय हा स्वरूप संप्रदाय आहे. स्वरूप संप्रदाय म्हणजे काय, हे सांगताना दादामहाराज केळकर म्हणतात, 'ज्यात स्वरूपाचा रोकडा साक्षात्कार होतो आणि साक्षात्काराने उपासना साधून साक्षात्कारी जीवन व्यतीत करता येते, अखिल विश्व म्हणजे ईश्वराचे साक्षात्कारी स्वरूपातून घडलेला एक सहज चमत्कार आहे हे प्रतीत होते' त्याला स्वरूप संप्रदाय म्हणतात. चैतन्य हे जीवाचे स्वरूप आहे; त्याचा साक्षात्कार होणे म्हणजे स्वरूपाचा साक्षात्कार होणे. म्हणून 'चैतन्याने चैतन्याचे द्वारा, चैतन्याशी तादात्म्य साधून सदैव चैतन्याची अनुभूती घेणे हीच स्वरूपस्थिती आहे. या स्वरूपस्थितीचा साक्षात्कार सद्‌गुरूंच्या कृपेने ज्या संप्रदायात होतो, तो स्वरूप संप्रदाय होय' (दा). 'चैतन्य किंवा स्वरूप हे स्वत:सिद्ध आहे. त्याच्या सत्तेने विश्व दिसते. विश्वामुळे सिद्धवस्तू सिद्ध होत नाही. स्वरूपाजवळ आपण सिद्ध म्हणजे कटिबद्ध झालो, तर ते स्वरूप सिद्ध होते, हे ज्या संप्रदायात दाखविले जाते, तो स्वरूप संप्रदाय होय' (दा) आणि 'स्वरूप कळल्यावर सर्व विश्वात एक स्वरूपस्थितीच दिसते, हे स्पष्ट करून सांगणारा स्वरूप संप्रदाय आहे' (दा).

स्वरूप म्हणजे जीवाचे मूळ अथवा स्वरूप. वर्तमान जीवनात जीव हा अज्ञानी एकदेशी, कर्माची बरीवाईट फळे भोगणारा, नवीन कर्मे करणारा, देहाला आत्मा मानणारा व त्याअंती सुखी-दु:खी होणारा असा दिसतो. पण त्याचे खरे स्वरूप नाही. स्व म्हणजे आत्मा; त्याचे रूप ते स्वरूप, म्हणजे आत्मरूप होय. आत्मा हा सच्चिदानंद आहे. जीवाने आत्मरूप होणे म्हणजे सच्चिदानंदरूप होणे आहे. सच्चिदानंदरूप होणे म्हणजे स्वरूपाचा साक्षात्कार करून घेणे. जीवाला आत्मस्वरूपाची प्राप्ती झाली की त्याची स्वरूपसिद्धी झाली.

आता, जीव आत्मरूप वा ब्रह्मरूप अथवा सच्चिदानंदरूप आहे, असे ऐकून किंवा म्हणून स्वरूपसिद्धी होत नाही. त्यासाठी काही विशिष्ट साधनाचा अभ्यास करावा लागतो. हे साधन सद्‌गुरू सांगतात. म्हणून सद्‌गुरूंच्या आदेशानुसार विशिष्ट साधनाने जीवाला स्वरूपाचा साक्षात्कार ज्यामध्ये करून दिला जातो, तो स्वरूप संप्रदाय होय. स्वरूपाचा साक्षात्कार हे साध्य व त्यासाठी आवश्यक ते साधन ज्या संप्रदायात आहे, तो स्वरूप संप्रदाय होय.

स्वरूप संप्रदायात स्वरूपसिद्धी हे ध्येय असल्याने, येथे चमत्कारांना फारसे महत्त्व नाही. स्वरूप संप्रदायातही चमत्कार घडतात; ते ईश्वराच्या अथवा गुरूच्या सामर्थ्याने घडतात. पण ते आनुषंगिक आहेत. तसेच या संप्रदायात प्रसिद्धीलाही फारसे

महत्त्व दिले जात नाही. तर सततच्या अभ्यासाने साधन साधून स्वरूपसाक्षात्कार करून घेऊन त्यातच रमून जाणे, हेच या स्वरूप संप्रदायात सारभूत आहे.

## ✦ गुरुसंप्रदाय

चिमड संप्रदाय हा गुरु-संप्रदाय आहे. म्हणजे येथे गुरू अगर सद्‌गुरू हा अत्यंत महत्त्वाचा आहे. सद्‌गुरू देहधारी दिसले, तरी शरीर हे त्यांचे खरे स्वरूप नव्हे. गुरू म्हणजे साक्षात परब्रह्म ही भूमिका येथे आहे. सच्चिदानंदस्वरूप हे गुरूचे खरे स्वरूप आहे. 'सद्‌गुरूचे वर्णन श्रुती, स्मृती, शेष व वागीश्वरी हे आजपर्यंत पुरे करू शकले नाहीत. गुरूपेक्षा श्रेष्ठ कोणीही नाही. गुरूजवळ कर्तुं, अकर्तुं व अन्यथा कर्तुं शक्ती आहे' (चि). 'म्हणून गुरूचा महिमा वर्णन करता येत नाही' (मा). सद्‌गुरूचा शोध करून त्याचे पदीं शरण जाऊन व तेथे मन जडवून त्यांचेकडून साधन समजून घ्यावे लागते. 'सद्‌गुरुविना खरे साधन कळत नाही; सद्‌गुरूशिवाय आत्मसाक्षात्काराचा रस्ता उमजत नाही' (दा). 'ब्रह्मदर्शन होण्यास संप्रदायातील गुरुपरंपरेने आलेले साधन करावे लागते' (रे). पण एवढ्यातच सद्‌गुरूचे महत्त्व संपत नाही. सद्‌गुरूशिवाय परमार्थातील वाटचाल सुरूच होत नाही; परमार्थातील प्रगतीही सद्‌गरुकृपेनेच होते. सद्‌गुरुकृपेनेच साधनाचा आचार घडतो आणि सद्‌गुरूंनी सांगितलेले साधन केल्यानेच सद्‌गुरूची कृपा होते; असा परस्पर-आश्रय येथे आहे. सद्‌गुरूंची कृपा द्रव्याने, सत्तीने वगैरे गोष्टींनी होत नाही. 'कृपा करणे हे सद्‌गुरूंच्या अधीन आहे. ते केवळ त्यांच्या इच्छेवरच अवलंबून आहे' (ना). 'म्हणून गुरुनामी सोय धरणे, हाच तरणोपाय आहे. गुरुनामाने भक्त पूर्णकाम होतो '(मा). म्हणून असेही सांगितले जाते - 'सद्‌गुरुकृपेविना ब्रह्माचे खरे स्वरूप कळत नाही' (रे). 'सद्‌गुरूशिवाय देवाची भेट होत नाही; गुरुकृपेनेच स्वरूपाचा साक्षात्कार होतो' (मा). 'सद्‌गुरू आत्मरूप प्रगट करतात; सद्‌गुरूशिवाय आत्मदर्शन होत नाही '(दा). संक्षेपाने सांगायचे झाल्यास, *'गुरुकृपा गुरुकिल्ली । नेई ब्रह्माचे महाली ॥'* (मा).

## ✦ तत्त्वज्ञान

चिमड संप्रदायाला मान्य असणारे तत्त्वज्ञान हे अद्वैताचे तत्त्वज्ञान आहे. ते पुढीलप्रमाणे सांगता येते.

## ✦ अंतिम तत्त्व

विश्वाच्या मुळाशी एक मूलभूत असे तत्त्व आहे. त्याला आत्मा, परमात्मा, ईश्वर, परमेश्वर, चैतन्य, चिद्‌वायू, वस्तू, आत्मवस्तू, शिव, हरी, ब्रह्म वा परब्रह्म

यांतील कोणतेही नाव देता येईल. अस्तित्व हेच परमात्म्याचे स्वरूप आहे. परमात्मा हे स्वयंप्रकाशी तत्त्व आहे. तोच सिद्धवस्तू आहे. आत्मा हा नित्य, स्वयंपूर्ण आहे; तो सच्चिदानंद आहे. आत्मवस्तू ही स्वत:सिद्ध आहे. ती कोणत्याही अन्य प्रमाणाने सिद्ध करता येत नाही. 'ब्रह्म हे कोठून आलेले वा झालेले नाही; ते स्वयंसिद्ध आहे'(निंगु). 'आत्मा नि:शब्द व निश्चळ आहे' (दा). 'आत्मा म्हणजे पंचमहाभूते, इंद्रिये, शरीर वगैरे नाही. आत्मा नाही अशी जागाच नाही. तो सर्वव्यापक आहे. त्याला रंग, रूप, आकार, इत्यादी नाही. त्याला उत्पत्ती नाही म्हणून लयही नाही. तो अज आणि अविनाशी आहे. तो निर्विकल्प, सूक्ष्म, निष्कळ, निर्गुण आणि निरंजन आहे '(ता).

## ✦ विश्वोत्पत्ती

विश्वाची उत्पत्ती आणि लय हा चैतन्याचा खेळ आहे. विश्वोत्त्पतीची प्रक्रिया पुढीलप्रमाणे सांगितली गेली आहे - 'सच्चिदानंदवायुस्वरूपी परमात्म्यापासून दोन लहरी उत्पन्न होतात. त्यांतील एक उष्ण असते व दुसरी शीत असते. या लहरींच्या प्रवाहामध्ये जी पोकळी होते, तिला चिदाकाश म्हणतात. या चिदाकाशातून प्रस्फुट गगन निर्माण होते. नंतर या प्रस्फुट गगनापासून भूताकाश, वायू, तेज, जल, इत्यादी क्रमाने सृष्टीची उत्पत्ती होते'(दा).

'हे विश्व सातत्याने बदलत असते. म्हणूनच त्याला प्राय: मिथ्या असे म्हटले जाते' (दा). विश्व मिथ्या असले तरी, आत्मा मिथ्या नाही; तो एकमेव सत्य आहे. कधी कधी असेही म्हटले जाते, 'विश्वाच्या उत्पत्तीला कर्ता असा कोणी नाही. ती (उत्पत्ती) हरीच्या ठिकाणी कल्पनेने निर्माण झाली आहे ' (निंगु). त्यामुळे 'ती (उत्पत्ती) आहे तवर आहे; विश्व असून नसल्यात जमा आहे. म्हणून हे विश्व म्हणजे काही नाही' (निंगु) असेही म्हटले जाते.

## ✦ जीव

'विश्वात वावरणारा जीव हा मुळातच ब्रह्मस्वरूप आहे. तो विश्वातील गंमत पाहण्यास म्हणून गेला, तो तेथेच अडकून बसला ' (दा). अहंकार, वासना आणि कर्म यांच्यामुळे तो संसारात गुरफटला जाऊन, स्वत:चे खरे स्वरूप विसरून, एकदेशी होऊन, देहाला आत्मा समजून, दृश्यातच सुख आहे असे मानून, बाह्य विषयांतून सुख घेण्याचा प्रयत्न करू लागला. पण त्यामुळे त्याचे सुख कमी होऊन दु:ख मात्र वाढतच गेले. चालू जीवनात सहा विकारांच्या अधीन होऊन, इंद्रिये व मन यांना सैल सोडून, तो मी-मला-माझे करीत सुखदु:खाचे गोते खाऊ लागला. तो संसार व व्यवहार यांतून सुटेना. पण देह व दृश्य हे कधीतरी संपणारे आहेत. त्यामुळे त्यांचेमागे लागून त्याला

खरे सुखसमाधान मिळेनासे झाले आहे' (दा). त्याला स्व-चा म्हणजे स्वरूपाचा विसर पडला आहे. खरे म्हणजे 'सर्व विश्व आत्मा या सिद्धवस्तूच्या केंद्राभोवती फिरत आहे; 'तिच्यामुळेच दृश्य जगाची जाणीव होते, देहाची जाणीव होते. आत्म्यामुळेच सर्व काही आहे आणि नाही' (दा). या सर्वांचा जीवाला विसर पडला आहे.

वरील विवेचनात पुढील दोन गोष्टी अध्याहृत आहेत -

१. 'मानवी जीवन हे साक्षात्कारी जीवन असून, साक्षात्कार संपादन करून, साक्षात्कारी जीवनाचे अनुपमेय सुख जीवाने यावज्जन्म उपभोगणे, हा त्याचा मूलभूत हक्क आहे व तो त्याने संपादन करून घ्यावयास हवा' (दा).

२. 'साक्षात्कारानेच जीवनाला सुरुवात होते. तेव्हा अंतही त्यातच व्हावयास हवा आणि दोहोंमधले जीवन हेही साक्षात्कारानेच सुखी व समृद्ध व्हावयास हवे. जीवन हे मौजमजा, भोग यांसाठी नसून, जीवाने स्वत:मध्ये स्व-रूपाचा साक्षात्कार करून घ्यावा म्हणून आहे' (दा).

'चैतन्य हेच जीवाचे जीवन आहे. अन्न, वस्त्र, पाणी, हवा, इत्यादी गोष्टी जीवनाला पूरक व आवश्यक आहेत, पण त्या वस्तू म्हणजे जीवन नव्हे' (दा). 'साक्षात्कारी जीवन हेच परमार्थी जीवन; ते निरहंकारी असते; आपल्या शरीरात असणारी सिद्ध अशी आत्मवस्तू हेच आपले खरे जीवन आहे' (दा). जीव हा आत्मस्वरूप आहे. अहंकार व स्वरूपाचा विसर या गोष्टी दूर झाल्याशिवाय जीवाला आपले खरे स्वरूप कळून येत नाही. म्हणजे त्याला आत्मसाक्षात्कार होत नाही. आत्मसाक्षात्कार म्हणजे सिद्ध अशी आत्मवस्तू होऊन राहणे आहे. 'अहंकाराच्या निरासाने आत्मसाक्षात्कार होणार आहे. अहंकाराचा लय झाला की सिद्धवस्तू प्रगटून संसारच परमार्थरूप होणार आहे' (दा). जीवाला स्व-रूप कळले, तरच तो कायमचा सुखी होणार आहे. 'जीव जर 'स्व' मध्ये स्वस्थ झाला, तर त्याचा अस्वस्थपणा दूर होऊन तो नित्यसुखी होतो. स्व या सिद्ध आत्मवस्तूत सर्व सुखे आहेत. स्वरूपानुसंधान लागल्यावर काही पाहिजे असे उरत नाही. आत्मस्वरूपानुसंधानाने सिद्धवस्तू होऊन जाणारा जीव सर्वसुखी होतो' (दा).

### ✦ शब्दज्ञान निरुपयोगी

वरील वस्तुस्थिती जीवाला नुसती सांगितली अथवा त्याला ती ग्रंथवाचनाने कळली, तर त्याला शब्दज्ञान होईल, पण त्याने समाधान होणार नाही. साखर गोड आहे हे कळल्याने साखरेची चव प्रत्यक्ष समजत नाही. केवळ शब्दज्ञानाने जीव स्वस्वरूप होत नाही. स्वरूपस्थिती साधण्यास काही विशिष्ट प्रक्रियेने 'सभोवतालचे दृश्य व देह यांना बाजूला सारून व अंतर्मुख होऊन, देहातील आत्मा या सिद्धवस्तुसन्निध जीवाने

सिद्ध व्हावयास हवे' (दा). आणि तसे होण्यास व्यवहारात काही विशिष्ट आचार करून, सद्‌गुरूकडून समजलेले साधन करावयास हवे.

### ✦ आचार

साधकाने कसे वागावे, हे निंबरगीकरमहाराजांनी सविस्तर सांगितले आहे. साधकाने संसारात राहून परमार्थ करावा. विवेकाने प्रपंच करावा. पण परमार्थ टाकून फक्त प्रपंच करू नये.

'संसारात असताना दुसऱ्यास उपद्रव देऊ नये; दुसऱ्यावर आपला भार घालू नये; दुसऱ्याचे वाईट चिंतू नये; दुसऱ्याचे मन दुखवू नये; दुसऱ्यांना दुःख देऊ नये; दुसऱ्यांचा अपमान करू नये; दुसऱ्याची चोरी करू नये; दुसऱ्याशी कपट करू नये; दुसऱ्याला फसवू नये; दुसऱ्यांच्या गोष्टींची इच्छा करू नये. परवस्तू, परस्त्री व परधन घेऊ नये. देवाने आपणास जे दिले आहे, त्यात समाधान मानून राहावे; होईल तितका परोपकार करावा. सर्व प्रकारे सर्वांचे सोसत जावे. आपण तिजके सहन करू, तितके चांगलेच आहे' (निं).

'खोटे बोलू नये. प्रामाणिकपणा सोडू नये. खोटे व लुच्चे यांची संगत धरू नये. चांगल्या माणसांची संगत धरावी' (नि).

'वाईट कृत्य करू नये. आपण वाईट वागलो तर, वाईट होईल; आपण चांगले वागलो, तर चांगलेच होते. दुर्गुण वाढू देऊ नयेत. चिंता करीत उदास होऊ नये. इंद्रिये मागतील ते त्यांना देऊ नये. मनाला सैल सोडले, तर ते घात करते; म्हणून मनावर नियंत्रण ठेवावे. षड्विकार मोडून काढावेत. सद्‌गुण वाढवावेत' (निं).

'अहंकारामुळे अपराध घडतात. अहंकाराने वाईट होते. अहंकार टाकावा. तसेच आळस हा प्रपंच व परमार्थ या दोहोंतही घातक आहे; तो सोडून द्यावा' (निं).

'शुद्ध अन्न सेवन करावे; त्याचे आचारविचारांची शुद्धी होते. धनाने मद येतो; म्हणून धनाचा मोह नको. गर्वाने अपाय होतो; तो गळला पाहिजे. विषयांची आशा व आसक्ती सुटावयास हवी' (मा).

'सद्‌गुरुचरणी भाव, निष्ठा पाहिजे; गुर्वाज्ञेप्रमाणे वागले पाहिजे' (मा). 'संसार करताना सद्‌गुरूंनी सांगितलेले नाम सतत घ्यावे' (निं). 'परमार्थ आचरण्याचा निर्धार हवा' (मा).

'आपल्या मनातील काळजीने काही होत नाही. म्हणून त्रिगुणी पदार्थांची चिंता सोडून आत्म्याची चिंता करावी. काम करतानाही आत्म्याला विसरू नये. आत्म्याचे

ध्यान करीत, आत्म्याचे रूप पाहात संसार करावा. कोणतीही गोष्ट देवाच्या मनाप्रमाणे होऊ दे, असे म्हणावे' (निं). 'भगवंत सर्वकर्ता असल्याने तो करील, ते चांगलेच असते, अशी भावना ठेवावी' (मा).

## ✦ आत्मसाक्षात्कार कुठे होतो ?

आत्मा या सिद्धवस्तूच्या साक्षात्काराविना जीवाला सततचे सुख, समाधान व शांती हस्तगत होत नाहीत. आता, आत्मा सर्वत्र आहे हे खरे; पण त्याचा साक्षात्कार प्रथम आपल्या देहात करून घ्यावयास हवा. आत्मस्वरूप या शरीरात खेळत आहे. 'ते रामकृष्ण-गतीत संथ झाले असून तेथेच ते आनंदरूपाने प्रगट होते. चिदाकाशात म्हणजे रामकृष्ण-तत्त्वांचे पोकळीत परिपूर्ण ब्रह्म दिसते. अंतर्मुख होऊन नादबिंदुरूपाने आत्म्याला पाहावयाचे आहे' (निंगु). 'साधन करताना दिसणारा प्रकाश म्हणजेच आत्मा. शरीरात आत्मा नादरूपाने आणि प्रकाशरूपाने प्रतीतीस येतो. आत्म्याला पाहणे किंवा आत्मदर्शन म्हणजे नाद, बिंदू, कला व ज्योती या चार प्रकारांनी आत्म्याचा अनुभव घेणे; त्यापलीकडे आत्मसाक्षात्कार निराळा नाही' (दा).

## ✦ साधनाचे सामान्य स्वरूप

आत्मा या सिद्धवस्तूच्या साक्षात्काराचे साधन साधकांना सांगण्याचे कार्य चिमड संप्रदायातील सिद्धसाधूंनी केले व आजही ते करीत आहेत.

चिमड संप्रदायातील साधन म्हणजे सहजयोग आहे आणि 'सहजयोग हा ब्रह्मकपाटीचा मार्ग आहे. सोहंचे सूत्र धरून आधारापासून सहस्रदळस्थानापर्यंत पोचणे हा मार्ग आहे. प्राणाचा व मनाचा एक लय झाला की पवनसिद्धी साधते. मग प्राणगती अंतर्मुख होऊन ती आधारचक्रापासून दशमद्वारातून ब्रह्मभवनापर्यंत जाते' (दा). यालाच चिमडमहाराजांनी *'आकाशातूनि वाट'* असे म्हटले आहे.

आत्मा स्वस्थ आहे. म्हणून 'त्याला पाहण्यास स्वस्थचित्त व्हावे लागते' (निंगु). 'स्वस्थपणाने सिद्धवस्तूजवळ आपण उपस्थित राहून तादात्म्य होण्याचा अभ्यास म्हणजेच साधन' (दा). 'आत्मा हा सुरुवातीस अलक्ष्य असतो. अलक्ष्यावरच लक्ष ठेवणे म्हणजे साधन' (दा). नेहमीच्या जीवनात जीवाची ओढ बाह्य वस्तूंकडे, जडाकडे असते. 'जडाकडे असलेली ओढ चैतन्याकडे वळविणे म्हणजे साधन' (दा). संक्षेपाने सांगायचे झाल्यास, 'फक्त चैतन्याचे ज्ञान व भान ठेवणे म्हणजे साधन करणे. साधन करणे म्हणजे फक्त चैतन्य ठेवणे' (दा).

हे साधन होण्यास उत्कट इच्छा व तळमळ लागते. साधन हा नैमित्तिक अभ्यास

नाही. साधन म्हणजे सततचा अभ्यास आहे. साधनाला सुट्टी नाही. सिद्धपदवी मिळाली, तरी साधन संपत नाही. शरीरात जीवन आहे, तोपर्यंत साधन चालू राहिले पाहिजे.

### ✦ नाम-साधन

नामाशिवाय साक्षात्कार अथवा जीव-शिवांचे ऐक्य होत नसल्याने सद्‌गुरू नामाचे साधन सांगतात. पण या नामाचे स्वरूप आपण जसे बाह्यतः समजतो, तसे नाही. हे नाम वेगळ्याच स्वरूपाचे आहे.

नाम तेच रूप आहे. नाम म्हणजे चैतन्य. चैतन्य म्हणजे आपले जीवन असे असल्याने, 'नाम आपल्या जीवनाशी निगडित आहे. ॐकाराची गती म्हणजे आपले जीवन. प्राणापानाच्या गतीवर जीवन आहे. आपल्या जीवनाच्या गतीत नाम आहे. हे नाम वायु-गति-रूप आहे. नाम हे श्वास व उच्छ्वास यांच्या संधिकाळात आहे. ते नाम साधावयाचे आहे' (दा). 'आपल्या शरीरात नामाचा घोष होत आहे. नामाचा नाद देहात घुमत आहे. नाम म्हणजे नाद. देहात उमटतेच आहे; ते ऐकावयाचे आहे व ते ऐकता ऐकता त्याच्याशी तादात्म्य होणे, हेच नामस्मरण होय. नामात लय साधला की जीव ब्रह्मरूप होतो' (दा). कारण नाम हेच ब्रह्म आहे.

नामसाधन वायूशी संबंधित आहे; ते प्राणाशी संबंधित आहे. त्यामुळे नामसाधना म्हणजे प्राणोपासना आहे. नाम ही वायूची गती आहे. जेथे गती असते, तेथे नाद असतो. म्हणून नाम हे नादरूप आहे. नामाचा शरीरात उमटणारा नाद हाच अनाहत नाद आहे. 'चंचल मनास एकाग्र करून अनाहत नादात विरून जावयाचे आहे '(रे). 'वायुगतीचा पूर्ण निरोध झाल्यावर चार देहातीत असलेली चित्प्रभा दिसते '(निंगु).

वरील भाग वेगळ्या शब्दांत पुढीलप्रमाणे सांगता येईल :- 'शरीरात जेथे नामाचा घोष होत आहे, तेथे लक्ष लावावयाचे आहे. नीट पाहिले, तर कळून येते की, शरीरात खेळणाऱ्या पवनात हरिनाद घुमत आहे. तेच सहजनाम आहे. हा सहजनामजप रोज एकवीस हजार सहाशे इतका होत असतो. त्या नामाच्या वाऱ्यावर नजर लागली व प्राणापानात मनाचे मीलन झाले की देहभावाचा विसर पडतो, अहंकार दूर होतो व सर्वत्र परमेश्वर दिसू लागून परमार्थ पूर्ण होतो. प्राणाचा व मनाचा एक लय झाला की पवनसिद्धी प्राप्त होते; प्राणाची गती ऊर्ध्वमुख होते. पवनसिद्धी प्राप्त झाली की आत्माराम प्रगट होतो व आत्मदर्शनाने आपण आत्मरूप होऊन जातो'(दा).

### ✦ साक्षात्कारानुभव

नामसाधन जसजसे जमू लागते, तसे तसे परमार्थातील नाना प्रकारचे अनुभव येऊ लागतात. चैतन्य हे जरी मुख्यतः नाद-प्रकाश-रूपाने अनुभवास येते, तरी चैतन्याचे

अन्य काही अनुभव चिमड संप्रदायातील साधुसंतांनी सांगितलेले आहेत. त्यांचे मते, स्वाद, सुवास, विशिष्ट दृश्य किंवा रूप, नाद व प्रकाश या रूपांनी चैतन्याची अनुभूती येते.

### ✦ रसानुभव

मधुर अशा स्वादरूपातील अनुभव पुढीलप्रमाणे सांगितलेला आहे - *'जहाला मस्तकी कैचा हा उबारा। स्रवते शर्करा मुखामाजी ॥'* (दा). तसेच *'चौदेहाचे पैल शून्याचा शेवट। स्रवे जेथे नीट अमृतधारा॥'* (दा). ही अमृतधारा चाखणे म्हणजे निज-गोडी चाखणे आहे; ती चाखल्यावर बाकी सर्व व्यर्थ आहे (*अमृताची धारा चाखिली निज-गोडी। येर ती वावडी सर्व आम्हा॥*(दा)).

### ✦ सुवासाचा अनुभव

सुवास अथवा सुगंध याचा अनुभव असा सांगितला जातो - साधन करीत असताना, *'जरी बंद होय ऐसा हा निःश्वास। दरवळे सुवास चहू ठायी॥'* (दा). तसेच *'प्रकाशस्वरूपी देवळामाझारी। उंबरठ्याचे अंतरी सुवास गा॥'* (दा). हा सुवास फुलाशिवाय असतो - *'प्रणवाचे पोटी देखिजे सुनील। सुगंध परिमळ पुष्पाविणे॥'* (दा), तर कधी *'कस्तुरीचा घमघमाट। अनुभवासी येतसे॥'* (दा).

### ✦ विशिष्ट रूप अथवा दृश्य :

अनेकदा विशिष्ट प्रकारची रूपे वा दृश्ये अनुभवाला येतात - कधी नागाचे रूप दिसते (*झणी नागरूपे पुढे डोलताहे।* (ता)). कधी मोती, चांदणी, मोत्यांचा चूर, माणकांचे घोस, नवरत्नांची खाण इत्यादी दृष्टीस पडतात -

*मग पहाता दिसती मोती। माणिकांचे घोस लोंबले। मोतीचूर फेकियेले॥*
*मग पहाता दिसेल चांदणी। आणि नवरत्नांची खाणी॥'* (दा)

कधी सूर्य, चंद्र, तारे दृश्यमान होतात (*दिवसा पहाव्या तारा रे। रात्री रवीचा फेरा रे॥* (चि); *सूर्यचंद्रगोल हिरे रत्ननीळ। जडित विशाल किरीट ते॥* (दा); *पहा व्योमगर्भांतरी दिव्य तारे* (ता); *तारे चकाकती आनंद तो किती। किरण फाकिती चोहोकडे॥* (दा)). कधी *'दिसला तेजोगोल'*(बा) आणि *'तो इकडे शुभ्र पाणी। लाटाच उठती॥'*(बा). तर कधी *'रत्नगोल चेंडू उडे'*(बा). आकाशात दिव्य राममूर्ती दिसते (*बिंदु तो फुटता प्रभा ती पडली। तयात सावळी राममूर्ति॥ किरीटी असे सुवर्ण लखलखीत। ऐसी आकाशात दिव्यमूर्ती॥ तेजःपुंज रामप्रभु दिसे पाही ॥* (दा)). तर कधी *'हरिहराच्या मूर्ती पाहे बिंदुमध्ये दिसती'* (ता). कधी विजांचा चमचमाट तर

कधी विविध रंग दिसतात *(तये प्रभेमाजी विजा झगमगती ।। रंग उसळती नाना ज्योती ।।* (दा)). तर कधी *हंस गगनीच्या मुक्तामाळा देई आणुनी हाती । अगणित तारे त्यात चमकती नाना रंगज्योती ।।'* (ता) असा प्रकार होतो.

### ✦ नादाचा अनुभव

वर म्हटल्याप्रमाणे नाद, बिंदू, कला व ज्योती या रूपाने चैतन्याचा साक्षात्कार साधकाला होत असतो. त्यांपैकी नादाचे अनुभव असे - घंटा, किंकिणी, सिंह, शंख, भेरी इत्यादींच्या नादाप्रमाणे नाद ऐकू येतात *(घंटा-किंकिणी-नादं सिंहं शंखं नादं । भेर्यादिक-महानादं* (चि)). *कधी 'धो धो नौबती वाजती चौघडा । वाजतसे पुढा महाद्वारी ।। घणघण घंटानाद होतसे अंबरी । मेघनाद भारी होय तेथे ।।'* (दा).

### ✦ बिंदूचे अनुभव

या संदर्भात पुढील अवतरणे पाहा - *प्रथमारंभी ब्रह्मबिंदु तो दृष्टीपुढे दिसला । बिंदु पहाता तयापासुनि सिंधु पुढे झाला ।।* (ता)

***'लक्ष्यामाजी नीलबिंदूचे दर्शन । अलक्ष्यी गगन बुडाले ।।***
***लख प्रकाशात नीलबिंदु दिसे । प्रभा फाकलीसे चहुकडे ।।***
***एकदम रे पाही अंधकार झाला । बिंदु तो फुटला तयामाजी ।।***
***पुढे नीलबिंदु लखलखाट होय । तेज न समाये गगनोदरी ।।***
***टाळूचिये उपरी विवरामाझारी । रेणु फिरे भारी अतिसूक्ष्म ।।***
***असे लखलखीत कैसा तेजोबिंदु । भेटवी अगाधू परमात्मा ।।'*** (दा)

### ✦ ज्योतीचा अनुभव

ज्योतीचा अनुभव पुढीलप्रमाणे वर्णिलेला आहे-

***'स्वयंसिद्ध ज्योती तेज निरंजन । प्रसाद हा पूर्ण विज्ञानाचा ।***
***लागताचि उन्मनी ज्योति । आत्मरूप येई हाती ।।***
***सकारहकाराची स्थिती । प्राप्त होता पेटे ज्योति ।।'*** (दा)

### ✦ प्रकाशाचा अनुभव

कला हा प्रकाशाचा अनुभव आहे. पीत, शुभ्र, ताम्र, नील, धवल, श्याम रंगांचे प्रकाश दिसतात ( *पीतं शुभ्रं ताम्रं नीलं धवलं श्यामं अभिनवनवरंगं ।* (चि)). नामाचा बिंदू घडला की तो *'अंतर बाहेर प्रकाशे स्वये'* (दा). आकाशाला दिपवील असा तेजोराशी दिसतो ( *दिव्य तेजोराशी नवल ते प्रभा । दिपविले नभा स्वप्रकाशे ।* (दा)). कधी ' *तेजाचा बंबाळा धावोनिया आला । पश्चिमेसी ठाकला तेजोमेरू ।* (सा).

सहस्रदळकमळस्थानी *'श्यामवर्ण हा नील दिसतो'*(दा).

चैतन्याचे अनुभव घेत घेत, शेवटी *'अणुरूप ब्रह्म प्रचीतीसी येता। जीवात्म ऐक्यता सहजेचि।'*(दा) प्राप्त होते. आणि *'जीवशिवाची ऐक्यता। तेथे मोक्ष रे सर्वथा।'* (दा). अशी स्थिती आहे. 'जीवशिवांचे ऐक्य साधणे हीच परमार्थातील परमोच्च पदवी आहे' (दा). ते साध्य झाले की मानवी जीवनाचे सार्थक झाले.

●●●

## प्रकरण १५ : संदर्भसूची


१. **अमृतवाणी**, प्र. - रा. गो. केळकर, सांगली, १९८१

२. **कैवल्यकुंज**, र. ह. कोटणीस, सांगली, १९६८

३. **कैवल्यप्रसाद**, प्र. - ह. र. आणि पां. र. कोटणीस, सांगली, १९५९

४. **कैवल्यबोध**, र. ह. कोटणीस, सांगली, १९२५

५. **चिमडसंप्रदाय**, सहजयोगदर्शन अंक, सांगली, १९८३

६. **गुरुलिंगप्रसादगीता**, प्र. - वासुदेवराव जोशी, माधवनगर, १९५३

७. **दासरामगौरवग्रंथ**, प्र. - धनंजय भावे, सांगली, १९८०

८. **नारायणीय शिष्यप्रबोध**, सं. - व्यं. रा. मोहोळकर, बार्शी

९. **वायुलहरी**, दासराम, सांगली, १९६९

१०. **सन्मार्गदीप**, समर्थभक्त, चिमड, १९३३

११. **सिद्धसंप्रदाय व त्याची परंपरा**, मामामहाराज केळकर, 'दीपलक्ष्मी' मासिक विशेषांक, मुंबई, फेब्रुवारी, १९७१

१२. **हणमंतरावजी कोटणीस यांचे चरित्र**, साधुदास, सांगली, १९३७


▲▲▲

## ॥ चिमड संप्रदाय गुरुपरंपरा ॥

चिमड-क्षेत्रीं सद्‌गुरुमाई ।
जगदुद्धारा तिष्ठत राही ॥ध्रु.॥
रघुनाथप्रिय गुरुवर त्राता ।
कैवल्याचा पूर्ण प्रदाता ॥१॥
रामचंद्रप्रभु दीनोद्धर्ता ।
घोर भवाचें शासनकर्ता ॥२॥
मोक्षलक्ष्मी आक्का माउली ।
जन ताराया उभी राहिली ॥३॥
गुरुलिंगजंगम स्वामिकृपेची ।
छाया सर्वां परोपरीची ॥४॥
संसारी जन फिरता श्रमले ।
भवभय वारुनि मुक्तचि केले ॥५॥
हरिनामाची माला दिधली ।
आत्मस्वरूपीं वृत्ति वेधली ॥६॥
स्थावरजंगम भरली पाही ।
दासा दैवत त्याविण नाही ॥७॥

- श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस